# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक – ७

## सभावृत्तांत

दिनांक – १९.०८.२०१७ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे ऑगष्ट-२०१७ ची मा.महापालिका सभा शनिवार दि.१९.०८.२०१७ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे महापौर

२) मा.शैलजा अविनाश मोरे उपमहापौर

३) मा.कुंदन अंबादास गायकवाड

४) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे

५) मा.साधना अंकुश मळेकर

६) मा.दत्तात्रय बाबूराव साने

७) मा.अश्विनी संतोष जाधव

८) मा.सारीका शिवाजी सस्ते

९) मा.राहुल गुलाब जाधव

१०) मा.वसंत प्रभाकर बोराटे

११) मा.बुर्डे सुवर्णा विकास

१२) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)

१३) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

१४) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

१५) मा.उंडे लक्ष्मण धोंडू

१६) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

१७) मा.सागर बाळासाहेब गवळी

१८) मा.गोफणे अनुराधा देविदास

१९) मा.बारसे प्रियांका प्रविण

२०) मा.अजित दामोदर गव्हाणे

२१) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२२) मा.लांडगे सारिका संतोष

२३) मा.लांडगे रवि लक्ष्मण

२४) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२५) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२६) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२७) मा.फुगे भिमाबाई पोपट

२८) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२९) मा.सावळे सिमा रविंद्र

३०) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

३१) मा.लांडे विक्रांत विलास

३२) मा.गीता सुशिल मंचरकर

३३) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३४) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३५) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३६) मा.अनुराधा गणपत गोरखे

३७) मा.केशव हनुमंत घोळवे

३८) मा.मंगला अशोक कदम

३९) मा.तुषार रघुनाथ हिंगे

४०) मा.अश्विनी भिमा बोबडे

४१) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

४२) मा.संजय बबन नेवाळे

४३) मा.एकनाथ रावसाहेब पवार

४४) मा.भालेकर प्रविण महादेव

४५) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४६) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४७) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४८) मा.घोलप कमल अनिल

४९) मा.उत्तम प्रकाश केंदळे

५०) मा.पवळे सुमनताई मधुकर

५१) मा.चिखले सचिन तुकाराम

५२) मा.यादव मीनल विशाल

५३) मा.वैशाली जालिंदर काळभोर

५४) मा.प्रमोद कुटे

५५) मा.राजू मिसाळ

५६) मा.बाबर शर्मिला राजू

५७) मा.अमित राजेंद्र गावडे

५८) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५९) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

६०) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

६१) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

६२) मा.ढाके नामदेव जनार्दन

६३) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

६४) मा.करुणा शेखर चिंचवडे

६५) मा.भोईर सुरेश शिवाजी

६६) मा.अपर्णा निलेश डोके

६७) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६८) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६९) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

७०) मा.जयश्री वसंत गावडे

७१) मा.कोमल दिपक मेवानी

७२) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

७३) मा.सुलक्षणा राजू धर

७४) मा.शाम गणपतराव लांडे

७५) मा.सुजाता सुनिल पालांडे

७६) मा.योगेश मंगलसेन बहल

७७) मा.कदम निकीता अर्जुन

७८) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

७९) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

८०) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

८१) मा.नढे विनोद जयवंत

८२) मा.पाडाळे निता विलास

८३) मा.काळे उषा दिलीप

८४) मा.कोकणे संतोष अंकुश

८५) मा.पवार मनिषा प्रमोद

८६) मा.बारणे अर्चना तानाजी

८७) मा.अभिषेक गोविंद बारणे

८८) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

८९) मा.ॲड.भोसले सचिन सुरेश

९०) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

९१) मा.बारणे माया संतोष

९२) मा.निलेश हिरामण बारणे

९३) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

९४) मा.दर्शले रेखा राजेश

९५) मा.कलाटे राहुल तानाजी

९६) मा.ममता विनायक गायकवाड

९७) मा.कामठे तुषार गजानन

९८) मा.चोंधे आरती सुरेश

९९) मा.कस्पटे संदिप अरुण

१००) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

१०१) मा.सविता बाळकृष्ण खुळे

१०२) मा.सुनिता हेमंत तापकीर

१०३) मा.चंद्रकांत बारकु नखाते

१०४) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१०५) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

१०६) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

१०७) मा.आंगोळकर सागर सुनिल

१०८) मा.लोखंडे चंदा राजू

१०९) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

११०) मा.आशा धायगुडे-शेंडगे

१११) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

११२) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

११३) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

११४) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

११५) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

११६) मा.संतोष बबन कांबळे

११७) मा.सोनवणे शारदा हिरेन

११८) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

११९) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

१२०) मा. वाबळे संजय मल्हारराव

१२१) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

१२२) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

१२३) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१२४) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.श्रावण हर्डीकर- महापालिका आयुक्त, मा.अच्युत हांगे-अतिरिक्त आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय–आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.गावडे-सहआयुक्त, मा.दुधेकर, मा.पठाण-सहशहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.खोत, मा.कडूसकर, मा.दुरगुडे, मा.आष्टीकर, मा.लोणकर, मा.खोरटे, मा.राऊत- सहा.आयुक्त, मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उदयान अधिक्षक, मा.आवारी-प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ), मा.सवणे, मा.इंगळे, मा.तांबे, मा.लडकत, मा.बरशेट्टी, मा.कांबळे - कार्यकारी अभियंता, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------

**मा.महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

अंदाजपत्रकात समावेश नसलेली परंतु करणे आवश्यक असलेली विकास आराखडयातील विकास कामे सन २०१७-२०१८ चे अंदाजपत्रकामध्ये समाविष्ठ करणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

अ) मा.महापालिका सभा क्र-६८ दि. ९/०१/२०१७, दि.२०/०१/२०१७ (दु.१.३० वा.), दि. २०/०२/२०१७ (दु.१.३० वा.), दि.२७/०२/२०१७ (दु.१.३० वा.), दि.२०/०४/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

ब) मा.महापालिका सभा क्र-६९ दि. २०/०१/२०१७ (दु.२.०० वा.) , दि. २०/०२/२०१७ (दु.१.४५ वा.), दि.२७/०२/२०१७ (दु.१.४५ वा.), दि.२०/०४/२०१७ (दु.२.१५ व ४.०० वा.) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

क) मा.महापालिका सभा क्र-७० दि. २०/०२/२०१७ (दु.२.०० वा.), दि.२७/०२/२०१७ (दु.२.०० वा.), दि.२०/०४/२०१७ (दु.२.३० वा.) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

ड) मा.महापालिका सभा क्र-२ दि.२०/०४/२०१७ (दु.१.४५ वा.), दि.२५/०४/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

इ) मा.महापालिका सभा क्र-३ दि.१९/०५/२०१७ (दु.२.०० व २.३५ वा.) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

**मा.राहुल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. बजेटची मिटींग असताना आम्ही या सभागृहात नव्हतो. लोकशाहीचा घात करत असताना आम्हांला वाटले बजेटवर चर्चा झाली नाही म्हणून आम्ही या सभागृहातून बाहेर निघून गेलो. आम्ही बाहेर गेल्यानंतर या सभागृहात पक्षनेत्यानी भाषण केले की, पळपुटे, शिवसेनेचे, राष्ट्रवादीचे नगरसेवक बांगलादेशी. हा असं माग का बोलतो, समोर बोलना म्हणाव. बांगलादेशी कुणाला म्हणतो हा.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर-** राहूलजी कलाटे आताच्या विषयावर बोला बाकीची चर्चा नका करु.

**मा.राहुल कलाटे -** मा.महापौर साहेब, नगरसचिवांना वाचायला सांगा. वाचाना त्याच स्टेटमेंट.

**मा.महापौर-** आता तुम्ही या विषयावर बोला व सभागृहात व्यवस्थित भाषा वापरा.

**मा.राहुल कलाटे -** मा.महापौर साहेब, बांगलादेशी बोलल्यानंतर अशीच भाषा येणार. बांगलादेशी कोणाला म्हणता. समोर बोलाना, बाहेर गेल्यावर काय बोलता.

(सभागृहात गोंधळ)

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, अरेतूरेची भाषा सभागृहाच्या कामकाजाला धरुन नाही.

**मा.महापौर-** हा विषय सभावृत्तांत कायम करण्यासाठी आलेला आहे.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, आपण त्यांना सक्त ताकीद दयावी भाषा अरेतुरेची नको, अवाहनात्मक नको, दादागीरीची भाषा करायची नाही, सभागृहात संसदीय भाषा वापरावी.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर-** ते बांगलादेशी देशी असे बोलले असतीलतर ते शब्द मागे घेतील. राहूल कलाटे तुम्ही सुध्दा शब्द मागे घ्यावेत. दोघानी जे शब्द वापरले ते मागे घ्यावेत.

**मा.राहूल कलाटे -** मा.महापौर साहेब, मी बांगलादेशी सारखे म्हणालो नाही तो बांगलादेशी म्हणाला आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर-** सगळयानी खाली बसावे. दोघांचे शब्द सभाकामकाजातून वगळण्यात येत आहेत. “बांगला देशी पळून” हे शब्द सभावृत्तांतामधुन वगळून सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

फ) विशेष मा.महापालिका सभा क्र-४ दि.१५/०६/२०१७ मध्ये पान क्रमांक १६१ वरील ओळ क्रमांक १८ मधील “बांगला देशी पळून” हे शब्द वगळून विशेष मा.महापालिका सभा क्र-४ दि.१५/०६/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

ग) मा.महापालिका सभा क्र-५ दि.२०/०६/२०१७ (दु.२.०० व २.३५ वा.) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

ह) मा.महापालिका सभा क्र-६ दि.२०/०७/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

**मा केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, जम्मु काश्मीरमध्ये झालेल्या चकमकीमध्ये शहिद झालेले २ जवान, उत्तरप्रदेशमध्ये ऑक्सिजन पुरवठ्या अभावी ७२ बालकांचे निधन, हिमाचल प्रदेशात झालेल्या भुस्खलनामध्ये ४६ जणांचे निधन, तसेच प्रो.यु.आर.राव - इस्त्रोचे माजी अध्यक्ष,भारत अवकाश कार्यक्रमाचे प्रणेते, प्रो.यशपाल - ज्येष्ठ शास्त्रज्ञ, पद्मभुषण डॉ.बद्रिनारायण रामुलाल बारवाले- ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक, उस्ताद सईदउद्दीन डागर- ज्येष्ठ धृपद गायक, सुभाष टकले- पुण्यातील गिर्यारोहक यांचे कारगिल शिखरावरील माउंट नून माहिमेदरम्यान निधन, रघुनाथदादा सातकर - मावळचे माजी आमदार, रुक्मीणी झुंबर लांडगे-

सौ.निर्मला गायकवाड नगरसेविका यांच्या मातोश्री, भगवान आनंदराव लोंढे - सौ.नम्रता लोंढे नगरसेविका यांचे सासरे, ताराबाई रघुनाथ भोईर- सामाजिक कार्यकर्त्या, रांगीबाई धोंडीबा कांबळे - रहाटणी येथील सामाजिक कार्यकर्त्या, दिलिप कुदळे- पिं.चिं.म.न.पा.चे माजी कार्यकारी अभियंता, अलका गणपत भालेकर, हिराबाई गोविंद नखाते, किसन गणपत यनपुरे यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.ज्ञानदेव थोरात –** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर-** सर्वांनी श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.नगरसचिव-** मा.भाऊसाहेब भोईर नगरसदस्य यांना विचारावयाचे प्रश्न.

**मा.महापौर-** मा.भाऊसाहेब भोईर नगरसदस्य यांना विचारावयाचे प्रश्न.

**मा.भाऊसाहेब भोईर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मी जो विषय याठिकाणी मांडलेला आहे त्यासंदर्भात त्या विषयावर बोलण्या अगोदर मागील वर्तमानपत्र वाचले की, मागील सभेला मी उपस्थित नव्हतो तसे मी लेखी पत्राने आपल्याला कळवले होते की मी हजर राहणार नाही. परंतु काही प्रश्ना संदर्भात आपण या सभागृहामध्ये चर्चा करावी अशी मागणी मी केलेली होती. आमचे ज्येष्ठ मार्गदर्शक आदरणीय एकनाथजी पवार साहेब यांनी वक्तव्य केले की भाऊसाहेब भोईर त्याठिकाणी हजर नव्हते. झाली असेल लहान कार्यकत्याची चुक आपण समजून घेतल पाहीजे. आपण मोठे नेते आहात, या शहराचे ज्येष्ठ नेते आहात तुम्ही आता सत्तेच्या माध्यमातून शहराचे मायबाप आहात. आमच्यासारख्या कार्यकर्त्यांचे विचार लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी आपण सभेमध्ये तो विषय घेणं क्रमप्राप्त होतं. परंतु झालेली चुक जरी असलीतरी माझा विषय झाल्यानंतर आणि सभेच्या विषयांच कामकाज संपल्यानंतर जो शहरामधील अत्यंत ज्वलंत आणि भावनात्मक प्रश्न निर्माण झालेला आहे, रिंगरोडच्या संदर्भात त्यावर आपण चर्चा करावी अशी पुन्हा एकदा मागणी करुन माझ्या मुळ विषयावर चर्चा करतो. याठिकाणी पवना धरणाच्या माध्यमातून किंबहूना या पाण्याच्या संदर्भातील प्रश्न उपस्थित केलेले आहेत. खरेतर प्रश्न विचारण्या पाठीमागचा एक उद्देश असतो. किमान एक महीन्यातून एकदा आपण सभागृहामध्ये आल्यानंतर पक्षविरहीत या शहराचे विश्वस्त म्हणून आपली नेमकी बांधीलकी काय आहे, या शहराच्या विकासाबरोबर आर्थीक संतुलन आहे का किंबहूना ज्या मुलभूत सोयी आहेत त्यासंदर्भात आपल नियोजन काटेकोरपणाचे आहे का. या संदर्भात विचार विनीमय करण्यासाठी प्रश्न उपस्थित केलेला होता. आपल्या जीवनातील एक अविभाज्य घटक म्हणून पाण्याकड पाहील जातं. महानगरपालिकेच्या मुलभूत सोईमध्ये पाणी हे अत्यंत आवश्यक बाब समजली जाते. याठिकाणी प्रश्न निर्माण केल्यानंतर, खरेतर प्रश्नाच्या अनुषंगाने अनेक उपप्रश्न तयार झालेले आहेत आणि मजेशीर देखील उत्तर मिळालेली आहेत. वास्तविक मा.महापौर साहेब आपण सभेचे अध्यक्ष म्हणून

आणि या शहरातील सर्व विश्वस्तांचे प्रमुख म्हणून भविष्यकाळामध्ये अत्यंत गांभीर्याने या विषयाकडे पाहणे गरजेचे आहे. याठिकाणी संपुर्ण शहरामध्ये पाण्याच्या टक्या किती आहेत. काही दिवसानंतर हे शहर पाण्याच्या टाकीचे शहर असं संबोधल जाईल किंबहुना त्याची गिनीज वर्ड रेकॉर्डमध्ये नोंद होती की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. आयुक्त साहेब आख्ख्या मुंबई पासून वसई-विरार पर्यंत, नवी मुंबई पर्यंत जेवढया पाण्याच्या टाक्या नाहीत तेवढया पाण्याच्या टाक्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये आपण बांधलेल्या आहेत त्याचे नियोजन व्यवस्थीत आहे का. आपण ४५० ते ५०० एमएलडी पाणी उचलतो त्यानुसार त्या टाक्यांच नियोजन आहे का. त्यानुसार संपुर्ण शहरामध्ये पाण्याच व्यवस्थित नियोजन होतं का. त्या संदर्भात संतुलन आहे का. आजही कोणत्याही पाणीपुरवठयाच्या अधिका-याकडे गेलोतर तुमचा भाग उंचवटयाचा आहे तीथं एकच तास पाणी येईल असे सांगीतले जाते. साधारणत: निगडी पासुन, बिजलीनगरपासून, वाल्हेकरवाडी पासून  निगडीपर्यंत हा परिसर उंचवटयाचा समजला जातो. पिंपळेसौदागर, पिंपळेनिलख किंवा भोसरीतील काही भाग असू दया आहे तो खालचा भाग समजला जातो नेहमी हे उत्तर गेली पंचवीस वर्षे सभागृहात ऐकतो. पाण्याच्या संदर्भात जे काही विषय असतील त्याच्या संदर्भात अतीशय सेन्सिटीव्ह भाग असतो किंबहूना मतांच्या राजकारणाचाही तो काही भाग असतो म्हणून आपण कोणत्याही पक्षाचा सदस्य त्यावर गांभीर्याने बोलत नाहीत कारण दैनंदिन जीवनामध्ये त्या समस्याला सामोरे जावे लागते. याठिकाणी संपुर्ण शहरामध्ये नळकनेक्शन किती हा प्रश्न विचारलेला आहे त्यांनी सांगीतले आहे की १ लाख ४५ हजार नळकनेक्शन आहेत. प्रश्न असा आहे की २०१२ पर्यंतचे नळकनेक्शनला आपण परवानगी दिली. मा.महापौर साहेब, २०१२ ते २०१७ पर्यंत याचा अर्थ शहरात एकही बांधकाम झालेले नाही का, याचा अर्थ एकही नळकनेक्शन घेतलेले नाही का. आणि जर घेतलेले असेल आणि त्याची जर नोंद नसेलतर आपल्या उत्पन्नामध्ये निश्चितपणे घट झालेली आहे हे कागदोपत्री पुन्हा एकदा सिध्द होत. वाईट एका गोष्टीच वाटत, किंबहुना याठिकाणी आपण बारकाईने, गांभीर्याने कधी पाहणार आहोत. आर्थीकदृष्टया सक्षम होण्याच्या मार्गातून अडथळे निर्माण होतात. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आपण येण्याच्या अगोदर काही कालखंड जकातीच्या माध्यमातून ही महानगरपालिका चालत होती. ९०० ते १००० कोटीच उत्पन्न आपल्याला मिळत होतं. नंतरच्या कालखंडामध्ये एलबीटी आली व त्यात ४०० ते ४५० कोटीची तूट दरवर्षी होऊ लागली. आता जीएसटी आलेली आहे. केंद्राच्या माध्यमातून निधी जमा करणार त्यानंतर आपल्याला विकासाच्या दृष्टिकोनातून जे नियोजन केल जाईल त्यानंतर तो निधी आपल्याला मिळणार आहे. या परिस्थितीमध्ये उत्पन्नाचे सगळे स्त्रोत बंद झालेले असताना आपल्याला सवई मात्र मोठया लागलेल्या आहेत. ३ कोटीचे टेंडर ३०० कोटीवर, १०० कोटीचे टेंडर २५० कोटीवर आणि ही जर परंपरा अशीच चालत राहीलीतर, सात आठ वर्षापुर्वी आशिष शर्मा आयुक्त होते त्यावेळेस मात्र कर्ज घेण्याची वेळ आपल्या शहरावर

आलेली होती. याठिकाणी सांगीतले पाणीपट्टीच्या स्वरुपातून उत्पन्नाचे साधन नाही हे मी मानतो. ही अत्यंत जीवनावश्यक बाब आहे हे देखील मी मानतो. राज्यशासनाचे नियम सर्वांना सारखेच आहेत आपल्यालातर वेगळे असू शकत नाहीत. ना नफा ना तोटा या तंत्रावर चालाव असा आदेश संदेश महानगरपालिकेच्या माध्यमातून राज्यशासनाने यांना दिलेला आहे. आज सर्व सभागृहाला मी नम्रपणे सांगू इच्छितो की, ३१ कोटी आपल्याला उत्पन्न मिळतय आणि ८० कोटी रु. आपला खर्च आहे. मा.महापौर साहेब, तुम्ही विदर्भामध्ये जावुन आलेला आहात. अमरावती, अकोला महानगरपालिका, सांगली-मीरज-कुपवड महानगरपालिका या परिसरातील अशी परिस्थिती आहे की तीन तीन महीने कर्मचा-यांचा पगार मिळत नाही आणि आपण ८० कोट रुपयाकडे दुर्लक्ष करतो. पाच वर्षात पाच लाख ते सहा लाख लोकसंख्या वाढलेली आहे. पाच ते सहा लाख लोकसंख्येनी नळकनेक्शन घेतल नाही का असा तुमचा प्रशासनाचा दावा असेलतर तो मला सिध्द करुन दाखवा. २०१२ नंतर एकही घर झालेले नाही असे प्रशासनाच मत असेलतर तो फार मोठा विनोदाचा भाग होईल. स्थापत्य विभागाने फौजदारी गुन्हा कोणावर दाखल केलेला आहे का. पाण्याचे कनेक्शन कोणाचे तोडलेले आहेत का. आपल्याला उत्पन्नाचे स्त्रोत उपलब्ध असल्या कारणान ८०-८० कोटीची तूट जर वर्षाला येत असेलतर भविष्य आपले आर्थीकदृष्टया काय असणार आहे हे सर्वांनी ध्यानात घेतल पाहीजे. हा विषय एकटया कोणाचा नाही. हा विषय शहराचा आहे आणि या शहराचे विश्वस्त म्हणून आपली ती नैतीक जबाबदारी आहे आणि त्या जबाबदारीला आपल्याला टाळता येणार नाही. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब मी आठ वर्षापुर्वी याच सभागृहामध्ये २००७-०८ साली भाषण केलेल होतं. आजही माझा बंद नळ योजनेला विरोध नाही. बंद नळ योजनेच्या नियोजनाला माझा विरोध होता. ७० कि.मी. पैकी ९ कि.मी. आपल्या ताब्यात जागा असताना त्यावेळेस सरकार आमच जरी असलतरी त्यावेळेस जाहीरपणे मी सांगीतल होतं ही योजना चांगली आहे पण नियोजन शुन्य आहे आणि ते नियोजन करत असताना ४०० कोटीचा हा भविष्यातील प्रकल्प आज १२०० कोटीवर जाईल आज ते सत्य होत आहे. आजही तो प्रकल्प रखडलेला आहे. मावळच्या भाजपच्या आमदारांनी सांगीतलं हा प्रकल्प आम्ही होऊ देणार नाहीत. साहजीकच आहे तेथील शेतक-यांच्या मागण्या असतील ते त्यांच्या पध्दतीने लढा देणार. त्यांच्या जागी आम्ही असतोतर तोही लढा आम्ही दिला असता. प्रश्न असा येतो की हे नियोजन होत नसेलतर जवळ जवळ ३५ एक्करचे पाईप येवून पडलेले आहेत आणि ते गंज खातात त्याचा सुध्दा खर्च आपण दिलेला आहे. आपल्या तिजोरीतून ११२ कोट रुपये एकाच दिवशी काढलेली ती रक्कम आहे. त्या संदर्भात आपण काय करणार आहोत. आयुक्त साहेब आपल्याला खुप गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. बंड साहेबांनी सांगीतले आहे तुम्हांला ७० कि.मी. बंद लाईन करता येत नसेलतर, शेतक-यांना तुम्हांला जर समजवता येत नसेलतर, त्यांच्या जर समस्या असतीलतर त्यांचा मार्ग कोर्टात निघेपर्यंत बेबेडोव्हाळ याठिकाणी बंधारा आहे त्याठिकाणी आपल्याला

उंचावर पाण्याची टाकी बांधुन तीथ पाणी स्टोअर करुन एक टीएमसी पाणी वाचेल. तेथून तुम्ही पाण्याची लाईन घ्या. त्यावर देखील चर्चा नाही. चर्चा होतात त्या आंदोलन झाली की मोठया गांभीर्याने चर्चा होते. त्यातून कोणी दगावलतर डबल चर्चा होती. परंतु जो विषय आहे कारण आपण आर्थीकदृष्टया अतीशय सक्षम आहोत असा अविर्भाव आपण आणतो. आजपर्यंत आपल्याला चणचण जाणवली नाही. आपण बाहेर देशाचे दौरे करतो, शहरामध्ये जातो चांगली गोष्ट आहे. जगातील चांगल्या गोष्टी आपल्या शहरामध्ये येत असतीलतर, त्याच्याही पलीकडे जावुन आपले काही सभासद अमरावती महानगरपालिका, अकोला महानगरपालिका, सांगली-मिरज-कुपवड महानगरपालिका या महानगरपालिकेत गेल्यानंतर नेमक आपल अस्तित्व कुठय, आपली आर्थीक परिस्थिती कशी आहे आणि आपण किती गांभीर्याने या आर्थीक दृष्टिकोनातून त्यावर आपल्याला आत्मचिंतन करण्याची संधी मिळेल. याठिकाणी पिंपरी चिंचवड शहरातील लोकसंख्या २२ लाखाहून जास्त आहे. २०१२ पासून ४५० एमएलडी पाणी घेतो. पण २०१२ नंतर ३३ टक्के लोकसंख्या वाढली कारण त्याठिकाणी कोणती पाणी वाढविण्यासाठी उपाययोजना केलेली आहे. ३० ते ४० टक्के पाणी गळती होती. प्राधान्याने आपण २४X७ करण्यासाठी जुन्या लाईन टाकलेल्या आहेत त्या सगळया बदलून, कारण कुठे पाईप गंजलेले आहेत कुठे लिकेज आहेत त्यामुळे त्या पध्दतीने पाणी वाया जाते. त्या पाण्याला योग्य दिशा म्हणून विश्वराज कोणीतरी कंपनी आहे, माझा कंपनीमध्ये इन्ट्रेस्ट नाही, कोणत्याच कंपनीमध्ये मला कधीच इन्ट्रेस्ट नसतो पण याठिकाणी प्राधान्याने आपण ६० टक्के पाणी करण्यासाठी प्रशासनाने जे धोरण केलेले होते ते जवळ जवळ ६० टक्के म्हणजे २०१६ पासून विश्वराज इन्फ्रा. कंपनीन हे काम केलेल आहे. २०१६ पासून आस कोणत जागतीक लेव्हलवरच त्यांनी काम घेतलेल आहे का येथे समुद्र आहे आणि समुद्राच्या खालून पाईपलाईन घ्यायची आहे. त्यांचे आरामशीर काम चाललेले आहे. त्याकडे कोणी लक्ष देत नाहीत. याठिकाणी जवळ जवळ १० हजार कनेक्शन अनधिकृतपणे घेतलेले आहेत आणि त्याचा महसुल आपला बुडत आहे. याचा अर्थ पाणीपुरवठयावर मी बोलत असताना आपले अधिकारी सक्षम नाहीत अशी माझी मुळीच धारणा नाही. पण जे काही अधिकारी आहेत त्यांना मनुष्यबळ तेवढ आहेच नां. हा जो व्हॉल्वमन असतोना तो जेवढी हवा करतो तेवढ कार्यकारी अभियंत्यांना माहिती नसते. एका व्हॉल्वमनला मी बोलून घेतलं त्यावेळेस तो म्हणाला मी ठरवतो कोणत्या भागात किती पाणी सोडायचे ते. अशी जर परिस्थिती असेलतर काय. सक्षम मनुष्याचा आपण त्यांच्याकडे पाठपुरवा करतो का. जे चालल आहे ते चालू राहू दया. आमच्या सारख्या नगरसेवकांकडे कोणी तक्रार केलीतर आम्ही एकच सांगतो कारे पाणी येत नाही. तो बीचारा येतो तात्पुरत काहीतरी करतो परत मागचे दिवस पुढं. पंचवीस वर्षाच्या इतिहासामध्ये या या शहरामध्ये सोसायटीत जनहित दाखल करण्यासाठी प्रथमच जाताय. पाणी उपलब्ध असताना पाण्याच नियोजन कुठं आहे. त्या पाण्याच नियोजन करण्यासाठी १२ लाख लोकसंख्या होती त्यावेळेलाही ४५०

एमएलडी व २२ लाख लोकसंख्या झालेली आहे त्यावेळेस ५०० एमएलडी पाणी वाढवले आहे आणि त्यातही ३० टक्के पाण्याची चोरी. दहा हजार नळ कनेक्शन बेकायदा. या शहरामध्ये विश्वस्त म्हणून आपण काम करत आहोत. आर्थीकदृष्टया काय करणार आहात. याठिकाणी २०१२ पर्यंतचे जे काही असेल नळ कनेक्शन अधिकृत मान्यता देण्याचे अधिकृत करण्याचे धोरण असेलतर मी म्हणतो २०१७ पर्यंत त्यांच्या घराला आपण टॅक्स पावती फाडत असताना त्याच्यावर लिहीतो की हे घर अनधिकृत आहे. सगळे सुरळीत चालल्यामुळे १० ते ५ कोटीचे काही वाटत नाही. ८० कोट रुपये आपली तुट होतें आहे. आयुक्त साहेब तुम्ही विदर्भामध्ये काम केलेले आहे त्यामुळे ८० कोटीची व्हॅल्यू तुम्हांला माहिती आहे. आज याठिकाणी आपण दरवर्षी ते दंड लावून नियमीत करावे. याठिकाणी पवना धरणातील साठा ६.५ टीएमसी आहे. ब-याच जणाला वाटत पाऊस खुप चांगला झालेला आहे. वर्तमानपत्रामध्ये हेडींग येत की पवना धरण १०० टक्के भरलेल आहे. आपल्याला वाटत की आता दोन वर्षे काळजी नाही. धरण किती जरी भरलतरी आपल्याला जेवढा कोठा मंजूर आहे तेवढाच मिळतो त्याच्या पलीकडे आपल्याला कोठा मिळत नाही. त्याचे नियोजन आहे त्याच्या ३० ते ४० टक्के गळती आहे. अधिकृत माणसाला देखील त्या पाण्याच नियोजन करता येत नाही आणि चोरीचे प्रमाण प्रचंड वाढलेले आहे. याबाबत आपण अजीबात काहीही करत नाहीत. याठिकाणी दहा ते पंधरा वर्षात ५०० एमएलडी पाणी वाढलेले आहे. त्यासाठी भामा-आसखेड मधुन १६७ एमएलडी आणि आंद्रामधुन १०० एमएलडी पाणी असे मिळून २६७ एमएलडी पाणी येण्याचा कोठा पाटबंधारे कार्यालयातून मंजूर पण आहे. पण आपण याला गतीमान करणार कधी. तुम्ही सांगायच तुमच्या काळात केलं नाही आम्ही सांगायच आमच्या काळात केलं नाही मग तो गतीमान करण्याच्या दृष्टिकोनातून हीच बंद नळ योजना आता आपण ज्या पध्दतीने ते प्रकरण हाताळत आहोत त्याची किमंत ८०० ते ९०० कोटीचा आपल्याला भूर्दंड भरावा लागत आहे. आज आंद्र, भामा-आसखेड प्रकल्प करण्यासाठी तीन वर्षापासून मंजूर झालेला आहे. भविष्यामध्ये ज्यावेळेला आपण काम सुरु करु तो सुध्दा भविष्यकाळात १२०० कोटीवर जाईल आणि आपल्याला काही मिळणार नाही. २००७ पासून आपण पिंपरी चिंचवडला मीटरव्दारे पाणी देतो. पाणी देखील मोजूनच दिल पाहीजे ते पण बरोबर आहे. ३० हजार ली. ला २.५० रु., ३० ते ५० हजार ली. ला ५.३० पै., ५० ते ७५ हजार ली. ला १० रु. असे दर आहेत. आणि ७५ हजार ली. च्या पुढे १५ रु. शासनाचे धोरण आहे पाणीपुरवठा योजना ना नफा ना तोटा या धरतीवर चालवल्या पाहीजेत. भविष्याचे वेध घेवून आर्थीक संतुलन राहण्यासाठी या शहराचा विकास मंदाऊ नये, ही थकबाकी वसुल करणे अत्यंत गरजेच आहे. मला वाटत मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, गेल्या दहा वर्षात आपण दर सुध्दा निश्चित केलेले नाहीत. टाटा स्कायचे केबलचे आपण २५०/- रु.महीना पैसे भरत असूतर, रिचार्ज आपण शंभर शंभर रुपयाला तीन ते आठ दिवसाला करत असुतर आपण पाण्याच बील वर्गवारी करण गरजेच नाही का. त्याच्यामध्ये

वर्गवारी करा. झोपडपट्टी पुनर्वसन संदर्भात असेलतर फारतर त्यांना माफ करा. पण जे सक्षम आहेत त्यांचेकडून किमान घ्यावे. भारतामध्ये सर्वात स्वस्त पाणी कुठ असेलतर ते पिंपरी चिंचवडमध्ये आहे. ती श्रीमंती आता राहीलेली नाही. कारण तुम्हांला कळलं कारण आता जीएसटीच्या माध्यमातून ज्यावेळेस आपल्याला निधी मिळणार आहे त्या निधीच्या आधारे आपल बजेट होणार आहे. व त्या बजेटच्या आधारे विकासाची काम होणार आहेत. त्यावेळेस आपल्याला कळल की आपल्याला निधीसाठी किती मारामारी होणार आहे. आणि म्हणून या गोष्टीच भान राखून जी काही गळती आहे त्या गळतीच्या दृष्टिकोनातून आपण सर्वांनी प्रयत्न केले पाहीजे. सर्व नगरसेवकांनी एकत्र येवून आपल्या शहराचे विश्वस्त म्हणून अडचणीला सामोरे जायच, नाहीतर पुढची पिढी माफ करणार नाही. त्याठिकाणी आर्थीकदृष्टया सक्षम होण्याच्या दृष्टिकोनातून आपण पाऊल टाकल पाहीजेत. आता पाऊस चांगला झालेला आहे, आपल्याला काळजी नाही. याठिकाणी नियोजन होण गरजेच आहे. मी अधिक वेळ घेणार नाही. विस्तारपुर्वक, मुद्देसुद मी विषयापुरत बोललो आहे. मुळ उद्देश माझा तुम्हांला समजला असेल आणि याला गांभीर्याने घ्याव. जशी साक्षरता मोहीम आपण राबवतो तशी जल साक्षरता मोहिम आपण राबविणे गरजेच आहे. पुणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे लोक आले होते की जे या परिसरामध्ये रिटायर्डच शहर म्हणूनही ओळखले जाते. अनेक तज्ञ माणस याठिकाणी राहतात. मा.महापौर साहेब, मी आपल्याला विनंती करतो की सर्व पक्षाची एक समिती तयार करा आणि ती जल समिती असु दया. त्याच्यामध्ये सगळया पक्षाचे गटनेते घ्या. त्या पध्दतीने आयुक्त साहेब आपण एक मोहीम करा. याठिकाणी कोण सक्रीय आहे की पाण्याच्या संदर्भात नियोजन करण्यासाठी. ८०-८० कोटी जर आपण विनाकारण जर घालवत असूतर आपल्याला जनता कधीही भविष्या मध्ये माफ करणार नाही आणि म्हणून याच नियोजन करणे अत्यंत गरजेच आहे. आजही पाणीपुरवठयावर प्रत्येकजण बोलायला सांगीतलेतर प्रत्येकजण वीस वीस मिनीट बोलेल. कारण आजची परिस्थिती अशीच आहे. मुंबई सारख्या ठिकाणी माहित असतं. एवढया मोठया मुंबई शहरामध्ये एकही पाण्याची टाकी नसताना पाण्याचे नियोजन कशा पध्दतीने असतं. त्यांना माहिती आहे सकाळी सहा वाजता पाणी येणार आहे आणि बरोबर सात वाजता बंद होणार आहे. बारा बारा मजल्यावर सुध्दा एकटया एक तासामध्ये संपुर्ण आठरा तासाच नियोजन करतात. आपल्याकडे आज पाणी आलतर त्याची वेळही माहीत नसते त्यामुळे ते साठवणूक करतो व दुस-या दिवशी पाणी आले की हे कालच पाणी शिळे म्हणून ओतून देतो. आपल्याकड पाण्याची नासाडी पण होते आणि दुसरीकडे पाण्याच नियोजन करण्यामध्ये कमकुवत ठरलेलो आहोत. कदाचित मनुष्यबळ कमी असेल त्यासाठी कमकुवत ठरलो आसु. म्हणून आयुक्त साहेब तुमचे नाव हर्डीकर साहेब आहे. पुर्वी सर्जीकल स्ट्राईक झाले होते आता हार्डीकर स्ट्राईक करा आणि काहीतरी ठरवा. तुम्ही दबावामध्ये आणि गोंधळलेल्या अवस्थेत काम करु नका. तुम्ही धाडसी आहाततर धाडसी पध्दतीनेच काम करा. श्रीकर परदेशी साहेब

होते ते कोणत्याही विकासाच्या कामाला डगमगले नाहीत अशी आठवण तुमची राहीली पाहीजे. तुमचा कालखंड तीन वर्षाचा आहे आमचा आयुष्यभराचा आहे. या शहरात आम्हांला येथेच रहायच आहे तुम्ही निघून जाताल. पण निघुन गेल्यानंतर आपण काय केलं, काय नियोजन केलं. नियोजनाच्या बाबतीत या शहराला आर्थीकदृष्टया कस सक्षम केलं हे तुम्ही गेल्यानंतर सुध्दा या सभागृहात तुमच्या विषयी बोलल गेल पाहीजे ही अपेक्षा आपल्याकडून व्यक्त करतो. मा.महापौर साहेब, गांभीर्याने विषय घ्या. प्रश्न मांडला समाधान झाल, आपण ऐकलं यावर हा विषय सिमीत ठेवू नका. ८० कोटी रु. आपण वर्षाला घालवतो हे सर्व नगरसेवकांनी लक्षात ठेवा. हेच ८० कोटी आपण आपल्या वॉर्डामध्ये खर्च करु शकतो. त्याच नियोजन आपण कराव आणि जल समिती निर्माण करावी अशी भावना व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द संपवतो.

**मा.दत्ता साने –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. भाऊसाहेब भोईर यांचे मनापासून अभिनंदन करेल. शहराच्या जीवना विषयी पाण्यावर प्रश्न मांडलेले आहेत. मला विनंती करायची आहे की, शहरामध्ये २०१२ नंतर आपण नळकनेक्शन देणे बंद केलेले आहेत. अधिकृतपणे मागीतलेतर कनेक्शन देत नाहीत. असे होत असताना कुठलाही नागरीक व ज्यांनी घर बांधले आहे तो पाण्यापासून वंचित राहूच शकत नाहीत. असे अन्य नागरीक आहेत ज्यांनी अनऑथोराईज कनेक्शन घेवुन आपल्या पिंपरी चिंचवड शहराच्या पाणीपुरवठाच्या माध्यमातून आपल्याला जो आर्थीक उत्पन्नाचा सोर्स मिळणार आहे तो त्या नागरीकाकडन फुकट पाणी वापरायच काम करत असतो. माझी आपल्याला अशी विनंती आहे की आपण जरी ते कनेक्शन दिले नाहीतरी तो नागरीक घेणार आहे. मग जर कनेक्शन आपण न देवून तो कनेक्शन घेत असेलतर त्याला आपण दंड आकारुन किंवा अन्य काही लिगली कनेक्शन दिलेतर आपली जी गळती होणार आहे, चोरुन पाणी वापरणार आहेत. आतापर्यंत किती एमएलडी पाणी घेतो असे विचारले. ५०० एमएलडी पाणी पवना धरणामधुन घेतो. ज्या काळात बंद पाईपलाईनचा विषय आलेला होता त्या बंद पाईपलाईनमध्ये या शहराचे आम्ही त्या काळात सत्ताधारी होतो. त्या काळामध्ये अनावधानाने आमच्याकडुन काही चुका झालेल्या असतीलतर, आमच्याकडून तो प्रकल्प रखडला. आता सत्ताधारी भाजप आहे, ज्यांनी विरोध केला तेही भाजपचे आमदार आहेत. त्या काळामध्ये ज्या घटना घडल्या ज्या लोकांना स्वत:चा जीव गमवावा लागला त्या लोकांच्या भावनेचा आदर करुन त्या योजनेला भाजपने वेग दिलातर त्या शेतक-यांच्या भावना, त्यांच्या ज्या काही अडीअडचणी असतील त्या सोडविण्याचा शंभर टक्के प्रयत्न करुन जर बंद पाईपलाईन पिंपरी चिंचवड शहरासाठी केलीतर बरे होईल. रावेत पंपाच आपल्याला माहिती आहे, पवना नदीला पाणी आहे त्यामुळे तुम्हाला तेथे जाणवलं नाही. मार्च, एप्रिल, मे दरम्यान आपण जर त्या ठिकाणी जातालतर ज्या ठिकाणाहून आपण पाणी घेतो त्या ठिकाणची परिस्थिती पाहीलीतर, किंवा शहरातील नागरीकांनी परिस्थिती जर पाहीलीतर मला वाटत नाही आपल्या शहरातील नागरीकांना चांगले आणि शुध्द पाणी देतो. नागरीक त्याठिकाणी

बघण्यासाठी गेलातर मला वाटत नाही तो पाणी पील म्हणून. अशी परिस्थिती असताना त्याठिकाणची घाण आम्ही डोळयानी पाहीलेली आहे. त्यादृष्टिने बंद पाईपलाईन होणे गरजेच आहे. त्या माध्यमातून सत्ताधारी पक्षानी लक्ष घालावे अशी मी विनंती करतो. चर्चा करताना कोणाची अडचण असेल ज्या ज्या ठिकाणी कोणी कोणी अडवले असेल, किंवा अन्य काही असेल, कालतर आम्ही पेपरला बातमी वाचली आम्ही मेलोतरी पिंपरी चिंचवड शहराला बंद पाईपलाईनमधुन पाणी देणार नाही पण माझी त्या भागातील नागरीकांना विनंती आहे की मावळ असेल, मुळशी असेल किंवा अन्य त्या भागातन काही नागरीक या शहरामध्ये राहणारे आहेत किंवा रोज अपडाऊन करणारे लोक आहेत. ते आपल्या भागामध्ये पाणी पिणार आहेत. दुसरा आपला प्रकल्प भामा-आसखेड आडीच टिएमसी पाणी आपण चिखली भागामध्ये आणणार आहेत. तो सुध्दा प्रकल्प आपल्याला असाच कुठल्याही वादात न आडकता, अशा कुठल्याही कायदेशिर बाबीत न आडकता तो प्रकल्प सुध्दा व्यवस्थितरीत्या हाताळावा. तो प्रकल्प आपल्या भागात आलातर आपल्या चिखली, मोशी, च-होली हा भाग आहे किंवा दोन टप्प्यातून ते पाणी दिलंतर पिंपरी चिंचवड शहराचा दोन्ही भाग हे पाण्यामधुन मुक्त होतील. आमच्या भागामध्ये पाण्याचा गंभीर प्रश्न आहे. अनेकवेळा या सभागृहामध्ये पाण्याच्या संदर्भात चर्चा झालेली आहे. आयुक्त साहेब, आपल्याला विनंती आहे की जे अनऑथोराईज २०१२ नंतर जे जे नळकनेक्शन आहेत त्यांना कुठल्याही पध्दतीनं आपल्याला जर आपला इन्काम सोर्स वाढवायचा असेलतर आपण त्याना त्यांचे कनेक्शन लिगल कसे देता येईल हे बघावे. या लोकांकडून १०० घेत असालतर त्यांच्याकडून ५०० रुपये जास्त घेवून त्यांन पाणी दिलेतर आपले उत्पन्न वाढेल. भाऊसाहेब भोईर यांनी प्रश्न विचारल्याबद्दल मी धन्यवाद देतो. दोन-तीन प्रश्न मी सांगीतलेले आहेत. २४ X ७ या प्रकल्पा बाबत सुध्दा याठिकाणी खोट उत्तर दिलेलं आहे. ४० टक्के २४ X ७ पाणी देतो असे सांगीतलेले आहे. मला अधिका-यांनी सांगीतले या या भागामध्ये २४ X ७ देतो. उत्तर देताना बीनधास्त देतात की जस काही आम्ही बाहेरच्या भागातून आलो. शहरातली आम्हांला माहिती नाही अशा पध्दतीने अधिकारी उत्तर देत असतीलतर यामध्ये सुध्दा गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. ४० टक्के २४ X ७ पाणी असेलतर त्यांनी ऐरीयावाईज सांगावे. कुठे कुठे तुम्ही २४ X ७ दिलेले आहे. ठरावीक भागामध्ये हे २४ X ७ चालू आहे. आमच्या भागामध्ये अर्धा तास सुध्दा पाणी मिळणे मुश्किल आहे अशा परिस्थितीमध्ये आपण हे बेधडक खोट उत्तर दिलं खरतर ज्या अधिका-यानी हे उत्तर दिल त्यांचा मी जाहीर निषेध करतो. हे चुकीचे उत्तर दिले गेले मी निषेध करतो. अशी माहिती दयायची असेलतर त्याची सत्यता आपल्या सभागृहापुढे, शहरापुढे यावी. येथून पुढे कुठलेही प्रश्न असतीलतर चुकीची माहिती देवू नये असे सांगून थांबतो.

**मा.केशव घोळवे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आताच जो विषय घेतलेला आहे पाणीपुरवठया संदर्भात भाऊसाहेब भोईर यांनी आणि दत्ता काका आता बोलले.

मागच्या महीन्यामध्ये आयुक्त साहेबांना पत्र दिलेले होते. २४ X ७ हा पाणीपुरवठा या शहरात पायलट प्रोजेक्ट म्हणून प्रभाग क्रमांक १० घ्यावा आणि आज हा विषय याठिकाणी घेतलेला आहे. हा शहराचा अत्यंत ज्वलंत असा प्रश्न आहे. याच्यावर आपल्या जीबीमध्येच हा विषय घ्यायचा आणि येथेच हा सोडायचा इथपर्यंतचा हा विषय नसावा. माझी नम्रपुर्वक विनंती राहील आदरणीय देवेंद्रजी फडणवीस साहेबांनी संपुर्ण महाराष्ट्रात जलयुक्त शिवार ही योजना हाती घेतली आणि ती राबवली अतिशय प्रभावशाली पध्दतीन राबवली. तसच शहरामध्ये सुध्दा जलयुक्त शहर २४ X ७ या योजनेच्या माध्यमातून आपल्याला राबविता येवू शकते आणि त्या अनुषंगाने आपण जर पाहीलतर गेले दोन महीने मी स्वत: पाणीपुरवठाचा अभ्यास पवना धरणापासून ते शहरापर्यंतचा केला गेलेला आहे. आपल्या शहरामध्ये अतिशय अभ्यासू आणि कार्यक्षम अधिकारी श्री.लडकत साहेब आहेत प्रचंड त्यांचा त्यात गाढा अनुभव आहे. आजही ती योजना अतीशय चांगल्या पध्दतीने प्रभावशाली पध्दतीने अंमलात आणु शकतो. सर्वात महत्वाचे की आपल्या सर्वांची इच्छाशक्ती. हा प्रश्न फक्त राजकीय दृष्टिकोनातून न पाहता याच्याकडे सर्वपक्षीय वरिष्ठानी आणि पदाधिकारी, अधिकारी यांनी एकत्रीत बसून कसे सोडवता येईल हे पाहणं महत्वाचे आहे. मा.महापौर साहेब, आपल्याला विनंती राहील की ख-या अर्थाने सर्व नगरसेवकांची एक कार्यशाळा जलशुध्दीकरण केंद्र याठिकाणी घ्यावी आणि ख-या अर्थाने पवनेमधुन पाणी कसे आणले जाते हे दाखवावे. जवळपास ३५ कि.मी.पाणी हे आपल्याला पवनेच्या माध्यमातून येत आहे. साधारणत: आपण जर पाहीलतर पंपींगने पाणी आणणं आणि ग्रॅव्हीटीने पाणी आणंणं. आजही आपण पंपींगने पाणी आणतो. मुंबई शहराला ग्रॅव्हीटीने पाणी आणले जाते. पंपींगने आणल्यामुळे खर्च वाढतो. वॉटर लॉसेस वाढतात. आपण पाहतो उर्से आणि बापदेव परिसरामध्ये मोठी इन्डस्ट्रीज निर्माण झाली आहे. एसटीपी आणि ईटीपी प्लॅन्टस त्याठिकाणी नाहीत. संपुर्ण मैला पाण्यामध्ये येतो. वॉटर लॉसेस वाढतात. त्याच्यामुळे खर्च वाढत असतो. रावेत याठिकाणी पंपींग करुन दररोज ४२८ एमएलडी पाणी जलशुध्दीकरण केंद्रामध्ये शुध्द केले जाते आणि संपुर्ण शहरामध्ये ८५ टाक्यामधून ते देतो. आजही आपण पाहतो पाणीपुरवठा आपण पाहीलातर जीआय पाईपलाईनमधुन आपल्याला पाईपलाईन टाकलेली आहे. आठ ते दहा वर्षामध्ये जमिनीखाली जीआय पाईप असल्यामुळे तो गंजतो, त्याचा डायमीटर कमी होतो आणि लिकेजेस वाढलेले असतात. परंतु आपण जर पाहीलतर प्रगत राष्ट्रांमध्ये ५० वर्षे तरी एक पाईपलाईन टिकते. शंभर वर्षापर्यंत सुध्दा टिकते. मी स्वत: सिंगापूरमध्ये जाऊन पाईपलाईन पाहीलेली आहे. ख-या अर्थाने २४ X ७ ही योजना आपल्या शहरात राबवायची असेलतर त्याचे एक मॉडेल आपल्या पाणीपुरवठा विभागाने तयार केलेले आहे. मा.महापौर साहेब, आपल्याला विनंती करतो की या विषयावर कार्यशाळा आयोजीत करावी, त्याठिकाणी प्रेझेन्टेशन पहावी, समजून घ्याव आणि ख-या अर्थाने मला खात्री वाटते या शहरामध्ये अगदी चौथ्या मजल्यापर्यंत पाणी जाऊ शकतं ते या पुर्वी अनेक सोसायटयाला

मिळायचं. त्यातून जे पंपींगन वरती पाणी घेतल जातं १८०० ते ३००० पर्यंत प्रत्येक सोसायटीला महीन्याला वीजबील येते ते सुध्दा बंद होऊ शकते आणि आज जे पाणी आपण वापरतो त्याच्यामध्ये साधारणत: २५ टक्क्यांनी कपात आणि बचत होवू शकते. जर आपण २४ X ७ ही योजना पुर्णपणे कार्यान्वित केलीतर. त्यासाठी ख-या अर्थाने पाईपलाईनचे स्ट्रक्चर त्याच आरेखन त्याचा प्लॅन ख-या अर्थाने त्या शहरामध्ये त्या नगरामध्ये कितीची कपॅसिटी त्याठिकाणी लागते, किती पाणी त्याठिकाणी लागते, जशी लोकसंख्या वाढते त्यानुसार आपण जर त्याच नियोजन केलेतर आणि त्याला प्रेशर दिलेतर ख-या अर्थाने हे शहर जलयुक्त शहर झाल्याशिवाय राहणार नाही आणि तो आत्मविश्वास मलातरी याठिकाणी वाटतो. परंतु सर्व नगरसेवकांमध्ये जो आणायचा असेलतर आपण लवकरात लवकर ही कार्यशाळा आयोजीत करावी आणि त्याठिकाणी जलशुध्दीकरण केंद्रामध्ये जावुन ती पाहणी केल्यानंतर आपल्याला सर्वाच्या लक्षात येईल की ख-या अर्थाने आपल शहर जलयुक्त शहर म्हणून आणि २४ X ७ मध्ये बसू शकते. आपण काही महीन्याच्या जीबीमध्ये भामा-आसखेड आणि आंद्र धरणामधुन १६८ एमएलडीचा पाणी आपल्या शहराला मिळावे असा ठराव मंजूर केलेला आहे. त्याठिकाणची जी योजना आहे ती योजना आपल्या शहराला आणताना ती बंद नलीकेमधुन आपल्याला कशी आणता येईल आणि त्याच बरोबर त्या धरणाची समुद्रसपाटी पासूनची उंची आणि शहराची उंची याचा अभ्यास करुन आपल्या शहराला ग्रॅव्हीटीने पाणी आणता आलेतर पुढील काळात ते जे पाणी आपल्या शहराला मिळणार आहे त्याच्यामध्ये सुध्दा खुप चांगल्या पध्दतीची आर्थीक दृष्टिकोनातून बचत होवू शकते असं मला वाटत. पवनेचा बंद जलवाहीनी प्रकल्प दिवसेंदिवस असाच जर रेंगाळत गेलातर त्या प्रोजेक्टची कॉस्ट भविष्यामध्ये आणखीन वाढत जाणार आहे. जेवढ ते लेट होईल तेवढ ती कॉस्ट वाढत जाणार आहे. त्या अनुषंगाने संबंधित जो विषय थांबलेला आहे तो कोणत्या कारणांमुळे विषय थांबलेला आहे, आणि संबंधीत जे शेतकरी बाधीत असतील त्यांच्या मागण्या काय आहेत ते विचारात घेवून या शहराला सुध्दा बंद नलीकेमधुन पाणी कसे आणता येईल हे पहावे. डायरेक्ट धरणामधुन बंद नलीकेमधुन पाणी आणलेतर या शहराला अतीशय कमीत कमी खर्चामध्ये आणि अतीशय स्वच्छ आणि २४ तास पाणी चालु राहील, केव्हाही टॅप सुरु केलातर पाणी आले पाहीजे हे ज्यावेळेस घडेल त्यावेळेस पाणी ओतून देणे ही प्रक्रीयाच थांबू शकते. आपण ब-याच वेळा पाहतो की अनेकांचा असा समज आहे की आजच पाणी शिळ आहे ते उदया मग फेकून दिल जातं. धरणामध्ये पाणी ३६५ दिवस त्याठिकाणी असतं ते शिळ कधीच नसतं. त्यामुळ या सगळया विषयावर आपण हे गांभीर्याने घेऊन ख-या अर्थाने २४ X ७ ही योजना सर्वप्रथम संपुर्ण शहर घेत असताना सर्व प्रथम सर्वात जास्त जो प्र.क्र.१० चा जो गंभीर प्रश्न आहे त्याठिकाणी सर्वात प्रथम कार्यान्वित करावी अशी मी आपल्याला नम्र विनंती करतो.

**मा.स्विनल म्हेत्रे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. आमच्या प्रभागांतर्गत मोरे वस्ती, म्हेत्रे वस्ती, ताम्हाणे वस्ती या विभागामध्ये कृष्णानगरमधील उभारलेल्या २५ द.ल.ली.च्या टाकीमधुन ग्रॅव्हीटीव्दारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. सदयस्थितीमध्ये आमच्या विभागात अतीशय कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे अशा नागरीकांच्या तक्रारी आहेत. अनेकवेळा अधिका-यांना सांगीतले जाते परंतु अधिकारी असे उत्तर देतात की या विभागात लोकसंख्या मोठया प्रमाणात वाढलेली आहे त्यामुळे पाणीपुरवठा कमी होत आहे तरी ज्याठिकाणी अशी वाढीव लोकसंख्या आहे त्याठिकाणी जर पुरेशा दाबाने पाणीपुरवठा जर होत नसेलतर त्या त्या ठिकाणी त्या त्या विभागाची विभागणी करुन पाणीपुरवठा करण्यात यावा. म्हणजे माझ्या विभागातील मोरे वस्ती, म्हेत्रे वस्ती, ताम्हाणे वस्ती या विभागातील आर्ध्या भागात सध्या होणा-या ३ ते ४ तास पाणीपुरवठया ऐवजी दोन विभागात विभागणी करुन जर दोन ते तीन तास पाणीपुरवठा केलातर पुरेशा दाबाने पाणी नागरीकांना मिळेल आणि तक्रारीही कमी होतील. तसेच शहरामध्ये वाढत्या लोकसंख्येनुसार शहरात सध्यस्थितीमध्ये पवना धरणामधुन होणारा ४६० एमएलडी पाणीपुरवठा कमी पडत आहे. यासाठी आंद्र धरणातून आपल्या शहरासाठी जो अतिरीक्त पाणीपुरवठा मिळणार आहे तो प्रकल्प लवकरात लवकर कार्यान्वित करावा म्हणजे शहरामध्ये भविष्यामध्ये पाणी टंचाईला सामोरे जाता येईल.धन्यवाद.

**मा.अजीत गव्हाणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज याठिकाणी भाऊसाहेब भोईर यांनी हे प्रश्न सभागृहात विचारलेले आहेत या अनुषंगाने पिंपरी चिंचवड शहराचा आपण एकूण विचार केलातर ब-याच नगरसेवकांच्या बोलण्यात येते की, आमच्या भागात पाणीपुरवठा कमी आहे. यातील प्रमुख कारण असे की मुळात पिंपरी चिंचवड शहरात जो पाणीपुरवठा केला जातो ते सगळीकडे समप्रमाणात पाणी दिले जात नाही. असमतोल असल्यामुळे विशेषत: ग्रामीण भागात खुप कमी पाणीपुरवठा केला जातो. पुर्वीच्या गावात जास्त पाणीपुरवठा केला जातो त्यामुळे ग्रामीण पट्टयामध्ये पाण्याचा तुटवडा जास्त प्रमाणात होतो. त्यामुळे आयुक्त साहेब याचे नियोजन कराव लागणार आहे. पुढच्या काळामध्ये संपुर्ण शहराला पाणीपुरवठा होत असताना सगळया विभागाला समान प्रमाणात पाणी दिले गेले पाहीजे त्यादृष्टिने नियोजन केले पाहीजे. आपण ५०० एमएलडी पवना धरणातून पाणी उचलतो परंतु आपण याच्याही पेक्षा अधिकच पाणी एमआयडीसीकडून सुध्दा घेतो त्यामुळे आता असलेल्या लोकसंख्येला काही प्रमाणात ते पाणी पुरतय. परंतु भविष्यकाळाचा विचार केलातर येत्या वर्षभरामध्ये आपल्याला खुप मोठी पाण्याची समस्या निर्माण होणार आहे. भामा-आसखेड आणि आंद्राचा जो पाणीपुरवठा आहे तो लवकरात लवकर आणण्याच्या दृष्टिकोनातून आपल्याला प्रयत्न करावे लागतील. प्रशासनाने नेमके याच्या बाबतीत काय धोरण ठेवलेले आहे, आता कुठल्या स्टेजला आपण आहोत. त्याठिकाणी अजून प्रत्यक्ष काम चालू झाले का नाही. पवना

धरणामधुन बंद पाईपलाईनमधुन पाणी आणताना जो त्रास झाला तो त्रास याठिकाणी होऊ नये या दृष्टिकोनातून आपण काय उपाययोजना आखलेल्या आहेत याबाबतीत सुध्दा खुलासा प्रशासनाने केला पाहीजे. पवना धरणातून पाणी आणतो ते बंद पाईपलाईनमधुन पाणी थांबलेल आहे. याच्यामुळे कुठेतरी तेथल्या लोकांची दिशाभूल झालेली आहे त्याना नेमके काय पाहीजे हे महापालिकेच्या लक्षात आलेले नाही आणि त्याच्या संदर्भातल्या बैठका व्यवस्थितरीत्या न झाल्यामुळे तो प्रकल्प थांबलेला आहे. खर म्हणजे तेथून बंद पाईपलाईनमधुन आपल्या शहराला पाणी आलं असतंतर निश्चितपणे चांगल आणि स्वच्छ पाणी आपल्या शहराला मिळाल असतं आणि पाण्याची गळती पण कमी झाली असती. शासनाचे धोरण आहे की सगळया ठिकाणी पाणीपुरवठा करताना ते बंद पाईपलाईन मधुन करावा असे शासनाच धोरण आहे. मागच्या शासनाच पण तेच धोरण होत आताच्या शासनाच पण तेच धोरण आहे. सगळया शहराला बंद पाईपलाईनचे पाणी दिले गेले पाहीजे त्यादृष्टिने आपल्याला आगामी काळात पवना धरणामधुन पाणी आणताना किंवा इतर ठिकाणाहून भामा-आसखडे, आंद्रा मधुन जे पाणी आणणार आहोत ते आणताना विचारपुर्वक व नियोजनबध्द काम करावे लागेल. काही गोष्टी राजकीय हेतूने आडवल्या जातात परंतु त्या दृष्टिकोनातून येथील सभागृहातील सर्व पक्षातील लोकांना यामध्ये सहभागी करुन घेतले पाहीजे. मग उदया खेडमधुन, मावळामधुन पाणी आणत असताना तेथील लोकप्रतिनीधीची त्या संदर्भातील बैठका, तेथील स्थानिक लोकप्रतिनीधी असतील, तेथील स्थानिक शेतकरी असतील त्यांच्याबरोबर चर्चा केली पाहीजे जेणेकरुन त्यांच्या मनामधील शंका आहेत त्या शंका दुर झाल्या पाहीजेत. आमच्या शहराला पाणीपुरवठा करत असताना तेथील शेतक-यांवरती किंवा तेथील नागरीकांवर कुठल्याही प्रकारचा अन्याय झाला नाही पाहीजे अशा प्रकारची आमचीही भूमीका आहे. पण हे करत असताना आपल्याला एकदम नियोजनबध्द काम करावे लागेल. या पिंपरी चिंचवड शहरामध्ये सुध्दा मागच्या काळात अनेक प्रकल्पासाठी शासनाने, केंद्रशासनाने जमिनी भूसंपादन केलेल्या आहेत आणि ते करत असताना अतिशय शांतपणे पिंपरी चिंचवडकरानी केंद्रशासनास, राज्यशासनास त्या जमिनी दिलेल्या आहेत. या पिंपरी चिंचवड शहरामध्ये अनेक मोठमोठे शासनाने, केंद्रशासनाने अनेक जागा मिलीटरी, एमआयडीसी, प्राधिकरण यांच्या ताब्यात घेतलेल्या आहेत परंतु येथील शेतक-यांनी चांगली आणि सहकार्याची भुमिका ठेवल्यामुळे येथील पिंपरी चिंचवड शहराचा अतीशय चांगला विकास झालेला आहे. त्याच्यामुळे उदयाच्या काळामध्ये पाणी आणण गरजेच आहे. येत्या वर्षभरात निश्चितपणे आपल्या शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेतलीतर खुप मोठया प्रमाणात आपल्या शहराची लोकसंख्या वाढते आहे. महाराष्ट्रातील नव्हेतर देशाच्या कानाकोप-यातून लोक पिंपरी चिंचवड शहरामध्ये याठिकाणी राहण्यासाठी येतात. येणा-या लोकसंख्येला आपल्याला व्यवस्थित पाणीपुरवठा देण्यासाठी नियोजन करावे लागणार आहे आणि तशाप्रकारची कारवाई आपण आगामी काळामध्ये करावी. आमच्या एका सहकार्यानी याठिकाणी

कार्यशाळा घ्यावी अशी विनंती केली. निश्चितच अशाप्रकारची कार्यशाळा झाली पाहीजे. त्यामध्ये भामा-आसखेड, आंद्रा बाबतीत प्रशासकीय पातळीवरती काय काम चालू आहे हे समजले पाहीजे. आमच्याकडे लोक रोज सकाळी पाण्याच्या तक्रारी घेवून येतात. आम्ही सांगतो की आपल्या शहराची लोकसंख्या खुप वाढल्यामुळे, घर वाढल्यामुळे आपल्या येथे पाणीपुरवठा कमी पडतो आहे. लवकरात लवकर भामा-आसखडे, आंद्राच पाणी आम्ही आणणार आहेत त्यानंतर आपल्या शहराला सगळयांना चांगल पाणी मिळेल अशाप्रकारे आम्ही सगळे नगरसेवक सांगत असतो. आम्हाला याबाबतीत नेमकी माहिती येत्या काही दिवसात आपल्याकडून मिळेल अशी अपेक्षा आहे. हा प्रश्न अनधिकृत कनेक्शन बाबतीत आहे शहरामध्ये खुप मोठया प्रमाणात अनधिकृत कनेक्शन लोकांनी घेतलेले आहेत त्यामुळे अनेक लोकांवर अन्याय होतो कारण जे लोक अधिकृत कनेक्शन घेतात त्यांच्यावर यामुळे अन्याय होतो. अनधिकृत कनेक्शन घेत असताना अनेकठिकाणी रायझींग मेनला सुध्दा कनेक्शन घेतले गेलेले आहेत त्यामुळे पाण्याची टाकी भरताना अनेकवेळा अडचणी आलेल्या आहेत. अधिका-यांना सुध्दा निश्चितपणे याबाबतीत माहिती आहे. परंतु अधिका-यांवरती कारवाई करताना कुठेतरी त्यांच्यावरही दबाव येतो त्यामुळे अशाप्रकारची कारवाई त्यांना करता येत नाही. माझी आपल्याला विनंती आहे की, अशाप्रकारचे अनधिकृत कनेक्शन रायझींग मेनवरती दिले गेलेले आहेत ते ताबडतोब काढले पाहीजेत जेणेकरुन शहरातील सगळया नागरीकांना व्यवस्थित पाणीपुरवठा मिळेल आणि शंभर टक्के जी जी अनधिकृत कनेक्शन आहेत ती अधिकृत करण्याच्या दृष्टिकोनातून आपण त्याठिकाणी सुरवात केली पाहीजे जेणेकरुन आपल्या महापालिकेस त्यातून काही प्रमाणात उत्पन्न मिळेल. पाणीपुरवठा विभागातून फायदा नाही पाहीला पाहीजे. परंतु किमान नो प्रॉफीट, नो लॉस यादृष्टिकोनातून पाणीपुरवठा जर शहरामध्ये आपण दिलातर भविष्यकाळामध्ये आपल्याला निश्चितपणे उपयोग होईल. आज आपण पाहतो की आपला खर्च वाढत चालला आहे आणि उत्पन्नाची बाजू कमी होत चालली आहे. त्यामुळे आपल्या या सगळया गोष्टीमध्ये आपल्याला बारकाईने भविष्याकाळामध्ये विचार करावा लागणार आहे. या बाबतीत लक्ष घालावे. आपल्या शहरात अनेक ठिकाणी जुन्या लाईन्स टाकलेल्या आहेत. त्याठिकाणी खुप मोठया प्रमाणात पाण्याची गळती होते. पाण्याची लाईन्सचे सर्वेक्षण झालेल आहे त्याचे पुन्हा एकदा सर्वेक्षण करुन आशा ज्या लाईन्स पुर्वी शहरामध्ये पडलेल्या आहेत त्या लाईन्स आपण काढून टाकल्या पाहीजेत किंवा त्या लाईनला पाणीपुरवठा केला जातो तो थांबवला पाहीजे जेणकरुन पाण्याची गळती त्याठिकाणी थांबेल. आपल्याला जेवढ जास्तीत जास्त पाण्याची गळती थांबवता येईल त्या दृष्टिकोनातून आपल्याकड आगामी काळामध्ये उपाययोजना आखाव्यात अशाप्रकारची अपेक्षा व्यक्त करतो आणि याठिकाणी थांबतो.

**मा.अभिषेक बारणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. या सभागृहामध्ये पाणी या विषयावर बोलण्यासाठी संधी मिळते. दोन महीन्यापुर्वी मा.आयुक्त साहेबांना पत्र

पाठवलेले होते. आमच्या प्रभागामधील नागरीकांना नळकनेक्शनच्या अडचण असल्यामुळे ते घेण्यासाठी जातात त्यावेळेस त्यांना २०१२ पुर्वीच्या पुरावे सादर करावेत तरच नळकनेक्शन मिळेल अशी अडचण यायला लागली आहे. त्यानंतर तुमच्या पाठपुराव्यामुळे तुम्ही २०१५ पर्यंत कुठला पुरावा असेलतर अनधिकृत कनेक्शन अधिकृत करण्यात येईल असे आपण सांगीतले त्याबद्दल तुम्हांला प्रथमत: मी धन्यवाद देतो. तसेच आपल्याला विनंती करतो की ह्यात असलेली बांधकामाला जे पाणी वापरतात म्हणजे जवळ जवळ २०१५-१६-१७ कधीची जरी असलीतरी त्या पाण्याच्या टॅक्सपावतीवरती एक शेरा दया की हे घर अनधिकृत आहे. हे पाण्याच कनेक्शन ईलीगल आहे. पण त्या नागरीकाला ते कनेक्शन दया. काही ठिकाणी पाण्याच्या कनेक्शनला मोटर लावली जाते त्यामुळे त्यांच्याकडे पाणी जास्त जात आणि इतरांना पाणी मिळत नाही. त्यामुळे काय होईल की त्याच मीटर जास्त पळल आणि त्याला तेथे जास्त पैसे भरायला लागतील त्याच्यामुळे तुम्हांला कारवाई करायला सोप जाईल. हे सगळ लवकरात लवकर करण्यासाठी तुम्ही प्राधान्य दया त्यामुळे ब-याचशा अडचणी आमच्या भागातील सुटतील. विरोधकांना एवढच सांगतो की आमच्या शहरातील जो ज्वलंत प्रश्न आहे रिंगरोडचा तो माझ्या प्रभागामध्ये जास्त आहे त्यामुळ आज कृपया करुन गोंधळ घालू नका. चर्चा होण्यापुर्वी सभा तहकूब होऊ देऊ नका. याच्यावर चर्चा व्हावी अशी विनंती करतो आणि थांबतो.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. भाऊसाहेबांनी जे प्रश्न विचारले त्यावर सगळयांनी चर्चा केल्यानंतर आयुक्त साहेब तुम्ही खुलासा करावा. याच कारणच असं आहे की पवना जलवाहीनीवर आपण इतका खर्च करतो की ते पाईप ठेवलेल्या जागेचे भाडे सुध्दा कितीतरी रुपयामध्ये आपण मोजतो. काय करायचे त्याचा निर्णय कुठेतरी झाला पाहीजे. आयुक्त साहेब, तुम्ही पाठपुरावा करावा कारण की लाईन ही व्हायलाच पाहीजे. ती लाईन जमिनीच्या खाली पाच ते सात फुट टाका खालून आपण कुठूनही लाईन टाकू शकतो. लाईन ही करण गरजेच आहे. परंतु याच्यावर आयुक्त साहेब तुमचा खुलासा पण झाला पाहीजे. नाहीतर आजचे प्रश्नोत्तर घेतलेतर त्याचा काही उपयोग होणार नाही. नुसते प्रश्न झाले की विषय संपला असे होईल. त्याचप्रमाणे केशव घोळवे यांचे मी अभिनंदन करते त्यांनी खुप सुंदरपणे पाण्याचा विषय मांडलेला आहे. २४ X ७ सिस्टीम ज्या ज्या ठिकाणी चालू आहे त्याठिकाणी परंतु तेथे तेथे ते कनेक्शन आणि मीटर आता नवीन २४ X ७ च कारण सांगून दोन वेळेस टॅप मारण्याची पध्दत चालू झालेली आहे, म्हणजे मीटर त्यांचे आहे. जिथून तुम्हांला कनेक्शन दिलय त्याच्या पुढे लाईन टाकल्यानंतर जिथे मीटर बसवल आहे तिथं. आता त्यांचे म्हणणे अस आहे की गेटच्या तीन ते सहा फुट आतमध्ये मीटर बसले पाहीजे. पाईप कटींग केल्यानंतर १०० टक्के लिकेजेस होतात. आज शहरामधल पाण्याच लिकेजेस बघीतलतर ४० टक्के लिकेजेस पाण्यामध्ये आहे. आज आपण उचललेले पाणी १००

टक्क्यामधुन ४० टक्के लिकेजेस होत हे केवढया मोठया प्रमाणावर लिकेजेस आहे. म्हणजे हे कुठेतरी थांबले पाहीजे. आज २४ X ७ साठी परत मीटर एकीकडचे काढा आणि परत त्याच लाईनमधुन दुसरीकडे करा. गेटच्या बाहेर किंवा समोरच्या बाजूने, गाडया रिव्हर्स घेताना गाडया जाताना दरवेळेला त्या मीटर चोरीचे प्रमाण सुध्दा फार मोठया प्रमाणावर आहे. मिटींग लावली होती ती त्यावेळेस कॅन्सल झाली. मीटर ज्या ठिकाणी लावलेले आहे त्याच ठिकाणी राहू देत. असं आम्ही कुठेच म्हणणार नाही की बीगर मीटरच २४ X ७ ला पाणी दया किंवा ऑलरेडी आता कोणाकड बीगर मीटर पाणी आहे, तर नाही, मीटरप्रमाणेच दया. परंतु आहे ते परत परत चार वेळा ते पाईप तोडून परत त्या पाण्याची गळती होण्यापेक्षा जिथ मीटर आहे त्याच पध्दतीन मीटर असाव अशी मी अपेक्षा व्यक्त करते. लिकेजेसच्या बाबतीत आजपर्यंत सगळ्या सभागृहात तोच प्रश्न आला की ४० टक्के लिकेजेस आपण कसे शोधून काढायचे आणि मीटणार कसे. पण हे बंद पाईपलाईनमधून ज्यावेळेला पाणी येणार आहे किंवा नवीन ज्यावेळेला आपण २४ X ७ ची पाईपलाईन वापरणार आहोत तर त्या पाईपलाईनची क्वॉलीटी आपण तशा पध्दतीने घेतली पाहीजे. येथून पुढे तरी कमीत कमी आपल्याकडे पाणी लिकेजेसच प्रमाण कमी झाले पाहीजे. याच मॉडेल कुठेही आपल्याकडे नाही. की पाण्याची लाईन टाकल्यानंतर पाण्याची लाईन गेली कुठून. आज हद्दीबाहेर अनधिकृत कनेक्शन किती आहेत, हद्दीबाहेर अनधिकृत कनेक्शन किती आहेत हे बघा, आपल्या अधिका-यांना पण माहिती आहे. पाण्याची बील भरत नाहीत व हद्दीमधील लोकांना पाणी मिळत नाही. हद्दीच्या बाहेरील लोकांमध्ये जास्तीत जास्त कनेक्शन घेतली गेलेली आहेत. ती लोक सुध्दा पाणी बील भरत नाहीत. एखाद कनेक्शन घेतात ती लाईन तेथून तेथपर्यंत टाकून घेतात. मी सांगू शकते. मागच्या वेळेस सुध्दा हद्दी बाहेरचा विषय आलेला होता आम्ही स्पष्ट सांगीतल होत की आम्ही पाणी कनेक्शन देणार नाहीत हद्दीबाहेर. नाही म्हणल्यानंतर अनधिकृत कनेक्शन हद्दी बाहेर सर्रास चालू आहेत. पुनर्रवापराबाबत रेनवॉटर हर्वेस्टींग करणा-या सोसायटयांना सबसिडी दिली पाहीजे. जुन्या

सोसायटया असतील, मोठमोठे हॉस्पिटल असतील, शाळा असतील काही मोठमोठया संस्था आहेत किंवा मोठमोठया सोसायटया आहेत त्यांनी पुनर्रवापर करण्यासाठी रेनवॉटर हर्वेस्टींगचा प्रोजेक्ट राबविण्यासाठी महापालिकेनी सबसिडी दिली पाहीजे. आपल्या शहरात बोअरींग भरपूर आहेत. मागे सुध्दा सांगीतले होते ज्या ज्या ठिकाणी बोअर आहेत तेथे पाणी आतमध्ये परत गेले पाहीजे त्याची व्यवस्था पाहीजे परंतु ते झालेले नाही. येथून पुढे शहरात पाण्याची परिस्थिती फार वाईट होणार आहे आणि यासाठी आपण सुध्दा चांगला प्लॅन केला पाहीजे. पाणीपुरवठयाचे लोक त्रासामध्ये काम करतात. आज शहरात नागरीकांना काही लक्षात येत नाही. नागरीक म्हणतात पाऊस पडला १०० टक्के धरण भरले आम्हांला पाणी पाहीजे. काल सकाळी आम्ही सहा वाजता फोन अधिका-यांना केले. काही भागात पाणी नाही अधिकारी सहा वा. फोन उचलतात. जे.ई. उचलत नाहीत पण अधिकारी फोन उचलतात. पाणी न

पुरण्यासारखी परिस्थितीच नाही. शहरामध्ये पाणी चांगल आहे चांगल पाणी पुरल पाहीजे. आज परिस्थिती अशी आहे की मोरवाडी कोर्ट त्याठिकाणचा भाग घ्या, पाणीपुरवठयाचा प्रॉब्लेम आहे, लालटोपी नगर घ्या, पाणीपुरवठयाचा प्रॉब्लेम आहे, अजेंठानगर घ्या तेथे पाण्याचा प्रॉब्लेम आहे. सगळीकडे पाण्याचा प्रश्न आहे. अनधिकृत कनेक्शन अधिकृत केली गेली पाहीजेत. वसूली ३१.१६ आहे. खर्च किती आहे तो बघुन घ्यावा. मला वाटत खर्च जास्त आणि वसुली कमी आहे. वसुली करण्यासाठी खर्च जास्त आहे ते सुध्दा बघीतले पाहीजे. पुर्वी असे नव्हतेच, आता महीन्याला, नंतर सहा महीन्याने एकदा बील देतो, नंतर वर्षानी एकदा बील आता महीन्याला देतो. याच्यामध्ये पण फार मोठया प्रमाणात तफावत आहे. विदाऊट मीटर बील देत होतो तर नागरीक त्या पध्दतीने बील भरत होती. त्यावेळेला जेवढी वसुली आहे तेवढीच वसुली आता सुध्दा आहे. त्या पध्दतीने पण आपण बघीतल पाहीजे. शहरात बांधकाम इतकी झालेली आहेत. आज अशी परिस्थिती आहे की मोरवाडी भागातील जी पुर्वीचे जुने घर आहेत त्यांना पाणी मिळत नाही. आज नागरीक भयभीत झालेले आहेत. महींद्राने, म्हाडाने मोठमोठया इमारती बांधलेल्या आहेत. दिड दिड हजार फ्लॅट महिंद्रचे आहेत. जर त्यांना पाणी देणार असालतर पुढे आम्हांला पाणी मिळणार का. लोकांमध्ये भयभीत वातावरण आहे. मोरवाडीमध्ये बघा महापालिकेच्या मागच्या बाजूला की या लोकांना पाणी दिलेतर आम्हांला पाणीच नाही. त्यांना रस्ते वापरायला दिलेतर आम्हांला एवढूसाच रस्ता आहे. सगळयांनी प्रश्न विचारलेले आहेत आता खुलासा दयायला पाहीजे. खुलासा केला नाहीतर भामा करा, आंद्रा करा काहीही करा काहीच उपयोग होणार नाही. प्रत्येक प्रोजेक्टमध्ये कुठेना कुठेतरी काहीनां काही गोष्टी येतच असतात. आमची पालकमंत्र्यांना विनंती असेल, आमची मुख्यमंत्र्यांना विनंती असेल की पाण्याची पाईपलाईन ही खालून जाणारी पाईपलाईन आहे. त्यांनी सांगीतलेल्या सर्व अटी आम्ही मान्य करत आलेलो आहोत. कोणाच्याही घरामध्ये दुर्घटना घडू नये त्यांच्याशी, आम्ही शेतक-यांशी सहमत आहोत. परंतु शेवटी पाण्याचा सुध्दा हा प्रश्न आहे आणि हा प्रश्न सोडविलातर आपल्याकडचे बराचसे प्रश्न सुटणार आहेत. यादृष्टिकोनातून सगळयांनी प्रयत्न केले पाहीजेत. पालकमंत्र्यांनी प्रयत्न केले पाहीजेत, मुख्यमंत्र्यांनी प्रयत्न केले पाहीजेत, महापौरांनी प्रयत्न केले पाहीजेत, सर्वानी प्रयत्न केले पाहीजेत. हा प्रश्न तुमच्या स्किलने कसा करता येईल त्या पध्दतीने करावा व याच्यावर आयुक्त साहेबांनी खुलासा करावा, धन्यवाद.

**मा.तुषार हिंगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ज्येष्ठ नेते भाऊसाहेब भोईर जे बोलले ते खुप छान होते. जलसमिती, जलसाक्षरता ही झालीच पाहीजे. ती काळाची गरज आहे. आयुक्त साहेब, आज पिंपरी चिंचवड शहरात पाणीपुरवठयाचा प्रश्न गंभीर होत चाललेला आहे. त्याची काळजी घेत असताना पहील्यांदा आपण जेवढा खर्च करतो तेवढे आपण शहरात डक्ट केले नाहीत. आपण जसं नागपूर महापालिकेमध्ये डक्टची व्यवस्था केलेली आहे तशी पुर्ण शहरात प्रथम डक्टची व्यवस्था करावी. जेणेकरुन त्यातून एमएनजीएल, पाणीपुरवठा,

ड्रेनेज, स्ट्रॉम वॉटर  हे सगळेच एका ठिकाणावरुन गेलेत त्यामुळे मेन्टेनन्सच्या वेळेस परत ते लिकेज होतं आणि सगळ प्रदुषण निर्माण होतं. नागपूर महानगरपालिकेत ज्या पध्दतीने डक्ट केले आहेत त्या पध्दतीने रोड करायच्या अगोदर पहील इन्फ्रास्ट्रक्चर तयार केलं त्यामुळ आपण येथे पहील्यांदा पाणीपुरवठयाच्या प्रश्ना बरोबर पहील्यांदा आपण डक्ट बनवावेत. जेणेकरुन मेन्टेनेन्ससाठी भविष्यात काही होणार नाही. त्याचप्रमाणे आज ११२ कोटी रु. पवना बंद पाईपलाईनच्या वेळेस आपण खर्च केला असं सांगीतल. जर जागा आपल्या ताब्यात नव्हती तर तेथून पाईपलाईन का घेतली हा महत्वाचा प्रश्न आहे. जोपर्यंत जागा ताब्यात नव्हती तोपर्यंत ते पाईप घ्यायचेच नव्हते. त्याच टेंडर पण आपण काढल आहे. त्याचप्रमाणे पाण्याची पाईपलाईनचे आताच सन्माननीयांनी सांगीतले की ही पाच फुट खालून घेतली पाहीजे त्यामुळे पाणीपुरवठा चांगला होईल. माझा जो प्र.क्र.१० आहे तो मॉडेल वॉर्ड म्हणून मागच्या वर्षी होता. मॉडेल वॉर्ड होत असताना रोडचे काम झाली पण पाण्याची पाईपलाईनचे काम नाहीत, ड्रेनेजचे काम झालेले नाहीत. रोडचे काम झालेले असताना मला प्रशासनाने पत्र दिले आहे, पाणीपुरवठयाचे सांगीतले. प्र.क्र. ९ मॉडेल वॉर्ड हा विकसीत करत आसताना पाणीपुरवठयासाठीचे काम केलेले नाहीत व सदरचे कामात पाणीपुरवठयाचा समावेश नाही. मग पहील्यांदा मॉडेल वॉर्ड करताना आरोग्य आणि पाणीपुरवठा हा सगळयात महत्वाचा प्रश्न आहे तो सोडविला पाहीजे होता, ड्रेनेजचा प्रश्न महत्वाचा आहे तो सोडविला पाहीजे होता. आता तेथे पाणीपुरवठा म्हणलेतर आता तेथे सिमेंटवर्क केलेले आहे ते पुर्ण तोडावे लागतील अशी परिस्थिती आहे. आणि समजा न तोडता फुटपाथच्या शेजारी करायच म्हणलतर एकाच ठिकाणी सगळया लाईन येणार आहेत. त्यामुळे तो प्रश्न भेडसावतो. तरी मा.आयुक्त साहेब आपल्याला विनंती आहे की, पाणीपुरवठयाचा प्रश्न सोडवत असताना आपण सर्वात महत्वाचे डक्ट करावा एवढ बोलून थांबतो.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पहील्यांदा मी आपले मनापासून अभिनंदन करतो. की आज खर पाहता महापौर म्हणून तुम्ही काम करता. आज सभागृह चालवताना, आमची हीच अपेक्षा आहे की सर्वांना सादकबादक चर्चा करु दयावी, चांगल्या पध्दतीने काम कराव आणि अशाच पध्दतीने आपण सभागृह चालवाव त्याबद्दल आपल्याला धन्यवाद. भाऊसाहेब भोईर यांनी अतीशय चांगले प्रश्न मांडलेले आहेत. त्यांनी जी समिती गठीत करायची सांगीतले त्याला मी मनापासून अनुमोदन देतो. जे विषय झाले आहेत त्यावर मी अधिक बोलणार नाही. मा. आयुक्त साहेब दोन तीन सुचना करायच्या आहेत. आपल्याला ४७० एमएलडी पाण्याचा उपसा करण्याची परवानगी आहे. ५०० एमएलडी पर्यंत आपण पाणी दंड भरुन वगैरे उचलतो. या व्यतिरीक्त २५ ते ३० एमएलडी पाणी आपण एमआयडीसीकडून घेतो. जे पाणी आपण एमआयडीसी कडून घेतो त्या पाण्यापोटी साधारणत: साडेनऊ कोटी रु. आपण वर्षाला एमआयडीसीला देतो. मगाशी भाऊसाहेब भोईर यांनी दिलेले

आकडे आणि येथे प्रशासनाने दिलेली माहिती आहे त्याप्रमाणे १०९ कोटी वर्षभरात खर्च करतो. ३१.१६ कोटी २०१६-१७ ला वसुली म्हणलेलं आहे. साधारणत: ७७.८४ कोटी रु. जादाचा खर्च म्हणजे त्यांनी सांगीतल्याप्रमाणे ८० कोटी रु. आपण जास्तीचे खर्च करतो. कारण आपण पाणी देताना आडीच रुपयानी देतो आणि कमर्शिअल पाणी देतांना आपण २५/- रु. ने देतो. पब्लिक कनेक्शन ९२ आहेत, कमर्शिअल कनेक्शन ४३५५ शहरात आहेत. कमर्शिअल पुर्ण शहरामध्ये ४३५५ आहेत. याचाच अर्थ आपला सर्व्हे प्रॉपर नाही आणि कमर्शिअल मोठया प्रमाणामध्ये आहे त्याची नोंद आपल्याकडे प्रॉपर नाही आणि म्हणून आपला हेवी लॉस होतो. त्यामुळे संबंध शहरामध्ये ४३५५ कमर्शिअल कनेक्शन आहेत. रेसिडेन्शिअल कनेक्शन १ लाख २२ हजार ४३० आहेत. त्याला आपण आडीच रु. पर हजार ली. ला आपण चार्ज करतो. सोसायटयामध्ये ११७८४ कनेक्शन आहेत. संपुर्ण शहरामध्ये १४५५३० कनेक्शनची आपल्याकडे नोंद आहे. त्यामध्ये आपल्याला कमर्शिअल कनेक्शन आणि आता जो सर्वांनी ऊहापोह केलेला आहे की २०१२ नंतरच्या नोंदी नाहीत अशाप्रकारचे पाहीलेतर साधारणत: १० हजार कनेक्शन निघतील. हे लोक पाणी विना कुठल्याही परवानगीने वापरत आहेत. ज्यांनी अधिकृत कनेक्शन घेतले आहेत त्या लोकांची चुक झाली की काय असं म्हणायच का. मग आता सांगीतल्याप्रमाणे त्यांना दंड करायचा त्यांना नोटीस दयायची. मात्र ज्यांनी कोणत्याच प्रकारची परवानगी न घेता कनेक्शन घेतलेले आहे त्यांना आपण बील सुध्दा मागत नाहीत. साधारणत: दहा हजार कनेक्शन म्हणलतर आपण एका कनेक्शनला ७ हजार घेतो त्याप्रमाणे ७ कोटी रु. आपल्याला त्यामध्ये भुर्दंड आहे. अशा पध्दतीने हेही पैसे वसुली व्हावेत. हे कनेक्शन आपण रेग्यूलर केलेतर वर्षाला आपले उत्पन्नही वाढणार आहे. जसे आपण प्रॉपर्टीला अनऑथोराईज म्हणून स्टॅम्प मारतो. त्याचप्रमाणे यांना त्याच्यावरती अनऑथोराईज कनेक्शन म्हणाल जोपर्यंत रेग्यूलराईज नियमाप्रमाणे करता येत नाही, आता सुध्दा महाराष्ट्र शासनाने अनधिकृत बांधकामाची नियमावली केलेली आहे. ती २०१५ पर्यंत केलेली आहे. लोक आज सुध्दा अनधिकृत बांधकाम करतात, आज सुध्दा अनधिकृत कनेक्शन घेतात. त्याच्यावर आपले प्लॅनिंग शुन्य आहे, आपण असमर्थ आहोत आपण काम करु शकत नाहीत आणि आजही आपण ते बांधकाम थांबवू शकत नाहीत. मग अशा परिस्थितीमध्ये अशा कनेक्शनला या लोकांना दंड व्हायला पाहीजे. त्यांच्याकडून वसुली व्हायला पाहीजे. कोणत्या पध्दतीने करायचे कोणत्या नियमात बसवायची हे काम मा.आयुक्त साहेब आपल आहे. ज्यावेळेला लोकप्रतिनीधी म्हणून सभागृहात बोलतात की या लोकांची वसुली व्हायला पाहीजे. त्यांच्याकडून पैसे घेतले गेले पाहीजेत त्यांना नियमामध्ये बसून निश्चित मार्ग काढला पाहीजे. त्याचप्रमाणे आयुक्त साहेब सोसायटीमध्ये मीटर आहेत, इन्डिज्वल पण मीटर्स आहेत. सोसायटीच्या मीटर्स मध्ये पण असं आहे की मीटर बंद असेलतर आपले महाशय त्याला बील देत नाहीत. त्यावेळेला इन्डिज्वल असेल किंवा सोसायटी असेल, त्याच जर मीटर बंद पडलेल

असेलतर एव्हरेज बील दिले गेले पाहीजे. त्या प्रत्येक फ्लॅटला आपल ऍव्हरेज बील जायलाच पाहीजेत. रेग्यूलर मगच काळजीपुर्वक तो मीटर दुरुस्त करुन घेईल आणि महापालिकेचा लॉस होणार नाही ही दक्षता आपण घ्यायला पाहीजे. जे लोक केअरलेस राहतात मीटर दुरुस्त करत नाहीत अशा लोकांना सुध्दा त्यातन आपल्याला वचक देता येईल. आपण तो सुध्दा प्रयत्न याठिकाणी करणे खुप गरजेच आहे. त्याचबरोबर एव्हरेज बील देत असताना मग इन्डिव्ज्यूल असू दयात, सोसायटी असू दयात कमर्शिअल कनेक्शन जे आहे त्याच सर्व्हेक्षण करुन अजून सुध्दा आपले कमर्शिअल कनेक्शन कसे वाढवता येईल याकडे आपण लक्ष दिले पाहीजे. मा.आयुक्त साहेब, ३० एमएलडी पाणी घेतो त्याचा रेट दहा ते सतरा रु. पर्यंत आहे. आपण एमआयडीसीकडून जे पाणी घेतो त्याचा रेट दहा रुपये ते सतरा रुपयापर्यंत आहे. आपण स्वत: ५०० एमएलडी पाणी उचलतो त्यांच्याकडून १० रु. नी पाणी घ्यायच आणि आपण आडीच रुपयानी दयायच. त्यांच्याकडन १७ रु.नी पाणी घ्यायचे आणि आडीच रु.नी दयायच हे कितपत आपण चांगल गणीत करतो, कोणत गणीत करतो, कोणत प्लॅनिंग आहे. नियोजनशुन्य प्लॅनिंग आहे त्यामुळे आपले प्रॉब्लेम आहेत. त्याठिकाणी आपली टाकी नाही किंवा पंपींग होत नाही घोळवेनी सांगीतल त्या पध्दतीने आपल्याला सर्व गोष्टीचे प्लॅनिंग करावे लागेल. आपण स्मार्ट सिटी करत आहोत, काल सुध्दा ती मिटींग झाली त्या मिटींगमध्ये पाण्याचे नियोजन हे पहील्यांदा व्हायला पाहीजे. शहरामधले सार्वजनिक टॉयलेटस जे आहेत ते व्हायला पाहीजेत. हॉकर्स झोनची निर्मीती व्हायला पाहीजे. मगाशी सांगीतल की हे अमूक करत असताना या मुलभूत गोष्टी राहीलेल्या आहेत. त्या मुलभूत गोष्टी राहता कामा नये. याला आपण प्राधान्य दयाव, प्राधान्यक्रम दयाव आणि मग आंद्रा असेल किंवा भामा-आसखेड असेल येथील जे पाणी आणायच आहे त्या पाण्याच्या बद्दलच सुध्दा नियोजन पाहीजे. त्याचबरोबर या सभागृहाचे नेते एकनाथ पवार असतील, मा.महापौर आपण असाल, बाकीचे पदाधिकारी असतील, आमदार, महापौर असतील, पालकमंत्री असतील. माझी आपल्याला पिंपरी चिंचवड शहरवासीयांच्या वतीने विनंती आहे की आज दिल्ली पासून महापालिकेपर्यंत भाजपची सत्ता आहे. आज तळेगावच्या आमदारांनी त्यांची बाजू मांडलेली आहे. परंतु पिंपरी चिंचवड शहरवासीयांना सुध्दा स्वच्छ पाणी मिळाल पाहीजे, चांगले पाणी मिळाले पाहीजे आणि २४ X ७ चे आपल स्वप्न पुर्ण व्हायला पाहीजेत. यासाठी या सर्व पदाधिका-यांनी मावळच्या आमदाराबरोबर बसून त्यांच्या ज्या अडी-अडचणी असतील त्या जाणुन घेवून त्या सोडविण्याचा प्रयत्न केला पाहीजे, आणि बंद पाईपलाईन योजना जी आहे ती कशी कार्यान्वित करता येईल, पुन्हा कशी सुरु करता येईल, हेवेदावे बाजूला ठेवून, त्यांच म्हणणं काय असेल ते ऐकूण घेवून त्यातून मध्य मार्ग कसा काढता येईल हे सर्व प्रतिनीधीनी प्रयत्न करावेत अशाप्रकारच मी नम्र आवाहन शहरवासीयांच्या वतीने करतो आणि थांबतो. धन्यवाद, जयहिन्द जय महाराष्ट्र.

**मा.निता पाडाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याठिकाणी पाण्याचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. मला एवढच सांगायच आहे की आपण पवना धरणातून ५०० एमएलडी पाणी घेतो आणि आपल्याकड साठवण्याची क्षमता १९४.७० एमएलडी आहे. मा.आयुक्त साहेब आपल्याला विनंती करायची आहे की काळेवाडी प्र.क्र. २२ साठी गेले सात ते आठ महीन्यापुर्वी जे पाण्याच्या टाकीचे भुमीपुजन केले त्याचे काम अजून का चालू झालेले नाही. तरी आपण आपल्या एक्झिक्यूटीव्ह, डेप्युटी ईंजिनीयरला विचाराव की आपण ते काम चालू का केलेल नाही. त्याचबरोबर याठिकाणी अनधिकृत नळकनेक्शनची संख्याच आपण दिलेली नाही परंतु माझी आपल्याला विनंती आहे की अधिकृत नळकनेक्शन पेक्षा अनधिकृत नळकनेक्शन जास्त आहेत त्याच्यात आपल्या महापालिकेचे कितीतरी उत्पन्न जातय. आयुक्त साहेब, आपले जे अधिकारी आहेत त्यांना माहिती असते. मजुरांना माहिती असते की कोण नळ कनेक्शन घेतय कोण काय करतय परंतु त्याच्यावरती त्यांचा अजीबात अंकुश नाही. जे चाललय ते चाललय परंतु आयुक्त साहेब जी लोक रेग्युलर पाणी बील भरतात त्यांच्यासाठी आपण काय करणार आहोत. त्याना आपण पुरेशा प्रमाणात प्रेशर देत नाहीत. काळेवाडी भागात गेली दोन महीने लो प्रेशर पाणी येते, पवना धरण शंभर टक्के भरलेल आहे. दोन महीने रोज सकाळी आपले अधिकारी येतात पाहतात परंतु काहीच करत नाहीत. आमच्या प्रभागाचे जे डेप्युटी ईंजिनीअर आहेत ते तर नागरीकांना इतक्या उध्दट भाषेत बोलतात जमिनीच्या लेव्हलचा जो खड्डयातला नळ आहे तो चेक करतात आणि काय रे, तुझ आहे नां पाणी बरोबर, अजून तुला किती पाणी पाहीजे. हे पाणी तुला सफिसीएन्ट आहे, रेडींग घ्या रे याच. अक्षरश: लोकांना एवढ उध्दट भाषेत आमच्या समोर बोलतात. का तर त्यांना सहा वाजता वॉर्डात याव लागत म्हणून. तीन दिवसापुर्वीची गोष्ट आहे असे ते बोलत होते. परवा दिवशी मी दुधेकर साहेबांना फोन केला त्यांना ही परिस्थिती सांगीतली पाणीच येत नाही म्हणून, मी दुधेकर साहेबांचे खरच आभार मानते की त्यांनी काम चालू केलतर परवा दिवशी आपल्या व्हॉल्व मध्ये मोठा बॉल सापडला. त्या बॉलचे तुकडे तुकडे करुन काढले आहेत तरी पण काही तुकडे आत गेल्यामुळे अजूनही काही प्रेशरन काळेवाडीत पाणी येत नाही. अशी परिस्थिती असेलतर आपल्या डेप्यूटी ईंजिनीअरवरती बोलल पाहीजे. एक्झिक्युटीव्ह ईंजिनीअरना सुध्दा मी बराचवेळा सांगीतले ते फक्त लिहून घेतात फॉलोअप काहीच नाही. दोन महीन्यांनी आपले अधिकारी काम करणार असतीलतर ही खेदाची गोष्ट आहे. मी अशा अधिका-यांचा निषेध करते. जेणेकरुन काम सांगून सुध्दा काम होत नाहीत आणि माझ्या नागरीकांना उध्दट भाषेत बोलतात. त्याचप्रमाणे आपण जे पाण्याचे बील आहे ते काढण्यासाठी किंवा रिडींग घेण्यासाठी जी एजन्सी नेमलेली आहे त्या एजन्सीचे काम व्यवस्थित चाललेले आहे का नाही. त्या एजन्सीचे मीटरची रिडींग घ्यायला लोक येतात ते व्यवस्थित रिडींग घेत नाहीत. जेणेकरुन मध्येच एखादयाला जर बील दोन हजार येत असेलतर त्यांचे बील डायरेक्ट तीस हजारावरती

जातय. त्याच्यानंतर आम्हांला दुरुस्ती करुन घ्यावी लागते. महीन्याची महीन्याला बील येत नाही कधीतरी येतय. प्रत्येक बीला मागे त्यांना किती पैसे खर्च करतो त्या प्रमाणात त्यांचे काम चालते का, अजीबात चालत नाही. फक्त आपण एजन्सीच पोट भरण्यासाठी त्यांना ते काम दिलेले आहे असं मला वाटत. आयुक्त साहेब, २४ X ७ मध्ये आपण कोणती गाव घेतलेली आहेत कोणती नाही याची नगरसेवकांना कोणालाच कल्पना नाही. नगरसेवकांना विश्वासात घेवून हे करावे. आम्हांला विचारात घेवून करायला पाहीजे होते. किमान काळेवाडी, थेरगावचा समावेश करायला पाहीजे होता, तोही समावेश केलेला नाही. प्रत्येक गोष्टीत नगरसेवकांना विश्वासात घेवूनच काम झाले पाहीजे. त्याचप्रमाणे अनधिकृत बांधकामा विषयी आताच अभिषेक बारणे बोलले आहेत. ते सांगतात की मार्च २०१२ च्या अगोदरचा पुरावा आणावा तरच नळकनेक्शन देऊ. आयुक्त साहेब, आमच्या काळेवाडी भागात अशा चार ते पाच कॉलनी आहेत की त्यांची घर पुर्वीचेच आहेत. लाईट बील पुर्वीचे आहेत. परंतु त्यांनी नोंद न केल्यामुळे टॅक्सपावतीवर अनधिकृत शेरा येतो त्यामुळे नळकनेक्शन हे मंजूर होत नाही. लोक पैसे भरुन तयार आहेत. जे.ई.ना याबद्दल माहिती आहे परंतु त्यांना सुध्दा अडचण येते की आपला जीआरच तसा असेल. तरी लवकरात लवकर आपण २०१५ पर्यंत नळकनेक्शन मंजूर करण्यात यावे अशी मी विनंती करते व बोलू दिल्या बद्दल मा.महापौरांचे सुध्दा आभार मानते व थांबते, धन्यवाद.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज खरतर भाऊसाहेब भोईर यांचे धन्यवाद मानायला पाहीजे. कारण ब-याच महीन्यापासून आमच्या मनामध्ये रुखरुख होती की पाण्याविषय जो काही प्रश्न आहे तो सभागृहात मांडायचा आहे. नवीन जे सभासद आहेत मग ते केशव घोळवे असतील, स्नेहल असेल यांनी अतीशय सुंदर पध्दतीने पाण्याचा विषय मांडलेला आहे. तूषार हिंगे यांनी चांगला विषय मांडला आहे. की नागपूरमध्ये आयुक्त साहेबांनी हा विषय केलेला आहे. आता खरोखरच पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटीमध्ये येत असेलतर डक्ट हे झालेच पाहीजे. आम्ही पाहतो ज्यावेळेस पाण्याचा विषय येतो कारण आमच्याकडै पंचवीस-पंचवीस, तीस-तीस वर्षापुर्वीच्या या पाईपलाईन गंजलेल्या आहेत त्या पाईपलाईन जेव्हा काढायच्या असतात त्यावेळेला कुठ जर आम्ही खोदलतर कुठेतरी इलेक्ट्रीकची वायर लागते, कुठेतरी ड्रेनेज असतं त्यामुळे प्रॉब्लेमस क्रिएट होतात. त्याच्यासाठी पाणीपुरवठयाच्या अधिका-यांना विनंती आहे की त्यांनी डक्ट सिस्टीम लवकरात लवकर चालू करावी. जलसमितीची स्थापना केली पाहीजे अशी एक सूचना केशव घोळवे यांनी केली चांगली सूचना आहे. आज १३५ ली. पर माणसी पाणी दयायचे आपल्याकडे नियम आहे पण आपण पीसीएमसी जवळ जवळ १५० ते १६० ली. पाणी पर हेड प्रमाणे आपण देतो त्याबद्दल त्यांचे धन्यवादच माणयला पाहीजे. आज माझा प्रभाग क्र. २० संत तुकारामनगर. आता केशव घोळवे यांनी म्हणाले की कुठे ग्रॅव्हेटी सिस्टीम आहे, कुठे कुठे पंपींग सिंस्टीम आहे. पण आमचे बारा

प्रभाग हे ग्रॅव्हीटी सिस्टीमवर आहेत. ज्यावेळेला पाणी येत त्यावेळेला सगळया टाक्या भरल्या जातात आणि शेवटी नेहरुनगरची टाकी आणि संत तुकारामनगरची टाकी भरते. मा.आयुक्तांना एक विनंती करायची आहे की मासुळकर कॉलनीमध्ये आपण दोन टाक्या वेगवेगळया बांधलेल्या आहेत तरी सुध्दा नेहरुनगर टाकीवरुन जो बायपास मासुळकर कॉलनीला जातो तो अजूनही बंद करण्यात आलेला नाही. त्याच कारण काय हे खरोखर आयुक्तांनी आम्हांला सांगाव. कारण तेथे काही अधिकारी आपल्या कॉर्पोरेशनचे राहत होते म्हणून त्यांना जास्त पाणी दिल जातं आणि संततुकारामनगर पासूनच्या पुढच्या १२ प्रभागाना पाणी का दिले जात नाही याच उत्तर आम्हांला आयुक्तांकडून हवय. आमच्याकडे बरीचशी गार्डन आहेत त्या गार्डनमध्ये आपण पाईपलाईन दिल्या आहेत त्या गार्डनमधुन सुध्दा ब-याचशा घरामध्ये अनधिकृत पाईपलाईन दिलेल्या आहेत त्याची गार्डन विभागाला तुम्ही विचारणा करणार आहात का. कारण जर ती विचारणा केली नाहीतर जे लोक अधिकृत पैसे भरतात त्यांनी पैसे का भरावे. आणि अनधिकृत ज्या लोकांनी कनेक्शन घेतले त्यांनी पैसे का भरु नये याचे उत्तर दिले पाहीजे. ४३३५ कमर्शिअल बांधकाम पीसीएमसीमध्ये आह्ेत का. कारण ४३३५ कमर्शिअल बांधकाम पीसीएमसीमध्ये असतीलतर आपण जो टॅक्स घेतला जातो त्यांच्याकडून कमर्शिअल टॅक्स का घेतला जात नाही. आज कॅनबेरी ही संस्था कुठल्या पध्दतीने काम करते हे आज बघण्याची वेळ आली आहे. आज माझ्या संततुकारामनगरमध्ये, महेशनगरमध्ये एक फॅमीली राहते त्या फॅमीलीमध्ये फक्त दोन जण राहतात पण तेथे ५३ हजाराच बील येतं. आणि जिथ दहा दहा, वीस वीस जण आहेत तेथे मीटरप्रमाणे मात्र पाच ते सहा हजार बील येतं. मग हे कुठल्या पध्दतीने या संस्थेच कामकाज होतं. आज बील देताना त्याचा फोटो काढतो आणि फोटो काढताना सुध्दा ते म्हणतात आमच्या हातामध्ये आहे तुम्हांला बील किती देणं. अस जर असेलतर ही कॅनबेरी संस्था कोणाची आहे. कुठल्या पध्दतीने हे काम चालत याच उत्तर आम्हांला हवय. आज बंद पाईपलाईन योजना आपली बंद पडली आहे. पण बंद पाईपलाईन योजना बंद पडताना आमच्या खासदारांची भुमिका सुध्दा आता तेवढीच महत्वाची असणार आहे, ज्या नगरसेवकांनी मागणी केली त्यांच सुध्दा मी अभिनंदन करते. आज खासदारांच्या भुमीकेवरुन आमच्या पालकमंत्र्यांची, आमच्या मुख्यमंत्रद्वयांची आणि आमच्या प्रशासनाची नक्कीच तेथे मेहरनजर राहील आणि मला वाटत सर्वांच्या पध्दतीने त्याठिकाणी आम्ही नक्कीच काम करु. आज नवीन नवीन सोसायटीला पाण्याचे कनेक्शन देण्याचे काम केले. मला वाटत गेल्यावेळेस ज्या पध्दतीने जे झाले ते यापुढे भाजपकडून होणार नाही त्याच्यामध्ये नक्कीच सुधारणा होईल. म्हणून पहील्यांदा रहिवाशाना पाणी मिळेल आणि त्याच्यानंतर जे कन्स्ट्रक्शन करतील त्यांना पाणी मिळेल अशी प्रशासनाकडून नक्कीच ग्वाही देण्याचा प्रयत्न करते आणि मा.महापौरांनी याच्यावर नक्कीच काम कराव ही त्यांना विनंती करते आणि येथेच थांबते, जयहिन्द, जय महाराष्ट्र.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आजचा पाणीपुरवठयाचा विषय, त्यातून केलेले प्रश्न आणि प्रशासनाने दिलेली उत्तर. याठिकाणी जे उत्तर दिलेली आहेत मला वाटत ती वस्तुस्थितीला धरुन आहेत. बंद पाईपलाईन योजना बंद का पडली ती आता चालू करा त्यात काय राजकारण झाल, कोण कोण होतं कसे कसे होते हे काही मी नव्याने वेगळ सांगण्याची गरज नाही. बंद पाईपलाईन योजनेला भाऊसाहेब म्हणाले की आपले २०० कोटी रु. गेले. ११२ कोटी रु. आपण मोबीलायझेशन ॲडव्हान्स दिलेला आहे. आपल्या ॲडव्हान्समधुन ठेकेदारांनी घेतलेले पाईप आहेत आणि ते सडतात हे त्रिवार सत्य आहे. पाणी कसं असल पाहीजे नळ चालू केल्यानंतर नळातन जर का पाण्याबरोबर रक्त येणार असेलतर मला वाटतं आता जे पाणी मिळत त्याच्यावर समाधान मानायला हरकत नाही. किंबहूना तेच पाणी आपण गेल्या अनेक वर्षापासून वापरतो. म्हणून इतर पाण्याचा अग्रह धरायचा नाही का. तर धरला पाहीजे परंतु त्या भागातील शेतक-यांना विश्वासात घेतले असते, जागा ताब्यात नसताना टेंडर काढायची घाई केली नसतीतर आज या योजनेला कोणतीही खीळ बसली नसती. मग महापौरांनी लक्ष घातल पाहीजे, पक्षनेत्यांनी लक्ष घातल पाहीजे, पालकमंञ्यांनी घातल पाहीजे गल्ली पासून दिल्लीपर्यंत आमचीच सत्ता आहे का, तर आहेनां. याच्या अगोदर तुम्ही सतरा वर्षे तत्कालीन सत्ताधारी सत्तेवरच होते गल्ली पासून दिल्ली पर्यंत. त्यांना कोणी थांबवलय, आम्हीतर नव्हतं थांबवल. आम्ही शेतक-यांच्या बाजूने होतो का, तर हो आहेत आणि उदयाही राहणार आहोत. का, तर मला माझ्या शेतकरी बांधवाला न्याय मिळाला पाहीजे यासाठी कटिबध्द आहे. सत्तेत आलो कोणाचे घर भरण्यासाठी निश्चितच सत्तेत आलो नाहीत. आज जे काही सभागृहात बोलले त्यांची भाषा त्यावेळेसची वेगळी होती आणि आजची वेगळी आहे. भामा-आसखेड, आंद्र यासाठी आपण ५० कोटीची तरतूद केलेली आहे. २४ X ७ यमुनानगरमध्ये प्रायोगीक तत्वावर त्याठिकाणी काम मागच्या पंचवार्षीकला झालेल आहे. नवीन आता काम चालू आहे. २०१६ ला त्याची वर्कऑर्डर दिलेली आहे. डब्बू आसवाणी स्टॅण्डींग चेअरमन असताना. अजून दोन वर्षे त्याच काम चालणार आहे. घाई नको, मला असं वाटतय की सगळया गोष्टीमध्ये घाई, घाई, घाई घाई. आता काय झाल, आता काय झाल, इतकच का झाल तीतकच का झाल. सहा महीन्याच बारस धरणार पोर त्याच्याकडून काय काय अपेक्षा करणार आहेत. मा.महापौर साहेब, ज्या मिळकतीच्या संदर्भात आता अभिषेक बारणे यांनी विषय केला, आयुक्त साहेब त्याच्यावरती आपण सिरीएसली विचार केला पाहीजे. अभिषेकनी पण चांगली सूचना केलेली आहे. बांधकाम अनधिकृत आहेत पण पाणीतर सगळयानाच लागतय नां. बरं, तुम्ही पाणी दिले नाहीतर ते चोरुन वापरले जाते, विनापरवाना वापरले जाते. किंवा माझ्या शेजारी नळ असेलतर मी सुध्दा माणुसकी म्हणून त्याठिकाणी पाणी देणारच आहे. तर तशा लोकांना सुध्दा आपण दंड मारुन किंबहूना कमर्शिअल देताना आपण अटी-शर्तीवरती देवू शकतो का याचा सुध्दा शासनाकडे पाठपुरावा करण फार गरजेच

आहे. कारण जे पाणी आपण धरणातून उचलतो ते जर का अधिकृत घरामध्ये राहणा-या लोकांसाठी देत असू किंवा अनधिकृत नळजोड घेणारे जर त्याठिकाणी पाणी वापरत असतीलतर मला वाटत साहेब, शहरामध्ये पाण्याची गरज सर्वांनांच आहे. आणि पाण्यासाठी कुठला नियम कुठला कायदा हा नसावा. कारण पाणी अत्यंत जीवनावश्यक वस्तू आहे. काही लोकांच्या सांगण्यात पण असं येत होत मला जाणवत होत की त्यांना असं सांगायचे आहे का की अनधिकृत बांधकामाचे पाणी बंद करा. पण डेअरींग होत नव्हतं. मग असा जो बांध मारायचा प्रकार होत होता, तर इतके दुतखुळे आम्ही निश्चितच नाहीत. तेवढ निश्चितपणे आम्हांला कळत होतं. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब जे अनधिकृत बांधकाम आहेत त्याच्या संदर्भात आता आपण बांधकाम काढू शकत नाहीत का तर ती खरतर फार मोठया प्रमाणावर मोहीम राबवली गेली पाहीजे. राबवताना आता ज्यांनी ज्यांनी भाषण केले, आमच्या सगळया सभासदांचे जे भाषण होतील ते भाषण सुध्दा त्याठिकाणी दाखवा आणि सांगा लोकांना हे तुमचे बांधकाम अधिकृत नाहीत आणि म्हणून मला यावर कारवाई करावी लागते. मलाही वाटत, कायदयाच पालन हे झाल पाहीजे, तर निश्चितपणे झाल पाहीजे. का होऊ नये, जनतेच्या पुढे जाऊन जर वेगळी भाषा करणार असालतर आणि सभागृहात वेगळी भाषा करणार असालतर ते खपवून घेतले जाणार नाही, हे सुध्दा तीतकच ठणकावून याठिकाणी सांगते मा.महापौर साहेब. आपण आता वॉटर रियुजवरती मोठया प्रमाणात काम चालू केलेल आहे. रेनवॉटर हर्वेस्टींगवर सुध्दा आपण काम करतो. या सगळयावरती काम करत असताना आयुक्त साहेब, नवीन नवीन योजना, नवीन नवीन संकल्पना घेवून या शहरामध्ये कामाला सुरवात केलेली आहे. मला असं वाटत की आयुक्त साहेब तुम्ही खुप चांगले काम करता. तुम्हांला जी काही या शहराबद्दलची तळमळ आहे ती लगेच आम्ही तराजूत तोलतो की काय. त्याची घाई होती की काय असं मला वाटतं. आणि तुम्ही चांगल काम करणार आहात किमान तीन वर्षे, आम्हीतर म्हणतो जास्तीत जास्त चार वर्षे तुम्ही या शहरामध्ये काम कराल याविषयी माझ्या मनामध्ये काही शंका नाही. भाऊसाहेब मगाशी बोलताना म्हणाले की हे शहर पाण्याच्या टाकीचे शहर म्हणून ओळखले जाते की काय. मुंबईच उदाहरण दिल गेलतर मुंबईला स्वत:चे धरण आहे तसे धरण या शहराच नाही हे दुर्दैवान मला याठिकाणी नमुद करावस वाटत. आणि म्हणून टाक्या बांधाव्या लागतात. अनेक ठिकाणी टाकीचे बांधकाम अर्धवट स्थितीमध्ये आहे, काही ठिकाणी सहा सहा महीने झाले काम करतो. जी काम चालू केलेली नाही ती काम आम्ही रद्द करण्यासाठी सांगीतलेले आहेत. जेणेकरुन त्या कॉन्ट्रॅक्टरला भीती वाटेल आणि तो लकवरात लवकर काम चालू करेल आणि त्या भागातील नागरीकांचा प्रश्न सोडऊ शकू ही त्यातन अपेक्षा आहे. म्हणून त्याठिकाणी काम करण्यासाठी आम्ही दबावतंत्र वापरतो. मा.महापौर साहेब, आपण तशा प्रशासनाला सुध्दा सूचना कराव्यात की जे अनधिकृत बांधकाम असतील त्या संदर्भातील निर्णय तुम्हांला एकदा घ्यावाच लागेल पाणी सोडण्याच्या संदर्भातला

आणि तो जर का निर्णय लवकरात लवकर झालातर मला वाटते आपले उत्पन्न सुध्दा चांगल्या पध्दतीने वाढणार आहे. आता ८० कोटी खर्च करायचे आणि ४० कोटी वसुल करायचे तर त्यातून असे सुचवायचे आहे का तुम्ही पाणीपट्टी वाढवा. तशी सूचना असेलतर मा.महापौर साहेब, सर्व नगरसेवकांची एक जाहीर बैठक घ्यावी. कोणाच्या काय सुचना आहेत, महापालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी जर काय सर्व सदस्य प्रयत्न करणार असतीलतर निश्चितपणे त्या प्रयत्नांच स्वागत सुध्दा करायला हरकत नाही. मा.आयुक्त साहेबांना सांगायच आहे की, श्रीकर परदेशी साहेबांची स्टाईल वेगळी होती. ते कमी हसायचे, कमी बोलायचे, काम करायचे. आपण हासता पण आपण तेवढेच रुल्स रेग्युलेशन फॉलोप करुन स्ट्रिक्टली काम करता, फक्त आपल्या चेह-यावरच जे हास्य आहे ते सदस्यांना बुचकळयात टाकणार असतं. ते अजून काही काही लोकांना कळत नाही. त्यांना असं वाटत की आपण दबावाखाली काम करता. जे लोक तुम्हांला म्हणाले त्यांना मला असं सांगावस वाटत की तुम्ही दबावाखाली काम करता का तर ज्यांनी मा.मुख्यमंत्र्यांच्या शहरामध्ये काम केले ते कोणाच्या दबावाखाली काम करु शकतात का याचा विचार सगळयांनी करावा एवढच याठिकाणी सांगेल. मा.महापौर साहेब, आपण जे अनधिकृत बांधकाम आहेत त्याठिकाणची एक बैठक आपण लावावी. अभिषेक बारणे यांनी याठिकाणी चांगली सूचना केलेली आहे की त्यांठिकाणी त्यांना आपण नळजोडसाठी काय रेट लावू शकतो याच्या बाबतीत आपण निश्चितपणे पाणीपुरवठा विभागाला अभ्यास करण्यासाठी सांगावे. त्याचप्रमाणे पाणीपुरवठयाच्या ज्या ज्या तक्रारी आहेत अधिका-यांच्या संदर्भातील आता पाडाळे ताईनी मांडलेल्या, स्विनल म्हेत्रेनी मांडलेल्या असतील तर मला असं वाटत की त्या तक्रारीच सुध्दा निवारण चांगल्या प्रकारे आपल्या प्रशासनाकडून आपण करुन घ्यावे. महापौर म्हणून आपण त्याठिकाणची बैठक लावावी. बांधकामाच्या पाण्यासाठी आपण काय रेट लावू शकतो तो सुध्दा अधिकृतपणे रेट लावून पाणीपट्टी वसुल होईल का याच सुध्दा आपण नियोजन कराव, धन्यवाद.

**मा.अंबरनाथ कांबळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पाण्याचा विषय सर्वानी काढला त्याबद्दल मी अभिनंदन करतो. रावेत पासून पाणी सर्व भागाला दिले जाते. आम्हांला जुनी सांगवी, नवी सांगवी, दापोडी, गुरव पिंपळे हे पाणी येताना काळेवाडीमध्ये येते व नंतर सौदागरला येते. शेवटचे ठिकाणी जूनी सांगवी, नवी सांगवी आहे आमच्या टाक्या पुर्ण भरल्या जात नाहीत. गेल्या महीन्यात हे पाणी रावेतमध्ये एका तेथील स्थानीक माणसाने व्हॉल बंद केलेला होता. दिक्षीत म्हणून आमचे अधिकारी आहेत त्यांना आम्ही विचारल या टाक्या का भरल्या गेल्या नाहीतर वरच व्हॉल बंद केला जातो आमचे शेवटचे टोक असल्यामुळे शेवटी पाणी दिले जाते. आम्हांला नवीन पाईपलाईन टाकून आम्हांला चार ठिकाणी दापोडी, नवी सांगवी, जुनी सांगवी आणि गुरव पिंपळ हे पाणी आम्हांला आमच्या पध्दतीने सेपरेट दयावे एवढीच विनंती आहे, धन्यवाद.

**मा.राहूल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. भाऊसाहेबांनी अत्यंत चांगला विषय मांडला आहे. सहा महीन्यात सर्वात चांगली चर्चा आज मनमोकळेपणानी सर्व पदाधिकारी, नगरसेवक करतात त्यासाठी महापौरांना धन्यवाद देतो. अशी पारदर्शकता, लोकशाही आपल्या सभागृहात असावी. आज शहरामध्ये पाण्याचा अत्यंत ज्वलंत प्रश्न आहे. दुधेकर साहेब मागे बसलेले आहेत. आयुक्त साहेबांनी शहराचा आढावा घेतला असेल, तेच तेच न बोलता मी त्या संदर्भातील सूचना सुचवतो. आता मला वाटत सन्मा.ताईनी सांगीतले की १५ वर्षापासून हे काम झालेले नाही. घाई केली आम्हाला कुठल्याही शेतक-याचा गळा दाबून पाणी नको. परंतु कुठल्याही शेतक-याचा गळा दाबत असताना या शहराला पाण्याची किती आवश्यकता आहे, या शहरात २२ लाख लोक राहतात. मला वाटत मावळामधील देखील बरेचसे लोक थेरगाव, वाकड याठिकाणी राहतात. झाल गेल, आता यांनी त्यांच्याकड बोट करु नका, त्यांनी यांच्याकड बोट करु नका. पाण्याचा अत्यंत जीवंत प्रश्न आहे. सर्व सभागृह आपल्या बरोबर आहे. शहरातील सर्व नागरीकांना पाणी दयायच आहे. पाणी पर्टीक्युलर कुठल्या पक्षाला दयायचे नाही किंवा पर्टीक्युलर कोणी ठरवलेली लोक घेणार नाहीत. पाण्याच नियोजन करत असताना आपण सर्व भागालाच समप्रमाणात पाणी कसं मिळेल याची काळजी आयुक्त साहेब आपण घ्या. आपण याठिकाणी सांगीतल की १०९ कोटी खर्च होतो आणि ३१ कोटीच महसुल जमा होतो. मला वाटत टाटा इन्स्टिटयूट सारखी कॅन्सर हॉस्पिटल्स आहेत त्याप्रमाणे पाणी देत असताना पाण्याचा महापालिकेला किती नफा तोटा होईल ही गोष्ट याठिकाणी कोणालाच अभिप्रेत नाही. पाण्यातून महापालिकेच कुठतरी उत्पन्न वाढाव अशी अपेक्षा न करता या शहरातील प्रत्येक नागरीकाला पाणी कसं मिळेल मग तो अधिकृत घरातला असु दया किंवा अनधिकृत घरातला असू दयात. तुम्ही पाण्यावर कारवाई करताना तुम्ही शास्तीकर असताना देखील काही लोकांची कनेक्शन्स तुम्ही देत नाहीत. तुम्ही म्हणता शास्तीकर भर आणि मग पाण्याच कनेक्शन घे. आज ताथवडयासारख्या परिसरात तुम्ही सांगता तुमची २०१२ च्या अगोदरची नोंद आहे तुम्हांला पाणी मिळणार नाही. त्याठिकाणी त्या नागरीकांची असणारी तळमळ जर आपण पाहीलीतर पाण्यासाठी ते लोक आजही महापालिकेत राहून हांडयानी पाणी भरतात. मला वाटत 24x7 ची लाईन टाकण्यासाठी दुधेकर साहेबांनी एक रस्ता खोदला आहे त्या रस्त्यात दोन माणस आतापर्यंत गेली. त्या गावातून ती लाईन जात असताना त्या गावातले पाणी कनेक्शन आपण का थांबवता. शहरात राहणारा नागरीक हा कशातही असलातरी मग तो अधिकृत मध्ये असू दयात किंवा अनधिकृतमध्ये असू दयात त्याला पाणी देण्याची जबाबदारी ही आपली आहे. ती देत असताना कुठलाही दुजाभाव न करता ते कनेक्शन तुम्ही कसे रेग्यूलराईज करणार ते करत असताना तुम्ही त्यांना माहीती दया. किंवा त्या लोकांना पाणी कस मिळेल याची काळजी सुध्दा आपण घेतली पाहीजे. आज शहराची लोकसंख्या २२ लाख आहे. पुढच्या दहा ते पंधरा वर्षात शहराची लोकसंख्या किती असेल हा जर आपण

दुरदृष्टिकोन ठेवलातर निश्चितच पाण्याची समस्या आपल्याला कमी प्रमाणात भेडसावेल. मला वाटत आमचे मित्र केशव घोळवे यांनी सांगीतल की आम्ही सिंगापूरचे दौरे केले. हे दौरे करत असताना त्यांना पाणी कसे मिळते हे माणण्यापेक्षा तो देश ज्या देशानी पावसाच्या पाण्याच पाणी आडवून स्वत:च धरण केलं आणि त्या धरणाच पाणी संपुर्ण देशाला देतात. अशी देखील उदाहरण आहेत याठिकाणी गोविंदरावानी घेतल म्हणून मी त्या सिंगापूरचा उल्लेख याठिकाणी करतो. की जो देश दुस-या देशातून पाणी घेत होता त्यानी स्वत:च्या देशात पावसाच पाणी पडणार आडवून लोकांना पाणी दिलं त्यातून धरण बांधल अशी असंख्य उदाहरण आपल्याला बघायला मिळतील. ताईन सांगीतल की महापौर आमचे, पालकमंत्री आमचे मागच्या लोकांचा दृष्टिकोन नव्हता. ताई आता तुमचा दृष्टिकोन ठेवा. झाल गेल विसरुन जा. त्या शेतक-यांना त्या आमदारांना, मुख्यमंत्री यांना एकदा विश्वासात घ्या. या शहराला पाणी पाहीजे. पक्षविरहीत पक्ष विसरुन आम्ही सर्वजण आपल्या बरोबर आहोत. हा निर्णय घेत असताना अस करु नका की तीन वर्ष झाले. बरेचसे प्रश्न अजूनही प्रलंबीत आहेत. याठिकाणी शास्तीकराचा प्रश्न प्रलंबीत आहे, याठिकाणी अनधिकृत बांधकामाचा प्रश्न प्रलंबीत आहे, रेडझोनचा प्रश्न प्रलंबीत आहे. तरी याच त्याच्यावर व त्याच याच्यावर न ढकलता पाण्याचा गंभीर प्रश्न जेणेकरुन पुढच्या दहा वीस वर्षे तो प्रश्न कसा सूटेल याकडे आयुक्त साहेब आपण लक्ष दयावे. आपण स्मित हास्य केले ताईनी सांगीतले तुम्ही कुठला दबाव घेत नाहीत आणि आपण मुख्यमंत्र्यांबरोबर काम केल पण आपण गालातल्या गालात हसल्याबरोबर आम्हांला मा.शरद पवार यांची आठवण येते. की गालातल्या गालात हासणे म्हणजे नक्की काय, ताई बोलत असताना आपण स्मित हास्य केलं. तरी आपण स्मित हास्य केल्यानंतर संपुर्ण शहरातील नागरीकांना हावस कसे वाटेल हे आपण पाणी देत असताना पहाव. मी आज एक छोटस उदाहारण आमच्या भागातील देतो. आपण पोलीस लाईनच्या बाजूला टाकी गेले दहा वर्षापासून बांधताय. प्राधिकरणाने दिली परत त्याचा तुम्हांला स्लोप नाही आवडला परत ती कॅन्सल केली आज त्याची परिस्थिती काय आहे. आज तुम्हांला विचारलेतर तुम्ही म्हणता कारवाई झाली. प्राधिकरणाला विचारल्यावर सांगतात त्याठिकाणी शाळा आहे. आम्ही कारवाई करुन परत ती पाण्याची टाकी ताब्यात घेऊ. आमचा भाग जरी ग्रामीण भाग असलातरी त्या भागातून येणारा बिल्डींग परमीशनचा २५ टक्के निधी आम्ही देतो. कालच तुम्ही पेपरला बातमी वाचली असेल की बालेवाडी प्रमाणे त्यांनीही कोर्टात जायची तयारी ठेवली आहे. आणि जर बालेवाडीप्रमाणे तेही कोर्टात गेले आणि त्याठिकाणच्या नवीन बांधकामाला जर स्थगिती मिळाली तर ते आपल दुर्दैव असेल. त्यांच्या एवढी वाईट परिस्थिती आज आपली नाही. परंतु आज तुम्ही गणेशनगर, लक्ष्मणनगर, कस्पटेवस्ती, दत्तमंदीर एवढया सगळया ऐरीयाला प्र.क्र.२५ ला आपण फक्त ६० एमएलडी पाणी देतो. हे देत असताना एका एका सोसायटीच्या टँकरच बील सत्तर-सत्तर, तीस-तीस लाख रु. वर्षभराच बील त्याठिकाणी आहे. आपली जबाबदारी आहे त्यांना पण पाणी दयायची. पाणी देत

असताना आपण एकीकडे 24x7 करत असताना आपण शहरातील सर्व भागांचा जो ग्रामीण भाग शहरात आलेला आहे त्या भागाचा देखील विचार करावा. त्याठिकाणाहून आपल्याला चांगले उत्पन्न देखील मिळतय. रेनवॉटर हर्वेस्टींगबद्दल जर आपण टॅक्समध्ये त्यांना सबसिडीसारखा प्रकार केलातर निश्चितपणे लोक रेनवॉटर हर्वेस्टींग प्रभावीपणे राबवतील. आज रिसायकलींग प्लॅन प्रत्येक सोसायटीचे आहेत. मी आजच सकाळी फोटो काढले पाऊस पडत होता आणि डिव्हायडरला आपल्या महापालिकेचा टँकर झाडांना पाणी घालत होता, हा काय प्रकार आहे. वरुन पाऊस पडतो आणि आपला टँकर झाडाना पाणी घालतो. हा कुठेतरी आपला आपल्या कर्मचा-यांवर, या शहरातल्या टँकर लॉबीवर देखील अंकुश पाहीजे परंतु तो टँकर महापालिकेचा होता. आता महापालिकाचा देखील टँकर लॉबीत समावेश आहे का. असे असंख्य प्रश्न या शहरातील नागरीकांना देखील भेडसावतात. आयुक्त साहेब, आपण नागपूरला चांगले काम केले आहे. याठिकाणी सुध्दा चांगले काम करताल. जाता जाता चांगला ठसा उमटवताल यात आम्हांलाही शंका नाही. या शहराच्या पाण्याच्या टाकीचे रिझर्व्हेशन आपल्या ताब्यात दिले, पाण्याच्या टाकीचे रिझर्व्हेशन ताब्यात घेत असताना जर ते भूसंपादनाला गेलतर व तो मालक तयार नसेलतर ती प्रक्रीया दोन दोन तीन तीन वर्षे आडकून पडते. ही सोडवणूक करण्यासाठी आपण काय करणार आहोत. वाकड मध्ये मेन चौकात एक लाईन फुटली, लाईन फुटली असताना दुधेकर साहेब, आम्ही शोधत होतो. त्यावेळेस कळल की ती १९८६ ची लाईन आहे. आणि ज्यावेळेस तुम्ही अल्टरनेट डे पाणी दिलं त्यावेळसे त्या लाईनचे प्रेशर वाढले म्हणून ती लाईन फुटली. मागे पंचवीस-तीस वर्षापुर्वी झालेले काम त्याचा प्लॅन त्या सगळयाची उत्सुकता, त्याच कोऑर्डीनेशन हे आपल्या सर्वांचे आपआपसात आहे की नाही. आज काही काही ठिकाणी हवेवर मीटर पळतो मग तो मालक येतो आणि सांगतो, साहेब हे बघा अगोदरची जी हवा येते त्यानी माझा मीटर पळतो आणि बील वाढतं. अशावेळेस आपल्या अधिका-यांनी देखील त्या माणसकडे न्याय भूमीकेतून पाहीले पाहीजे. या शहरात प्रत्येक गरीब लोक आहेत, चांगली लोक आहेत त्यांची ज्यावेळेस पाण्यासाठी हेळसांड होते ती पाहत असताना लोकांनाही पाणी देणं आपल कर्तव्य आहे. मा.महापौर साहेब, खरंतर भाऊसाहेबांनी सर्वांना एक धडा घालून दिला आहे त्यांनी अतीशय चांगला प्रश्न विचारुन त्याच्यावर याठिकाणी चर्चा घडवून आणली. ती घडवत असताना महापौरांनी देखील लगेच कोणालाही न विचारता ती मान्य केली. त्याबद्दल मा.महापौरांना धन्यवाद देतो. पवना धरणाच्या पाईपलाईनमध्ये देखील आपण लक्ष घालावे. संपुर्ण शहराच्या पाण्याचा प्रश्न, भविष्यात वाढणारी लोकसंख्या, भामा-आसखेडचे देखील पाणी मंजूर झालेले आहे. मुंबई महानगरपालिकेच स्वत:चे धरण आहे. त्याठिकाणी त्यांच्या पाण्याच्या टाक्या कमी आहेत. ६ कोटी लोकसंख्या असताना देखील संपुर्ण महाराष्ट्राला पाणी देण्याची जबाबदारी ही राज्याची देखील आहे त्याचप्रमाणे आपल्या महापालिकेची देखील जबाबदारी त्याचप्रमाणात आहे. आम्ही सर्व विरोधात जरी असलोतरी अशा ज्वलंत प्रश्नी आपण

सर्व एकत्र महापौरां बरोबर आहोत. महापौरांना हे सांगायच गांभीर्य कमी आहे कारण बोलायला कोणी नाही. त्यांच्या घरात वैनी आल्या, वैनी म्हणल्या घरात पाणी नाही आल की महापौरांना लगेच कळेल. त्यामुळ मा.महापौरांनी मा.आयुक्तांनी गांभीर्याने या प्रश्नाकडे पहाव, धन्यवाद.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. माझे परममीत्र भाऊसाहेब भोईर यांनी खरच सांगीतले की आज सभागृह माझ्या पध्दतीने चालवणार आहे, खर आहे भाऊसाहेब, तुमचे अभिनंदन करतो की ज्या विषयाची चर्चा या सभागृहात झाली, मला असं वाटतय की पहील्या सभेपासून तुम्ही असतातर मला अजून अधिक आनंदही झाला असता. आणि हे सभागृह आणि खरतर भाऊसाहेबांनी माझ ऐकलं असततर माझ्या जागेवरती या सभागृहाचे नेते भाऊसाहेब भोईर शंभर टक्के राहीले असते. ठिक आहे, भाऊसाहेब कधी कधी माणसाचे निर्णय चुकत असतात. मी अस म्हणणार नाही की राजकारणामध्ये तुम्ही खुप मुरब्बी आहात. माझ्या सारखा कार्यकर्ता तुमच्या बद्दल बोलणे बरोबर नाही. अभिमानही वाटला की आज तुम्ही पहील्यांदा सभागृहामध्ये आलात, पाण्याच्या संदर्भामध्ये चर्चा घडऊन आणली आणि दोन तास आपण या पाण्याच्या विषयावर बोलतोय. खरतर माझ्या अगोदर सगळया वक्त्यांनी आपले मत व्यक्त केले. मी तर या सभागृहाला एवढच सांगेल, भाऊसाहेब भोईर, दत्ता काका साने बोलले, माझे मित्र अजीत गव्हाणेंनी खुप चांगल सांगीतल, मंगलाताई यांनी चांगल्या पध्दतीच्या सुचना केल्या की नियोजन झाल नाही. खरतर सिमाताईनं सांगीतल की सहा महीन्यापुर्वी महापालिकेमध्ये भाजपची सत्ता आलेली आहे. ताई खरं आहे, मंगलाताई मी तुम्हांला योगेशभाईना विनंती करतो तुम्ही पंधरा ते वीस वर्ष या महापालिकेमध्ये सत्तेमध्ये होता. थोडस प्लॅनिंग केल असतेतर माला असं वाटतय पाण्याची अशी परिस्थिती माझ्या सगळया भगीनी सांगत होत्या की आमच्याकड पाण्याची समस्या आहे. काका तुमच्या वॉर्डात खुप कमी पाणी येतय तुम्ही थोडस चांगल प्लॅनिंग जर केल असततर पाण्याची समस्या आली नसती. तुम्ही चुकही कबुल केली मी तुमचे अभिनंदनही करतो. सगळेजण एक गोष्ट सांगत होते, पवना जल वाहीनीच्या संदर्भात सगळयांच्या मनामध्ये शंका होती. मी त्याच्या प्लॅनिंगमध्ये जाणार नाही माझ्या अगोदरच्या सगळया वक्त्यांनी पवना जलवाहीनी, कृत्रीम पाणी टंचाई निर्माण करणे या शहरातील लोकांच्या बद्दलची आस्था निर्माण करण मला असं वाटत की ते तुमचे काम आहे. आम्ही प्रमाणिकपणाने लोकांना सेवा देण्यासाठी येथे आलो. आम्ही सत्तेवर बसलो म्हणजे फार काही मिळवण्यासाठी आलेलो नाहीत. या शहरातील नागरीकांना पाणी चांगल्या पध्दतीच मिळाल पाहीजे वेळेवर मिळाल पाहीजे. पुरेसे पाणी मिळाले पाहीजे हा प्रामाणिकपणा घेवून आम्ही या पुढच्या काळामध्ये काम करणार आहोत. पवना बंद जल वाहीन्याच्या संदर्भात माझ्या अगोदरच्या सगळया वक्त्यांनी सांगीतले की मावळामध्ये भाजपचे आमचे आमदार आहेत. त्यांचा विरोध आहे, हे साहजीकच आहे, ताईही बोलता बोलता बोलल्या. या प्रश्नाचे राजकारण आम्ही कधीच केलेले नाही. पहील्या दिवसापासून

आम्ही एकच गोष्ट सांगतो कुठल्याही शेतक-यांच्या रक्ताने माखलेले पाणी पिंपरी चिंचवडच्या लोकांना नको. ज्यावेळेला गोळीबार झाला, त्यादिवशी कसली परिस्थिती होती. ९ ऑगष्टला गोळीबार झाला. दुर्दैवी घटना होती आणि साहजीकच आहे की दोन-तीन माणसे मावळामधली गोळीबारामध्ये दुर्दैवाने गेल्यानंतर आपण त्यांची मनस्थिती तयार करणे हे सगळयात मोठे काम आहे. आणि म्हणून सगळयांनी मनापासून सांगीतल आहे. भाऊसाहेब मावळामध्ये तुमचे नातेवाईक आहेत, तसे माझे मीत्र तेथे आहेत, तसे तुमचेही सगळया पक्षात आहेत, योगेश बहल यांचे पण आहेत. मी या निमीत्तान एवढच सांगतो की पाण्याच्या प्रश्नामध्ये आम्ही राजकारण कधीच करणार नाहीत. माझी तुम्हांला सगळयांना विनंती आहे. मा.पालकमंत्र्याना, मा.मुख्यमंत्र्यांनाही आम्ही सांगीतले आहे. तेथील शेतक-यांचे समाधान करणे आपले पहील कर्तव्य आहे. म्हणजे शेतक-यांना काय पाहीजे. कोल्हापूर टाईपचे काही बंधारे बांधुन देऊन त्या शेतक-यांचे समाधान करता येईल का, तीथल्या गावागावातला पाणीपुरवठा चांगला करुन देवून त्यांच समाधान करता येईल का. मला असं वाटतय की काही गोष्टी बोलायच्या नाहीतर त्या झाल्यानंतर निश्चितच पवना जलवाहीनीचे काम काही दिवसामध्ये पुर्णत्वाकडे नेणार आहोत. जशा तुम्ही चुका केल्या परंतु या शहराला पवना जनवाहीनीतून पाणी देण्यासाठी मावळच्या जनतेला आम्ही दहा वेळा नाहीतर शंभरवेळा त्यांच्या पाया पडलोतरी चालेल परंतु पिंपरी चिंचवडला पाणी आणण्यासाठी प्रयत्न करु. भामा-आसखेडची तीच परिस्थिती आहे. मला असं वाटतय की भामा-आसखेडच्या संदर्भामध्ये मागच्या महीनाभरापुर्वी मा.पालकमंत्र्यांची त्यासंदर्भात बैठक झाली आणि पुढच्या पंचवीस-तीस वर्षाचा या शहराचा पाणीपुरवठा, खरंतर हे आज आपण पवना जलवाहीनीतून पाणी आणलं, भामा-आसखेड मधुन पाणी आणलं, पुढच्या काळामध्ये आंद्रा मधुन पाणी आणण्याची वेळ आलीतर मला असं वाटतय की हे पाण्याच नियोजन फक्त पुढच्या येणा-या २५-३० वर्षानंतरचे असणार आहे. म्हणजे पुढच्या २५-३० वर्षाच्या नंतरच जर आपल्याला प्लॅनिंग करायचे असेलतर मला वाटतय की ताईन सांगीतल की मुंबई सारखे स्वत:चे धरण निर्माण करण्याची वेळ या पिंपरी चिंचवडला येणार आहे. आपल्याला विनंती आहे की पाण्यासाठी पक्ष वगैरे सोडून दया शहराचे व्यवस्थित प्लॅनिंग करायचे असेलतर पंचवीस, तीस, पन्नास वर्षाच. खरतर रस्त्याच्या संदर्भामध्ये आपण शंभर टक्के चर्चा करणार आहोत. मला वाटतय की शहराच्या विकासामध्ये पाणी असेल, अनधिकृत नळा संदर्भात सांगीतले की पाण्यापासून आपल्याला किती इन्कम होते. इन्कम हा महत्वाचा मुद्दा नाही. महापालिकेत सत्तेमध्ये आल्यापासून आम्ही मनापासून हे ठरवल हे खरं आहे की शहरामध्ये अनेक लोक असे राहतात की ते पाण्याचे कनेक्शन टॅप मारुन वापरतात. आयुक्त साहेबांना मागच्या पंधरा दिवसापुर्वी आम्ही विनंती केली की त्यांना आपण एक संधी दयायला पाहीजे तु पाण्याच बील तरी भर. म्हणजे किमान लाखभर पाण्याची कनेक्शन असतील. आणि ताई आम्हीतर फक्त पाणी आळंदीला दिलेले आहे. मला वाटतय की शहरा मधल्या कुठल्याही

जवळपासच्या भागाला आम्ही पाणी नाही दिलं. कारण आळंदी हा आपल्या सगळयाच्या भावनेचा, श्रध्देचा प्रश्न आहे. पुढच्या काळामध्ये आळंदी असेल, हिंजवडी असेल किंवा बालेवाडीलाही पाण्याचा प्रश्न तुमच्या सगळयाच्या काळामध्ये केला आणि माझी या सभागृहाला एवढीच विनंती आहे की या शहरात पाण्याचे चांगले नियोजन करण्यासाठी आपण सगळयांनी पुढच्या काळामध्ये प्रयत्न करु. भामा-आसखेडचा प्रश्न मार्गी लावण्याच्या संदर्भामधला, पवना जलवाहीनीचा मार्गी लावण्याच्या संदर्भामधला प्रश्न असेल. आपण सगळयांनी प्रयत्न केले आणि अशीच साथ दया. मला वाटते आमचे आमदार आहेत, पालकमंत्री आहेत, मा.मुख्यमंत्री आहेत या पिंपरी चिंचवडकडे खरतर त्यांच अधिक लक्ष आहे. पिंपरी चिंचवडची तहान भारतीय जनता पार्टीचे नेते शंभर टक्के भागवतील आणि पुढच्या काळामध्ये हे दोन-तीन विषय आपण मार्गी लाऊन या शहराचा पाणीपुरवठा पुर्ण करण्याचा निश्चितच प्रयत्न करु. मला असं वाटतय की या एका ज्वलंत प्रश्नाला माझ्या सगळया सहकार्यांनी आज वाट निर्माण करुन दिली. मी आपले सर्वाचे मनापासून अभिनंदन करतो आणि हा प्रश्न सोडविण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करुयात एवढच या निमीत्तान सांगतो आणि थांबतो, धन्यवाद.

**मा.आरती चोंधे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ५८ | विषय क्रमांक – १

दिनांक- १९/८/२०१७ | विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/३८१/२०१७, दि.१५/०६/२०१७

२) मा.विधी समिती सभा ठराव क्रमांक १७ दि.२१/०७/२०१७

"कान-नाक-घसा तज्ञ" अभिनामाचे पद सरळसेवा प्रवेशाने भरण्याकामी कर्मचारी निवड समितीने शिफारस केलेल्या प्रतिक्षा यादीवरील डॉ.चव्हाण परमानंद देवदास यांची खुल्या (वि.जा.(अ)) प्रवर्गातून वेतनश्रेणी र.रु. १५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० मध्ये "कान-नाक-घसा तज्ञ" अभिनामाचे पदावर नियुक्ती देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.योगीता नागरगोजे-** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.अश्विनी चिंचवडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. वैदयकीय विभागातील कान-नाक-घसा तज्ञ सरळसेवेने भरणेकामी या विषयास अनुसरुन मी सभागृहाचे लक्ष वेधु इच्छिते की तत्कालीन आयुक्त डॉ. श्रीकर परदेशी यांनी प्रत्येक रुग्णालयात फिजीशियन, स्त्रीरोग तज्ञ, बालरोगतज्ञ तसेच आवश्यक ते सर्व विभागासाठी वैदयकीय अधिकारी यांची कायमस्वरुपी टिम नेमणार असे सांगून कार्यवाही सुरु केली परंतु आजरोजी महापालिकेच्या सर्व रुग्णालयामध्ये दुर्दैवाने डॉ.नसल्याचे फलक झळकत असतात. आजच सकाळी मी तालेरा रुग्णालयात एका पेशंटला भेटण्यासाठी गेले होते. त्याठिकाणी वैदयकीय

सेवेसाठी असणारा स्टाफ म्हणजेच बालरोगतज्ञ फिजीशीयन नाही. जे वॉर्डबॉय असतात, मावशा असतात त्यांची कमतरता आहे अशी माहिती मला तेथे मिळाली. तसेच सोनोग्राफीसाठी जे डॉक्टर होते ते वैयक्तिक कारणामुळे त्यांनी राजीनामा दिलेला आहे आणि आता तेथे सोनोग्राफीही केली जात नाही. मागील वर्षापासून डोळयांचे मोतीबींदुचे ऑपरेशन्स होतात. त्यासाठी तालेरा रुग्णालय हे खास मानल्या जायचं. तालेरा रुग्णालय हे पिंपरी चिंचवडमध्ये मध्यवर्ती ठिकाण आहे. तसेच वेताळनगर, बिजलीनगर, वाल्हेकरवाडी, ताथवडे, पुनावळे, रहाटणी, काळेवाडी येथील नागरीकाना ते सोईस्कर होतं. त्यादृष्टिने तेथे ज्या शस्त्रक्रिया व्हायच्या तर तो शस्त्रक्रिया विभागच पुर्णपणे बंद केलेला आहे. नवीन सावित्रीबाई फुले हे हॉस्पिटल झालेले आहे. जर आपल्याला तालेरा हॉस्पिटलच रिन्यूएशन करायचेतर नवीन रुग्णालयात आपण शस्त्रक्रीया विभाग हलवायला पाहीजे होता. तो विभाग बंद केल्यामुळे तेथील सगळे रुग्ण आता वायसीएमला पाठविले जातात. परंतु वायसीएमलाही डॉक्टर्स उपलब्ध नसल्यामुळे अक्षरशा रुग्णांची हेळसांड होते. तरी या गोष्टीकडे आपण लक्ष दयाव. नवीन इमारत बांधण्याच्या उद्देशानेच डॉक्टर आणि कर्मचा-यांची भरती होत नाही की काय अशी शंका येते. नवीन हॉस्पिटल बांधा परंतु त्याला पर्यायी जुन्या हॉस्पिटलमध्ये आवश्यक डॉक्टर, कर्मचारी यांचीही उपलब्धता करुन दयावी अशी मी प्रशासनाला विनंती करते. पिंपरी चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या विचारात घेता शहरामध्ये दोन रक्तपेढयांची गरज होती. काही दिवसापुर्वी तालेरा रुग्णालयात क्रांतीवीर चाफेकर बंधु नावाची रक्तपेढी चालू होती. परंतु ती वायसीएममध्ये शिफ्ट केली. तालेरामध्ये येणारे गरीब रुग्ण आता रक्तासाठी वणवण फिरतात. वायसीएमला गेले की तेथे रक्ताचा तुटवडा आहे म्हणून सांगतात. गरीब लोकांना पुण्यापर्यंत पोहचाव लागतं. तरीही रक्त मिळतं, नाही मिळत अशी अवस्था आहे. ही रक्तपेढी चालू करण्यासाठी मी मागच्या पंचवार्षीकमध्ये पाठपुरावा केला होता. शहर सुधारणा समिती, स्थायी समिती, सर्वसाधारण सभामध्ये ठराव मंजुर होवुनही आजपर्यंत प्रशासनाने रक्तपेढी चालू करण्यासाठी कुठलीही यंत्रणा राबवली नाही. शहरातील फिरत्या दवाखान्यालाही ब्रेक लागलेला आहे. तसेच कर्मचारी संख्या अपुरी आहे. वायसीएममध्ये शवविच्छेदन विभागात अपुरे डॉक्टर आहेत व कर्मचारी संख्याही कमी आहे. त्यामुळे मृत पावलेल्या व्यक्तीच्या नातेवाईकांना तिथं ताटकळत रहावं लागत. कधी कधी त्याच्यावरुन तेथे हाणामा-या होतात तरी साहेब, आपण या गोष्टीकडेही लक्ष दयावे. तत्कालीन आयुक्त डॉ.श्रीकर परदेशी यांनी वैदयकीय सेवेमध्ये चांगल्या पध्दतीने लक्ष घातले होते त्यामुळे परदेशी यांचे काळातील वैदयकीय सेवेबाबतचे आदेश, पत्रव्यवहार तपासावेत व आजरोजी सुरु असलेले सर्व महापालिका रुग्णालयातील कामकाजाची तपासणी व ऑडीट करावे आणि ज्या काही त्रुटी, दोष निर्माण झाले असतील त्यात सुधारणा होणेकामी दिर्घकालीन योजना तयार करावी अशी विनंती करते आणि माझे दोन शब्द थांबवते. धन्यवाद, जयहिन्द, जय महाराष्ट्र.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.शर्मिला बाबर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ५९ विषय क्रमांक – २

दिनांक – १९/८/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/४९१/२०१७, दि.१९/०७/२०१७

२) मा.विधी समिती सभा ठराव क्रमांक १८ दि.०४/०८/२०१७

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर 'प्रशासन अधिकारी' अभिनामाची पदे र.रु.९३००-३४८०० ग्रेड पे ५४०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. जाहिरात क्र.९३/२०१३ नुसार आदेश क्र.प्रशा/१/कावि/१४९२/१३, दि.२०/११/२०१३ अन्वये श्री.खोत संदिप दादासाहेब यांना खुला (भ.ज.(क)) आणि श्री.बहुरे सिताराम देवचंद यांना वि.जा.(अ) या प्रवर्गातून सरळसेवा प्रवेशाने प्रशासन अधिकारी या पदावर नियुक्ती देण्यात आलेली आहे. प्रस्तुतच्या नियुक्ती आदेशामध्ये आपण जर दि.०१/११/२००५ पूर्वी शासकीय/निमशासकीय सेवेत दाखल झाला असाल तर आपण पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर रुजू झाल्यापासून तीन महिन्याच्या कालावधीत, संबंधित शासकीय/निमाशासकीय कार्यालयाने आपले सेवानिवृत्ती वेतन अंशदान (Pension Contribution) व रजा वेतन अंशदान (Leave Salary Contribution) ची रक्कम पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे वर्ग केल्यास आपणांस महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ नुसार निवृत्तीवेतन योजना लागू राहील. तसेच संबंधित शासकीय/निमशासकीय कार्यालयाकडे जमा असणारी भविष्य निर्वाह निधीची व्याजासह रक्कम पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे वर्ग केल्यास आपणांस सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम १९९८ प्रमाणे भविष्य निर्वाह निधी योजना लागू राहील. अन्यथा आपणांस दि.३१ ऑक्टोंबर २००५ नुसार नवीन अंशदान निवृत्तीवेतन योजना म्हणजेच 'परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना' (Defined Contribution Pension system) लागू राहील', याप्रमाणे अट नमूद करण्यात आलेली आहे.

श्री.खोत संदिप दादासाहेब हे दि.११/१२/२०१३ रोजी प्रशासन अधिकारी पदावर महापालिका सेवेत रूजू झाले आहेत. तत्पूर्वी श्री.खोत संदिप हे दि.१४/१०/२००५ पासून जिल्हा परिषद अहमदनगर या आस्थापनेवर ग्रामसेवक पदावर कार्यरत होते. श्री.बहुरे

सिताराम देवचंद हे दि.१७/१२/२०१३ रोजी प्रशासन अधिकारी पदावर महापालिका सेवेत रूजू झाले आहेत. तत्पूर्वी श्री.बहुरे सिताराम हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद या आस्थापनेवर दि.२२/०६/२००५ पासून टायपिस्ट या पदावर कार्यरत होते. संबंधित कार्यालयामध्ये सदरच्या अधिका-यांना महाराष्ट्र नागरी सेवा (नियम) १९८२ नुसार निवृत्तीवेतन योजना लागू होती. उक्त अधिका-यांनी प्रशासन अधिकारी पदाकरीता अर्ज करताना दि.१२/०१/२००७ च्या शासन परिपत्रकामधील अटी व शर्तीची पूर्तता केलेली आहे.

नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीनुसार संबंधितांचे पूर्वीच्या कार्यालयाकडे रजा वेतन अंशदान व सेवानिवृत्ती वेतन अंशदान रकमेची मागणी केली असता, श्री.खोत यांच्यासंदर्भात अहमदनगर जिल्हा परिषद यांनी जिल्हापरिषद सेवेतून एखादा कर्मचारी महामंडळे/ नगरपालिका/महानगरपालिकेकडे सेवेत हजर झाल्यास संबंधित संस्थांना सेवानिवृत्ती वेतन अंशदान व रजा वेतन अंशदान वर्ग करण्यासंदर्भात **नियम अस्तित्त्वात असल्याचे दिसून येत नसलेबाबत** मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (ग्रा.पं.) जिल्हा परिषद अहमदनगर यांनी जा.क्र.साप्रवि२/ग्रामपंचायत८/६८/१६, दि.२७/०४/२०१६ अन्वये कळविले आहे. तर श्री.बहुरे यांच्याबाबत महाराष्ट्र शासन शिक्षण विभागाकडील दि.२१/०७/१९८३ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्रातील विद्यापीठे तसेच संलग्नित अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर वर्गाला निवृत्तीवेतन अनुदान योजना दि.०१/१०/१९८२ पासून लागू करण्यात आली आहे. श्री. बहुरे यांची नेमणूक दि.०१/१०/१९८२ नंतर झाली असल्यामुळे सेवानिवृत्ती अंशदान भरण्याचा प्रश्न उद्भवत नसलेबाबत मा.कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी दि.१८/०२/२०१६ चे पत्रान्वये कळविले आहे.त्यामुळे श्री.खोत व श्री.बहुरे यांनी दि.२०/०८/२०१६ च्या अर्जान्वये नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीनुसार अट क्र. ६ ची पूर्तता न झाल्याने सदरची रक्कम स्वत: भरण्यास तयार असल्याबाबत कळविले असून पूर्वीची सेवा सलग धरुन महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन नियम १९८२ नुसार सेवानिवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी, रजा वेतनाच्या लाभासाठी विचार करण्याबाबत विनंती केली आहे.

त्यानुसार मा.मुख्यलेखापरिक्षक यांचेकडील क्र.मुलेप/१/कावि/४८६/१७, दि.१९/०१/२०१७ अन्वये प्रकरणी श्री.खोत व श्री. बहुरे, प्रशा. अधिकारी यांचे **नियुक्ती आदेश क्र.प्रशा/१/कावि/ १४९२/१३, दि.२०/११/२०१३ मधील अट क्र.६ शिथिल करावी लागेल आणि शासकीय/निमशासकीय कार्यालयातील कर्मचारी यांची मनपा सेवेत येणेपूर्वीची सेवा सेवानिवृत्ती वेतनासाठी व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम १९९८ प्रमाणे भविष्य निर्वाह निधी योजनासाठी धरणेबाबत मनपाचे धोरण निश्चित नसलेने याबाबत मा.महापालिका सभेची मान्यता घ्यावी लागेल याप्रमाणे अभिप्राय दिले आहेत.**

सबब, श्री.खोत संदिप व श्री.बहुरे सिताराम यांच्या मागील सेवेला संरक्षण देणेप्रकरणी **नियुक्ती आदेश दि.२०/११/२०१३ मधील अट क्र. ६ शिथिल करणे,** श्री.खोत यांची जिल्हा

परिषद अहमदनगर या आस्थापनेवर दि.१४/१०/२००५ ते दि.१०/१२/२०१३ या कालावधीकरीता केलेली सेवा त्याचप्रमाणे श्री.बहुरे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद या आस्थापनेवर दि. २२/०६/२००५ ते दि.१६/१२/२०१३ या कालावधीकरीता केलेली **सेवा पिंपरी चिंचवड महापालिकेकडे सलग सेवा धरणे, उक्त कालावधीकरीता सदरच्या कार्यालयाकडे जमा असलेल्या सेवानिवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी आणि रजा वेतनाच्या रकमा लेखा विभागामार्फत निश्चित करुन संबंधित अधिका-यांमार्फत भरुन घेणे आणि सदरच्या रकमा भरुन घेतल्यानंतर त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ नुसार निवृत्तीवेतन योजना आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम १९९८ प्रमाणे भविष्य निर्वाह निधी योजना लागू करणे या बाबीस मान्यता** देणेत येत आहे.

**मा.अनुराधा गोरखे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.भाऊसाहेब भोईर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. या विषयाच्या अनुषंगाने विषय मंजूर करायचा तर करा परंतु आपण मागच्या गेली वीस वर्ष साधारणत: आपली महानगरपालिका क वर्गात होती आता ब वर्गात रुपांतर झालेल आहे. आपण अकृतीबंध गेली वीस वर्ष केला नाही. महापालिकेच्या माध्यमातून तो शासनाकडे पाठवलेला आहे तो लवकरात लवकर आणावा व कोणत्याही पदावर गदा येऊ नये. आपण आपल्या पध्दतीचे असे विषय जर करत बसलोतर, आकृतीबंध पाठपुरावा करुन ताबडतोब आणावा. आयुक्त साहेब आपण गांभीर्याने याची दखल घ्यावी कारण तो आपण शासनाकडे मंजूरीसाठी पाठवलेला आहे. तरी तो शासनाकडून मंजूर करुन घ्यावा.

**मा.संदीप वाघेरे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आजच्या सभेतला विषय श्री. संदीप खोत व श्री.बहुरे साहेब यांचा अंशदान पेन्शनचा विषय आहे त्या विषयावरती भविष्य निर्वाह निधी, रजावेतन अंशदान विषय विधी समिती मार्फत मुख्य महापालिका सभेला आलेला आहे. मा.महापौर साहेब, दोन अधिकारी शासनाकडून आलेले आहेत. त्यांना आपण आपल्या महापालिका सेवेत कायम करणार आहोत का आणि करणार असालतर कोणत्या नियमानुसार. आजपर्यंत किती प्रशासन अधिकारी शासनाकडून आलेले आहेत. अशा प्रशासन अधिका-यांना आपण महापालिकेत कोणत्या अटि व शर्तीवर कायम करणार आहेत. आपल्या मनपातून सरळ सेवेतून प्रमोशन न देता सहा.आयुक्त पदाचे अधिकारी ठिक आहे पण आपण असे बाहेरील अधिकारी घेऊ शकतो का. श्री.बहुरे यांना मी प्र.क्र. २१ मधील महापालिकेच्या मिळकतीचा तपशील मागीतला होता. त्याप्रमाणे त्यांनी तपशील दिला त्यामध्ये प्र.क्र.२१ मधील मिळकतीची थकबाकी १ कोटी ९१ हजार ४०० रु. म्हणजे एका प्रभागाची आतापर्यंत १ कोटी ९१ हजार. असे ३२ प्रभाग आहेत. त्यांनी आता पर्यंत किती वसुली केली याची श्री.बहुरे साहेब यांनी माहिती दयावी. रक्कम वसुल झाल्यावर

काय कारवाई केली व न झाल्यावर काय कारवाई केली याचीही माहिती दयावी. असे कामचुकार अधिका-यांना आपण सेवेत कायम करणार आहोत का. तसेच भूमी आणि जिंदगीचा त्यांच्याकडे चार्ज होता, ड प्रभागातील प्रशासन अधिका-याचा त्यांच्याकडे चार्ज होता. त्यांनी तिथ जो पिंपरीतला एक कोंडवाडा आहे, भुमि आणि जिंदगीतच्या ताब्यातला त्याला २९/७/२०१७ ची मुदत होती तर तो त्या मुदतीच्या आतमध्ये यांनी ताब्यात घेतलेला नाही. तो कोंडवाडा आपण दर महा २३४/- रुपयानी प्रायव्हेट संस्थेला दिला. तिथ जे आता पशुवैदयकीय अधिकारी आहेत, मी वारंवार प्रश्न विचारले, पत्र दिले, डॉ. गोरेना माहिती मागीतली या गायांच तुम्ही काय करता. आमच्याकडे पिंपरी प्रभागामध्ये गाया, कुत्री, डुक्रे एवढी झालेली आहेत की माणस कमी आणि हेच जास्त झालेले आहेत. आणि जो कोंडवाडा आहे तो परस्पर भाडयाने दिलेला आहे. आणि जे काही गाया पकडण्याच कॉन्ट्रॅक्ट दिलय ते आतापर्यंत पुर्ण चार महीन्यात पिंपरी चिंचवड मधुन ७३ जनावर पकडलेली आहेत. एकटया पिंपरीमध्ये ४०० ते ५०० गाया अशा मोकाट फिरतात. आणि जो ७३ गायाना उचलण्याच टेंडर दिल आहे ते शुभंमला दिलेले आहे आणि जो कोंडवाडा भाडयान दिला तो पण शुंभमला दिलेला आहे. म्हणजे काही साटलोट आहे का. का शेटलमेंट आहे आपआपसामध्ये. डॉ.गोरे यांना निलंबीत केले पाहीजे. मी पत्र दिले, बाकीच्या सन्मानीयांनी पत्र दिल की तुम्ही अशा अशा कार्यवाया करातर ते मला माझ्या सारखेच पत्र देतात. ठिक आहे आमच प्रासिजर चालू आहे. समोरच्या व्यक्तीन पत्र दिल की त्यांना म्हणतात मुदतवाढ दया कोंडवडयाची आम्हांला गरज नाही. पिंपरी चिंचवड महापालिकेत आज चार कोंडवडे आहेत. चारही आपण ९६ ला बंद केले आहेत. ९२ नंतर चार वर्षात कुठला जावाईशोध लावला की सेंट्रलाईज पध्दतीने आपण कोंडवाडा, मी पण शेतकरी आहे. माझ्या घरी सुध्दा गाई, म्हशी आहेत. महापौर साहेब, तुम्हीही शेतकरी आहेत, तुम्हांलाही माहिती आहे की परिस्थिती काय असते. श्री.बहुरे यांना कायमस्वरुपी घेणार असालतर कोणत्या नियमाने घेणार याचे उत्तर दयावे, थांबतो जयहिन्द जय महाराष्ट्र.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.माधुरी कुलकर्णी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ६०
दिनांक – १९/८/२०१७

विषय क्रमांक – ३
विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.शशिकांत कदम, मा.विकास डोळस यांचा प्रस्ताव –
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.११ दि.११/०७/२०१७

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील मौजे दापोडी येथील आ.क्र. ३/१४ इंजिनिअरींग स्टोअर्स (ES) या आरक्षित जागेवर पाण्याची टाकी (ESR) साठी होणा-या बदलास म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. मौजे दापोडी येथे सद्यस्थितीत आ.क्र.३/३ उंच पाण्याची टाकीसाठी ४००० चौ.मी. क्षेत्र आरक्षित केलेले आहे. या ठिकाणी एकच पाण्याची टाकी बांधण्यात आलेली आहे. त्याठिकाणी दुसरी पाण्याची टाकी बांधणे शक्य होणार नाही. दापोडी येथील लोकसंख्या पाहता एकच पाण्याची टाकी असल्यामुळे पाण्याची खुपच टंचाई निर्माण झालेली आहे. त्यामुळे दुस-या पाण्याच्या टाकीसाठी नियोजन करणे गरजेचे आहे. दापोडी येथील स.नं.१३ पैकी आ.क्र.३/१४ इंजिनिअरींग स्टोअर्ससाठी आरक्षित असलेली १००० चौ.मी. जागा महानगरपालिकेच्या ताब्यात आलेली आहे. मौजे दापोडी येथील आ.क्र.३/१४ इंजिनिअरींग स्टोअर्स या आरक्षित जागेवर म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार उंच पाण्याची टाकी (ESR) साठी आरक्षण फेरबदल प्रस्तावित करणेस मान्यता देणेस व सदर म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार आरक्षण फेर बदलाची संपुर्ण कार्यवाही करणेचे म्हणजेच जाहीर नोटीस करणेकामीचे, हरकती व सुचनांवर सुनावणी घेऊन प्रस्ताव शासनास सादर करणेचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सारीका सस्ते-** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.उषा ढोरे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ४

दिनांक – १९/८/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.नरवि/कावि/३६/पिं.गुरव/२६२/२०१७, दि.१९/०७/२०१७
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.१२ दि.२५/०७/२०१७

मौजे पिंपळे गुरव, पिंपळे सौदागर, मौजे सांगवी पर्यत संरक्षण विभागाच्या हद्दीलगत असलेल्या मंजूर विकास योजनेतील १२ मी./१८ मी. रूंद रस्त्यालगत संरक्षण विभागाच्या हद्दीतून आणखी १२ मी. रूंद रस्ता करणे व या व्यतिरिक्त मौजे सांगवी स.नं. ६८ पासुन (बी.आर.घोलप कॉलेजची उत्तरेकडील बाजू) ते नवी सांगवी बस स्टॉप पर्यत अतिरिक्त २४ मी. रस्ता तसेच यापूर्वीच्या संरक्षण विभागाने मंजूरी दिलेल्या **H to I ($R_3$)** रस्त्याकरीता अतिरिक्त १२ मी. रूंद रस्ता करणे आवश्यक आहे. सदरचा अतिरिक्त रस्ता केल्याने, सदर रस्ता हा दोन बीआरटी रस्त्यांना जोडणार असल्याने वाहतुकीसाठी फीडर रूट म्हणून उपयोगात येणार आहे. तसेच सदर भागाचा विकास मोठ्या प्रमाणावर झालेला असल्याने वाहतुक सुरळीत व सुरक्षित होण्याच्या दृष्टीने सदरचा रस्ता होणे गरजेचे आहे. सदर नियोजित रस्त्यांची लांबी सुमारे **४९३० मी.** इतकी असणार आहे. सदरची जागा सुमारे **६३९६० चौ.मी.** व विकास योजनेतील १२ मी. व १८ मी. रूंद रस्त्यामधील उर्वरित क्षेत्रासह एकुण क्षेत्र संरक्षण विभागाचे असल्याने सदरचे क्षेत्र संरक्षण विभागाकडून मनपास हस्तांतरीत करावे लागणार आहे. त्यासाठी महापालिकेने संरक्षण विभागास सदर जागेचे नियमानुसार मुल्य अदा करावे लागणार आहे. तरी सदरची जागा संरक्षण विभागाकडुन मनपास हस्तांतर करून घेऊन संरक्षण विभागास सदर जागेचे मुल्य अदा करणे व त्यासाठी आवश्यक सर्व्हेक्षण, मोजणी करणे इत्यादी अनुषंगिक मंजुरीसह येणा-या सर्व खर्चाबाबत मा.आयुक्तसो यांना संपुर्ण अधिकार देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.स्विनल म्हेत्रे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.शत्रुघ्न काटे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- मौजे पिंपळे सौदागर येथील स.नं. १२१ मधील संरक्षण विभागाच्या हद्दीतील औंध-रावेत ४५.० मी.रस्ता व कोकणे चौक ते शिवार चौक ते साई चौक ४५.० मी.रस्ता या दोन्ही रस्त्यांच्या (स.नं. १२१ मधील) गोलाईने बाधित होणारी (औंध बाजुकडील) १५० चौ.मी.जागा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ताब्यात घेणेस मान्यता देणेत यावी.

**मा.ॲड.नितीन लांडगे –** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- मौजे सांगवी येथील बा.रा.घोलप कॉलेजच्या पश्चिमेकडील बाजु येथून ते महात्मा फुले पुलाच्या लँडीग पर्यंत असलेल्या शासनाच्या जागेतून २४ मी.चा रस्ता भूसंपादन करणेस मान्यता देणेत यावी तसेच पिंपरी वाघिरे येथील डेअरी फॉर्मलगत रेल्वे फाटक पासून कासारवाडी येथील शंकरवाडी शंकर मंदीरापर्यंतचा भुयारी मार्गापर्यंतचा भाग संरक्षण विभागाच्या मालकीचा आहे. रेल्वे लाईनलगत या भागातून १२ मीटर रुंदीचा रस्ता करणे अत्यावश्यक आहे. कारण या भागाचा विकास मोठया प्रमाणावर झाल्याने वाहतूक प्रचंड वाढलेली आहे. त्यामुळे वारंवार वाहतुकीची कोंडी होत असते त्यामुळे वाहतूक सुरळीत व सुरक्षित होण्याच्या दृष्टिने सदरचा रस्ता होणे गरजेचे आहे. सदर रस्त्याचे क्षेत्र संरक्षण विभागाचे असल्याने सदरचे क्षेत्र संरक्षण विभागाकडून मनपास भूसंपादन करावे लागणार आहे. त्यासाठी महापालिकेने संरक्षण विभागास सदर जागेचे नियमानुसार मुल्य अदा करावे लागणार आहे. तरी सदरची जागा संरक्षण विभागाकडून मनपास हस्तांतर करुन घेऊन संरक्षण विभागास सदर जागेचे मुल्य अदा करणे व त्यासाठी आवश्यक सर्व्हेक्षण, मोजणी करणे आदी अनुषंगिक मंजूरीसह येणा-या सर्व खर्चाबाबत मा.आयुक्त सो. यांना संपुर्ण अधिकार देणेस मान्यता देणेत यावी.

**मा.शारदा सोनवणे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.उषा ढोरे -** मा.महापौर साहेब, दोन्ही उपसूचनां स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ६१ विषय क्रमांक – ४

दिनांक – १९/८/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.नरवि/कावि/३६/पिं.गुरव/२६२/२०१७, दि.१९/०७/२०१७
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.१२ दि.२५/०७/२०१७

मौजे पिंपळे गुरव, पिंपळे सौदागर, मौजे सांगवी पर्यत संरक्षण विभागाच्या हद्दीलगत असलेल्या मंजूर विकास योजनेतील १२ मी./१८ मी. रूंद रस्त्यालगत संरक्षण विभागाच्या हद्दीतून आणखी १२ मी. रूंद रस्ता करणे व या व्यतिरिक्त मौजे सांगवी स.नं. ६८ पासुन (बी.आर.घोलप कॉलेजची उत्तरेकडील बाजू) ते नवी सांगवी बस स्टॉप पर्यत अतिरिक्त २४ मी. रस्ता तसेच यापूर्वीच्या संरक्षण विभागाने मंजूरी दिलेल्या **H to I ($R_3$)** रस्त्याकरीता अतिरिक्त १२ मी. रूंद रस्ता करणे आवश्यक आहे. सदरचा अतिरिक्त रस्ता केल्याने, सदर रस्ता हा दोन बीआरटी रस्त्यांना जोडणार असल्याने वाहतुकीसाठी फीडर रूट म्हणून उपयोगात येणार आहे. तसेच सदर भागाचा विकास मोठ्या प्रमाणावर झालेला असल्याने वाहतुक सुरळीत व सुरक्षित होण्याच्या दृष्टीने सदरचा रस्ता होणे गरजेचे आहे. सदर नियोजित रस्त्यांची लांबी सुमारे **४९३०**

**मी.** इतकी असणार आहे. सदरची जागा सुमारे **६३९६० चौ.मी.** व विकास योजनेतील १२ मी. व १८ मी. रूंद रस्त्यामधील उर्वरित क्षेत्रासह एकुण क्षेत्र संरक्षण विभागाचे असल्याने सदरचे क्षेत्र संरक्षण विभागाकडून मनपास हस्तांतरीत करावे लागणार आहे. त्यासाठी महापालिकेने संरक्षण विभागास सदर जागेचे नियमानुसार मुल्य अदा करावे लागणार आहे. तरी सदरची जागा संरक्षण विभागाकडुन मनपास हस्तांतर करून घेऊन संरक्षण विभागास सदर जागेचे मुल्य अदा करणे व त्यासाठी आवश्यक सर्व्हेक्षण, मोजणी करणे इत्यादी अनुषंगिक मंजुरीसह येणा-या सर्व खर्चाबाबत मा. आयुक्तसो यांना संपुर्ण अधिकार देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मौजे पिंपळे सौदागर येथील स.नं. १२१ मधील संरक्षण विभागाच्या हद्दीतील औंध रावेत ४५.० मी.रस्ता व कोकणे चौक ते शिवार चौक ते साई चौक ४५.० मी.रस्ता या दोन्ही रस्त्यांच्या (स.नं. १२१ मधील) गोलाईने बाधित होणारी (औंध बाजुकडील) १५० चौ.मी.जागा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ताब्यात घेणेस मान्यता देणेत येत आहे तसेच मौजे सांगवी येथील बा.रा.घोलप कॉलेजच्या पश्चिमेकडील बाजु येथून ते महात्मा फुले पुलाच्या लँडीग पर्यंत असलेल्या शासनाच्या जागेतून २४ मी.चा रस्ता भूसंपादन करणेस मान्यता देणेत येत आहे तसेच पिंपरी वाघिरे येथील डेअरी फॉर्मलगत रेल्वे फाटक पासून कासारवाडी येथील शंकरवाडी शंकर मंदीरापर्यंतचा भुयारी मार्गापर्यंतचा भाग संरक्षण विभागाच्या मालकीचा आहे. रेल्वे लाईनलगत या भागातून १२ मीटर रुंदीचा रस्ता करणे अत्यावश्यक आहे. कारण या भागाचा विकास मोठया प्रमाणावर झाल्याने वाहतूक प्रचंड वाढलेली आहे. त्यामुळे वारंवार वाहतुकीची कोंडी होत असते त्यामुळे वाहतूक सुरळीत व सुरक्षित होण्याच्या दृष्टिने सदरचा रस्ता होणे गरजेचे आहे. सदर रस्त्याचे क्षेत्र संरक्षण विभागाचे असल्याने सदरचे क्षेत्र संरक्षण विभागाकडून मनपास भूसंपादन करावे लागणार आहे. त्यासाठी महापालिकेने संरक्षण विभागास सदर जागेचे नियमानुसार मुल्य अदा करावे लागणार आहे. तरी सदरची जागा संरक्षण विभागाकडून मनपास हस्तांतर करुन घेऊन संरक्षण विभागास सदर जागेचे मुल्य अदा करणे व त्यासाठी आवश्यक सर्व्हेक्षण, मोजणी करणे आदी अनुषंगिक मंजूरीसह येणा-या सर्व खर्चाबाबत मा.आयुक्त सो. यांना संपुर्ण अधिकार देणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.मनिषा पवार -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ६२ विषय क्रमांक – ५

दिनांक – १९/८/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.नरवि/कावि/१२/१३१/२०१७, दि.१७/०७/२०१७
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.१३ दि.८/०८/२०१७

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची हद्दवाढ महाराष्ट्र शासनाचे आदेश क्र.क्रपीसीसी ।३०९६।१८०१।सीआर-२६१।नवि-२२, दि ११।०९।१९९७ अन्वये करणेत आली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसुचना क्र. टिमपीएस- १८०५/१०५०/सीआर- ७९५/०७/नवि-१३, दि. ३०/०५/२००८ अन्वये मंजुर आहे. तसेच दि. १८/०८/२००९ रोजीच्या निर्णयान्वये पुन:प्रसिद्ध केलेला भाग वगळता उर्वरीत विकास योजना मंजुर असुन शासन निर्णय क्र. टीपीएस१८१२/१६०/प्रक्र५८/१२/पुनर्बांधनी क्र.२७/१२/ईपी मंजुरी/ नवि-१३ दि.०२/०३/२०१५ अन्वये उर्वरीत भागच्या विकास योजनेबाबत निर्णय घेणेत आलेला आहे. मौजे बोपखेल येथील पिपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेमधील खालील तक्यात दर्शविलेल्या प्रस्तावित आरक्षणाचे भूसंपादन करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | आ. क्र. | आरक्षणाचे प्रयोजन | स.नं | बाधित होणारे संपादन करावयाचे एकुण सुमारे क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| १. | आरक्षण क्र. २/१६९ | प्राथमिक शाळा | स.नं १५२ पैकी | ४०००.०० चौ.मी. |
| २. | आरक्षण क्र. २/१५२ | उद्यान | १५६ पैकी | उद्यान –५०००.० चौ.मी. |
| ३ | १८.० मी. रस्ता उद्यानालगतचा पुर्व-पश्चिम रस्ता | -- | १५६ पैकी | अंदाजे ३६०० चौ.मी. |

उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकरिता मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि

पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम – २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेस  मान्यता देणेत येत आहे.

**मा.आरती चोंधे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.राजेंद्र गावडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ६३ विषय क्रमांक – ६

दिनांक – १९/८/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.विकास डोळस, मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव –
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.१४ दि.८/०८/२०१७

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१८ मध्ये विविध आरक्षणे येतात. परंतु सद्यस्थितीत बहुतांश अविकसित आरक्षणे ही नदी व निळया पुररेषेत येत आहेत. त्यामुळे अशा निळया पुररेषेने बाधीत आरक्षणांचा अस्तित्वातील प्रयोजनासाठी विकास करणे शक्य होत नाही किंवा बांधकाम करता येत नाही. म्हणजेच सदर जागेत मनपाच्या नियमानुसार कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येत नसल्यामुळे सदर आरक्षित भूखंडामधील अस्तित्वातील प्रयोजन बदलून सदर ठिकाणी भूखंडाची जागा ही गार्डन, खेळाचे मैदान किंवा पुररेषेने प्रतिबंधीत क्षेत्रात अनुज्ञेय होणारी प्रयोजनासाठी आरक्षित करणे आवश्यक वाटते. कारण चिंचवड परिसरात लाखापेक्षा जास्त लोकसंख्या आहे. सदर परिसरात सुमारे २५,००० इतकी फ्लॅटची संख्या आहे.  सदर भागात दाट लोकवस्ती, भाजीमंडई, शाळा, हॉस्पिटल, स्मशानभूमी, झोपडपट्टी, नाले, दोन मैला शुध्दीकरण प्रकल्प, काही ठिकाणी छोटे रस्ते, मोरया गोसावी मंदिर, असे ऐतिहासिक वारसा लाभलेले शहर आहे. तसेच मोठमोठया सोसायटया असून सदर सोसायटयांना गार्डन व खेळाची मैदाने नाहीत. त्यामुळे येथील लहान मुलांना खेळण्यासाठी मैदाने तसेच जेष्ठ नागरिकांना बसण्यासाठी गार्डन व्यवस्था नाही. मुलांना मोकळा श्वास घेण्यासही खुली हवेची जागा नसल्याने तसेच परिसरातील नागरिकांच्या सोयीसाठी सदर जागेचा गार्डनसाठी व मैदानांचा विचार होणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर आरक्षित जागेचा योग्य वापर होईल व नागरिकांना त्याचा उपभोग घेता येईल. तरी सदर जागेवरील आरक्षणे खालील प्रमाणे बदलणे कामीच्या सदरच्या ठरावास मा.महापालिका सभेची मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | आरक्षण क्रमांक | सध्याचे प्रयोजन | स.नं./सि.स.नं. | एकूण क्षेत्र (चौ.मी.) | अपेक्षित प्रयोजन |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | २१९ | माध्यमिक शाळा | २९६ पै | ७००० | खेळाचे मैदान |
| ०२ | २०९ | पोहण्याचा तलाव | १७४ पै | ४५०० | व्यापारी केंद्र व प्रसुतीगृह |
| | | | | | |
| ०३ | २३० क | प्रसुतीगृह व दवाखाना | २८४ पै | ४००० | उद्यान |

उपरोक्त पैकी अ.क्र.१ व ३ ही आरक्षणे पुररेषेत येत असल्याने मनपा नियमानुसार कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नाही. तसेच चिंचवड गावात आ.क्र.२१८ मध्ये पोहण्याचा तलाव यापूर्वीच बांधणेत आलेने नव्याने अ.क्र.२ नुसार आ.क्र.२०९ मध्ये पुन्हा नव्याने पोहण्याचा तलाव विकसित करण्याची आवश्यकता नाही. त्याऐवजी दाटवस्ती भागातील आरक्षण असल्याने व्यापारी केंद्र (शॉपिंग सेंटर) व प्रसुतीगृह असा फेरबदल करणे योग्य वाटते. २३०अ व केशवनगर मध्ये शाळा यापूर्वीच बांधणेत आल्याने नव्याने अ.क्र.१ नुसार आ.क्र.२१९ मध्ये पुन्हा नव्याने शाळा विकसित करणेची आवश्यकता नाही. त्याऐवजी खेळाचे मैदान असा फेरबदल करणे योग्य वाटते. तसेच अ.क्र.३ नुसार आ.क्र.२३०क मध्ये प्रसुतीगृह व दवाखाना विकसित करणे ऐवजी उद्यान असा फेरबदल करणे योग्य वाटते. तरी वरील आरक्षणांचे बाबतीत महाराष्ट्र प्रादेशिक अधिनियम १९६६ च्या कलम ३७ अन्वये बदल करण्यास तसेच मा.आयुक्त यांनी हरकती सुचना मागवून अंतिम निर्णय घेऊन सदर विषय पुढील कार्यवाही करीता शासनास प्रस्ताव सादर करण्यास मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.बाबासाहेब त्रिभुवन –** मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सारीका सस्ते -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ७

दिनांक – १९/८/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.विकास डोळस, मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव –
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.१५ दि.८/०८/२०१७

मौजे चोविसावाडी व वडमुखवाडी येथील खालील नमुद मंजूर विकास योजनेतील रस्ते भूसंपादन करणे आवश्यक आहे. **१)** मौजे चोविसावाडी येथील स.नं.१०२ ते स.नं.९२ पासून स.नं. ९१ पर्यंत चोविसावाडी हद्दीपर्यंत मंजूर विकास योजनेतील १८ मी.रस्ता भूसंपादन करणे. **२)** मौजे चोविसावाडी येथील स.नं.१८६ पासून स.नं.१९५ चोविसावाडी हद्दीपर्यंत मंजूर विकास योजनेतील १८ मी.रस्ता भूसंपादन करणे. **३)** मौजे वडमुखवाडी येथील स.नं.२५ पासून ते स.नं.५५ पर्यंत वडमुखवाडी हद्दीपर्यंत मंजूर विकास योजनेतील १८ मी.रस्ता भूसंपादन करणे. **४)** मौजे वडमुखवाडी मधील स.नं.२१७ पासून ते स.नं.१८८ पर्यंत वडमुखवाडी हद्दीपर्यंत मंजूर विकास योजनेतील १८ मी.रस्ता भूसंपादन करणे. **५)** मौजे चोविसावाडी मधील स.नं.३० पासून स.नं.३९ पर्यंत मंजूर विकास योजनेतील २४ मी. व तेथुन पुढे स.नं.३९ पर्यंत विकास योजनेतील १८ मी.रस्ता भूसंपादन करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.स्विनल म्हेत्रे -** मा.महापौर साहेब ठरावास अनुमोदन देते.

**मा.विकास डोळस -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील आ.क्र. २/१४८ उदयान या आरक्षणातील क्षेत्र वगळून निवासी विभागात समाविष्ट करणेकरीता म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मा.महापालिका सभेची मान्यता देणेत यावी.

मौजे-दिघी येथील स.नं. ३ पै. मधील आ.क्र. २/१४८ उदयान आरक्षण टाकणेत आलेले हे. सदर स. नंबरमध्ये घरे अस्तित्वात आहेत. सदर घरे ही दिघी महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट होण्याचे आधी ग्रामपंचायत काळापासून आहे. त्याठिकाणी त्यांची अन्य ठिकाणी कोठेही जमीन/जागा नाही. सदर आरक्षण विकसीत करावयाचे झालेस सदर कुटूंब बेघर होणार आहेत त्यामुळे सदर ठिकाणचे आरक्षण रद्द करणेस मान्यता देणेत यावी.

प्रस्तावित स.नं.३ पै. मधील आ.क्र. २/१४८ उदयान या आरक्षणामधील अस्तित्वातील घरांचे एकुण अंदाजे १५ आर क्षेत्र (दोन १५ मी.लगत) आरक्षणातून वगळून निवासी विभागात समाविष्ट करणेकरीता म.प्रा.न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये रद्द करणे व निवासी विभागात समाविष्ट करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.लक्ष्मण उंडे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.सारीका सस्ते -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ६४ विषय क्रमांक – ७

दिनांक – १९/८/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.विकास डोळस, मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव –

२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.१५ दि.८/०८/२०१७

मौजे चोविसावाडी व वडमुखवाडी येथील खालील नमुद मंजूर विकास योजनेतील रस्ते भूसंपादन करणे आवश्यक आहे. **१)** मौजे चोविसावाडी येथील स.नं.१०२ ते स.नं.९२ पासून स.नं. ९१ पर्यंत चोविसावाडी हद्दीपर्यंत मंजूर विकास योजनेतील १८ मी.रस्ता भूसंपादन करणे. **२)** मौजे चोविसावाडी येथील स.नं.१८६ पासून स.नं.१९५ चोविसावाडी हद्दीपर्यंत मंजूर विकास योजनेतील १८ मी.रस्ता भूसंपादन करणे. **३)** मौजे वडमुखवाडी येथील स.नं.२५ पासून ते स.नं.५५ पर्यंत वडमुखवाडी हद्दीपर्यंत मंजूर विकास योजनेतील १८ मी.रस्ता भूसंपादन करणे. **४)** मौजे वडमुखवाडी मधील स.नं.२१७ पासून ते स.नं.१८८ पर्यंत वडमुखवाडी हद्दीपर्यंत मंजूर विकास योजनेतील १८ मी.रस्ता भूसंपादन करणे. **५)** मौजे चोविसावाडी मधील स.नं.३० पासून स.नं.३९ पर्यंत मंजूर विकास योजनेतील २४ मी. व तेथुन पुढे स.नं.३९ पर्यंत विकास योजनेतील १८ मी.रस्ता भूसंपादन करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील आ.क्र. २/१४८ उदयान या आरक्षणातील क्षेत्र वगळून निवासी विभागात समाविष्ट करणेकरीता म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मा.महापालिका सभेची मान्यता देणेत येत आहे

मौजे-दिघी येथील स.नं. ३ पै. मधील आ.क्र. २/१४८ उदयान आरक्षण टाकणेत आलेले हे. सदर स. नंबरमध्ये घरे अस्तित्वात आहेत. सदर घरे ही दिघी महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट होण्याचे आधी ग्रामपंचायत काळापासून आहे. त्याठिकाणी त्यांची अन्य ठिकाणी कोठेही जमीन/जागा नाही. सदर आरक्षण विकसीत करावयाचे झालेस सदर कुटूंब बेघर होणार आहेत त्यामुळे सदर ठिकाणचे आरक्षण रद्द करणेस मान्यता देणेत येत आहे.

प्रस्तावित स.नं.३ पै. मधील आ.क्र. २/१४८ उदयान या आरक्षणामधील अस्तित्वातील घरांचे एकुण अंदाजे १५ आर क्षेत्र (दोन १५ मी.लगत) आरक्षणातून वगळून निवासी विभागात समाविष्ट करणेकरीता म.प्रा.न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये रद्द करणे व निवासी विभागात समाविष्ट करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.आश्विनी जाधव -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ८

दिनांक – १९/८/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.विकास डोळस, मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव –
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.१६ दि.८/०८/२०१७

मौजे च-होली येथील खालील नमुद मंजूर विकास योजनेतील रस्त्यांचे भूसंपादन करणे आवश्यक आहे. **१)** मौजे च-होली स.नं.२२७ ते स.नं.१९८ पर्यंत २४ मी. मंजूर विकास योजनेतील रस्ता भूसंपादन करणे. **२)** मौजे च-होली स.नं.१९२ ते स.नं.८७ पर्यंत १८ मी. मंजूर विकास योजनेतील रस्ता भूसंपादन करणे. **३)** मौजे च-होली, कोतवालवाडी स.नं.४६१ ते डी.वाय.पाटील शाळा च-होली हद्दीपर्यंत (स.नं.१३४) ३० मी. विकास योजनेतील रस्ता भूसंपादन करणे. **४)** मौजे च-होली, ताजणेमळा स.नं.४३० च-होली गावापर्यंत १८ मी. विकास योजनेतील रस्ता भूसंपादन करणे. **५)** मौजे च-होली स.नं.१०१३ ते स्मशानभूमी पासून जाणारा १८ मी.विकास योजनेतील रस्ता स.नं.८ पर्यंत भूसंपादन करणे. **६)** मौजे च-होली स.नं.१०२७ ते १०१० पर्यंत ३० मी. व पुढे १२ मी.विकास योजनेतील रस्त्याचे भूसंपादन करणे. **७)** मौजे च-होली म्हसोबा मंदिर स.नं.५१९ ते स.नं.४७५ कोतवालवाडी पर्यंत विकास योजनेतील ३० मी. रस्ता भूसंपादन करणे. **८)** मौजे च-होली हिरामाता मंदिर स.नं.४३ ते स.नं.१०९ पर्यंत विकास योजनेतील ३० मी. रस्ता भूसंपादन करणे. **९)** मौजे च-होली मंजूर विकास योजनेतील आ.क्र.२/६४ उद्यानाची जागा भूसंपादन करणे. **१०)** मौजे डूडूळगांव येथील स.नं.१८९ पासून स.नं.१९१ पर्यंत २४ मी. रस्ता भूसंपादन करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.माधुरी कुलकर्णी -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.तुषार कामठे-** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-- १. मौजे च-होली स.नं. १७७ पासुन बुर्डे वस्तीकडे जाणा-या १८ मी. विकास योजनेतील रस्त्याचे (स.नं. १७२,१७३,१७४,१७५,१७६,१७७) भूसंपादन करणेस मान्यता देणेत येत आहे. २. मौजे च-होली म्हसोबा मंदीर ते इंद्रायणी नदीकडे जाणारा ४५ मी. रस्त्यासाठी स.नं. ५३५ (जुना स.नं. १००४) व स.नं. ५३६ (जुना स.नं. १००५) मधील क्षेत्राचे भूसंपादन करणेस मान्यता देणेत यावी.**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.राहूल जाधव -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेव्यतिरीक्त- मौजे-चिखली येथील ग.नं. ६८० लगतचा अस्तित्वातील रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये १२.०० मी. रस्ता घोषीत करणेस मान्यता देणेत यावी.

मौजे-चिखली येथील ग.नं.६८० मध्ये मंजूर विकास योजनेत १२ मी. रस्ता प्रस्तावित केलेला आहे. ग.नं. ६८० लगत दक्षिणेस अंदाजे ९.०० मी. अस्तित्वातील रस्ता आहे. त्यामुळे त्याठिकाणी दोन रस्ते तयार होणार आहेत. तसेच ग.नं. ६८० मधील १२ मी. रस्त्यावर कंपनीचे मोठे शेड आहेत. त्यामुळे विकास योजनेतील रस्ता विकसित करणेस अडचणी निर्माण होणार त्यामुळे विकास योजनेतील १२ मी. रस्ता रद्द करुन अस्तित्वातील रस्त्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये १२.०० मी. रस्ता घोषित करणेस मान्यता देणेत यावी.

प्रस्तावित मौजे-चिखली येथील ग.नं. ६८० लगतचा अस्तित्वातील रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये १२.०० मी. रस्ता घोषित करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.सागर गवळी -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.अश्विनी जाधव –** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक- ६५      विषय क्रमांक – ८

दिनांक – १९/८/२०१७      विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.विकास डोळस, मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव –
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.१६ दि.८/०८/२०१७

मौजे च-होली येथील खालील नमुद मंजूर विकास योजनेतील रस्त्यांचे भूसंपादन करणे आवश्यक आहे. **१)** मौजे च-होली स.नं.२२७ ते स.नं.१९८ पर्यंत २४ मी. मंजूर विकास योजनेतील रस्ता भूसंपादन करणे. **२)** मौजे च-होली स.नं.१९२ ते स.नं.८७ पर्यंत १८ मी. मंजूर विकास योजनेतील रस्ता भूसंपादन करणे. **३)** मौजे च-होली, कोतवालवाडी स.नं.४६१ ते डी.वाय.पाटील शाळा च-होली हद्दीपर्यंत (स.नं.१३४) ३० मी. विकास योजनेतील रस्ता भूसंपादन करणे. **४)** मौजे च-होली, ताजणेमळा स.नं.४३० च-होली गावापर्यंत १८ मी. विकास योजनेतील रस्ता भूसंपादन करणे. **५)** मौजे च-होली स.नं.१०१३ ते स्मशानभूमी पासून जाणारा १८ मी.विकास योजनेतील रस्ता स.नं.८ पर्यंत भूसंपादन करणे. **६)** मौजे च-होली स.नं.१०२७ ते १०१० पर्यंत ३० मी. व पुढे १२ मी.विकास योजनेतील रस्त्याचे भूसंपादन करणे. **७)** मौजे च-होली म्हसोबा मंदिर स.नं.५१९ ते स.नं.४७५ कोतवालवाडी पर्यंत विकास योजनेतील ३० मी. रस्ता भूसंपादन करणे. **८)** मौजे च-होली हिरामाता मंदिर स.नं.४३ ते स.नं.१०९ पर्यंत विकास योजनेतील ३० मी. रस्ता भूसंपादन करणे. **९)** मौजे च-होली मंजूर विकास योजनेतील आ.क्र.२/६४ उद्यानाची जागा भूसंपादन करणे. **१०)** मौजे डुडूळगांव येथील स.नं.१८९ पासून स.नं.१९१ पर्यंत २४ मी. रस्ता भूसंपादन करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच १.मौजे च-होली स.नं. १७७ पासुन बुर्डे वस्तीकडे जाणा-या १८ मी. विकास योजनेतील रस्त्याचे (स.नं. १७२,१७३,१७४,१७५,१७६,१७७) भूसंपादन करणेस मान्यता देणेत येत आहे. २. मौजे च-होली

म्हसोबा मंदीर ते इंद्रायणी नदीकडे जाणारा ४५ मी. रस्त्यासाठी स.नं. ५३५ (जुना स.नं. १००४) व स.नं. ५३६ (जुना स.नं. १००५) मधील क्षेत्राचे भूसंपादन करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेव्यतिरीक्त- मौजे-चिखली येथील ग.नं. ६८० लगतचा अस्तित्वातील रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये १२.०० मी. रस्ता घोषीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

मौजे-चिखली येथील ग.नं.६८० मध्ये मंजूर विकास योजनेत १२ मी. रस्ता प्रस्तावित केलेला आहे. ग.नं. ६८० लगत दक्षिणेस अंदाजे ९.०० मी. अस्तित्वातील रस्ता आहे. त्यामुळे त्याठिकाणी दोन रस्ते तयार होणार आहेत. तसेच ग.नं. ६८० मधील १२ मी. रस्त्यावर कंपनीचे मोठे शेड आहेत. त्यामुळे विकास योजनेतील रस्ता विकसित करणेस अडचणी निर्माण होणार त्यामुळे विकास योजनेतील १२ मी. रस्ता रद्द करुन अस्तित्वातील रस्त्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये १२.०० मी. रस्ता घोषित करणेस मान्यता देणेत येत आहे.

प्रस्तावित मौजे-चिखली येथील ग.नं. ६८० लगतचा अस्तित्वातील रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये १२.०० मी. रस्ता घोषित करणेस मान्यता देणेत येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सारिका सस्ते –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ६६ विषय क्रमांक – ९

दिनांक – १९/८/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.विकास डोळस, मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव –

२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.१७ दि.८/०८/२०१७

मौजे बो-होडेवाडी येथील गट नं.१८९ ( मोशी जुना ग.नं.१३०७) वर महानगरपालिकेच्या विकास आराखडयात आ.क्र.१/१६५ बेघरांसाठी घरे आरक्षण टाकणेत आलेले आहे. सदर गटामध्ये श्री.बाळू किसन बोराटे व इतर यांचे राहते घर आहे. सदर घर बो-हाडेवाडी महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट होण्याचे आधी ग्रामपंचायत काळापासून आहे. त्या ठिकाणी बोराटे यांची अन्य ठिकाणी कोठेही जमीन नाही. सदर आरक्षण विकसित करावयाचे झाल्यास सदर कुटूंब बेघर होणार आहे. त्यामुळे सदर ठिकाणचे आरक्षण रद्द करणेत यावे. प्रस्तावित या आरक्षणातील ग.नं.१८९ मधील आ.क्र.१/१६५ बेघरांसाठी घरे म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये रद्द करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.स्विनल म्हेत्रे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. वास्तविक पाहता कोणाच घर जर वाचत असेलतर त्याबद्दल आमच काहीच दुमत नाही. परंतु पिंपरी चिंचवड शहरामध्ये सध्या रिंगरोडचा जो विषय आहे त्या अनुषंगाने अनेक गोरगरीबांचे घर त्याच्यामध्ये जात आहेत, बाधीत होत आहेत. माझी आपल्याला विनंती आहे की हा विषय अनेकवेळा चर्चेला आला मागच्या वेळेस चर्चा होणार होती. माझी आपल्याला विनंती आहे की त्याच पुर्ण सर्वेक्षण करुन रिंगरोड जर करायचा असेल आणि रिंगरोड होणार असेलतर त्याला पर्यायी व्यवस्था असेलतर ती आपण पहावी. सर्वेक्षण कराव, अन्यत: जे बेघर होणार आहेत त्या बेघर लोकांची काहीतरी व्यवस्था आपल्याला जर संबंधित प्राधिकरण असेलतर प्राधिकरणाकडून महापालिका असेलतर महापालिकेकडून जी लोक त्या रिंगरोडमध्ये बाधीत होणार आहेत त्या लोकांची व्यवस्था शासनाने करावी, महापालिकेनी करावी अन्यत: प्राधिकरणाने करावी. त्यांची फसवणूक झालेली आहे, शेतक-यांनी ती जागा विकलेली आहे. यामध्ये अनेक भूसंपादनाचे विषय आहेत. माझी आपल्याला विनंती आहे की आपण प्रशासनाला अशाप्रकारचे आदेश दयावेत की या शहरामध्ये जेवढे डीपी रोड आहेत ते सगळे डीपी रोड लवकरात लवकर कसे भूसंपादीत होतील असा आपल्या महापालिकेचा प्रयत्न असला पाहीजे. अन्यत: लोक आरक्षणाची जागा विकून टाकतात. भूसंपादन लवकर होत नाही मग तो शेतकरी आपली जागा गुंठा गुंठा करुन विकतो आणि त्यामध्ये गोरगरीब फसले जातात. अर्थात रेव्हेन्यू डिपार्टमेंटला याच्याशी काही घेणे देणे नाही. लोक अर्धा गुंठा एक गुंठा अशी जागा घेतात आणि कालांतराने त्याला कळत की माझ घर हे हॉस्पिटलमध्ये आहे, गार्डनमध्ये आहे, रस्त्यामध्ये आहे. अशा पध्दतीने गोरगरीबांच्या घरावर बुलढोझर फिरवण्याची वेळ येते. माझी आयुक्त साहेब आपल्याला विनंती आहे की हे विषय घ्यावेच घ्यावे परंतु शहरामधील जे जे आरक्षण आहेत ते लवकरात लवकर ताब्यात कसे येतील हे बघावे. वास्तविक पाहता राज्यशासनाची योजना असेल, केंद्रशासनाची योजना असेल किंवा आता नवीन शासनाने टिडीआरमुक्त केला, २.२ जे लवकर देतील त्यांना नंतर २.१५ आणि २.१० हे लवकर भूसंपादन कस करता येईल यासाठी आहे. मा.आयुक्त साहेब माझी आपल्याला विनंती आहे की, आपण अशाप्रकारचे जे रस्ते असतील, अशाप्रकारच जे आरक्षण असेल याला ताब्यात घेण्यासाठी आपण जर एक वेगळ डिपार्टमेंट नियुक्त केलतर हे भूसंपादन करता येईल अशाप्रकारची अडचण भविष्यामध्ये होणार नाही. आता आपण स्मार्ट सिटीमध्ये या सगळया गोष्टी बघणार आहेत यासाठी आपल नियोजन कराव आणि रिंगरोडच्या या सर्व बाधीत लोकांना कशी मदत करता येईल या पध्दतीने सर्वच पक्षातील लोकांनी प्रयत्न करावेत आणि या लोकांना कसा आश्रय देता येईल हे बघावे यासंबंधीतील आपल्याला विनंती करतो आणि थांबतो.

**मा.हिराबाई घुले -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. बोपखेलला सातवी पर्यंत शाळा आहे. आता आठवी, नववी, दहावी ती केलेली आहे. १५२ मध्ये आरक्षण आहे. ते

ताब्यात घ्याव. तसेच गणेशनगरला १५६ मध्ये आरक्षणची जागा आहे ती जागाही ताब्यात घ्यावी ही माझी विनंती आहे. दिघीला बी.यू.भंडारीच्या तिथ एक विहीर आहे त्याठिकाणी ड्रेनेजच पाणी त्या विहीरीत जातय ते वापरायच नाही तेवढ नियोजन कराव.जयहिन्द, जय महाराष्ट्र.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरंतर योगेशभाई तुम्ही या संदर्भामध्ये कोणाची घरं सुटली पाहीजे किंवा वाचली पाहीजे तर आम्हांला सगळयांची घर वाचली पाहीजेत. हा विषय किंवा ही सभा झाल्याच्यानंतर आपण ठरवलय रिंगरोडच्या संदर्भामध्ये सभागृहाने दोन, तीन, चार तास जेवढे लागतील तेवढे तास जेवढया सन्मा.सदस्यांना बोलायच त्यांना बोलाता येणार आहे त्यावर आपण चर्चा करणार आहोत. मा.महापौरांना विनंती करतो की हा विषय मंजूर करुन १ के चा विषय झाल्यानंतर रिंगरोडच्या संदर्भामध्ये आपल्याला चर्चेसाठी थांबायच आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.अॅड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- ६७ विषय क्रमांक – १०

दिनांक – १९/८/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
जा.क्र.प्रअक/३/कावि/२६४/२०१७ दि.५/०७/२०१७

२) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ५३ दि.२०/७/२०१७ अन्वये.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ६७(अ) अन्वये प्रत्येक महानगरपालिकेने लगतपूर्ववर्ती शासकीय वर्षासंबंधिचा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल शासनाकडून वेळोवेळी विहीत करण्यात येईल, अशा पध्दतीने दरवर्षी ३१ जुलै पूर्वी मा.महापालिका सभेकडे सादर करणे आवश्यक आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा सन २०१६-१७ चा पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या डी.पी.एस.आय.आर. या मार्गदर्शक तत्वानुसार सर्व आवश्यक माहिती संबंधित विविध विभागाकडून संकलित करुन त्यानुसार तयार करण्यात आला आहे. सदर प्रारुप अहवाल मा.महापालिका सभेस सादर करावयाचा आहे.

सबब पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा सन २०१६-१७ चा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल मा.महापालिका सभेसमोर ठेवणेत येत आहे.

**मा.बाबू नायर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.जयश्री गावडे –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ६८ विषय क्रमांक – ११

दिनांक – १९/८/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
जा.क्र.स्वभाअक/३/कावि/१८०/२०१७ दि.४/०८/२०१७

केंद्र शासनाच्या "स्वच्छ भारत अभियान"च्या धर्तीवर राज्यामध्ये "स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)" राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालयनाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु २८७,०३,०००/- व ५,०३,९१,०००/- असे एकुण र. रु ७,९०,९४,०००/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/-, राज्य शासनाचे र.रु.८००० /- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/-याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३१/७/२०१७ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहितीखालील प्रमाणे

**प्रपत्र "अ"**

<table>
<tr><th colspan="2">महानगरपालिकेचे नाव</th><th>पिंपरी चिंचवड महानगरपालिका</th><th>शेरा</th></tr>
<tr><td colspan="2">जिल्हा</td><td>पुणे</td><td></td></tr>
<tr><td colspan="2">वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या<br><br>कुटुंबांची संख्या</td><td>११००४</td><td></td></tr>
<tr><td colspan="2">केंद्र शासनाचे "स्वच्छ भारत अभियान"च्या संकेत<br><br>स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या</td><td>९९१४</td><td></td></tr>
<tr><td colspan="2">मंजूर अर्जांची एकूण संख्या</td><td>६३०९</td><td></td></tr>
<tr><td>बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या</td><td>वैयक्तिक घरगुतीशौचालय</td><td>५६०१</td><td></td></tr>
<tr><td>बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या</td><td>वैयक्तिक घरगुती शौचालय</td><td>५०६७</td><td></td></tr>
<tr><td>बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या</td><td>सामुदायिक शौचालय</td><td>३६१ सीटस</td><td></td></tr>
<tr><td>बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या</td><td>सामुदायिक शौचालय</td><td>१७५सीटस</td><td>महिला – ९४ सिटस कामकाज पूर्ण<br><br>पुरुष – ८१ सिटस कामकाज पूर्ण</td></tr>
<tr><td rowspan="2">निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता</td><td rowspan="2">५६०१लाभार्थी</td><td>GOI+GOM=३३६.०६<br>लाख</td><td>GOI=२०००/-व<br><br>GOM=४०००/- हिस्सा</td></tr>
<tr><td>ULB =११२.०२ लाख</td><td>ULB =२०००/- हिस्सा</td></tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| | **एकुण** | **४४८.०८लाख** | |
| निर्गत करणेत आलेला<br><br>दुसरा हप्ता | ४२४८लाभार्थी | GOI+GOM=२५४.८८<br><br>लाख | GOI=२०००/-व<br><br>GOM=४०००/-<br>हिस्सा |
| | | ULB =८४.९६ लाख | ULB =२०००/-<br>हिस्सा |
| | **एकुण** | **३३९.८४ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत आला.

**मा.अश्विनी बोबडे –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा. ॲड.सचिन भोसले -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. स्वच्छ भारत अभियान या विषयाला धरुन मी काही सूचना करु इच्छितो. गल्ली ते दिल्ली अस सगळीकडे कमळ फुललेल आहे. परंतु या शहरामध्ये कच-याचे ढिग गल्लोगल्ली साठलेले आहेत. स्वच्छ भारत अभियान या विषयातंर्गत मी बोलतो. माझ्या प्रभागामध्ये किमान सात ते आठ ठिकाणी कचरा साठतो त्या संदर्भात मी ७/४/२०१७ ला पत्र दिलेल होत आणि ते पत्र देत असताना मी त्याठिकाणी सूचवल होत. आमचे जे आरोग्य निरीक्षक आहेत त्यांना विचारल की कच-याची समस्या आपल्याला का भेडसावते तर त्यांनी मला सांगीतल की आपल्याकडे घंटागाडी कमी आहेत. मी त्या पत्राव्दारे सन्मा.आयुक्त आपल्याला एक पत्र दिलेल आहे. त्याठिकाणी लवकरात लवकर घंटा गाडयाची संख्या वाढवावी. प्रभाग मोठा झालेला आहे त्यामुळे सर्वत्र कचरा होतो व घंटागाडी वेळेत जात नाही त्यामुळे कचरा साठतो. परंतु ते निवेदन देवून देखील आजतागायत त्याच्यावर कुठलीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे मी विनंती करतो की लवकरात लवकर हे स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत आपल शहर स्वच्छ हवय अस म्हणत असूतर त्यासाठी आपल्याला कच-याची विल्हेवाट लावणे हे देखील तीतकच गरजेच आहे. शौचालयाचा जो विषय आहे तो ब-प्रभागाअंतर्गत महात्मानगर झोपडपट्टी आहे गेल्या अनेक दिवसापासून मी आरोग्य निरीक्षकांना मागणी करतो, विचारणा करतो की या प्रभागामध्ये, महात्मानगर झोपडपट्टीमध्ये किती लोकांचे अर्ज आले होते आणि किती लोकांनी या शौचालयाचा लाभ घेतला आहे. याच्यामध्ये मला पहील्यांदा सांगण्यात आल की २३ लोकांनी याचा लाभ घेतला आहे. त्याच्यानंतर कुठलीही मला माहिती न देता व्हॉट्सप वरती कळवण्यात आल की फक्त ७ नागरीकांना त्याठिकाणी या योजनेचा लाभ घेता आला. उर्वरीत त्यांनी जे कारण सांगीतल जवळ जवळ २३८ अर्ज आले होते आणि त्या २३८ अर्जापैकी फक्त

एवढेच अर्ज मंजूर झाले आहेत आणि बाकीचे अर्ज नामंजुर झाले त्याच कारण असं सांगण्यात आल होतं की यांना ड्रेनेज लाईन नाही व इतर काही अनेक त्रुटी त्यामध्ये आहेत. मी या सभागृहाच्या माध्यमातून विचारु इच्छितो की सर्वसामान्य नागरीक ज्या वस्तीमध्ये राहतो त्याठिकाणी सार्वजनिक शौचालय देखील आहे परंतु त्याची देखील देखभाल आपल्या प्रशासनाच्या वतीने व्यवस्थित होत नाही. उर्वरीत अर्ज जे नामंजुर झाले त्यामध्ये कुठल्या त्रुटी आहेत ते मला सांगावं. आता ताबडतोब त्याठिकाणी आपण हा जो काही आकडा दिलेला आहे. प्रत्यक्षात हे कागदावरती आलेलं आहे. पण प्रत्यक्षात त्याठिकाणी तसं झालेल नाही. तरी त्याची आपण खात्री करुन घ्यावी अशी माझी आपल्याला सर्वांना विनंती आहे. एवढ बोलून याठिकाणी थांबतो, जयहिंद, जय महाराष्ट्र.

**मा.सचिन चिखले -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. केंद्रशासन भारत स्वच्छ अभियानांतर्गत आपण या विषयावर चर्चा करत आहोत. खरतर माझा प्रभाग पाहीलातर अर्धा रेडझोनमध्ये आहे, से.२२ हा. पण त्याची लोकसंख्या पाहीलीतर कमीत कमी दोन ते आडीच लाख लहान मुलांना धरुन आहे. त्या परिसरामध्ये वसाहत असेल, पीसीएमसी कॉलनी असेल, त्याचप्रमाणे जेएनएनयुआरएमच्या बिल्डींग असतील जुने इंदिरागांधी योजनेअंतर्गत मिळालेली जी घर आहेत त्या घरामध्ये जे वेगवेगळया ठिकाणी जे शौचालय उभी केलेली आहेत. काही झोपडपट्टयाही त्या परिसरामध्ये आहेत. भक्ति-शक्ती चौक ते त्रिवेणीनगर चौकापर्यंत आजही उघडयावर लोक शौचालयाला जातात. कोणत्याही प्रकारची सुविधा त्या परिसरामध्ये नाही. गेले पाच ते दहा वर्षात त्या परिसरामध्ये शौचालया विषयी ज्यावेळेस आम्ही अधिका-यांना सांगीतल की याची डागडूजी करा परंतु ती केली जात नाही कारण ते अधिकारी आम्हांला सांगतात की हा संबंध परिसर रेडझोनमध्ये आहे. परंतु मा.महापौर साहेब, आपण जर त्या परिसरामध्ये पाहणी केलीतर काही शौचालय अशी आहेत की ज्याला दरवाजे नाहीत आणि ते तशाच पध्दतीने लेडीज असतील, जेण्टस असतील ते वापरतात. अक्षरश: छोटी छोटी मुल, महीला आहेत. तशा पध्दतीचे शौचालय वापरले जातात. अत्यंत घाणेरडया पध्दतीच्या मुता-या असतील, बाथरुम असतील एकदम अयोग्य पध्दतीने ते पडलेल्या अवस्थेत आहेत आणि तसेच ते वापरले जातात. आयुक्त साहेब आपल्याला माझी नम्र विनंती आहे की से.२२ मध्ये जेवढे शौचालय असतील, जेवढे टॉयलेट असतील ते तुम्ही प्रायोरीटी बेसवर घेऊन लवकरात लवकर ती दुरुस्त करावीत आणि तेथील लोकांना एक चांगली सुविधा उपलब्ध करुन दयावी अशी मी तुम्हांला नम्र विनंती करतो, धन्यवाद.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा शौचालयाचा विषय आपल्याकडे आला. कचरा उचलला जात नाही, त्याच्यासाठी गाडी अव्हेलेबल नाहीत असा विषय मांडला. मला वाटत या पाच महीन्यामध्ये कुठल्या पध्दतीचे कामकाज करावे हे

भारतीय जनता पार्टीने ठरवलेले आहे. मला कौतूक करावेसे वाटते की स्थायी समिती अध्यक्षा सिमाताई विरोधी पक्षामध्ये असताना सुध्दा त्यांनी बालाजीनगरमध्ये १९७२ टॉयलेटची व्यवस्था केली मला वाटत त्यांच आपण अभिनंदन केल पाहीजे. कारण सत्तारुढ पक्षामध्ये असताना  काम करणे सोप जात पण विरोधीमध्ये असताना काम करण कठीण जातं हे मला माहिती आहे.  मी निवडून आल्यानंतर पाच महीन्यामध्ये सुध्दा १७२ सीट केलेले आहेत. मला नवीन सदस्यांना सांगावस वाटतय की, काय राहील आहे यापेक्षा कुठल्या पध्दतीने काम करुन घ्यायचे हे तुम्हांला शिकावे लागेल. तरच आपण पुढे तरी काम करु शकतो. ड्रेनेजच्या ब-याचशा लाईन झोपडपट्टीमध्ये राहीलेल्या आहेत. ते काम अधिका-यांकडून करुन घ्यावे लागेल. आपल्याकड तशा पध्दतीच मला वाटत बजेट पण अव्हेलेबल आहे. यापुढे शौचालयाची काळजी जास्तीत जास्त कशी घेता येईल, जास्तीत सार्वजनिक शौचालय कसे देता येतील, आणि त्याची स्वच्छता कशी करता येईल हे सुध्दा आयुक्त साहेब तुम्हांलाही बघावे लागेल. प्रायव्हेट लोकांना जे काही सिट दिलेत त्यांना आपण पैसे घेवूनच टॉयलेट देतो. २५०/- रु. एका सिट मागे दिले जातात. मला वाटत ते सुध्दा आता वाढविण्याची गरज आहे एवढेच बोलून  थांबतो. जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मा.महापौर साहेबांना मी विनंती करणार आहे की या सभागृहात रिंगरोडच्या संदर्भात चर्चा केली जाणार आहे त्यामुळे सभागृहामध्ये सर्व सदस्यांना विनंती आहे की बाकीच्या विषयावर कमी बोललेतरी चालेल. बरेचसे नागरीक या विषयासाठी याठिकाणी उपस्थित राहीलेले आहेत. तरी त्या विषयाला थोडासा जास्तीचा वेळ मिळेल म्हणून मी विनंती करतो.

**मा.महापौर -**  विषय क्रमांक ११ वर मा.आयुक्त साहेब खुलासा करतील.

**मा.महापालिका आयुक्त -** मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह. या विषयासंदर्भात एक गोष्ट मला सभागृहाच्या निदर्शनास आणायची आहे. आपले शहर हे ओडीएफ म्हणजे खुला वर्ग शौचालयास जाण्यासाठी मुक्त अशा स्वरुपाच्या सर्वेक्षणाकडे मार्गक्रमणा करते आहे आणि आपण केंद्रशासनाकडून आपल्याकडे तपासणी लवकरच होणार आहे. तथापि आपण या गेल्या पाच ते सहा महीन्यामध्ये येथे सर्व्हे करुन घेतलेला आहे आणि ओडीएफच्या पलीकडचा टप्पा आपल्याला गाठायचा आहे तो आहे ओडीएफ प्लस. ओडीएफ प्लस म्हणजे त्याच्या पलीकडे जाऊन आपल्याला एक महत्वाचा टप्पा जो गाठायचा तो असा आहे की आजच्या स्थितीमध्ये ज्या नागरीकांकडे स्वत:च वैयक्तिक शौचालय नाही त्यांना आज आपण कम्युनिटी टॉयलेट सामूदायीक शौचालय वापर करण्यासाठी आपण त्यांना सुविधा देतो. पण सामुदायीक शौचालयाची संख्या पर्याप्त नसल्याने म्हणा, त्याठिकाणी नागरीकांना अनेकवेळा अडचण होत

असते. अशा परिस्थितीमध्ये आपल्या अनेक स्लम्समध्ये आपल्या येथे ड्रेनेज लाईनची व्यवस्था नसल्यामुळे किंवा त्याठिकाणी पर्याप्त सुविधा ड्रेनेज लाईनची नसल्याने आपल्याकडे आतापर्यंत वैयक्तिक शौचालय देवू शकलो नव्हतो. पण प्रशासनाच्या वतीने नजीकच्या कालावधीमध्ये आपण एक मॅसिव्ह  कार्यक्रम याच्यामध्ये घेतोय की ज्याच्यामध्ये सर्वच स्लम ऐरीयामध्ये आपण ड्रेनेज लाईनची व्यवस्था करतो आहोत. जिथे ड्रेनेज लाईन नसते तिथे घर तिथे शौचालय या भूमिकेवरती आपण राहणार आहोत आणि यासाठी सुमारे पुढील तीन ते चार महीन्यामध्ये जर आपण टार्गेटेट पध्दतीन पंधरा ते सोळा हजार घरामध्ये जर शौचालय देवू शकलो, निधीची कमतरता नाही मात्र प्रत्येक सन्माननीय सदस्यांना माझी विनंती राहील की आपला वॉर्ड हा नागरी स्वच्छतेसाठी आणि आरोग्यासाठी ओडीएफच्या पलीकडे जाऊन ओडीएफ प्लस होईल. याच्या मध्येजर वैयक्तिकरीत्या लक्ष दिलं तर निश्चितपणे आपल शहर ओडीएफ प्लस होईल आणि स्वच्छतेच्या, आरोग्याच्या दृष्टिने आपले शहर चांगले होऊ शकेल. कम्युनिटी टॉयलेटची देखील आपल्याकडे अधिक सुविधा आपल्याला करायची आहे त्याच्यामध्ये काही पॉलीसी डिसीझन आपण घेतो आहोत. पण हे करत असताना नवीन कम्युनिटी टॉयलेटस्  आणि पब्लिक टॉयलेटसची निश्चिती ही नागरीकांच्या मदतीन जागा स्थळ निश्चिती जर झाली, त्याच्यामध्ये लोकप्रतिधीनी जर नागरीकांना सोबत घेवून स्थळ निश्चिती केलीतर आपल्याला कुठल्याही प्रकारचे हेवेदावे भांडण त्या निमीत्तान होणार नाहीत आणि चांगल्या रीतीन आपण पब्लिक टॉयलेटस बांधु शकू. एक अत्यंत महत्वाचा उपक्रम आपल्याला स्वच्छ सर्वेक्षणाच्या अनुषंगाने देखील आवश्यक आहे. स्वच्छ भारतमध्ये ओडीएफ प्लस आपल्याला करायच आहे. सर्व सन्मा.नगरसेवकांना माझी विनंती आहे की या कार्यक्रमामध्ये आपआपल्या वॉर्डच उत्तरदायित्व आणि पालकत्व आपण घेतलतर निश्चितपणे चांगले काम याच्यामध्ये होऊ शकेल.

**मा.भाऊसाहेब भोईर -**  मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपण मैला शुध्दीकरण प्रकल्प राबविलेला आहे.  याठिकाणी अंडरग्राऊंड ड्रेनेजच्या रक्तवाहीन्या प्रमाणे या वाहीन्या आहेत. मैला शुध्दीकरण डायरेक्ट नाल्यात सोडलेले आहे त्याचे फिल्ट्रेशन नाही. काही पवनानदीमध्ये सोडल जेवढया नदया आहेत त्या नदीत सोडलेल आहे. याचा डायरेक्ट संपुर्ण परिणाम त्या पाण्यावर होतो.  आणि ते अतीशय अस्वच्छ पाणी झालेले आहे. अतीशय चांगला उपक्रम आहे त्याला दोन सूचना करतो की आपण त्याच सर्वेक्षण कराव आणि ते मैला शुध्दीकरणपर्यंत पोहचते का नाही यासाठी अतीशय गांभीर्यान लक्ष दयाव ही विनंती.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. प्रत्येकाच्या घरी शौचालय असाव याच्यावर चर्चा करत असताना सन्मा.आयुक्त साहेब आता पुर्ण सभेमध्ये पाणीपुरवठयावर बोलले, आपण स्वच्छतेवर बोलतोय. परंतु एक खंत वाटते की पाणीपुरवठा

विषयाबद्दल आज एका सदस्यांनी सांगीतले की १९८५ ची ती पाईपलाईन होती, म्हणजे अशा काहीतरी घटना घडतात ज्यावेळेस ड्रेनेजचा विषय आम्ही काढलातर ड्रेनेजवाहीन्या ज्या आहेत त्या खराब झालेल्या आहेत अशा अनेक समस्या आमच्या सगळयांच्या प्रभागामध्ये कमी जास्त प्रमाणात आहेतच. पाण्याच ४० टक्के आपण लिकेज म्हणतो, त्याच कारण असे आहे की आपल्याकडच्या ते पाणी नेणा-या वाहीन्या ज्या आहेत त्या गंजलेल्या वाहीन्या आहेत, असे अनेक कारण आहेत. तसेच ड्रेनेजच्या बाबतीमध्ये सुध्दा आहे. त्यामुळे या सभागृहाच्या माध्यमातून तुम्हांला एक विनंती आहे की  आपल्याकडे शहराचा युटीलीटी प्लॅन तयार असला पाहीजे. आज आपले अनेक अधिकारी रिटायर्डमेंटच्या जवळ आलेले आहेत, आणि बोलता बोलता एक सदस्य बोलून गेले की आज आमच्याकडे एक्झिक्यूटीव्ह ईंजिनीअर पेक्षा, डेप्युटी ईंजिनीअर पेक्षा, ज्युनिअर ईंजिनीअरपेक्षा आमचा प्लंबर तिथ मास्टर आहे अशी कंडीशन कुठेतरी आहे. आमच्या प्लंबरला माहिती आहे की कुठे किती आटया आहेत, कुठे काय आहे, कुठे कनेक्शन दिले, कुठे नवीन लाईन टाकली, कुठे जुनी लाईन टाकली आहे आणि याच एकच मुलभूत कारण आहे की आपल्याकडे याचा युटीलीटी प्लॅन तयार नाही. जर एखादया अधिका-यांनी जर सांगीतल की आपला ड्रेनेज विभाग असेल किंवा पाणीपुरवठा विभाग दोन्ही जीवनावश्यक म्हणजे सगळयांना गरजेच्या गोष्टी आहेत. त्याच्यामुळे जर आपल कमांड आलंतर निश्चितपणे शहरामध्ये काम करत असताना त्या ड्रेनेजलाईनची डेप्थ किती आहे, जो काय चेंबर आहे तो किती खोल आहे  याची सगळी माहिती जर आपल्याकडे प्रॉपर असेलतर अत्यंत चांगल्याप्रकारच काम आपण आपल्या शहरामध्ये करु शकू त्यामुळे आपण आपल्या असणा-या सगळया प्लंबर लोकांना, पाणीपुरवठा, ड्रेनेज विभागाला आदेश दयावेत की आपण याठिकाणी ज्या ज्या प्रभागात काम करतात त्याठिकाणचा युटीलीटी प्लॅन आपल्या माध्यमातून तयार झाला पाहीजे, धन्यवाद.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.प्रियंका बारसे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ६९ विषय क्रमांक – १२

दिनांक – १९/८/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
जा.क्र.नवियो/५/कावि/२८५/२०१७ दि.०८/०८/२०१७

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत राबविण्यात येणा-या मागासवर्गीय कल्याणकारी योजनेअंतर्गत १) इयत्ता ५ वी ते १० वी मधील

मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती. २) १२ वी नंतरचे वैद्यकिय (MBBS, BAMS, BDS, BUMS, BHMS), MBA आणि अभियांत्रिकी पदवी परीक्षा यासारखे उच्च शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य देणे. ३) मागासवर्गीय युवकांना परदेशातील उच्च शिक्षणासाठी अर्थसहाय्य देणे. ४) इयत्ता ८ वी ते १२ वी मध्ये शिकत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मोफत सायकल वाटप. या चार योजना कार्यान्वित आहेत. या योजनेत काही दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने या बाबत सुधारीत योजना प्रस्ताव तयार करणेत आला आहे. तरी प्रस्तावा सोबतचे प्रपत्र अ, ब, क आणि प्रपत्र ड नुसार या सुधारीत योजनेला मान्यता देणेत येत आहे.

**मा.शैलजा मोरे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.राहूल कलाटे-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याच्यामध्ये दुरुस्त्या काय आहेत त्या सभागृहाला कळाव्यात.

**मा.सुनिता तापकीर-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागातर्फे राबविण्यात येणा-या योजनाच्या सुधारीत मागासवर्गीय कल्याणकारी योजनेची मी आपणास माहिती देते. प्रपत्र अ,ब,क,ड मध्ये दिलेले आहे ते वाचून दाखविते.....

**मा.महापौर-** हे प्रपत्र सगळयांना दिलेले आहेत. हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.माधवी राजापुरे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ७० विषय क्रमांक – १३
दिनांक – १९/८/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
जा.क्र.नवियो/०६/कावि/७९६/२०१७ दि.०९/०८/२०१७

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत राबविण्यात येणा-या इतर कल्याणकारी योजने अंतर्गत इयता १ली ते पदव्युत्तर पर्यंत शिक्षण

घेणा-या महापालिका हद्दीतील अनाथ / निराधार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे. तसेच एच.आय.व्ही./एड्स बाधित मुलांचा सांभाळ करणा-या पालकांना / संस्थाना अर्थसहाय्य देणे. या दोन योजना कार्यन्वित आहेत. या दोन योजने मध्ये काही दुरुस्त्या करणे आवश्यक असल्याने या बाबत सुधारित योजना, प्रस्ताव तयार करणेत आला आहे. तरी प्रस्तावा सोबतचे **प्रपत्र 'अ'** आणि **प्रपत्र 'ब'** नुसार या दोन सुधारित योजनाना मान्यता देणेत येत आहे.

**मा.सीमा चौगूले -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.निता पाडाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. यामध्ये ज्या अटि शर्ती आहेत त्यात शेवटची जी अट आहे अभ्यासक्रम सुरु झाल्यानंतर बोनाफाईड प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. मा.आयुक्त साहेब, माझ्या वॉर्डामधले काही विदयार्थी आहेत जर्मनीमध्ये ते अभ्यासक्रमासाठी गेले आहेत. परंतु फॉर्म भरताना बोनाफाईड त्या विदयापीठाच मागीतल गेल आहे. तरी त्या विदयापीठान सांगीतल की असल्या काही प्रकारच आमच्याकडे नाही. तुम्हांला ऍडमीशन घेण्यासाठी जे डॉक्यूमेंटेशन आहे तेवढेच फक्त मग अशावेळेस काय करायच.

**मा.महापौर -** मी मा.आयुक्तांना निर्देश देतो की हे सर्व तपासून त्याचे निर्णय घ्यावे.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ज्यावेळेला आपण कागदपत्र सबमीट करतो आणि बोनाफाईड मागीतल जात. जी योजना आहे त्या योजनेच्या संदर्भात एखादया जर कागदपत्रामध्ये कुठेतरी थोडाफार फरक झालातरी सुध्दा आपल्या येथे अनुदान दिल जात नाही. आता वि.क्र.१२,१३,१४ हे तीन्ही विषय सारखेच आहेत. या विषयाला विरोध नाही, वाढ केली त्यात त्याबद्दलही दुमत नाही. आज आयुक्त साहेब फाईल तुमच्याकडेच आहे अस आम्हांला कळालं. काही ठिकाणी वाढ करणार आहेत परंतु अजुन पुर्तत्वात आलेल नाही. आज परत फॉर्म सोडलेले आहेत. मागील वर्षाच सगळ वाटप झाल का. दहावी बारावीचे विदयार्थी आहेत त्यांना आजपर्यंत चेक वाटप चालू आहे. मी आष्टीकर साहेबांना मागच्या महीन्यात सुध्दा फोन केला की या या मुलाला दहावी बारावीचा चेक मिळाला नाही. पालकांचा गैरसमज होतो. योजना ही कागदावरच राहणार आहे का. काही लोकांच काही कारण नसताना अपात्र केलेल आहे. दहावी बारावीमध्ये इतके इतके टक्के मार्क मिळाली की त्यांना मिळाल पाहीजे. परंतु एखाद त्यामध्ये कागदपत्र अपुर्ण असेलतर आपल्या लोकांनी त्या फॉर्मवरच्या ईमेलवर किंवा फोन नंबरवर कळवल पाहीजे. आज अशी परिस्थिती आहे की मागच्या ज्या योजना आहेत त्या योजनांच आजपर्यंत नागरीकांना बेनीफिट मिळाल का. आता याठिकाणी दिलेल आहे एड्सबाधीत लोकांना सुध्दा आमच काहीही म्हणण नाही, बीचारे गरीब असतील काही झोपडपट्टीतील असतील, कोणीही असूदेत त्यांना सुध्दा ही सेवा दया. त्याबद्दल आमच दुमत नाही. मागचे फॉर्म वाटलेले आहेत त्या संस्थानी जर कागदपत्राची पुर्तता केलेली असेलतर तुम्ही ज्या ज्या गोष्टी दिलेले आहेत त्या लोकांना देणे गरजेचे आहे. सायकलीमध्ये

सुध्दा असच झालेल आहे मागच्याच जुन्या सायकली आहेत, काही दिवसापुर्वी आणलेल्या त्या सायकली आहेत आणि त्या जर गंजल्या असतील त्याचे काही पार्टस खराब झाले असतीलतर त्या सायकलीची दुरुस्ती झाली पाहीजे. शेवटी काय होत आपण दिलेली वस्तु ते लोक बाहेर जाऊन विक्री करतात. मग आपल्याला पण दु:ख होत किंवा एखादा विक्री करताना सापडलातर तो काय म्हणणार मला या गोष्टीचा उपयोगच नाही मग मी ती भंगार मध्ये देईल नाहीतर काहीही करीन. मध्ये पेपरला येत होत की सायकल वाटप, या सगळया गोष्टीमध्ये सायकलचे काही पार्ट खराब पण झाले आहेत वर्षे दिड वर्षापुवीच्या त्या गोष्टी आहेत. तुम्ही त्यांना ते दुरुस्ती करुन दया हे बघीतल पाहीजे. स्पोर्टसमध्ये एक मुलगी तायक्वोंदोसाठी जाणार होती त्या मलीला ७२ हजार रुपये दिले गेले. ती मुलगी नॅशनल खेळासाठी जाणार होती. मी ते दिले त्यासाठी आभार मानते, म्हणजे क्रिडा समितीने विषय केला, स्थायी समितीने विषय केला. त्या मुलीला जायच्या अगोदर चेक मिळाला त्या बद्दल आम्ही आभारी आहोत परंतु तीला खर्च ९५ हजार रु. येणार होता व दिले ७२ हजार. इतक्या गरीब घरातली मुलगी होती की तीच्या वडीलाकडे बघीतलतर अक्षरश: दु:ख वाटत होतं. म्हणताताना "जिथ पिकतं, तीथं विकत नाही" किंवा "जिथं दात आहेत, तिथं चणे नाहीत" तशी अक्षरश: परिस्थिती होती. त्या माणसान आम्हांला येवून सांगीतल की सिमाताईनी सुध्दा सांगीतल की अरे, तुम्ही संपुर्ण पैसे दया तीला. पण आपल्याकडच्या अधिका-यांनी तसं केल नाही. तीला ७२ हजाराचा चेक दिला. मग त्या योजनेचे पैसे आपल्याकडे तसेच पडून असतात. त्या मुलीला तीचा संपुर्ण खर्च जर दिला असतातर, एका गरीब घरातील मुलगी इन्टरनॅशनल लेव्हलला खेळण्यासाठी ती जाणार आहे. तरी या दुरुस्त्या कुठेतरी झाल्या पाहीजेत. आपल्या अधिका-यांना सूचना केल्या गेल्या पाहीजेत. ७२ हजार दिले २३ हजाराचाच प्रश्न होता. ९५ हजारचा खर्च होता तो दिला असतातर काय झाले असते. काही पालकांकडे २५ टक्के रक्कम भरण्या इतके पण पैसे नाहीत अशी परिस्थिती आहे आणि ते त्यांच्या चेह-यावरुन सुध्दा दिसतं की खरच त्यांची परिस्थिती तशी नाही मग याच्यामध्ये पण दुरुस्ती केली गेली पाहीजे. आज आपण म्हणतो की खेळाडू तयार झाले पाहीजेत. खेळाडू कसे तयार होणार, तयार होणारच नाहीत. त्या माणसाने १५ हजार रुपये व्याजाने काढले. शेवटी आम्ही काही लोकांनी त्यांना मदत केली आणि उरलेले पैसे देण्याचा बंदोबस्त केला. आपल्याकडे क्रिडा धोरणामध्ये जर पैसे देत असूतर पुर्ण पैसे दिले गेले पाहीजे होते. अधिका-यांना सूचना दिल्या गेल्या पाहीजेत की हे पैसे दिले पाहीजेत. आपण जर त्यांचे अर्ज घेतो त्या पध्दतीने त्यांना जर क्रिडा शिष्यवृत्ती देणार असूतर पुर्णपणे दिले पाहीजे. आणि त्यातल्या काही योजना बंद करायच्या असतीलतर फॉर्म काढू नका बंद करा. कडूस्कर साहेबतर कधीच मिटींगला नसतात. फोन उचलत नाहीत, ही कुठली पध्दत. जर ते मिटींगला येणार नसतीलतर त्यांनी क्रिडा चेअरमनला, क्रिडा समितीला तशी कल्पना दिली पाहीजे की मी मिटींगला येवू शकणार नाही. तसं त्यांनी संबंधित माणसाला सांगीतल पाहीजे. फोन केलातर

उचलत  नाहीत, त्याचा रिप्लाय देत नाहीत. आयुक्त साहेब तुम्हांला आम्ही फोन केलातर तुम्ही मिसकॉल बघुन फोन करतात किंवा मॅसेज टाकतात मी आता मिटींगमध्ये आहे तुम्हांला नंतर फोन करेल. एवढी काम कडुस्कर यांच्याकडे असतीलतर त्यांच्या कामाचा लोड कमी करा. त्यांना क्रिडा विभाग नकोतर त्यांनी घेवू नये. मिटींगला सभागृह मिळत नाही का. मिटींगला सभागृह मिळत नाहीतर विषय कसे होणार. अक्षरश: तळमळीन त्या दिवशी सभासद बोलत होते तरी मिटींगसाठी सभागृह सुध्दा मिळाल नाही. हे एवढे एंग आहे मी खुप चांगल काम करतो, चांगल्या पध्दतीन काम करतो. यात सुध्दा महीला व बालकल्याणच्या सगळया योजना आहेत. आता तापकीरताई सुध्दा सगळया पध्दतीचा खुलासा करत होत्या. शुल्लक कागदासाठी त्या माणसाला जर महीनोनमहीने फिराव लागत असेलतर ते बरोबर नाही. त्या महीला व बालकल्याण विभागामध्ये तीन चार लोक आहेत त्यांच्या बदल्या करा तेथे चांगला नवीन स्टाफ टाका. त्यांना वाटतय की आम्ही आमच्या पगारातून पैसे देतो की काय अशी परिस्थिती त्या महीला बालकल्याण विभागामध्ये आहे. कोणीही तेथे व्यवस्थित माहीती देणार नाही कोणीही तेथे नागरीक आलेतर त्यांना अटेंड करणार नाही. दहावी बारावीचे चेक आतापर्यंत चाललेत. आष्टेकर साहेब म्हणाले ताई तुम्ही काळजी करु नका मी तो बरोबर काढून देतो. त्यांनी ते काम केलं पण आष्टेकर साहेबांना सांगण्यापेक्षा आदि का त्या लोकांना पत्र गेल नाही हे पण बघीतल पाहीजे. वि.क्र. १२,१३,१४ हे सगळे विषय त्याच्यात आहेत. अधिका-यांना सुचना कराव्यात जर फॉर्म काढले असतीलतर, एखादा कागदपत्र त्याच्यात कमी असेलतर त्या नागरीकांना कळवल गेलं पाहीजे. त्यांचे ई-मेल आहेत, फोन नंबर आहेत. तेवढ कराव आणि त्या पध्दतीने नियोजन करावं. एवढीच अपेक्षा आहे, धन्यवाद.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरतर आता नागरवस्ती विभागाचे विषय मग त्याच्यामध्ये मागासवर्गीयांच्या योजना असतील, महीला बालकल्याणच्या योजना असतील, मला वाटतय आमच्या १२८ अधिक ५ या सगळयाच नगरसेवकांच्या अत्यंत जिव्हाळयाचा विषय आहे. का तर आम्ही काहीतरी नागरीकांच्या घरापर्यंत या योजना पुरवतो किंवा पोहचवतो. मागच्या पाच वर्षात आष्टेकर साहेबांना नागरवस्तीच विचारलतर मला वाटतय शहरामधले शंभर चेक पैकी पंचवीस ते तीस चेक माझ्या वॉर्डातले असतात आणि शंभर टक्के पाठपुरावा करुन ते चेक काढले जातात. आता काही सदस्यांनी सभागृहात सांगीतल की असं होत, तसं होत, तसं होतं. आपण एखादी योजना लागू करतो त्यात अटि–शर्ती टाकतो, अटि–शर्तीचा अर्थच असा आहे की त्या समोरच्या व्यक्तीने कागदपत्र घेवून आले पाहीजे. आष्टेकर साहेब तेथे बसले असतीलतरी माझ्या शहरवासीयांना काय लागतं, त्यांना समस्या काय येतात याचा विचार करुन आपण त्याच्यामध्ये दुरुस्त्या केल्या आणि मग त्यांनी त्याच्यावर प्रशासन म्हणून योग्य ती कार्यवाही केली. परंतु योजना आहेत कागदपत्र देणं लागतो. एखादा कागद नसला असलातरी हरकत

नाही. मा.महापौर साहेब मी अनेक वेळा पाहील की नागरीक रेशनकार्ड जोडतात आणि त्या रेशनकार्डवरती उत्पन्नच लिहीलेल नसतं. मग अशा वेळेला मी माझ्या अधिका-याला प्रेशर करुन ती योजना, तो चेक काढणे शक्य नाही कारण मला माहिती आहे उदया ज्यावेळेस ऑडीटमध्ये विषय निघतो त्यावेळेस माझा अधिकारी आडचणीत येतो त्यामुळे सर्व नगरसेवकांना विनंती आहे की जे जे नगरसेवक आपल्या प्रभागामध्ये ज्या ज्या वेळेला योजना राबवतात त्या त्या वेळेला अत्यंत कार्यक्षम पध्दतीने योजना राबवा. कारण थेट आपण नागरीकांच्या घरापर्यंत पोहचतो. परंतु ते करत असताना आपल्या ऑफिसमध्येच फॉर्म चेक झाला पाहीजे आणि तेथून तो सीएफसी केंद्रावर गेला पाहीजे. येथून मागची पध्दत अशी होती की येथून फॉर्म आपण उचलतो आणि सीएफसी केंद्रावर देतो. २० रु. हा काही फार मोठा भाग नाही. परंतु सीएफसी केंद्रात देण्याची पध्दत पाडली. त्यांना सुध्दा उत्पन्न मिळाल पाहीजे म्हणून सीएफसी केंद्र चालू असतात. त्या सीएफसी केंद्रामध्ये प्रॉपर्ली फॉर्म दिले जात नाहीत. माझ्याकडे त्या व्यक्तीने फॉर्म भरल्याची पावती आहे पण फॉर्म पोहचलेच नाहीत सांगतात. अशावेळेला आम्ही पुन्हा फॉर्म जमा करतो, आणि ते भरुन घेतो थोडासा नागरीकांना त्रास देतो परंतु तो चेक ती योजना किंवा तो फॉर्म त्यांच्या घरापर्यंत पोहचविण्याची व्यवस्था केली जाते. त्यामुळे आपण ज्याप्रमाणे सीएफसीला चुकीचा पायंडा पाडला आहे त्यांची घर, पुन्हा जे कार्यकर्ते एक्स, वाय, झेड असतील त्यांना जपण्याची जी प्रक्रीया केली आहे ती कुठेतरी थांबविण्याचा प्रायत्न केला पाहीजे. यावर्षी आपल्याला ती चालु ठेवावी लागेल परंतु येथून पुढे मात्र आपल्याला योग्य तो विचार करावा लागेल. हेच नागरीकाने आपल्या महापालिकेत आणून दिलेतर आपल्या अधिका-याना चेकलीस्ट करता येते. आता एक्स वाय झेड कोणतरी सीएफसी केंद्राचा कर्मचारी असतो कोणीही मालक तेथे बसत नाही त्यांचा कर्मचारी असतो. त्यांच्या हाताखालची माणस तेथे बसतात. फॉर्म गहाळ झाल्यानंतर जबाबदार कोणाला धरायचं. आपला अधिकारी म्हणणार फॉर्म आले नाहीत सीएफसी म्हणणार इथे फॉर्म दिलेंत. मग या सगळयामध्ये त्या फॉर्मची गळती होते. ज्या त्रुटी राहतात त्याच्यावरती कुठेतरी महानगरपालिकेचा आंकुश असणं गरजेच आहे. सीएफसी केंद्रात आपण ज्यावेळेस फॉर्म जमा करतो त्याचवेळी आपण चेकलीस्ट दिली पाहीजे. त्यांनी खरतर आपल्याला जे कागदपत्र जोडायचे आहेत त्याच्यावर टिक टिक करुन दिलं पाहीजेत. म्हणजे हा कागद तुम्ही दिला तो दिला नाही. महानगरपालिका आमच्या नगरसेवका मधला जो दुवा आहे तो सीएफसी आहे. एकतर त्यांना आपण चांगल काम करण्याचे आदेश दयावेत. अन्यत: त्यांच्यावरती आपण योग्य तो विचार करावा. आज महीला व बालकल्याण समितीच्या अध्यक्षा तापकीरताईंच मनापासून कौतूक करते. ज्या गोरगरीब नागरीकांच्यासाठी आपण योजना राबवतो त्याच्यामध्ये त्यांनी केलेली योग्य प्रकारची वाढ असेल, नागरीकांना योग्य प्रकारचे मानधन शिष्यवृत्तीच्या पध्दतीने असेल, योजनेच्या माध्यमातून असेल त्यात त्यांनी वाढ केली त्याबद्दल महीला व

बालकल्याण समितीच मनापासून अभिनंदन. मगाशी विषय झाला की आपल्याकडून एका मुलीला ती नॅशनल लेव्हला खेळण्यासाठी गेली तीला आपण ७५ हजार रु. दिले. ख-या अर्थाने क्रिडा समितीचे अध्यक्ष किंवा स्थायीच्या सिमाताई असतील या सगळयांच मनापासून कौतूक. ती तीन ते चार दिवसामध्ये फिची फास्ट प्रोसेस केली. करण सामान्य गरीब नागरीकांची कुठेतरी कळकळ नुसती बोलण्यात नाहीतर ती कृतीत असते आणि म्हणून मला मा.लक्ष्मण सस्ते असतील, सिमाताई तुम्ही फास्ट प्रोसेस केली मनातून कळकळ होती की त्या व्यक्तीला पैशाची गरज आहे. ज्या रक्कमेची गरज आहे ती रक्कम दिली गेली पाहीजे. परंतु पुन्हा क्रिडाधोरण आलं. पुर्वीपासून जे क्रिडा धोरण तयार केलं, म्हणजे नुसत म्हणणं फार सोप आहे. क्रिडाधोरणामध्ये अट आहे की ज्या नागरीकांची जी काही मागणी असेल एक लाखाची मागणी असेलतर पंच्याहत्तर टक्के अमौंट दिली गेली पाहीजे. ही क्रिडा धोरणातली अट असल्या कारणाने त्या संबंधित अधिका-याला त्या पध्दतीने चेक काढायला लागला. आणि म्हणून आपण त्याना ७२ हजार रुपये दिले. त्यांना निश्चितपणे एक लाख दिले गेल पाहीजेत नागरीकांच्याच सेवेसाठी आपण आहोत त्यांच्या पैशावरतीच आपली महानगरपालिका रण होते. परंतु जर धोरणात तसे केले असेलतर दुर्दैवाने आम्हांला त्याप्रमाणे अंमलबजावणी करावी लागते. येथून पुढच्या काळामध्ये आपल्याला जे योग्य बदल करावे वाटतील ते निश्चितपणे करु, धन्यवाद.

**मा.राहूल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. निश्चितच या सर्व कल्याणकारी योजना राबवत असताना आपण ज्या दुरुस्त्या सुचवल्या कुठे एक लाखाचे दिड लाख कुठे दोनचे चार हे ज्यांना खरच गरज आहे अशा लोकांना आपण ही मदत करतो. निश्चितच हे पैसे तुमच्या आमच्या खिशातले नसून शहरातल्या सर्व नागरीकांचे आहेत, शासनाचे आहेत. त्यामुळे या पैशा मुळे जर या गोरगरीबांना मदत होत असेलतर, आताच शेंडगेताईनी सांगीतल की सिमाताईनी लगेच पैसे दयायला लावले. ज्या माणसाला बाहेर जायच आहे त्या माणसाला त्याची कळकळ असते. ती वेळ निघून गेल्यानंतर त्यालाही नंतर कोणी विचारत नाही. मा.आयुक्त साहेब मला याठिकाणी एक गोष्ट नमुद करायची आहे. शहरातील सर्व गरीब मग ते कुठल्याही जाती-धर्माचे असू ज्याला खरच गरज असेल त्याला जर आपल सभागृह मदत करु शकलेतर निश्चितच या देशात ब्रेंचमार्क होईल, या राज्यात ब्रेंचमार्क होईल आपण त्यादृष्टिकोनातून देखील विचार करावा. हे करत असताना मी पुन्हा एकदा सांगतो की मागासवर्गीय किंवा दुस-या कोणाला देण्यास कोणाचाही विरोध नाही. गरीब कुठल्याही जाती धर्माचा असलातरी त्यालाही आपल्या महापालिकेची मदत होईल, धन्यवाद.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आमच म्हणण हेच आहे की खाली कागदपत्र गहाळ झाली, सीएफसीकडे कागदपत्र दिलेतर ते कागद गहाळ झाले तर आपल्या लोकांनी त्यांना सांगीतल पाहीजे. आमचही म्हणणं हेच आहे आणि जर मागच्या

सभागृहाने काही तात्वीक मुद्दे मांडले असतील त्यांना त्यावेळेला ते योग्य वाटले असतील म्हणून त्यांनी केलं. तुम्ही त्यात दुरुस्त्या करु शकतात, आज सहा महीने होवुन गेले, तुम्हांला जर बदल करायचा असेलतर करानां. मागच, मागच, मागच कितीवेळा काढणार मागच. इच्छा असेलतर मार्ग नक्कीच निघतो. ईच्छेप्रमाणे, मार्गाप्रमाणे काम करा. मागे असे झाल म्हणून आता असं झाल, मागे तसं झाल म्हणुन आता असं झाल हे म्हणण्यापेक्षा दुरुस्ती करा. बजेटमध्ये जर व्यवस्थित केल असतंतर आता विषय आला नसता. आणि म्हणून मागच्यानी काय केल आहे हे सांगत बसण्यापेक्षा तुम्ही दुरुस्त्या करानां. तुम्हांला कोणी दुरुस्त्या करायला नको म्हणलय का.

**मा.महापौर-** ठिक आहे, आयुक्तांनी याच्यामध्ये दुरुस्ती करावी असे निर्देश देण्यात येत आहे.

**मा.राहूल जाधव -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. गोरगरीबांच्या हिताचा आणि चांगला प्रश्न आज सभागृहामध्ये आलेला आहे. परंतु हा विषय आपण आणताना संबंधित नागरवस्ती विकास योजना हा जो विभाग आहे या विभागाला मा.महापौर साहेब, आपण आदेश दयावेत. आपण हा विषय सभागृहामध्ये आणला या विषयावर सदस्य पोटतीडकीने बोललेले आहेत. कारण की हा असा विभाग आहे की ज्या विभागामुळे नगरसदस्य किंवा जे कार्यकर्ते असतात ते अगदी घरापर्यंत पोहचतात असा हा विषय आहे. परंतु या विषयाच्या योजनेचा लाभ सर्वसामान्य नागरीकांना मिळाला पाहीजे. मा.महापौर साहेब, आज तुम्हांला एक गोष्ट मी आवर्जून या सभागहामध्ये सांगतो आज जरी आपण या विषयाचा जरी खुलासा मागत नसलोतरी ५० टक्के अनुदानाचे चेक हे नागरवस्ती विकास योजनेमध्ये पेन्डीग आहेत. आष्टीकर साहेबांचा खुलासा घेण्यापेक्षा ऐवले साहेबांच्या कडून खुलासा घ्या संपुर्ण माहिती तुम्हांला याठिकाणी मिळेल. आपण तरी दुस-यांदा निवडून आलेलो आहोत पण नवीन सदस्य गेलेनां तर अजीबात या विभागात किमंत मिळत नाही. ज्यावेळी आम्ही नवीन नगरसेवक झालो त्यावेळेस जगताप साहेब त्याठिकाणी होते. जगताप साहेबांचे त्यावेळेसचे वाक्य आहेत की जर तुम्ही या विभागाला धरुन राहीलाततर तुम्ही पुन्हा पुन्हा निवडून याल. तरी आपण त्याठिकाणच्या संबंधित अधिका-यांना आदेश दयावेत की त्या ठिकाणी जे जे अनुदान मिळतय ते अनुदान सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचल पाहीजे, धन्यवाद.

**मा.एकनाथ पवार-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. महिला बालकल्याण समितीच्या या विषयावर खरंच खुप गांभीर्याने चर्चा झाली मला खुप आनंदही झाला. पण त्याहीपेक्षा काही प्रेक्षक या सभागृहाच्या अवतीभोवती बसलेत. मला अस वाटतय की ज्यावेळेस मंगलाताई दोनदोन वेळा बोलायला लागल्या पुन्हा एकदा रिंगरोडची चर्चा बारगळते की काय. त्या रोडच्या चर्चेसाठी आम्ही सगळेजण येथे बसलो आहोत. ताई तुम्ही माझा एखादा सदस्य बोलायला लागला की तुम्हांला आनंद वाटतो, राहूलदादांनी सांगीतल, खरय. पंधरा,वीस,पंचवीस वर्षामध्ये जी, पुन्हा पुन्हा तुम्ही म्हणताय की सहा महीने झाल तुम्ही काय करता. सहा

महीन्यामध्ये आम्ही चांगलच काम करण्याचा प्रयत्न करतो. ज्या पध्दतीने ज्या अधिका-यांना एवढे वर्षानुवर्ष तुम्ही पाठीशी घातल त्यांना वटणीवर आणायच म्हणलतर शंभर टक्के थोडासा वेळ जाणारच. ते जर नाही वाटणीवर आलेतर, आयुक्त साहेबांना त्या पध्दतीने आम्ही सांगीतल आहे जे अधिकारी प्रमाणिकपणाने काम करतील त्या अधिका-यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील पाहीजे आणि जे अधिकारी चुकीच्या पध्दतीने वागतील त्यांना वटणीवर आणायच सुध्दा काम केल पाहीजे. मला वाटत की तुम्ही खुप लाड केलेत, काही अधिका-यांचे. या निमीत्तान मी एवढच सांगेल की महीला बाल कल्याण समिती खुप चांगल्या पध्दतीने काम करतेय. महीलांसाठी कळकळ आहे. या शहरामधल्या गोरगरीब, दलीत, समाजातील वंचितासाठी प्रमाणीकपणे काम करतेय. मनापासून राहूलदादा सांगत होते की महीला बालकल्याण समितीच्या माध्यमातून नगरसेवक चांगल काम करतील, अधिकारी चांगल काम करतील. योगेशभाई तुम्हीतर पस्तीस वर्षापासून नगरसेवक आहेत. मला वाटत की या सभागृहामध्ये आमचे सगळे नगरसेवक चांगल काम करण्याचा प्रयत्न करत आहेत. मा.महापौरांना विनंती करतो की हा विषय मंजूर करावा.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.स्विनल म्हेत्रे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ७१ विषय क्रमांक – १४

दिनांक – १९/८/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
जा.क्र.नवियो/०६/कावि/७९७/२०१७ दि.०९/०८/२०१७

नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. इतर कल्याणकारी योजने अंतर्गत एच.आय.व्ही./ एड्स बाधित व्यक्तींसाठी पी.एम.पी.एम.एल. बस चे पासेस मोफत देणेकामी नवीन कल्याणकारी योजना राबविणेत यावी अशी महाराष्ट्र स्टेट एड्स कंट्रोल सोसायटी, महाराष्ट्र शासन मुंबई यांचे कडून लेखी मागणी करणेत आली आहे. यास अनुसरून एच.आय.व्ही./ एड्स बाधित व्यक्तींसाठी पी.एम.पी.एम.एल. बस चे पासेस मोफत देणेकामी नवीन कल्याणकारी योजना सुरू करणेकामी प्रस्तावा सोबतचे प्रपत्र “क” नुसार या योजनेला मान्यता देणेत येत आहे.

**मा.आश्विनी जाधव –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.वैशाली काळभोर –** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- मला एकच विनंती करायची आहे की, शहरातील सर्व आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील जे काही ओपन कॅटेगरीतील मुल आहेत त्या सर्व मुलांना संधी दयावी. कारण या मागासवर्गीय निधीला काहीही धक्का न लागता यांना हा निधी उपलब्ध करुन दयावा. त्याच्यासाठी आपल्याला जरी एक हेड ओपन कराव लागलतरी काही हरकत नाही.

**मा.अनुराधा गोफणे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देते.

**मा.सुनिता तापकीर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. महिला बालकल्याण समिती आणि नागरवस्ती विकास योजना हे खरतर तळागाळा पर्यंत पोहचण्याच एक साधन आहे. नगरसदस्य आणि नगरसदस्यांमधला हा एक दुवा आहे. मी आमच्या पहील्या मिटींगमध्येच सांगत आलेली आहे की या योजनांची माहिती तळागाळापर्यंत पोहचत नाही. त्याची जाहीरात ही कमी प्रमाणात होते. तरी मी आपल्याला विनंती करते की याची जाहीरात ही मोठयाप्रमाणात व्हावी. जेणेकरुन हा निधी पुर्णपणे वापरला जाईल. दुसरे म्हणजे मी आयुक्त साहेबांना एक पत्र दिलेल होतं की नागरवस्ती विभागामध्ये समुहसंघटक आणि कर्मचारी कमी आहेत त्याची नोंद घ्यावी आणि नागरवस्ती विभागामध्ये श्री.जगदाळे अधिकारी आहेत त्यांच्याकडे कामगार कल्याण विभाग आणि नागरवस्ती विभाग हे दोन विभाग त्यांच्याकडे आहेत त्यांना त्या कामाचा त्रास होतो. त्यामुळे त्यांच्याकडे नागरवस्ती हा एकच विभाग ठेवावा ही विनंती, धन्यवाद.

**मा.महापौर-** लेखी उपसूचना दिलेली नाही त्यामुळे मुळ विषय क्रमांक १४ मंजूर करणेत येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.करुणा चिंचवडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – १५

दिनांक – १९/८/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
जा.क्र.नवियो/९/कावि/१२३/२०१७ दि.१०/०८/२०१७

शासन निर्णय क्र.एनयुएल.२०१४/प्र.क्र.१०४/नवि-३३, दि.२८ ऑगस्ट २०१४ अन्वये राज्यातील ५३ शहरामध्ये दिअयो-राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाची अंमलबजावणी करणेत येत आहे. सदर अभियानामध्ये शहरी बेघरांना निवारा हा एक घटक आहे. तसेच शासन नगरविकास निर्णय क्र.संकिर्ण २०१०/प्र.क्र.४५/नवि-२०, दि.१४ जुलै २०११ अन्वये रात्रनिवारा कार्यान्वित करणे व त्यांचे संचलन व देखभाल विषयी मार्गदर्शक तत्वे निश्चित करणेत आलेली आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिक्षेत्रामध्ये दि.१०/३/२०१७ रोजी प्रभागनिहाय शहरी बेघरांचे सर्वेक्षण केले असता १०५ बेघर आढळून आलेले आहेत. त्यासाठी पिंपरी भाजीमंडई येथील महापालिकेमार्फत चालविण्यात येत असलेला रात्रनिवारा हा नूतनीकरण करून वरील १०५ बेघरांना निवा-याची सुविधा उपलब्ध करून देणेबाबत प्रस्ताव तयार केला आहे. सदर प्रस्तावामध्ये स्थापत्य व विद्युतविषयक सर्व आवश्यक काम करणे, सुरक्षेसाठी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे इ. बाबींचा समावेश आहे. याकरिता एकूण खर्च र.रु.५०,२७,९७५/- इतका अंदाजित खर्च अपेक्षित आहे. सदरील खर्च हा केंद्रशासन पुरस्कृत दिअयो-राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अंतर्गत शहरी बेघरांना निवारा या उपांगाअंतर्गत करणेत येणार आहे. सदरचा प्रस्ताव मा.आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांचे अंतिम मान्यतेसाठी पाठविणेकामी मान्यता देणेत येत आहे.

**मा.सारीका सस्ते -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.उषा ढोरे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- सांगवी वॉर्ड क्रं.३२ मधील मधुबन सोसायटी मधील छत्रपती शिवाजी महाराज उदयानामध्ये रात्रीचे वेळी गैरप्रकार होऊ नये म्हणून हया उदयानात ठिकठिकाणी CCTV कॅमेरे बसविणेत यावेत. सदर कामासाठी अंदाजे र.रु. ५०,००,०००/- खर्च अपेक्षित असुन सदर कामासाठी विदयुत विभागामार्फत आवश्यक तरतूद वर्गीकरण करणेस आणि सदर खर्चास व कामास प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

**मा.हर्षल ढोरे –** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.राहूल जाधव-** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- प्रभाग क्र. १२ तळवडे हा भाग दाट नागरी लोकवस्तीचा भाग आहे. सदर भागामध्ये अनेक कष्टकरी कामगार रहात आहेत. आपली महानगरपालिका ही देशामध्ये नागरी सुख सुविधा देणेबाबत अग्रणी गणली जाते. तसा नाव

लौकीक म.न.पा.ने मिळवलेला आहे. आज मनपामध्ये मोठमोठे प्रकल्प आहेत. अनेक प्रकल्प प्रस्तावित आहेत. त्या अनुषंगानेच सर्व नागरीक हे मनपाचे करदाते असलेमुळे, नागरीकांना अत्यावश्यक नागरी सुविधा मनपास बंधनकारक आहे. त्यामध्ये रस्ते, फुटपाथ, ड्रेनेज, पाणीपुरवठा, स्मशानभुमी व इतर नागरीकांच्या जीवनाशी निगडीत दैनंदिन गोष्टींचा समावेश आहे. प्रभाग क्रमांक १२ हा रेड झोनहद्दी मध्ये येत आहे. जरी आमचा प्रभाग रेड झोनमध्ये असलातरी सुध्दा त्या भागात अत्यावश्यक नागरी सुविधा करदाते नागरीकांना देणे अत्यावश्यक व मनपास बंधनकारक आहे. तसेच तळवडे येथील स्मशानभुमी अस्थी विसर्जन घाट या नागरी सुविधा पुरविणेस मान्यता देणेत यावी. याप्रमाणे प्रभाग क्र. १२ मधील वरील सर्व नागरी सुविधेची कामे करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.राजेंद्र लांडगे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेला मी अनुमोदन देतो.

**मा.करुणा चिंचवडे -** मा.महापौर साहेब, दोन्ही उपसूचना स्विकारल्या आहेत.

**मा.वैशाली घोडेकर –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हे जे नाईट शेल्टर आहे याला ५० लाखाचा खर्च करणार. त्याच्यामध्ये १०५ जण तुम्ही बेघर शाबीत केली आहेत. या बेघराच्या संख्येवर काही लिमीटेशन्स ठेवणार आहात की नाही. आपण यांना फॅसिलीटी देत जाणार आणि बाहेरच्या शहरातला लोंढा हा आपल्या शहरात जास्त येत जाणार. तरी याच्यावर कोणते लिमीटेशन असणार आहेत का. आणि याच्यावर कोणत्या अटी, शर्ती तुम्ही ठेवणार आहात का. की याच लोकांना ते युज करायला दिले जातील. किंवा यामध्ये कोणत्या प्रकारच्या फॉसिलीटीज त्यांना दिल्या जाणार आहेत. आजजर १०५ हा आकडा डोळयासमोर ठेवलातर एका माणसाला ५० हजार रु. खर्च येतो. मग ती दुरुस्ती असेल, पुढे मेन्टेनन्स असेलतर या १०५ चे उदया २०५ होतील, ५०० होतील, ६०० होतील त्याबाबतीत आपण काय तरतूद ठेवलेली आहे. हे नाईट सेंटर आपण देणं योग्य आहे का. याच्यावर मा.आयुक्त साहेबांनी माहिती दयावी एवढीच मा.महापौरांना विनंती करते, धन्यवाद.

**मा.पंकज भालेकर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आताच आमचे सन्मा.नगरसेवक राहूलदादा जाधव यांनी याठिकाणी उपसूचना मांडलेली आहे. आपल्या शहरात संपुर्ण भागात रेडझोनचा जो ऐरीया येतो त्याठिकाणी अत्यावश्यक सेवा सुविधा देण्याबाबतची उपसूचना मांडली ती मंजूर करावी. आमचा प्र.क्र. १२ असेल, निगडीचा काही भाग असेल. भोसरीचा, दिघीचा काही भाग असेल हा ब-याच प्रमाणात रेडझोनच्या हद्दीमध्ये येतो. आमचा प्र.क्र.१२ हा संपुर्ण रेडझोनमध्ये येत असल्याने त्याठिकाणी नागरी सुविधा देण्याकरिता काही अडचणी येतात. काही अधिका-यांकडून सांगण्यात येत की सुविधा देण्यासाठी रेडझोनची अडचण आहे. पण आमच्या भागाला गेली वीस वर्षे झाले, १९९७ साली आम्ही महानगरपालिकेमध्ये आलो पण वीस वर्षात अत्यावश्यक सेवासुविधेचा वणवा आहे. साधे रस्ते,

ड्रेनेज करण्यासाठी सुध्दा आम्हांला अडचणी येतात. आज स्मशानभूमीचा प्रश्न असेल ज्या अत्यावश्यक सोईसुविधामध्ये प्रश्न येतात त्याच्यामध्ये अडचणी निर्माण होतात. आमच्याकडे एवढी दाट नागरीवस्ती आसल्यामुळे सर्व नागरीकांना सोईसुविधा देणं बंधनकारक आहे. मा.आदरणीय महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब आपण याच्यामध्ये लक्ष घालून अधिका-यांना तशा सुचना देवून या उपसूना मंजूर कराव्यात.

**मा.महापौर-** मा.आयुक्तांना असे निर्देश देण्यात येत आहेत की या विषयी सर्व माहिती देण्यात यावी.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, १०५ कुठून आकडा काढला. पिंपरीच्या पुलाखाली जा किती तुम्हांला दिसतील ते बघा. पिंपरीच्या पुलाखाली लोकांनी संसार थाटलेले आहेत.

**मा.महापालिका आयुक्त –** सन्मा.महापौर, सन्मा.सभागृह. विषय क्रमांक १५ च्या संदर्भात मला माहिती अशी दयावयाची आहे की हा जो विषय ठेवण्यात आलेला आहे हा केंद्र पुरस्कृत योजना एनयुएलएम याच्या अंतर्गत शहरी बेघरांसाठी निवारा बांधण्याची योजना केंद्र पुरस्कृत आहे त्याच्या अंतर्गत आपल्याकडे जो अस्तित्वातील निवारा आहे त्याची डागडुजी आणि त्याच्या अनुषंगाने हा विषय ठेवलेला आहे. याच्यामध्ये केंद्राकडन आपल्याला निधी मिळणार असून त्याची सुधारणा देखभाल दुरुस्तीसाठी सहकार्य केंद्रशासनाकडून मिळणार आहे. या योजनेमध्ये राज्यस्तरावरील डायरेक्टर ऑफ म्युनिसीपल ऍडमिनिस्ट्रेशन यांच्या माध्यमातून या प्रकल्पाची छाननी करण्यात येते. आज आपल्याकडून या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता देवून पुढील छाननी करुन अंमलबजावणी करणार आहोत. मार्च महीन्यामध्ये बेघरांच सर्वेक्षण त्यावेळेला करण्यात आलेल होतं. त्यावेळेला जो बेघराचा आकडा आढळून आलेला आहे त्या आकडयाच्या अनुषंगाने त्याच नियोजन करण्यात आलेल आहे. सन्मा.नगरसदस्या यांनी यापुर्वी जो प्रश्न विचारला की आपण याच्यावरती काही नियंत्रण ठेवणार आहोत का, याबाबतीत आपण काही कंट्रोल आणणार आहोत का. मला सन्मा.सभागृहाच्या समोर एक बाब मांडायची आहे की शहरीकरणाची प्रक्रीया ही निरंतरपणे चालत असते. त्याच्यामध्ये आज राज्यघटनेनुसार कुठल्याही प्रकारचे बंधन आज आपणतरी घालू शकत नाही. त्यामुळे जर नागरीक या शहरात येत असतीलतर ते स्वत:ची संधी पाहून या शहरामध्ये येत आहेत. कामाच्या शोधात येत असतील, निवा-याच्या शोधात येत असतील. ज्यावेळेला हे नागरीक आपल्या शहरात प्रवेश करतात जर गरीबीमुळे त्यांना तात्काळ कुठलेही रेन्टल किंवा अन्य प्रकारच ऍकोमोडेशन किंवा नातेवाईक कोणी नसतीलतर अशा नागरीकांची गैरसोय होवू नये आणि त्यांची योग्य प्रकारे काळजी घेतली जावी ही संपुर्ण समाजाची आपल्या महानगरपालिकेची जबाबदारी आहे आणि त्याच्या अनुषंगाने एक चांगली योजना म्हणून ही पुरस्कृत योजना आपण घेतलेली आहे.

यापुर्वी महानगरपालिकेच्या माध्यमातून रात्रनिवारे आपण चालवत होतो. त्याच्यात सुधारणा करुन आता दिवसभराचे निवारे ठेवण्याची ही सुचना सुधार करण्यात आलेली आहे. सन्मा.सदस्यांच्या निदर्शनास एक गोष्ट आणायची आहे की, याबाबतीत त्याच संचलन कसं कराव याबाबतीत मात्र आपण काही विचारविमर्ष करु शकतो. एनयुएलएम ही योजना सर्वंकष दारिद्रय निर्मुलनाची योजना असून एखादा व्यक्ति जर निवा-यामध्ये आला तर त्या निवा-यात आलेल्या व्यक्तिला अन्य बाबींचा देखील आपण पुरवठा करतो. त्यांना आपण कौशल्य विकासाच्या संधी देखील उपलब्ध करुन देऊ. कौशल्य विकासाच्या संधीच्या माध्यमातून त्यांना नौक-यांची उपलब्धता किंवा रोजगारांची उपलब्धता देखील या योजनेअंतर्गत अभिप्रेत आहे. आणि त्याच्या माध्यमातून नवीन नागरीकांना किंवा या शहरातील बेघर असलेल्या नागरीकांना ज्या काही पुनर्वसनासाठी आवश्यक मदतीची आवश्यकता असेल ती करण्याची तरतूद या योजनेमध्ये आहे. आणि असे अनेक उपांग या योजनेमध्ये ठेवणेत आलेली आहेत. आताच जो सन्मा.नगरसदस्य यांनी मुद्दा मांडला की निगडीच्या पुलाखाली जर काही बेघर निर्वासीत तेथे राहत असतीलतर त्यांचा देखील निश्चितपणे समावेश, माझ्यामते यात समावेशन झालेल असेल, नसेल तर आपण काही हा आकडा क्लोज केलेला नाही. जर ही संख्या कमी जास्त होत असेलतर त्यांच्या अनुषंगाने आपण भविष्यात अधिक रात्रनिवारे, दिवसनिवा-यांची सोय देखील करु शकतो. आणि तशी तरतूद या योजनेमध्ये आहे. त्यामुळे बेघरांच सर्वेक्षण करत राहणं, त्यांची माहिती घेणं ही निरंतर प्रक्रीया राहणार आहे. आणि त्या पध्दतीन काम करण्याची तजवीज प्रशासनाच्या वतीने ठेवण्यात येत आहे.

यानंतर उपसुचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ७२ विषय क्रमांक – १५

दिनांक – १९/८/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
जा.क्र.नवियो/९/कावि/१२३/२०१७ दि.१०/०८/२०१७

शासन निर्णय क्र.एनयुएल.२०१४/प्र.क्र.१०४/नवि-३३, दि.२८ ऑगस्ट २०१४ अन्वये राज्यातील ५३ शहरामध्ये दिअयो-राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाची अंमलबजावणी करणेत येत आहे. सदर अभियानामध्ये शहरी बेघरांना निवारा हा एक घटक आहे. तसेच शासन नगरविकास निर्णय क्र.संकिर्ण २०१०/प्र.क्र.४५/नवि-२०, दि.१४ जुलै २०११ अन्वये रात्रनिवारा कार्यान्वित करणे व त्यांचे संचलन व देखभाल विषयी मार्गदर्शक तत्वे निश्चित करणेत आलेली आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिक्षेत्रामध्ये दि.१०/३/२०१७ रोजी प्रभागनिहाय शहरी

बेघरांचे सर्वेक्षण केले असता १०५ बेघर आढळून आलेले आहेत. त्यासाठी पिंपरी भाजीमंडई येथील महापालिकेमार्फत चालविण्यात येत असलेला रात्रनिवारा हा नूतनीकरण करून वरील १०५ बेघरांना निवा-याची सुविधा उपलब्ध करून देणेबाबत प्रस्ताव तयार केला आहे. सदर प्रस्तावामध्ये स्थापत्य व विद्युतविषयक सर्व आवश्यक काम करणे, सुरक्षेसाठी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे इ. बाबींचा समावेश आहे. याकरिता एकूण खर्च र.रु.५०,२७,९७५/- इतका अंदाजित खर्च अपेक्षित आहे. सदरील खर्च हा केंद्रशासन पुरस्कृत दिअयो-राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अंतर्गत शहरी बेघरांना निवारा या उपांगाअंतर्गत करणेत येणार आहे. सदरचा प्रस्ताव मा.आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांचे अंतिम मान्यतेसाठी पाठविणेकामी मान्यता देणेत येत आहे. तसेच सांगवी वॉर्ड क्रं.३२ मधील मधुबन सोसायटी मधील छत्रपती शिवाजी महाराज उदयानामध्ये रात्रीचे वेळी गैरप्रकार होऊ नये म्हणून हया उदयानात ठिकठिकाणी CCTV कॅमेरे बसविणेत यावेत. सदर कामासाठी अंदाजे र.रु. ५०,००,०००/- खर्च अपेक्षित असुन सदर कामासाठी विदयुत विभागामार्फत आवश्यक तरतूद वर्गीकरण करणेस आणि सदर खर्चास व कामास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र. १२ तळवडे हा भाग दाट नागरी लोकवस्तीचा भाग आहे. सदर भागामध्ये अनेक कष्टकरी कामगार रहात आहेत. आपली महानगरपालिका ही देशामध्ये नागरी सुख सुविधा देणेबाबत अग्रणी गणली जाते. तसा नाव लौकीक म.न.पा.ने मिळवलेला आहे. आज मनपामध्ये मोठमोठे प्रकल्प आहेत. अनेक प्रकल्प प्रस्तावित आहेत. त्या अनुषंगानेच सर्व नागरीक हे मनपाचे करदाते असलेमुळे, नागरीकांना अत्यावश्यक नागरी सुविधा मनपास बंधनकारक आहे. त्यामध्ये रस्ते, फुटपाथ, ड्रेनेज, पाणीपुरवठा, स्मशानभुमी व इतर नागरीकांच्या जीवनाशी निगडीत दैनंदिन गोष्टींचा समावेश आहे. प्रभाग क्रमांक १२ हा रेड झोनहद्दी मध्ये येत आहे. जरी आमचा प्रभाग रेड झोनमध्ये असलातरी सुध्दा त्या भागात अत्यावश्यक नागरी सुविधा करदाते नागरीकांना देणे अत्यावश्यक व मनपास बंधनकारक आहे. तसेच तळवडे येथील स्मशानभुमी अस्थी विसर्जन घाट या नागरी सुविधा पुरविणेस मान्यता देणेत येत आहे. याप्रमाणे प्रभाग क्र. १२ मधील वरील सर्व नागरी सुविधेची कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सागर गवळी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ७३ विषय क्रमांक – १६

दिनांक – १९/८/२०१७ विभाग- मा.नगरसचिव

**<u>समित्यांचे अहवाल</u>**

**<u>विधी समिती</u>**

अ) दि.७/०७/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) दि.२१/०७/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.राजेंद्र लांडगे –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सागर गवळी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ७४ विषय क्रमांक – १७

दिनांक – १९/८/२०१७ विभाग- मा.नगरसचिव

**<u>मा.महिला व बालकल्याण समिती</u>**

अ) दि.४/०७/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) दि.१८/०७/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.राजेंद्र लांडगे –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सागर गवळी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ७५ विषय क्रमांक – १८

दिनांक – १९/८/२०१७ विभाग- मा.नगरसचिव

**<u>मा.शहर सुधारणा समिती</u>**

**अ)** दि.११/०७/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.२५/०७/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.राजेंद्र लांडगे –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सागर गवळी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ७६ विषय क्रमांक – १९

दिनांक – १९/८/२०१७ विभाग- मा.नगरसचिव

**<u>मा.क्रीडा, कला, क्रिडा कला साहित्य व सांस्कृतिक समिती</u>**

**अ)** दि.२३/०६/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.राजेंद्र लांडगे –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – २०

दिनांक – १९/८/२०१७

विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.
स्था/लेखा/७/१९५/२०१७ दि.१९/०८/२०१७

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास आराखड्यातील रस्ते व आरक्षणे विकसित करण्याबाबत मा. स्थायी समिती सभेच्या सूचना आहेत. सबब सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात समावेश नसलेली, परंतु करणे आवश्यक असलेल्या कामांची यादी खालीलप्रमाणे आहे. सदर कामांचा प्रथमत: अंदाजपत्रकामध्ये समावेश करणे आवश्यक आहे. सदरची कामे सर्व प्रभागांतर्गत करावयाची आहेत. सन २०१७-१८ चे भांडवली अंदाजपत्रक क्र.३, भाग - २ पान क्र. ३७६, ३७७, अ. क्र. ४ वर शहर विकास आराखडा या लेखाशिर्षाखाली एकूण र.रू. २०५ कोटी तरतूद करणेत आलेली आहे. त्यामधून खाली नमूद केलेल्या कामांच्या नावासमोर, दर्शविलेल्या रकमा वर्ग करता येणे शक्य आहे. त्यासाठी या कामांचा २०१७-१८ च्या भांडवली अंदाजपत्रकातील विशेष योजना अंदाजपत्रकात पान क्र. ८२ वर अ. क्र. ३० वर नव्याने समावेश करून त्यासमोर दर्शविलेल्या अंदाजपत्रकीय रकमेस प्रशासकीय मान्यता व तरतूद वर्ग करण्यास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्रं. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१७-१८ तरतूद |
|---|---|---|---|
| **ब क्षेत्रीय कार्यालय स्थापत्य** | | | |
| १ | थेरगाव येथील क्रांतीवीरनगर वर्धमान वाटीका सोसायटी समोरील रस्ता विकसीत करणे | २८०००००० | १५०००००० |
| २ | प्रभाग क्रं. २५ वाकड आरक्षण क्रं. ४/१५ प्राथमिक शाळेचे जागेसाठी सिमाभिंत घालणे. | २०००००००० | ५०००००० |
| ३ | प्रभाग क्रं. २५ वाकड आरक्षण क्रं. ४/११ जकात नाकाचे जागेसाठी सिमाभित घालणे. | ५०००००००० | १५०००००० |
| ४ | प्रभाग क्रं. २५ वाकड आरक्षण क्रं. ४/२३ माध्यमिक शाळा विकसीत करणे. | १५००००००० | १५०००००० |
| | **एकूण** | **२४८००००००** | **५००००००००** |

| क क्षेत्रीय कार्यालय स्थापत्य | | | |
|---|---|---|---|
| ५ | प्रभाग क्र.५८ मधील सांगवी परिसर मुख्य रस्ते विकसित करणे. | १०००००००० | १५०००००० |
| ६ | मौजे भोसरी कासारवाडी येथील आरक्षण क्र.१३ विकसित करणे. | २०००००००० | ३००००००० |
| ७ | यशवंतनगर चौकापासून पथिक हॉटेल समोरुन मटेरियल गेट ते स्पाईन रोड पर्यंतचा रस्ता विकसित करणे. | ३०००००००० | २००००००० |
| ८ | प्रभाग क्र.८ मधील इंद्रायणीनगर चौकापासून एम.आय.डी.सी. रस्त्याचे डायनोमेक कंपनी पर्यंतचा रस्ता विकसित करणे. | ३०००००००० | २००००००० |
| ९ | प्रभाग क्र.८ येथील गवळीमाथा चौक (PCMC गोडाऊन) पासून स्पाईन रोड पर्यंत रस्ता रुंदीकरण करुन डांबरीकरण करणे. | ३०००००००० | ३६००००० |
| १० | प्रभाग क्र.४०,४१ मुख्य रस्त्याच्या कडेने फुटपाथ व आर सी सी कॉंक्रिट पद्धतीने कामे करणे. | ४५०००००० | ३०००००० |
| ११ | मनपाच्या ताब्यात आलेले व येणा-या जागांना सिमाभिंत बांधणे व अनुषंगिक कामे करणे. ( क व ह प्रभाग ) | २००००००० | ५०००००० |
| १२ | प्रभाग क्र. ८ मधील प्राधिकरणाकडून ताब्यात आलेल्या जागा विकसित करणे. ( क प्रभाग ) | ५००००००० | ५०००००० |
| १३ | प्रभाग क्र.८ इंद्रायणीनगर मध्ये ठिकठिकाणी चौकामध्ये म्युरल्स बसविणे व सुशोभिकरणाची कामे करणे. | ५००००००० | १०००००० |
| १४ | कासारवाडी व कुंदननगर | १५०००००० | २०००००० |

| | | | |
|---|---|---|---|
| | परिसर विकसित करणे.(विकास आराखड्यातील ९ मी. रुंद रस्ता व इतर रस्ते) | | |
| १५ | कासारवाडी आरक्षण क्र.22 येथे मैदानावर प्रेक्षक गॅलरी करणे. | १५००००००० | ४०००००० |
| | **एकूण** | **१३५४५०००००** | **१०८६०००००** |
| **ड क्षेत्रीय कार्यालय स्थापत्य** | | | |
| १६ | **नविन**<br>प्रभाग क्र. २६ मध्ये ताब्यात येणारे डी. पी. रस्ते विकसित करणे. | ८५०००००० | ४०००००० |
| | **एकूण** | **८५००००००** | **४००००००** |
| **इ क्षेत्रीय कार्यालय स्थापत्य** | | | |
| १७ | प्रभाग क्र. ७ च-होली - पठारेमळा- डी.वाय. पाटील कॉलेज विकास आराखड्यातील ३० मी. रुंदीच्या रस्त्याचे उर्वरीत स्थापत्य विषयक कामे करणे. | ४०००००००० | ३००००००० |
| १८ | प्रभाग क्र. ७ च-होली येथील सर्व्हे नं.१०१३ ते ८ पर्यंतचा १८ मी. रस्ता विकसीत करणे. (स्मशानभुमीकडील रस्ता) | १०००००००० | ५०००००० |
| १९ | प्रभाग क्र.२ बो-हाडेवाडी येथील ताब्यात येणा-या गायरान जागेतील आरक्षणावर शाळा इमारत बांधणे. | ५००००००० | २५००००० |
| २० | प्रभाग क्र.६ मोशी येथील मोशी-आळंदी रस्ता ते इंद्रायणी नदी ( केळगांव पुल ) पर्यंतचा १८ मी. डी.पी. रस्ता विकसित करणे. | १०००००००० | ५०००००० |
| २१ | प्रभाग क्र.६ मोशी येथील गट क्र.५७ ते ६१ पर्यंतचा १८ मी. डी.पी. रस्ता विकसित करणे. | ५००००००० | ५०००००० |
| | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | एकूण | ७००००००००० | ४७५०००००० |
| फ क्षेत्रीय कार्यालय स्थापत्य | | | |
| २२ | प्रभाग क्र ३ चिखली येथील देहु आळंदी रस्ता ते धर्मराजनगरकडे जाणारा १८.०० मी डि पी रस्ता विकसीत करणे | १००००००००० | २०००००००० |
| २३ | प्रभाग क्र १ तळवडे चिखली तळवडे हद्दीवरील शिवेचा रस्ता विकसीत करणे | १००००००००० | १०००००००० |
| २४ | प्रभाग क्र ९ शाहुनगर येथील बहिरवाडे मैदानाभोवती सिमाभिंत बांधणे व इतर अनुषंगीक कामे करणे | ९०००००० | ३०००००० |
| २५ | प्रभाग क्र ११ यमुनानगर येथे श्री छत्रपती संभाजीराजे क्रिडांगण येथे मल्टी स्पोर्टस ग्राऊंड विकसीत करणे | ३५०००००० | ४०००००० |
| २६ | प्रभाग क्र. 9 मधील यशवंतराव चौकापासून पतीक हॉटेल टेल्को मटेरिअल गेट रोड, स्पाईन रोड मार्ग पुर्णानगर उड्डाणपुल पर्यत मुख्य DP रस्ता पुर्णपणे विकसीत आधुनिकीकरण करणे | २५००००००० | २५००००० |
| २७ | प्रभाग क्र. 2 जाधववाडी कुदळवाडी से.क्र. 16 मधील सावतामाळी उद्यानातील मोकळ्या जागेत महीला व पुरूषांसाठी स्वतंत्र्य अद्यायावत व्यायामशाळा इमारत व सुसज्य सभागृह बांधणे | ३००००००० | ५०००००० |
| २८ | प्रभाग क्र. 2 मधील देहू आळंदी मुख्य रस्त्यालगतचे परीसरातील ताब्यात आलेले डी. पी. रस्ते विकसीत करणे | १००००००००० | ५०००००० |
| २९ | प्रभाग क्र. 2 मधील वडाचामळा परिसरातील ताब्यात आलेले डी | १००००००००० | ५०००००० |

| | | | |
|---|---|---|---|
| | पी रस्ते विकसीत करणे | | |
| ३० | प्रभाग क्र. 2 बो-हाडेवाडी बनकरवस्ती मधील ताब्यात आलेले डी पी रस्ते विकसीत करणे | १००००००००० | ५००००००० |
| | **एकूण** | **८२४०००००००** | **५९५००००००** |
| **उद्यान विभाग ( स्थापत्य )** | | | |
| ३१ | किवळे येथील आरक्षणाच्या जागेत उद्यान विकसित करणे | ५०००००००० | १०००००००० |
| ३२ | रावेत येथे मनपाच्या आरक्षित जागेत उद्यान विकसित करणे | ३०००००००० | ७५०००००० |
| ३३ | बोपखेल येथे मनपाच्या आरक्षित जागेत उद्यान विकसित करणे | ४०००००००० | १०००००००० |
| ३४ | दापोडी आ. क्र. ३/१ येथे उद्यान विकसित करणे | १५००००००० | १०००००००० |
| ३५ | फ प्रभागातील से. क्र. १८ मधील सी.डी.सी. प्लॉट क्र. ४ व शरदनगर येथील मोकळ्या जागेवर आवश्यक स्थापत्य विषयक कामे करणे. | ४०००००००० | २०००००००० |
| ३६ | वाकड येथे मनपाच्या आरक्षित जागेत उद्यान विकसित करणे. | ३०००००००० | १०००००००० |
| ३७ | पिंपळे सौदागर आरक्षण क्र.३६१ अ येथे उद्यान विकसित करणे. | ४०००००००० | १०००००००० |
| | **एकूण** | **२४५००००००** | **७७५०००००** |
| | **म.न.पा. एकूण** | **३४५६५००००००** | **३४७१००००००** |

सबब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम १०३, अनुसूची ड मधील प्रकरण ७ (२) अनुसार कार्यवाही करण्यास तसेच सदर कामांचा भांडवली अंदाजपत्रक सन २०१७-१८ मध्ये समावेश करून, त्यासमोर दर्शविल्याप्रमाणे अंदाजपत्रकीय रकमेस प्रशासकीय मान्यता व तरतूद वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.चंद्रकांत नखाते -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.कैलास बारणे-** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- तसेच खालील नवीन

कामे अंदाजपत्रकात समाविष्ट करणेस व सदर कामांच्या प्रत्यक्ष अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता तसेच सदर कामांसाठी प्रत्येकी रक्कम रु. ५ लाख इतकी तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे. सदर तरतूद शहर विकास आराखडा या लेखाशिर्षामधुन करणेस मान्यता देणेत येत आहे.

१) देहू आळंदी रोड ते गट नं.४०२ पर्यंत १८ मी. डीपी रस्ते विकसीत करणे
२) सावतामाळी मंदिर ते विसावा हॉटेल पर्यंत १८ मी. व ३० मी.डी.पी.रस्ते विकसीत करणे.
३) चिखली गट नं.५०७ ते गट नं. ६८८ पर्यंत ३० मी. डी.पी रस्ते विकसीत करणे.
४) गट नं.५२४ ते ६७५ पर्यंत कुदळवाडी ते पाणनरोड पर्यंत १८ मी. डी.पी.रस्ते विकसीत करणे
५) गट नं.६५० ते ७०३ पर्यंत १२ मी.डीपी रस्ते विकसीत करणे
६) गट नं. ७२ (१) आरक्षण नं. १/१३७ खेळाचे मैदान विकसीत करणे.
७) गट नं. ४१४ मधील आरक्षण नं. १/१४३ खेळाचे मैदान विकसीत करणे.
८) गट नं.६५३ ते गट नं. ६५८ आरक्षण नं. १/१४७ उदयान विकसीत करणे.
९) गट नं. २० ते २२ आरक्षण नं. १/१२८ चिखली टाऊन हॉल बांधणे.
१०) गट नं. १३८८ मोशी आरक्षण नं. १/१६६ उदयान विकसीत करणे.
११) गट नं. १२७३ बो-हाडेवाडी आरक्षण नं. १/१५५ उदयान विकसीत करणे.

तसेच खालील नविन कामे अंदाजपत्रकात समाविष्ठ करणेस व कामास प्रशासकीय मान्यता व आवश्यक तरतूद शहर विकास आराखडा या लेखाशिर्षामधून करणेस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | प्रशासकीय र.रु. | तरतूद र.रु. |
|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ८ मध्ये सेक्टर क्र. ६ येथील पाण्याची उंच टाकी बांधणे. | २००००००० | ५०००००० |
| २ | प्रभाग क्र. ३ मधील वडमुखवाडी थोरल्या पादुका मंदिराजवळ पाण्याची उंच टाकी बांधणे. | २००००००० | ५०००००० |
| ३ | प्रभाग क्र. ३ येथील आदर्शनगर | १०००००००० | १००००००० |

| | | | |
|---|---|---|---|
| | मधील डी.पी.रस्ते विकसीत करणे. | | |
| ४ | प्रभाग क्र. ३ साईमंदिर कोतवालवाडी, च-होली गावठाण इ. भागातील रस्ते विकसीत करणे. | ७०००००० | २००००००० |
| ५ | प्रभाग क्र. ३ येथील सर्व्हे ५१९ ते ४७५ पर्यंतचा ३० मी.डी.पी.रस्ता विकसीत करणे. | १०००००००० | १०००००००० |
| ६ | प्रभाग क्र. ३ मधील चोविसावाडी येथील आ.क्र.२/१९ मध्ये उदयान विकसीत करणे. | २००००००० | ५०००००० |
| | एकूण | ३३००००००० | ५५००००००० |

बीआरटीएस विभागागाकडील विकास योजनेमधील रस्ते विकसीत करणेकामी, सुधारीत अंदाजपत्रकीय तरतूद करणेस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | पानांक /अ.क्र. | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१७-१८ चा अंदाज | सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम | सुधारीत मुळ अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सांगवी किवळे रस्त्यावरील सांगवी फाटा येथील ढोरे पाटील सबवे ते परिहार चौक, औंधकडे जाणा-या पुलापर्यंतचा रस्ता विकास आराखडयाप्रमाणे विकसीत करणे. | - | ० | ० | १०००००००० | ५००००००० |
| २ | देहू कमान ते झेंडेमळा रस्त्याचे रुंदीकरण मजबुतीकरण करणे. | - | ० | ० | ३५००००००० | १०००००००० |

**मा.तुषार कामठे –** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. विषय दाखल करताना सुध्दा पुर्ण विषय वाचला नाही. ऐनवेळचा विषय आपण समाविष्ट केला. ऐनवेळचा जो विषय दाखल केलेला आहे तो पुर्ण विषय वाचावा. कारण तो अजेन्डयावर नाही. ऐनवेळचा विषय आहे

तो संपुर्ण विषय सविस्तर वाचावा. आम्हांला कळू दया काय करताय ते आणि मग आम्हांला बोलायला दयाव.

**मा.महापौर-** विषय वाचला आहे. तुम्हांला बोलण्यास देतो. त्यावेळेस तुमच काय म्हणण आहे ते मांडा.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, जो विषय अजेन्डयावर असेल त्याच्या दोन ओळी वाचल्यातरी चालते परंतु हा विषय अजेन्डयावर नाही म्हणून वाचावा.

**मा.महापौर-** ठिक आहे, केंदळे तुम्ही परत विषय वाचावा.
(**मा**.उत्तम केंदळे यांनी विषय क्रमांक २० चे वाचन केले)
**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मी आपल्याला विनंती केलेली होती की, विषय ऐनवेळचा आहे, विषय अजेन्डयावर नाही. माझी विनंती आहे की जो विषय अजेन्डयावर नाही, जो विषय आपण ऐनवेळेला घेतो त्या विषयाच हेड ओपन नाही. त्या विषयाचा बजेटमध्ये समावेश नाही. ते बजेट आपण घाईघाईन मंजुर केल. त्याच्यावर आपण अभ्यास न करता मंजूर केलं. आता त्या चुका तुमच्या लक्षात यायला लागलेल्या आहेत. आता तुम्ही त्या विषयाच हेड ओपन करता. २०५ कोटीच वर्गीकरण करता. माझी विनंती आहे संपुर्ण विषय वाचायला सांगा.
**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.
**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरतर एवढी चांगली तीन ते चार तास झाले आपण सभा घेतली अजून तीन ते चार तास या सभागृहात बसायच आहे. ही उपसूचना आम्हांला एवढयासाठी घ्यावी लागली की समाविष्ट गाव या महापालिकेमध्ये १७ ते १८ वर्षापुर्वी आलेले आहेत व त्या भागातल्या विकासापासून वंचित असलेली ती गाव आहेत. परिस्थिती अशी आहे की विषय फक्त लेखाशिर्ष ओपन करण्याच्या संदर्भामध्ये होता. तुमच्या काळामध्ये त्या भागातील विकासकाम जर केली असती, तुम्ही बजेटच्या संदर्भात बोलता, बजेट चुकीच्या पध्दतीने केलं म्हणतातर या सभागृहामध्ये योगेशभाई तुम्ही पंचवीस वर्ष आहेत. मला असं वाटतय की अत्यंत पारदर्शीपणे या सभागृहामध्ये आम्ही काम करतो. या शहराचा विकास जर तुम्ही चांगल्या पध्दतीने केला असता, दत्ता काकानी सांगाव की समाविष्ट गावचा विकास झाला का. तळवडेच्या नगरसेवकांनी मनापासून सांगावे की समाविष्ट गावचा विकास केला का. अनेक गोष्टी याठिकाणच्या राहील्या असतील त्या करण्याचा आम्ही याठिकाणी प्रयत्न करतो. मा.महापौर साहेब, मी तुम्हांला विनंती करतो की या विषयाच्या मंजूरीच्या नंतर आपल्याला रिंगरोडच्यावरती चर्चा करायची आहे. ते लोक बीचारे सगळया पक्षाच मत काय असणार आहे, कुठला पक्ष हा आमच्या बरोबर आहे, कुठला पक्ष काय करणार आहे हेही लोकांना समजणार आहे. कित्येक लोकांच पितळ उघड या रिंगरोडच्या माध्यमातून

पडणार आहे. मा.महापौरांना विनंती करतो की हा विषय आपण मंजूर करावा व रिंगरोडच्या संदर्भामध्ये लगेचच चर्चा करावी.

**मा.महापौर-** हा विषय मंजूर करण्यात येत आहे व यानंतर रिंगरोडच्या संदर्भात चर्चा चालू करावी.

(सभागृहात गोंधळ)

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ७७ विषय क्रमांक – २०

दिनांक – १९/८/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.
स्था/लेखा/७/१९५/२०१७ दि.१९/०८/२०१७

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास आराखड्यातील रस्ते व आरक्षणे विकसित करण्याबाबत मा. स्थायी समिती सभेच्या सूचना आहेत. सबब सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात समावेश नसलेली, परंतु करणे आवश्यक असलेल्या कामांची यादी खालीलप्रमाणे आहे. सदर कामांचा प्रथमत: अंदाजपत्रकामध्ये समावेश करणे आवश्यक आहे. सदरची कामे सर्व प्रभागांतर्गत करावयाची आहेत. सन २०१७-१८ चे भांडवली अंदाजपत्रक क्र.३, भाग - २ पान क्र. ३७६, ३७७, अ. क्र. ४ वर शहर विकास आराखडा या लेखाशिर्षाखाली एकूण र.रू. २०५ कोटी तरतूद करणेत आलेली आहे. त्यामधून खाली नमूद केलेल्या कामांच्या नावासमोर, दर्शविलेल्या रकमा वर्ग करता येणे शक्य आहे. त्यासाठी या कामांचा २०१७-१८ च्या भांडवली अंदाजपत्रकातील विशेष योजना अंदाजपत्रकात पान क्र. ८२ वर अ. क्र. ३० वर नव्याने समावेश करून त्यासमोर दर्शविलेल्या अंदाजपत्रकीय रकमेस प्रशासकीय मान्यता व तरतूद वर्ग करण्यास मान्यता देणेत येत आहे.

| .क्रं. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१७-१८ तरतूद |
|---|---|---|---|
| **ब क्षेत्रीय कार्यालय स्थापत्य** | | | |
| १ | थेरगाव येथील क्रांतीवीरनगर वर्धमान वाटीका सोसायटी समोरील रस्ता विकसीत करणे | २८०००००० | १५०००००० |
| २ | प्रभाग क्रं. २५ वाकड आरक्षण क्रं. ४/१५ प्राथमिक शाळेचे जागेसाठी सिमाभिंत घालणे. | २००००००० | ५०००००० |
| ३ | प्रभाग क्रं. २५ वाकड आरक्षण क्रं. ४/११ जकात नाकाचे जागेसाठी सिमाभित घालणे. | ५००००००० | १५०००००० |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | प्रभाग क्रं. २५ वाकड आरक्षण क्रं. ४/२३ माध्यमिक शाळा विकसीत करणे. | १५०००००० | १५०००००० |
| | **एकूण** | **२४८००००००** | **५००००००** |
| **क क्षेत्रीय कार्यालय स्थापत्य** | | | |
| ५ | प्रभाग क्र.५८ मधील सांगवी परिसर मुख्य रस्ते विकसित करणे. | १०००००००० | १५०००००० |
| ६ | मौजे भोसरी कासारवाडी येथील आरक्षण क्र.१३ विकसित करणे. | २०००००००० | ३०००००० |
| ७ | यशवंतनगर चौकापासून पथिक हॉटेल समोरुन मटेरियल गेट ते स्पाईन रोड पर्यंतचा रस्ता विकसित करणे. | ३०००००००० | २०००००० |
| ८ | प्रभाग क्र.८ मधील इंद्रायणीनगर चौकापासून एम.आय.डी.सी. रस्त्याचे डायनोमेक कंपनी पर्यंतचा रस्ता विकसित करणे. | ३०००००००० | २०००००० |
| ९ | प्रभाग क्र.८ येथील गवळीमाथा चौक (PCMC गोडाऊन) पासून स्पाईन रोड पर्यंत रस्ता रुंदीकरण करुन डांबरीकरण करणे. | ३०००००००० | ३६०००००० |
| १० | प्रभाग क्र.४०,४१ मुख्य रस्त्याच्या कडेने फुटपाथ व आर सी सी कॉक्रिट पद्धतीने कामे करणे. | ४५०००००० | ३०००००० |
| ११ | मनपाच्या ताब्यात आलेले व येणा-या जागांना सिमाभिंत बांधणे व अनुषंगिक कामे करणे. ( क व ह प्रभाग ) | २०००००० | ५०००००० |
| १२ | प्रभाग क्र. ८ मधील प्राधिकरणाकडून ताब्यात आलेल्या जागा विकसित करणे. ( क प्रभाग ) | ५०००००० | ५०००००० |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | प्रभाग क्र.८ इंद्रायणीनगर मध्ये ठिकठिकाणी चौकामध्ये म्युरल्स बसविणे व सुशोभिकरणाची कामे करणे. | ५००००००० | १०००००० |
| १४ | कासारवाडी व कुंदननगर परिसर विकसित करणे.(विकास आराखड्यातील ९ मी. रुंद रस्ता व इतर रस्ते) | १५०००००० | २०००००० |
| १५ | कासारवाडी आरक्षण क्र.22 येथे मैदानावर प्रेक्षक गॅलरी करणे. | १५०००००० | ४०००००० |
| | **एकूण** | **१३५४५०००००** | **१०८६०००००** |
| **ड क्षेत्रीय कार्यालय स्थापत्य** | | | |
| १६ | **नविन**<br>प्रभाग क्र. २६ मध्ये ताब्यात येणारे डी. पी. रस्ते विकसित करणे. | ८५०००००० | ४०००००० |
| | **एकूण** | **८५००००००** | **४००००००** |
| **इ क्षेत्रीय कार्यालय स्थापत्य** | | | |
| १७ | प्रभाग क्र. ७ च-होली - पठारेमळा- डी.वाय. पाटील कॉलेज विकास आराखड्यातील ३० मी. रुंदीच्या रस्त्याचे उर्वरीत स्थापत्य विषयक कामे करणे. | ४०००००००० | ३००००००० |
| १८ | प्रभाग क्र. ७ च-होली येथील सर्व्हे नं.१०१३ ते ८ पर्यतचा १८ मी. रस्ता विकसीत करणे. (स्मशानभुमीकडील रस्ता) | १०००००००० | ५०००००० |
| १९ | प्रभाग क्र.२ बो-हाडेवाडी येथील ताब्यात येणा-या गायरान जागेतील आरक्षणावर शाळा इमारत बांधणे. | ५००००००० | २५००००० |
| २० | प्रभाग क्र.६ मोशी येथील मोशी-आळंदी रस्ता ते इंद्रायणी नदी ( केळगांव पुल ) पर्यंतचा १८ मी. डी.पी. रस्ता विकसित करणे. | १०००००००० | ५०००००० |

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | प्रभाग क्र.६ मोशी येथील गट क्र.५७ ते ६१ पर्यंतचा १८ मी. डी.पी. रस्ता विकसित करणे. | ५०००००००० | ५००००००० |
| | | | |
| | **एकूण** | **७०००००००००** | **४७५००००००** |
| **फ क्षेत्रीय कार्यालय स्थापत्य** | | | |
| २२ | प्रभाग क्र ३ चिखली येथील देहु आळंदी रस्ता ते धर्मराजनगरकडे जाणारा १८.०० मी डि पी रस्ता विकसीत करणे | १००००००००० | २०००००००० |
| २३ | प्रभाग क्र १ तळवडे चिखली तळवडे हद्दीवरील शिवेचा रस्ता विकसीत करणे | १००००००००० | १०००००००० |
| २४ | प्रभाग क्र ९ शाहुनगर येथील बहिरवाडे मैदानाभोवती सिमाभिंत बांधणे व इतर अनुषंगीक कामे करणे | ९०००००० | ३०००००० |
| २५ | प्रभाग क्र ११ यमुनानगर येथे श्री छत्रपती संभाजीराजे क्रिडांगण येथे मल्टी स्पोर्टस ग्राऊंड विकसीत करणे | ३५०००००० | ४०००००० |
| २६ | प्रभाग क्र. 9 मधील यशवंतराव चौकापासून पतीक हॉटेल टेल्को मटेरिअल गेट रोड, स्पाईन रोड मार्ग पुर्णानगर उड्डाणपुल पर्यत मुख्य DP रस्ता पुर्णपणे विकसीत आधुनिकीकरण करणे | २५००००००० | २५००००० |
| २७ | प्रभाग क्र. 2 जाधववाडी कुदळवाडी से.क्र. 16 मधील सावतामाळी उद्यानातील मोकळ्या जागेत महीला व पुरूषांसाठी स्वतंत्र्य अद्यायावत व्यायामशाळा इमारत व सुसज्य सभागृह बांधणे | ३००००००० | ५०००००० |
| २८ | प्रभाग क्र. 2 मधील देहू आळंदी मुख्य रस्त्यालगतचे | १००००००००० | ५०००००० |

| | | | |
|---|---|---|---|
| | परीसरातील ताब्यात आलेले डी. पी. रस्ते विकसीत करणे | | |
| २९ | प्रभाग क्र. 2 मधील वडाचामळा परिसरातील ताब्यात आलेले डी पी रस्ते विकसीत करणे | १०००००००० | ५०००००० |
| ३० | प्रभाग क्र. 2 बो-हाडेवाडी बनकरवस्ती मधील ताब्यात आलेले डी पी रस्ते विकसीत करणे | १०००००००० | ५०००००० |
| | **एकूण** | **८२४००००००** | **५९५०००००** |
| **उद्यान विभाग ( स्थापत्य )** | | | |
| ३१ | किवळे येथील आरक्षणाच्या जागेत उद्यान विकसित करणे | ५००००००० | १००००००० |
| ३२ | रावेत येथे मनपाच्या आरक्षित जागेत उद्यान विकसित करणे | ३००००००० | ७५००००० |
| ३३ | बोपखेल येथे मनपाच्या आरक्षित जागेत उद्यान विकसित करणे | ४००००००० | १००००००० |
| ३४ | दापोडी आ. क्र. ३/१ येथे उद्यान विकसित करणे | १५०००००० | १००००००० |
| ३५ | फ प्रभागातील से. क्र. १८ मधील सी.डी.सी. प्लॉट क्र. ४ व शरदनगर येथील मोकळ्या जागेवर आवश्यक स्थापत्य विषयक कामे करणे. | ४००००००० | २००००००० |
| ३६ | वाकड येथे मनपाच्या आरक्षित जागेत उद्यान विकसित करणे. | ३००००००० | १००००००० |
| ३७ | पिंपळे सौदागर आरक्षण क्र.३६१ अ येथे उद्यान विकसित करणे. | ४००००००० | १००००००० |
| | **एकूण** | **२४५००००००** | **७७५०००००** |
| | **म.न.पा. एकूण** | **३४५६५००००००** | **३४७१००००००** |

सबब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम १०३, अनुसूची ड मधील प्रकरण ७ (२) अनुसार कार्यवाही करण्यास तसेच सदर कामांचा भांडवली अंदाजपत्रक सन २०१७-१८ मध्ये समावेश करून, त्यासमोर दर्शविल्याप्रमाणे अंदाजपत्रकीय रकमेस प्रशासकीय मान्यता व तरतूद वर्ग करणेस मान्यता देणेत

येत आहे. तसेच खालील नवीन कामे अंदाजपत्रकात समाविष्ट करणेस व सदर कामांच्या प्रत्यक्ष अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता तसेच सदर कामांसाठी प्रत्येकी रक्कम रु. ५ लाख इतकी तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे. सदर तरतूद शहर विकास आराखडा या लेखाशिर्षामधुन करणेस मान्यता देणेत येत आहे.

१) देहू आळंदी रोड ते गट नं.४०२ पर्यंत १८ मी. डीपी रस्ते विकसीत करणे
२) सावतामाळी मंदिर ते विसावा हॉटेल पर्यंत १८ मी. व ३० मी.डी.पी.रस्ते विकसीत करणे.
३) चिखली गट नं.५०७ ते गट नं. ६८८ पर्यंत ३० मी. डी.पी रस्ते विकसीत करणे.
४) गट नं.५२४ ते ६७५ पर्यंत कुदळवाडी ते पाणनरोड पर्यंत १८ मी. डी.पी.रस्ते विकसीत करणे
५) गट नं.६५० ते ७०३ पर्यंत १२ मी.डीपी रस्ते विकसीत करणे
६) गट नं. ७२ (१) आरक्षण नं. १/१३७ खेळाचे मैदान विकसीत करणे.
७) गट नं. ४१४ मधील आरक्षण नं. १/१४३ खेळाचे मैदान विकसीत करणे.
८) गट नं.६५३ ते गट नं. ६५८ आरक्षण नं. १/१४७ उदयान विकसीत करणे.
९) गट नं. २० ते २२ आरक्षण नं. १/१२८ चिखली टाऊन हॉल बांधणे.
१०) गट नं. १३८८ मोशी आरक्षण नं. १/१६६ उदयान विकसीत करणे.
११) गट नं. १२७३ बो-हाडेवाडी आरक्षण नं. १/१५५ उदयान विकसीत करणे.

तसेच खालील नविन कामे अंदाजपत्रकात समाविष्ठ करणेस व कामास प्रशासकीय मान्यता व आवश्यक तरतूद शहर विकास आराखडा या लेखाशिर्षामधून करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | प्रशासकीय र.रु. | तरतूद र.रु. |
|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ८ मध्ये सेक्टर क्र. ६ येथील पाण्याची उंच टाकी बांधणे. | २००००००० | ५०००००० |
| २ | प्रभाग क्र. ३ मधील वडमुखवाडी थोरल्या पादुका | २००००००० | ५०००००० |

| | | | |
|---|---|---|---|
| | मंदिराजवळ पाण्याची उंच टाकी बांधणे. | | |
| ३ | प्रभाग क्र. ३ येथील आदर्शनगर मधील डी.पी.रस्ते विकसीत करणे. | १०००००००० | १००००००० |
| ४ | प्रभाग क्र. ३ साईमंदिर कोतवालवाडी, च-होली गावठाण इ. भागातील रस्ते विकसीत करणे. | ७००००००० | २००००००० |
| ५ | प्रभाग क्र. ३ येथील सर्व्हे ५१९ ते ४७५ पर्यंतचा ३० मी.डी.पी.रस्ता विकसीत करणे. | १०००००००० | १००००००० |
| ६ | प्रभाग क्र. ३ मधील चोविसावाडी येथील आ.क्र.२/१९ मध्ये उदयान विकसीत करणे. | २००००००० | ५०००००० |
| | एकूण | ३३००००००० | ५५०००००० |

बीआरटीएस विभागागाकडील विकास योजनेमधील रस्ते विकसीत करणेकामी, सुधारीत अंदाजपत्रकीय तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | पानांक/ अ.क्र. | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१७-१८ चा अंदाज | सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम | सुधारीत मुळ अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सांगवी किवळे रस्त्यावरील सांगवी फाटा येथील ढोरे पाटील सबवे ते परिहार चौक, औंधकडे जाणा-या पुलापर्यंतचा रस्ता विकास | - | ० | ० | १०००००००० | ५००००००० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | आराखडयाप्रमाणे विकसीत करणे. | | | | | |
| २ | देहू कमान ते झेंडेमळा रस्त्याचे रुंदीकरण मजबुतीकरण करणे. | - | ० | ० | ३५०००००० | १०००००००० |

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.महापौर –** रिंगरोड या विषयावर चर्चा करण्यात यावी.

**मा.अभिषेक बारणे-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, मी सर्वांना हात जोडून विनंती करतो की, आमच्या भागातील घरांचा प्रश्न आहे. ज्या-ज्या नगरसेवकांच्या भागातील हा प्रश्न आहे त्या सगळ्यांना विनंती करतो.

(सभागृहात गोंधळ)

**मा.अभिषेक बारणे-** सगळ्यांना हात जोडून विनंती आहे, माझे बोलून झाल्यावर बोला. माझे बोलून झाल्यावर बोला. माझे बोलून झाल्यावर बोला.

**मा.महापौर** – मा.राहूल कलाटे तुम्हाला बोलायला सांगीतल्यावर तुम्ही बोला. तुम्ही खाली बसा.

**मा.अभिषेक बारणे-** आज यावेळी रिंगरोडचा प्रश्न शहराच्या समोर आला आहे. प्र.क्र.२३ या प्रभागाचा मी नगरसेवक झालो आहे. या प्रभागाचा नगरसेवक होण्यापूर्वी कायद्याच्या भाषेने कोणी मत मागत नाही. नेत्याच्या भाषेने, त्या भावनेच्या भाषेने मत मागतो. मी त्या लोकांना आश्वासन दिले होते की, तुम्ही मला निवडून द्या. आमच्या नेत्यांनी आश्वासन दिले होते की, प्राधिकरणाचा प्रश्न शंभर टक्के मिटवू. येणा-या काळात आमदार मा.महेशदादा लांडगे असतील, मा.लक्ष्मणभाऊ जगताप असतील, आमच्या पक्षाचे सर्व नेते असतील यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे पाठपूरावा करुन अनधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी एक जी.आर. काढला आहे. मा.मुख्यमंत्री यांनी अनधिकृत बांधकामे नियमित करत असताना प्राधिकरणाचा उल्लेख केला. मी मा.मुख्यमंत्री महोदयांचे पहिले आभार मानतो की, त्यांनी आमच्या भागाचा उल्लेख केला परंतू तुम्ही प्रत्येकाने हा जी.आर. वाचला का. हा सर्व नगरसदस्यांना प्रश्न असेल, सर्व अधिका-यांना प्रश्न असेल, आयुक्तांना प्रश्न असले, महापौर साहेबांना प्रश्न असेल. मुख्यमंत्र्यांची समिती असेल त्यांनी सर्वांनी मिळून हा जी.आर. तयार केला आहे. हा जी.आर. तयार करत असताना याला काही उपसूचनांची आवश्यकता आहे. यात प्रत्येक बांधकाम नियमित करायचे

असेलतर बांधकामासमोर २० फूटी रोड असावा असे या नियमात लिहीलेले आहे. परंतू तिथे खराच २० फूटी रोड आहे का. तसेच प्रत्येक बांधकामाच्या बाजूला .७५ मी. जागा, ३ फूट जागा सोडली पाहीजे. तेवढी जागा सोडलेली आहे का. तेवढी जागा सोडली नसेलतर ही सगळ्यांची जबाबदारी आहे. ही उपसूचना द्यायची आहे. परंतू आमच्या भागातील, प्राधिकरणातील ज्येष्ठ नागरीक जास्त जागरुक आहेत. प्रश्न सगळ्यांचा आहे. पण आमच्या इथले नागरीक जास्त जागरुक आहेत. मी तुम्हाला लेखी देतो. आमचे काही मित्र त्यांची मी इथे नावे घेतो. श्री.पवार असतील,श्री.येळकर असतील,श्री.सपकाळ असतील,श्री.ऊबाळे असतील, या सर्व सामाजिक कार्यकर्त्यांमुळे, यांनी एकट्या थेरगावामधून १२८० हरकती घेतलेल्या आहेत. त्या १२८० हरकती नोंदवलेल्या आहेत. किती नगरसदस्यांनी आपापल्या भागातून अनधिकृत बांधकामांबाबत हरकती नोंदवलेल्या आहेत, मला माहित नाही. माझी सगळ्यांना विनंती आहे की, फक्त शाईनिंग करुन भाषणं करु नका. इथून मागील काळात काय झाले की, खूप डायव्हर्जन झाले. बांधकामे नियमित झाली नाहीत. डायव्हर्जन होऊन बांधकामे नियमित होत नसतात. यासाठी सन्माननीय मुख्यमंत्री हे गरीबांचे नेते आहेत, कष्टक-यांचे नेते आहेत. त्यांनी हे जाणले आहे. अधिकृत ठिकाणी राहणा-या काही लोकांचे असे म्हणणे असेल की, आम्ही अधिकृतपणे इथे राहतोय. आणि हे अनधिकृतपणे इथे राहत आहेत. तर त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. थेरगाव असेल, पिंपरी असेल, रहाटणी असेल, काळेवाडी असेल हा बराचसा जुना भाग डेव्हलप झालेला आहे. इथे ८० टक्के बांधकामे अनधिकृत आहेत. या बांधकामांमधून जो कर वसूल केला, या बांधकामांच्या जीवावर या भागात रस्ते झाले,पूल झाले,सगळी विकास कामे झाली. त्यामुळे नवीन नवीन इमारती होत चालल्या आहेत. या भागातील त्यांचे संख्याबळ वाढत चालले आहे. म्हणून असे नाही की,ज्यांनी मूळ तयार केले,त्यांना काढून टाकायचे. या सगळ्या गोष्टींचे हित जाणून घेऊन मा.मुख्यमंत्री यांनी एकदम चांगला निर्णय घेतला आहे. चांगला जी.आर. तयार केला आहे. त्यात खूप उपसूचनांची गरज आहे. त्या उपसूचना होत नाहीत, तोपर्यंत मला वाटत नाही की ही बांधकामे नियमित होतील. आणि खरेच सगळ्यांची अशी मानसिकता असेल की, ही सगळी बांधकामे नियमित करायची आहेततर सर्वांना एकच विनंती करतो की, सर्वांनी हा जी.आर. पुन्हा एकदा वाचावा. या जी.आर.ला काय उपसूचना करायच्या आहेत हे परत एकदा तयार करावे. प्रत्येकाने आपला पक्ष बाजूला ठेवून नागरीकांसाठी काय करता येईल ते पहावे. मी मा.महापौर यांना विनंती करतो की, यासाठी काय करता येईल यासाठी प्रयत्न करावा.

**मा.प्रमोद कुटे-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,रिंगरोडसंदर्भात आपण सर्वजण चर्चा करतोय. सर्वप्रथम बिजलीनगरमध्ये राहणारे जे रिंगरोडबाधित नागरीक आहेत, ते रिंगरोडबाधित होण्यापूर्वी तिथे प्राधिकरणाची ती जागा होती. १९७२ व १९७८ साली प्राधिकरणाने त्या जागांवर मूळ मालकाचे नाव काढून प्राधिकरणाचे नाव आणले. प्राधिकरणाने

नाव आणल्यानंतर त्या रिकाम्या असलेल्या जागा सर्वसामान्य, गोरगरीबांना विकण्यात आल्या. त्या का आल्या या केवळ शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे विकण्यात आल्या. १९७२ व १९७८ साली जे शेतकरी होते, त्यांना आजपर्यंत साडेबारा टक्याने मोबदला दिला गेलेला नाही. शेवटी वैतागून या लोकांनी त्याठिकाणच्या जागा सामान्य कामगारांना दिल्या. त्यामुळे त्याठिकाणी लोकांनी कुठल्याही प्रकारे काहीही न पाहता या जागा घेतल्या. १९९६ साली पिंपरी चिंचवड शहराचा जुन्या गावांचा डि.पी. तयार करण्यात आला. त्याठिकाणी हा ६१ मी. रोड टाकण्यात आला. याठिकाणी ही झालेली घरे आहेत ही शासनाच्या चुकीच्या धोरणांमुळे झालेली आहेत. त्यामुळे आपण या निर्णयात लक्ष घालून सदरच्या रिंगरोडची अलाईनमेंट आहे ती स्पाईन रोडला लागून आहे. आपण ही अलाईनमेंट बदलावी. आणि सर्वसामान्यांच्या घरांवर बुलडोजर चालवण्याचा विचार काही मंडळी करत आहेत. मा.महापौर, आपण ही अलाईनमेंट बदलावी. आणि या घरांमध्ये राहणा-या सर्वसामान्य लोकांना न्याय द्यावा. एवढेच बोलतो आणि माझे दोन शब्द संपवतो.

**मा.सचिन चिखले-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकारबंधू, खरेतर खूप महत्वाचा व गंभीर विषय आज चर्चेसाठी घेतल्याबद्दल मी मा.महापौर साहेबांचे मनापासून हार्दिक अभिनंदन करतो. वाल्हेकरवाडी असेल, या भागात प्राधिकरणाने रिंगरोडचा प्लॅन १९७६ साली बनवण्यात आला होता. ज्यावेळी हा प्लॅन बनवण्यात आला होता, त्यावेळी हे गाव म्हणजे पिंपरी चिंचवड शहरातील सगळ्यात शेवटचे गाव होते. त्यावेळी हे गाव नगरपालिकेत सुद्धा नव्हते तर ते नगरपरिषदेत होते. त्यावेळी हा प्लॅन आखला गेला. यानंतर रावेत असेल, किवळे असेल, ताथवडे असेल, मामुर्डी असेल, ही सगळी गावे कालांतराने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत समाविष्ट करणेत आली. ज्यावेळी १९७६ साली हा प्लॅन आखला गेला, त्यावेळी वाल्हेकरवाडी परिसरातील जो शेतकरी वर्ग होता, त्या शेतकरी वर्गाच्या सातबारा उता-यावर कोणताही उल्लेख करण्यात आला नव्हता. खरेतर पिंपरी चिंचवड शहर हे कामगार नगरीचे शहर आहे. जेव्हा हळूहळू बाहेरून लोक शहरात यायला लागले, त्या-त्या वेळी त्या शेतक-यांकडून एक गुंठा असेल, दोन गुंठा असेल, पै-पै जमवून, दिवसरात्रं काम करुन हा एक गुंठा/दोन गुंठा विकत घेतला गेला. १९७६ साली ज्यावेळी या जागा विकत घेतल्या गेल्या, त्यावेळी प्राधिकरणाकडून कोणताही प्रकारचा चार्ट लावण्यात आला नव्हता की ही जागा रिंगरोड बाधित आहे. कोणत्याही प्रकारच्या सूचना दिल्या गेल्या नाहीत. कोणत्याही प्रकारच्या हरकती दाखल केल्या नाहीत. विचारपूस केली गेली नाही. त्यावेळी प्राधिकरण पूर्णपणे झोपलेल्या अवस्थेत होते. १९७६ नंतर आज तीस वर्षे उलटून गेली आहेत. आणि आज पुन्हा ज्यापद्धतीने त्या गोरगरीब लोकांनी पै-पै गोळा करुन ही घरे बांधली होती. ही घरे बांधल्यानंतर आज तीस वर्षांनंतर आपण त्या परीसरातून रिंगरोड करत आहोत आणि करणार आहोत. मा.महापौर साहेब, आमचा विकास कामे करण्याला विरोध नाही. विकास कामे ही झाली पाहीजेत. परंतू

जर गोरगरीबांच्या घरांवरून बुलडोजर जाणार असेल, जर ते घरांतून बेघर होणार असतीलतर अश्या विकासकामांना आमचा बिल्कूल सुद्धा पाठिंबा नसणार आहे. आम्ही संपूर्णपणे या रिंगरोड बाधित नागरीकांबरोबर आहोत. खरे पाहिलेतर या शहरामध्ये गेले दहा ते पंधरा वर्षांपासून अनधिकृत बांधकाम असेल, शास्तीकर असेल, शहरातील प्रत्येक नागरीकावर ही एक टांगती तलवार आहे की, कधी आमची घरे पाडली जातील आणि कधी आम्हाला बेघर केले जाईल. आज तुम्ही पाहाल की, गेले एक ते दोन महिन्यांपासून वाल्हेकरवाडी असेल, काळेवाडी असेल, त्या परिसरातील लहान लहान मुलगादेखील नीट व्यवस्थित झोपला गेलेला नाही. घरांतील बाईमाणसे असतील, गडीमाणसे असतील, वयस्कर लोक असतील, ते मनात चिंता व्यक्त करत दिवसभर इकडे-तिकडे फिरत आहेत. मला वाटते, काही लोकं तर कधी ऑर्डर होईल आणि कधी आम्हाला बेघर करतील अशा पद्धतीने वावरत आहेत. मा.महापौर साहेब मी आपल्याला नम्र विनंती करतो की, हा रिंगरोड तात्काळ रद्द करुन याला शहरात पर्यायी काय करता येईल या विषयावर आपण चर्चा करावी. या विषयावर कोणत्याही पक्षाने राजकारण न करता पिंपरी चिंचवड शहरातील नागरीकांचा विचार करुन सर्वांनी या विषयावर चर्चा करायला हवी. यातून मार्ग काढायला हवा. एवढे बोलतो. धन्यवाद.

**मा.करुणा चिंचवडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, पिंपरी चिंचवड शहरात दोन्ही रोड प्रस्तावित आहेत. माझा प्रभाग क्र.१७ तील काही भाग या बाधित होणा-या भागातून जातो आहे. यातून अनेक गोरगरीबांची घरे बाधित होणार आहेत. मध्यमवर्गीय, मोलमजूरी करणा-या नागरीकांचा, कामगारांचा यात समावेश आहे. रिंगरोडमध्ये ज्यांच्या हक्कांची घरे बाधित होत आहेत, त्यामुळे त्यांना स्वतःची घरे वाचवण्याचा खूप मोठा प्रश्न उभा राहीला आहे. गेले दोन महिन्यांपासून वर्तमानपत्रांतून, प्रसारमाध्यमांतून येणा-या वेगवेगळ्या बातम्यांमधून नागरीकांमध्ये भितीचे वातावरण आहे. गोरगरीबांच्या घरांचा विचार करुन रिंगरोडमध्ये बाधित होणा-या नागरीकांना न्याय मिळावा ही विनंती. जयहिंद, जयमहाराष्ट्र.

**मा.माया बारणे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, पत्रकार बंधू, खरेतर रिंगरोड हा संपूर्ण सभागृहाचा, नागरीकांचा अतिशय जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. या रिंगरोडमध्ये प्रस्तावित रिंगरोडमध्ये चिंचवड, वाल्हेकरवाडी, गुरुद्वारा हा भाग येतो. खरेतर या रिंगरोडमुळे त्या भागातील बरेचसे नागरीक बेघर होणार आहेत. १९७२ साली प्राधिकरणाची स्थापना झाली. प्राधिकरणाची स्थापना करण्यामागे उद्देश्य हाच होता की, सर्वसामान्य नागरीकांना परवडतील अशा प्रकारची घरे देणे. परंतू प्राधिकरणाने आत्तापर्यंत अशी कुठलीही घरे बांधलेली नाहीत. हा अतिशय संशोधनाचाच विषय आहे. ज्यावेळी प्राधिकरणाची स्थापना झाली होती, तेव्हा वाकड असेल, वाल्हेकरवाडी असेल, थेरगाव असेल, या भागातील जे भूसंपादन केले, ज्या शेतक-यांच्या जागा घेतल्या, त्या शेतक-यांना काहींना आजही शासकीय नियमानुसार मोबदला मिळालेला नाही किंवा १२.५ टक्यांनी परतावा मिळालेला नाही. ज्या कारणासाठी, विकासासाठी या जागा

घेतल्या होत्या. परंतू त्याठिकाणी हा विकास झालेला दिसत नाही. १९७२ मध्ये म्हणजे प्राधिकरणाची स्थापना होऊन जवळजवळ आज पंचेचाळीस वर्षे झाली आहेत. ज्यावेळी कुठलाही विकास आराखडा मंजूर होतो, तेव्हा ३० वर्षांच्या कालावधीत मंजूर विकास आराखड्यातील आरक्षणे विकसित करायची असतात. आज पंचेचाळीस वर्षांनंतर प्राधिकरणाला जाग आली. आणि रिंगरोडचा खूप मोठ्ठा डोंगर आपल्यावर ठेवलेला आहे. या रिंगरोडला माझा वैयक्तिक विरोध राहील. मला वाटते, इथे जे सन्माननीय नगरसदस्य बसलेले आहेत. त्यांचा सगळ्यांचा या विषयाला विरोध राहील. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब माझी आपल्याला विनंती राहील की, संपूर्ण सभागृहाच्या वतीने मा.मुख्यमंत्री यांना निवेदन द्यावे आणि हा रिंगरोड रद्द करण्यात यावा. धन्यवाद.

**मा.झामाबाई बारणे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार बंधू,गॅलरीत जे उपस्थित आहेत, त्यांच्या मनांत जी चिंता आहे, ते सर्व बंधू आणि भगिनी. खरेतर हा प्रश्न जिव्हाळ्याचा आहे. एकंदरीत थेरगाव परीसरात प्राधिकरण व अनधिकृत बांधकामाची सतत टांगती तलवार नागरीकांच्या डोक्यावर होती. आत्ता सुद्धा आहे. खरेतर या परीसरात चिंचवडेनगर, वाल्हेकरवाडी, वाकडचा काही भाग आहे. याठिकाणी मला एवढेच सांगायचे आहे की, या परीसरात जे प्राधिकरण पोचलेले आहे. या परिसरात बाहेरून आलेले नागरीक आहेत. जे नागरीक पोटाची खळगी भरण्यासाठी, नोकरीच्या निमित्ताने इथे येतात. त्यांनी त्यांच्या ऐपतीने गुंठा/अर्धा गुंठा जागा घेऊन घरे बांधलेली आहेत. त्यांनी छोटी-छोटी घरकुले उभी केली आहेत. त्यांनी काय पाप केले होते का. हे सभागृहात सांगावेसे वाटते. खरेतर त्या लोकांची अशी परिस्थिती की, एकिकडे प्राधिकरण. बांधकाम काढले, थोडसं केलंनाही तर लगेच आले प्राधिकरणाचे लोकं पाडापाडी करायला. नंतर कुठे काय करायचे असेलतर नागरीकांना सुविधा सुद्धा पुरवल्या जात नव्हत्या. पाडापाडी करायची. महापालिका व प्राधिकरण या दोन्हींच्या कचाट्यात त्या नागरीकांचे हाल होत होते. त्यांचे खरेतर जगणे मुश्किल झाले होते. आत्ता सुद्धा त्यांच्यावर हिच वेळ आलेली आहे. त्यांना नागरी सुविधा द्यायचे म्हटले तरी नागरी सुविधा देण्याचा ठराव केला. त्यावेळी पवार साहेबांनी जो विषय मंजूर केला. श्री.श्रीनिवास पाटील साहेब हे त्यावेळी आयुक्त होते आणि ते प्राधिकरणाचे सुद्धा अध्यक्ष होते. त्यांनी नागरी सुविधा देण्याचा विषय मंजूर केला. खरेतर याठिकाणी नागरीक राहतात. त्या लोकांना प्राधिकरणाने सुविधा दिल्या पाहीजेत. याचा त्यांनी उल्लेख केला होता. प्राधिकरण व महापालिका दोन्हींच्यामध्ये लोक रहात आहेत. या विषयावर विषय झाला. त्यावेळी पालकमंत्री श्री.अनंतराव थोपटे साहेब होते. खासदार नानासाहेब होते, आमदार ज्ञानेश्वर लांडगे होते, आणि अशोक मोहोळ होते. त्यावेळी पुणे सर्किट हाऊसला मिटींगमध्ये हा विषय मंजूर झाला. काहीतरी कारण देत किंवा दंड भरुन किंवा कुठल्या ना कुठल्या कारणाने यांच्याकडून महापालिकेला उत्पन्न मिळावे अशा पद्धतीने त्यांनी तो विषय केला होता. त्या

लोकांना रु.४/- प्रति स्क्वे.फूट असा डेव्हलपमेंट चार्ज भरावा लागला. असा डेव्हलपमेंट चार्ज भरुन त्या लोकांना तिथे नागरी सुविधा दिल्या गेल्या. पाण्याची लाईन असेल, सार्वजनिक नळ असेल, घरगुती नळ असेल, लाईट असेल अशा ज्या मुलभूत गरजा होत्या. महापालिका व प्राधिकरण यांच्याकडून त्या लोकांना या सुविधा पुरवल्या गेल्या. त्यानंतर अनधिकृत बांधकामे वाढत गेली. अधिकृत बांधकाम, अनधिकृत बांधकाम अशा अनेक अडचणींना त्या लोकांना सामोरे जावे लागले. प्राधिकरणाचा शिक्का असल्यामुळे कुठली बँक त्यांना कर्ज द्यायला तयार नव्हती. म्हणजे त्या लोकांनी खूप सहन केले आहे. आणि आता हा रिंगरोडचा प्रश्न आहे. अनेक लोकांची घरे त्यात जाणार आहेत. अनेक लोकांच्या घरांवर बुलडोजर फिरणार आहे. मला एवढेच दु:ख वाटते की, हा विषय पुन्हा त्यांच्यापुढे आलेला आहे. अनेक ठिकाणी अनेक शेतक-यांच्या जमिनी आहेत. आम्हीही शेतकरी आहोत. आमच्या पण ब-याचश्या जमिनी रिंगरोडमध्ये गेल्या आहेत. आत्ता रिंगरोडमध्ये जाणार आहेत. पवना नदीपाशी आलं, पदमजीचं गेट संपलं की आमचा बंगला आहे. आमचा बंगलासुद्धा त्यामध्ये जाणार आहे. मी आमच्यासाठी काही म्हणतच नाही. सर्वसाधारण जे गोरगरीब आहेत, नागरीक आहेत, त्यांच्यासाठी आपण याठिकाणी विचार करावा. मा.मुख्यमंत्र्यांनी विषय केला आहे. मा.आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांनी सुद्धा त्यांच्या आमदारकीच्या काळात त्यावेळी राजिनामा दिला होता. शास्तीकर रद्द करावा म्हणून त्यांनी सुद्धा त्यांच्या पदाचा त्याग केलेला आहे. दोन्ही आमदार मा.महेशदादा लांडगे व मा.लक्ष्मणभाऊ जगताप हे सुद्धा महापालिकेच्या कारभारात लक्ष घालतात. लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी मा.पालकमंत्र्यांनी लक्ष घातलेले आहे. मा.मुख्यमंत्र्यांनी लक्ष घातलेले आहे. खरेतर या गरीबांवर संकट आलेले आहे. या गरीबांच्या अडचणी जाणणारा कोणीतरी नेता पाहीजे. या रिंगरोडच्या विषयात ज्यांची बांधकामे पाडली जातील त्यांना पर्यायी जागा देणार आहात का. त्यांचे काय करणार आहात. किती लोकांची पर्यायी व्यवस्था करणार आहात. आत्तापर्यंत जेवढी जेवढी बांधकामे केली आहेत, काहींची रोडमध्ये गेली आहेत, काहींची घरे आरक्षणात गेली आहेत. कुठल्या कुठल्या लोकांना पर्यायी जागा देणार आहात. रिंग रोड हा पर्यायी बाजूने झाला पाहिजे. एवढीच याठिकाणी विनंती करते व थांबते.

**मा.निलेश बारणे-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार बंधू, खरेतर गेल्या दीड/दोन महिन्यांपासून आपण या सभेसाठी वाट बघत होतो. मी आयुक्त साहेबांचे धन्यवाद करतो. खरेतर पिंपरी चिंचवड प्राधिकरण व पिंपरी चिंचवड महानगरपालिका १९७२ साली प्राधिकरणाने या सर्व भागावर आरक्षण टाकले. खरेतर शेतक-यांना तुम्ही जर मोबदला दिला असतातर ही गोष्टच उद्भवली नसती. तुम्ही शेतक-यांना मोबदला दिला नाही. त्यांच्या कुठल्याही सोयी केल्या नाहीत. लोकांनी गुंठा, अर्धा गुंठा करुन जागा विकल्या. आणि बांधकामे झाली. १९९५ साली विकास आराखडा मंजूर झाला. थेरगाव,वाल्हेकरवाडी हा ३० मी. रोड

दर्शविला आहे. हा रिंगरोड कधीच ताब्यात घेतला नाही. या भागात दीड ते दोन हजार बाधित लोक आहेत. खरेतर करसंकलन विभाग आहे. लाईट, पाणी, टॅक्स एकिकडे तुम्ही सगळा मोबदला देताय. त्यांच्याकडून टॅक्स गोळा करताय. आणि इकडे नोटीस सुद्धा बजावताय. खरेतर मी मा.आयूब पठाण साहेबांना विचारतो. त्यांनी खुलासा करावा. साधारणपणे शासनाच्या नियमानुसार तुम्ही २० वर्षांत जागा ताब्यात घेतली नाहीतर त्या जागेचा मालक हा शेतकरी असतो. रिंगरोडबाबत प्राधिकरणाकडे आपण खुलासा मागितला होता,प्राधिकरणाकडून माहिती मागविण्यात आली होती की, आजपर्यंत कुठलीही जाहीरात, नोटीस अभिलेखित नसल्याचे उत्तर त्यांनी दिले आहे. त्यामुळे प्राधिकरणाच्या मागील ३५ वर्षांत कंपाऊंड, मार्जिन, सूचना, जाहीराती असे कुठलेही प्राधिकरणाने केले नसल्याचे सूचित केले आहे. या परिसरातील गुरुद्वारा, बिजलीनगर, वाल्हेकरवाडी, रहाटणी, पिंपळेगुरव, पिंपळेसौदागर हा भाग बाधित होतो आहे. खरेतर या भागात गरीब लोक आहेत. त्यांनी स्वतःचे दागिने विकून, गावाकडील जमिनी विकून घरे बांधली आहेत. थेरगाव सर्वे क्र.११,४,२२ इथे कोणी मारवाडी नाही, कोणी सिंधी नाही, सगळी गरीब जनता इथे आली आहे. मा.आयुक्त साहेब, शंभर-शंभर एकरांचे, दहा-दहा एकरांचे बिल्डरांचे जे प्लॉट होते ते आज आर झोन करण्यात आले, का करण्यात आले याचा खुलासा आजपर्यंत कोणी दिला नाही. मा.आयुक्त साहेब, गरीबांची घरे पाडायला निघाले आहेत, हे कुठेतरी थांबले पाहिजे. खरेतर मी मा.दत्ताकाका साने यांचे आभार मानतो. मा.एकनाथ पवार यांना पण सांगतो. सभागृहाने ठरवले तर विषय होऊ शकतो. याचे जीवंत उदाहरण दत्ता काका साने हे आहेत. २००५ साली चिखलीमध्ये मा.दत्ता काका साने यांनी आंदोलन चालू केले होते ते २०१० साली संपले. तेथील सगळ्या रिंगरोड बाधितांना प्राधिकरणाकडून प्लॉट दिले आहेत. आपल्याला असे काही करता येईल का. खरेतर त्यांना बाजूला घरे देण्यात आली. एका माणसाला १५०० स्क्वे. फूटाचे घर दिले आहे. खरेतर मा.एकनाथ पवार व सर्व सभागृहाने ठरवलेतर देता येण्यासारखे आहे. मी आयुक्त साहेबांना विनंती करतो की, वाल्हेकरवाडीपासून होणारा हा रिंगरोड जवळजवळ ४५ मी. रस्ता आहे. वाल्हेकरवाडीपासून थेरगाव पूलापर्यंत बिर्ला हॉस्पिटल मार्गे मंगल कार्यालय चौकापर्यंत जातो नंतर थेरगावपासून डांगे चौक, डांगे चौकापासून डायरेक्ट जगताप डेअरीपर्यंत जाऊ शकतो. जर हा रस्ता केलातर ही बाधित घरे वाचतील. मा.आयुक्त साहेब, आपण यावर गांभिर्याने विचार करावा. मा.आयूब पठाण साहेबांना मी एकच प्रश्न विचारतो की, २० वर्षांपासून शेतकरी जमिनमालक आहेत. ती जागा ताब्यात घेतली नाहीतर तो जमिन मालक होतो का याचा आपण फक्त खुलासा करावा. जयहिंद, जयमहाराष्ट्र.

**मा.राजेंद्र लांडगे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,आज जो विषय चर्चेसाठी घेतला आहे, तो गोरगरीबांच्या खूपच जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. आज आपण विचार करतो की, रिंगरोड बाधित लोकांचे काय. तसाच प्रश्न प्राधिकरणातील भूसंपादन झालेल्या

जागांचा आहे. भोसरी असेल, काळेवाडी असेल, रहाटणी असेल, थेरगाव असेल, वाल्हेकरवाडी असेल, इथल्या लोकांच्या डोक्यावर टांगती तलवार आहे. रिंगरोडमुळे या लोकांना प्रश्न निर्माण झाला आहे की, आमची घरे जातील का राहतील. तसेच उद्या प्राधिकरण ही जागा देईल का. ज्यावेळी प्राधिकरणाने आमच्या भोसरीतली जागा घेतली, १९८२ साली तिथे भूसंपादन केले. आजतागायत त्या जागेवर कुठलाही विकास केलेला नाही. किंवा आत्तापर्यंत तिथे काही केले नाही. मग तिथे जी गोरगरीब लोकं होती, त्यांनी घरे बांधली. अर्धा गुंठा, एक गुंठा. त्या जागेवर आपल्या महापालिकेने बराचसा विकास केलेला आहे. महापालिका टॅक्स वसूल करते आहे. परंतू आजपर्यंत त्या बांधकामांचे पत्रे फूटले आणि बदलायचे म्हटलेतरी प्राधिकरणाची गाडी येते आणि म्हणते की इथे बांधकाम करु नका. खरेतर त्यांना तिथे काहीच करायचे नाही. विकास तर केलाच नाही. कुठले आरक्षण नाही. ब-याच ठिकाणी अशा जागा आहेत, प्राधिकरणाला त्यांची गरज पण नाही. जर गोरगरीबांसाठी प्राधिकरण अस्तित्वात आले. त्यांनी तिथे कुठलाही विकास केला नाही. तिथे गोरगरीबच राहतात तर ही घरे अधिकृत व्हायला पाहिजेत. आज जसा रिंगरोडचा प्रश्न उद्भवला आहे. तसे उद्या प्राधिकरण म्हणेल की, तिथे दूसरे काहीतरी आरक्षण टाकून ती जागा ताब्यात घेऊ. अशाप्रकारे त्या गोरगरीबांचा प्रश्न उपस्थित होणार आहे. असा बराच परिसर आहे जिथे प्राधिकरण ऍक्वायर्ड असल्यामुळे लोकांना ब-याचशा सोयीसुविधा देता येत नाही. माझा प्र.क्र.६ हा पूर्णपणे अनधिकृत बांधकामांचा प्रभाग आहे. एका बाजूला रेडझोन आहे, एका बाजूला प्राधिकरण आहे. तिथे कोणत्याही प्रकारचा विकास करता येत नाही. २५ वर्षांपूर्वी झालेल्या विकासावर सगळे चालू आहे. आज ड्रेनेज लाईन करायचे म्हटलेतरी अधिकारी सांगतात की तिथे विकास करता येत नाही. ब-याच अश्या अडचणी आहेत. काही ठिकाणी तर पाण्याची लाईन पण नाही. लोकांना इतका त्रास होतो आहे की, आजसुद्धा त्याठिकाणी टँकरने पाणीपुरवठा केला जातो आहे. लोक टॅक्स भरतात, सगळं करतात. तरी आपण त्यांना पाणी सुद्धा देऊ शकत नाही ही शोकांतिका आहे. म्हणून मा.महापौर साहेब, मला तुम्हाला एवढेच सांगायचे आहे की, लोकांवर ही जी टांगती तलवार आहे, यासाठी जे नगरसदस्य आहेत, त्यांच्या सगळ्यांच्या उपस्थितीत अत्यंत चांगला विषय मांडून किंवा चांगली चर्चा करुन मा.मुख्यमंत्री असतील, मा.पालकमंत्री असतील त्यांना आपण चांगले निवेदन देऊन ज्या समस्या उत्पन्न होणार आहेत, त्या सोडवण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांना आपलेमार्फत सभा लावून हा प्रश्न मांडावा, अशी मी इच्छा व्यक्त करतो. धन्यवाद.

**मा.भाऊसाहेब भोईर**-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, पत्रकार बंधू, याठिकाणी सर्व सभागृहाला नम्र विनंती करतो की, हा विषय कोण सत्तेवर आहे. कोण सभागृहात बहुमतात आहे. याहीपेक्षा हे शहरावरील फार मोठे संकट आहे. म्हणून राजकीय भांडवल न करता गांभिर्याने विषय घेऊन, याठिकाणी सर्वांनी आपले मत व्यक्त करुन निर्णायक भूमिका घेऊन राज्य शासनाची मनधरणी करावी. कारण मा.महापौर साहेब, मी पत्रव्यवहार

करुन या विषयासंदर्भात चर्चा करावी असे पहिल्यांदा नमूद केले होते. पंचवीस वर्षे राजकीय जीवनात काम करत असताना कोणत्याही चुकीच्या आंदोलनात मी आजपर्यंत भाग घेतलेला नाही. आम्ही महापालिकेत सत्तेवर नव्हतो. पण राज्यात आमच्या पक्षाचा मुख्यमंत्री असताना त्यावेळी देखील मला अनेक वेळा सांगण्यात आले की, अनधिकृत घरांसंदर्भात वातावरण खूप तीव्र आहे. तुम्ही या आंदोलनात भाग घ्या. त्यावेळी पण मी सांगितले होते की, ही न्यायप्रविष्ट बाब असल्याकारणाने मी या आंदोलनात येणार नाही. त्याचे परिणाम आम्हाला भोगावे लागले. आमच्यावर अनंत टिका झाली. नंतर त्या कालखंडात अनेकांनी अनेक पद्धतीने कार्यभाग साधला. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मी २००१ ते २००४ पर्यंत प्राधिकरणात सदस्य होतो. प्राधिकरणात डि.पी. नसतो, प्राधिकरणाचा लेआऊट असतो. आणि नियोजन आराखडा हा महानगरपालिकेचा असतो. आम्ही शालेय जीवनात असल्यापासून १९८६ पासून रिंगरोड, रिंगरोड या शब्दाचा प्रयोग करतोय. जंगलामध्ये किंवा शासनाची पेट्रोलची लाईन जाते, तिथे सुद्धा जनावरे पोहोचत नाहीत. तिथे लाल रेष निर्माण केलेली असते. त्या भागात गुरे सुद्धा जात नाहीत. रिंगरोड संदर्भात वारंवार ज्या पद्धतीने वातावरण निर्माण झाले आहे, तो आजचा विषय आहे का. तुम्हाला रिंगरोड करायचा आहे. १९८६ पासून ते आजतागायत याठिकाणी किमान त्या परिसरात कोणतीही घटना होऊ नये. तिथे कोणत्याही पद्धतीने अतिक्रमण होऊ नये. अशा पद्धतीच्या प्रशासनाने कोणत्या उपाययोजना केल्या. मला एकाने विचारले की, तुम्ही रिंगरोडमध्ये काम करताय, तुम्हाला कळत नाही का. आम्ही गाढव आहोत. आम्हाला कळत नाही. आम्ही आहोत, आम्ही नागरीक आहोत म्हणून आम्ही अज्ञानी आहोत. आम्ही त्याठिकाणी काम केले. आमची चूक झाली, नाही झाली. तुम्ही ज्या खुर्चीवर बसलेला आहात, ज्या खुर्चीचा तुम्हाला पगार मिळतो, त्या माध्यमातून त्या परिसरात पाच/सहा वर्षांत रितसर खरेदीखते झाली आहेत. २००१ मध्ये जेव्हा मी प्राधिकरणाचा सदस्य झालो, त्यावेळी २००२ साली माझ्याकडे वाल्हेकरवाडी, गुरुद्वाराचा परिसर होता. त्या भागाचा मी नगरसेवक झालो आणि मला फायदा कोणत्या गोष्टीचा झाला. त्याठिकाणी मला कोणतीही विकासाची कामे करता येत नव्हती. मी हे पहिल्यांदा बोलतोय असे नाही. याचे सगळे पूरावे प्रोसिडींगमध्ये, महानगरपालिकेच्या दप्तरी दाखल आहेत. पहिले उमेशचंद्र सारंगी साहेब होते, निर्मल देशमुख साहेब होते. सर्वे क्र.२९ च्या डी.वाय.पाटील परीसरात लेआऊटचे काम चालू होते. ते माझ्या पाठिमागे आले. कोणतेही काम करायला गेलोतरी, गटर्स करायचे होते, अंडरग्राऊटींग नव्हते, काहीही करायला गेलोतरी एनओसी नाही. प्राधिकरणाची हद्द, नगरसेवक तिथला. विकासाची कामे करायची तर प्राधिकरणाचा संबंध नाही. लेआऊटच्या माध्यमातून जे प्लॉट विक्रीधारक आहेत त्याच्यावर लोड करुन ते विकास जाहीर करायचे. माझी पंचाईत झाली. मी देखील त्या अधिका-याचे जाहीरपणे नाव सांगतो. निर्मलकुमार देखमुख या अधिका-यांनी त्याठिकाणी मला प्राधिकरणाची हद्द महापालिकेची विकास कामे करण्यासाठी जाहीर एनओसी दिली. त्याची

हायकोर्टात देखील नोंद आहे. त्यावेळी सुद्धा एनओसी देताना त्यांनी अशी द्यायला पाहिजे होती की, याठिकाणी प्रस्तावित रिंगरोड आहे. रिंगरोडमध्ये कोणतीही बांधकामे,विकास कामे करता येणार नाहीत. त्याव्यतिरिक्त तुम्हाला काय विकास करायचा असेल तो तुम्ही करा. साधी बाब होती. आम्ही शंभर टक्के चूकत आहोत. प्रशासन देखील चूकतेय. झालेल्या चुकीचे प्रायश्चित्त फक्त जनतेनेच करायचे का. प्रशासन शंभर टक्के चूकलेले आहे. त्याचठिकाणी रिंगरोडवर खरेदीखते झाली आहेत. म्हणजे महसूल विभागाने महसूलातून उत्पन्न निर्माण केले. वीज दिली गेली म्हणजे तिथे एमएसईबी आली. महापालिकेचे करसंकलन आले म्हणजे तिथे महापालिका आली. पाणीपुरवठ्याचे रितसर कनेक्शन दिले. म्हणजे पाणीपुरवठा खाते आले. मग शिल्लक कोणते राहीले. मी स्वतः अंडरग्राऊंड ड्रेनेज तिथे केलयं. पाण्याच्या लाईन टाकल्या आहेत. मी सुद्धा त्यावेळी अज्ञानी होतो. मला सुद्धा अक्कल नव्हती. जर मला त्यावेळी असे समजून सांगितले असते की त्याठिकाणी रिंगरोड होणार आहे. या नागरीकांना सावध करा. मूळ मालक त्रासलेला असतो. मा.आयुक्त साहेब, १९८५ अगोदर शेतक-यांनी जादा दिल्या आहेत. जे सुशोभित, सुंदर बंगले बघायला आपण प्राधिकरणात जातो. ही १९८५च्या अगोदरची घरे आहेत. १९८५ अगोदरच्या शेतक-यांनी मोकाट ताबे दिले. त्यामुळे प्राधिकरणाचा नावलौकिक झाला. शेतक-यांना मोबदला दिला नाही. त्यांना साडेबारा टक्के दिले नाहीत. १९८५ नंतरच्या लोकांना साडेबारा टक्के दिले. ते लोक तो लढा आजही लढताहेत. आमचे दत्ता काका आहेत, प्रमोद कुटे आहेत. मुद्दा असा येतो की, मी या सभागृहात नम्र आवाहन करतो की, चूकीचे प्रायश्चित्त करायचे असेलतर केवळ जनतेनीच करुन नाही चालणार. या जनतेच्या जीवावर आपण सभागृहात प्रतिनिधित्व करतोय. प्रशासन आहे त्यांच्या चूकांचे प्रायश्चित्त कोणी करायचे तर ते पण त्यांनीच करायचे का. भावना व विकास या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. भावना व कायदा या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. एवढे मला समजते. मुद्दा असा आहे की, केवळ एकाने भावना दाखवत असताना आपण कोणत्या कायदेशीर मार्गाने त्यांना जागे केले होते. कोणत्या कायदेशीर मार्गाने आपण आजपर्यंत त्यांना रिंगरोडसंदर्भात नोटीसा दिल्या आहेत. एकाही अतिक्रमण विभागाने एकदातरी नोटीस दिली असेल, कारवाई केली असेलतर आज आम्ही त्यांची इथे बाजू घेणार नाही. एमएसईबीने त्यांना कधी पत्र पाठवले नाही. करसंकलन विभागाने त्यांना कधी पत्र पाठवले नाही. नळ कनेक्शन लगेच देऊन टाकतात. त्या वॉलमनला किंवा त्या प्लंबरला एवढा मान आहे, तेवढा आम्हाला सुद्धा नाही. कोणी नळ कनेक्शन घ्यायला गेला की, त्याला सांगतात, रेट वाढलाय. आत्ता घे. तुला एवढ्या रेटने नळ कनेक्शन देतो. अशा पद्धतीने रिंगरोड बाधित लोकांना नळ कनेक्शनसुद्धा दिले आहेत. यावर काय फायदा होणार आहे. काय राजकीय समिकरणे चालणार आहेत. याही पलिकडे जाऊन हा विषय गाजणार आहे. एक महिला आली होती. तिला सांगतानासुद्धा तिच्या अश्रूंचा बांध फूटला. तिला सांगता सुद्धा येत नव्हते की आमचे घर वाचवा. मी भावनात्मक भाषण करणार नाही.

तुम्ही म्हणाल रिंगरोड करणे आवश्यक आहे. आवश्यक आहे पण रिंगरोड करत असताना त्याचे प्रायश्चित्त फक्त जनतेने करुन चालणार नाही. रिंगरोडला पर्याय देखील आहेत. तुम्ही तिथे जागा चेंज करु शकता. संपूर्ण सभागृहाने, तुम्ही असा प्रस्ताव तयार करा. रिंगरोड झाला पाहीजे असे कोणी विचारलेतर मी म्हणेन हो रिंगरोड झाला पाहीजे. रिंगरोड करत असताना पंचवीस लोकांचे बळी देऊन तिथे रोड करण्यात आम्हाला कोणताही इंटरेस्ट नाही. तिथे रिंगरोड आहे म्हणून शहर चालेल अशातला भाग नाही. रिंगरोड झाला पाहीजे. फक्त दोन अडीच किलोमीटरचा प्रश्न आहे. याठिकाणी हरकती/सूचना करायचा उद्याचा शेवटचा दिवस आहे. महापालिकेच्या वतीने हरकती/सूचना, तक्रारी नोंदवून त्यावर बंधन घालून, तुम्हाला काय करता येईल का. त्यांच्या भावनेला, किंवा त्यांच्या विचारांना कोणी मानायचेच नाही. मग त्यांचा उदय होतो. मग कोणीतरी सांगायचे तुम्ही राजकीय भाषण करता. मी त्यांच्या एकाही सभेला गेलो नाही. पक्षीय वातावरण होईल किंवा राजकीय वळण लागेल असा मी कधी फायदा केला नाही, करणार नाही. हा आमचा धंदा नाही. म्हणून सदसदविवेकबुद्धी जागृत ठेवून या सभागृहाने कोण कोणाच्या काळात काय झाले सारखे तुम्ही विव्हळत बसू नका. पूर्वी काहीतरी झाले म्हणून तुम्ही आज इथे आहात. मुद्दा असा आहे की, या सगळ्या पद्धतीने आम्ही चूकलो ना. तुम्ही चुकत असताना आम्ही म्हणत नाही, तुम्ही चूका करताय. हे सगळे करत असताना तुझे-माझे करण्यासाठी हे सभागृह नाही. मी या पक्षाचा, मी त्या पक्षाचा याही पलिकडे जाऊन आपण एक माणूसकीच्या नात्याने, मानवतेच्या नात्याने कुठेतरी आम्ही तुमचे कोणीतरी लागतो. त्या एका-एका मतासाठी, पराभव होतो, जिंकतो, त्याहीपेक्षा घरोघरी जाऊन त्यांचे पाय धरलेले आहेत. म्हणून याची जाणिव ठेवून आपण हा निर्णय घेतला. म्हणून मला वाटते, मा.महापौर साहेब, हा विषय फार ताणत ठेवलातर अशी म्हण आहे की, नंगे को तो खुदा भी डरता है। ते बिचारे पार रस्त्यावर आलेले आहेत. ते कोणत्याही थराला जातील. काहींचे तर म्हणणे आहे की, माझे काय राहीले आहे आता माझे घरच राहीलेले नाही. प्रत्येकाचे स्वप्न असते की, माझे घर असावे म्हणून. त्यात कोणी परस्पर घाला घालत असेलतर तो म्हणेनस मी आत्महत्या केलीतरी काय फरक पडणार आहे. व्हॉटस् अपवर कोण काय बोलतो ते पटापट पटापट पोचायच्या आत बोलायच्या आत पाठ होते. यात कोणतेही राजकारण होऊ नये अशी माझी भावना आहे. माझी सभागृहाला नम्र विनंती आहे, मा.एकनाथ पवार आपण पक्षाचे नेते आहात, या सभागृहाचे नेते आहात. पर्यायाने आमचे नेते आहात. अनुभव किती वर्षांचा यापेक्षा पदाने मोठ्या असणा-या माणसाला आपण मान देणे हा आपला संस्कार आहे. म्हणून मला असे वाटतेय की, यावर फार ऊहापोह करण्यापेक्षा जुन्या लोकांनी काय केले, परवा यांनी काय केले, तेरवा लोकांनी काय केले. प्राधिकरणासारख्या अधिका-यांनी लूट केली आहे. काहीजण रिटायर्ड झाले. काहीजण मेले. या लोकांना परवानगी दिली. मूळ मालकाने जागा विकली. त्यांची दुसरी,तिसरी पिढी त्यांना नोक-या नाहीत. आमच्यासारख्या काही मंडळी त्यांनी त्यात

दलाली केली. जागा गेल्या. ते तर मोकाट सूटले आहेत. या सगळ्या परिस्थितीचा भार घेऊन गांभिर्याने विचार करा. मी आज बोलायला पाहीजे, मी बोललो, माझी जबाबदारी संपली, इथपर्यंत सभागृहात हा विषय होणार असेलतर आपल्याला परमेश्वर देखील सोडणार नाही. कारण त्यांच्या जीवनाचा प्रश्न आहे. म्हणून मा.महापौर साहेब, आपल्याला विनंती आहे की, आपण स्वतः मा.मुख्यमंत्र्यांना भेटून, किमान मी असे म्हणणार नाही की, तुम्ही तो रोड रद्द करावा. मी तुम्हाला सांगत नाही. मी तुम्हाला खाजगीमध्ये सांगेन की रस्ता कुठून न्यायचा आहे. मी आख्ख्या प्राधिकरणाचा निम्मा लेआऊट आधी केला आहे. आम्हाला माहित आहे, रस्ते कसे करायचे. गुरुद्वाराची ८० ते ९० घरे, त्याकाळी लेआऊट चेंज केला. आत्तादेखील याचा पुरावा आहे. लेआऊट चेंज करता येतो. फक्त तो चेंज करायची मानसिकता असावी लागते. कारण आपले नगररचनाचे ऑफीस काय दूबईला नाही, इथे मुंबईतच आहे. त्यामुळे आपण त्या पद्धतीने पाऊले टाकावीत. त्याच्या भावनेशी तुम्ही कोणीच खेळू नका. मा.महापौर साहेब, आपण या भागाचा दौरा करा आणि त्यांची अवस्था काय आहे ते बघा. त्यांना जेवणसुद्धा जात नाही. अशी भावना व्यक्त करत असताना सभागृहाने सदसदविवेकबुद्धी जागरूक ठेवत असताना सर्वपक्षीय एका वाक्यात ठराव करुन आपण या विषयाला कलाटणी द्यावी अशी मी विनंती करतो.

**मा. ॲड.सचिन भोसले**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,मा.अधिकारी व पत्रकार बंधू,अतिशय महत्वाचा आणि नागरीकांच्या अतिशय जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. आपण आज या विषयावर इथे चर्चा करतोय. आपण खरोखर मनापासून चर्चा करायला परवानगी दिल्याबद्दल मी मा.महापौर यांचे अभिनंदन करतो. त्यांना धन्यवाद देतो. आपण पाहिलेतर गेले तीस/ पस्तीस वर्षांपासूनचे रिंगरोडचे आरक्षण आहे. ख-या अर्थाने पाहिलेतर ज्यावेळी विकासात्मक आरक्षण टाकले जाते, त्याचवेळी प्राधिकरणाचे त्यावेळचे काम होते की, त्यांनी ज्यावेळी रिंगरोडचे आरक्षण टाकले, त्यानंतर ताबडतोब रिंगरोड बाधित क्षेत्र होते ते ताब्यात घ्यायचे होते. ते प्रशासनाला जमले नाही. वास्तविक पाहता, गेले ३०/३६ वर्षात आपण पाहिलेतर रिंगरोडचा जो पट्टा आहे, या पट्टयावर कष्ट करुन, पै-पै जमवून लोकांनी त्याठिकाणी घरे बांधली आहेत. ही घरे बांधत असताना प्रशासनाने, पालिकेने या लोकांना सर्व नागरी सुविधा पुरविल्या आहेत. म्हणजे एकंदरीता त्यावेळी ते सुरक्षित आहेत, अशी भावना त्यांच्या मनात तयार केली गेली. त्यामुळे तिथे बांधकामे झाली. तुम्ही त्यांच्याकडून करोडो रुपये टॅक्सच्या रुपाने, पाणीपट्टीच्या रुपाने जमा केले. आत्ताच ज्येष्ठ नेते मा.भाऊसाहेब भोईर यांनी सांगितले की, तिथे खरेदीखते झाली, डॉक्युमेंट झाले. यातून सरकारला खूप मोठ्या प्रमाणात महसूल प्राप्त झाला आहे. असे असताना या सगळ्या गोष्टींचा विचार करता, जर प्रशासन आपल्या कामामध्ये कमी पडले आहे तर त्यात नागरीकांना जबाबदार धरणे कितपत योग्य आहे. याचा सुद्धा विचार होणे गरजेचे आहे. कारण प्रत्येकाला आपल्या हक्काचे घर राईट

टू प्रॉपर्टी, कॉन्स्टीट्युशनल राईट, राज्यघटनेने सर्वांना दिलेला हा अधिकार आहे. परंतू या अधिकारांचा कोण गैरवापर करत असतील तर ही जनता ज्यांनी स्वतःच्या कष्टांवर घर बांधले असेल, ती हे कधीच सहन करणार नाही. आपण पाहतोय, गेले दोन महिन्यांपासून रिंगरोडसंदर्भात आंदोलन चालू आहे. काही दिवसांपूर्वी मा.मुख्यमंत्री इथे आले होते. अतिशय दुःखाची बाब आहे की, जे नागरीक सन्मा.मुख्यमंत्र्यांना रिंगरोडच्या विषयासंदर्भात त्यांना भेटण्यासाठी जमले होते, त्यांच्यावरती लाठीमार करण्यात आला. ही अतिशय दूर्दैवाची बाब आहे. ख-या अर्थाने मा.मुख्यमंत्री या लोकांना भेटले नाहीत. ही दुःखाची बाब आहे की, याठिकाणी मुख्यमंत्र्यांना रस्ता बदलून जावे लागले.

**मा.महापौर** - तुम्ही विषयावर बोला. बाकीचं काही बोलू नका.

**मा. ॲड.सचिन भोसले**-मा.महापौर साहेब, आपण याठिकाणी पाहतोय की, इथे नागरीकांची आर्थिक पिळवणूक झालेली आहे. ही गोष्ट सरळ सरळ लक्षात येते आहे. प्राधिकरणात आणि प्रस्तावित रिंगरोड संदर्भात आपण पाहिले तर, निवडणूकी अगोदर हेच मुख्यमंत्री महोदय शहरात आले होते. आणि त्यांनी सांगितले होते की, कुणाच्या एकाही विटेला हात लागू देणार नाही. आता निवडणूक होऊन सात महिने पण झाले नाहीतर लोकांच्या घरांवर बुलडोजर फिरायला लागला आहे. मला माझे म्हणणे मांडू द्या. तुम्हाला काय ॲक्शन घ्यायची ती घ्या.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर** – कोणी काय केले हे बोलण्यापेक्षा तुम्ही काय केले ते बोला.

**मा. ॲड.सचिन भोसले**-मा.महापौर साहेब, जर तुम्हाला जनतेच्या प्रश्नांचा एवढा कळवळा असेलतर आणि याअगोदर काहीजण बोलले की, नेत्यांनी राजीनामा दिला. तुम्हाला खरोखर तळमळ असेलतर या सभागृहात एक प्रस्ताव मंजूर करा. आणि विषय संपवा. आम्ही काहीच बोलत नाही. पण जो शब्द दिलाय तो तुम्ही पाळला पाहीजे. आज रिंगरोडबाधितांचा कमीत कमी ८०० लोकांचा प्रश्न आहे. माझे सहकारी मित्र आहेत, ते सुद्धा त्याच प्रभागातले आहेत. त्यांना सुद्धा आत्मियतेने, मनापासून तळमळ आहे. एकमताने प्रस्ताव मंजूर करा.

**मा.महापौर** – मा.सचिन भोसले सर्वांना या विषयाबद्दल तळमळ आहे. आपण या विषयावर चर्चा करु. कोणी काय केले ते नका बोलू.

**मा. ॲड.सचिन भोसले**-मा.महापौर साहेब, माझी सभागृहाला विनंती आहे की, विकास करायचा असेलतर विकासाला सर्वानुमते कोणीही विरोध करणार नाही. परंतू या नागरीकांच्या घरांवर, त्यांच्यावर अन्याय होणार नाही अशी तरतूद करुन त्याऐवजी दुसरा पर्यायी रोड उपलब्ध करुन तिथे विकास करावा, अशी माझी मनापासून विनंती आहे. इथे सांगण्यात येते की, रिंगरोड बाधितांचे पंतप्रधान आवास योजना किंवा अन्य योजनेत या नागरीकांचे पुनर्वसन होणार आहे. पंतप्रधान आवास योजना ही केंद्र शासनाची योजना असताना तुम्हाला, या सभागृहाला

याठिकाणी या नागरीकांचे पुनर्वसन करण्याचा अधिकार आहे का असे मी तुम्हाला याठिकाणी विचारतो. तो अधिकार आपल्याला आहे का, तो अधिकार आपल्याला नाही.

**मा.महापौर** – तुम्ही तुमचे सांगा. तुमचे म्हणणे मांडा.

**मा. ॲड.सचिन भोसले**-मा.महापौर साहेब, ज्या पद्धतीने लोकांना चूक सांगितली जाते आहे. लोकांची दिशाभूल करु नका. जी सत्य परिस्थिती आहे ती सत्य परिस्थिती लोकांना सांगा. त्यातून चांगला मार्ग काढा. जेणेकरुन कुठल्याही नागरीकांना त्रास होणार नाही. आर्थिक भूर्दंड सहन करावा लागणार नाही. त्यापद्धतीचा याठिकाणी नियम करावा.

**मा.महापौर** – तुमची मागणी ऐकून आपण आयुक्त साहेबांना सांगू की आपण यावर मार्ग काढावा. मा.दत्ता साने तुम्ही बोला. तुम्ही यात राजकारण आणताय. नाहीतर कोणाला तरी बोलायला सांगितले जाईल. तुम्ही भाषणाचे कशाला सांगताय.

**मा. ॲड.सचिन भोसले**-मा.महापौर साहेब, या सभागृहात एकमताने रिंगरोडचा प्रश्न मंजूर करुन नागरीकांना त्याचे उत्तर द्यावे एवढीच मी विनंती करतो.

**मा.दत्तात्रय साने** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, मी मा.महापौर यांचे मनापासून आभार मानतो. आज शहरात अतिशय गंभीर मोठा प्रश्न चालू आहे. रिंगरोड या माध्यमातून गेले दोन/तीन महिने आमच्या भागातील नागरीक अस्वस्थ आहेत की त्यांच्या डोक्यावर टांगती तलवार आहे. चर्चा घेतल्याबद्दल मनापासून आभार मानतो. मला खरोखर दोन/तीन प्रश्न विचारायचे आहेत की, या विषयाला अधिकारी कोण आहेत. मला एक माहिती या सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यायची आहे की, हा रिंग रोड किती किलोमीटरचा आहे. किती किलोमीटर रोड ताब्यात आला आहे. यातून सगळा खुलासा होईल. आत्ता नक्की किती किलोमीटरमध्ये अडचण आलेली आहे. किंवा नक्की कुठले नागरीक बाधित आहे. मला पाच प्रश्नांची उत्तरे पठाण साहेबांनी दिलीतरी कोणाकोणाच्या डोक्यात काय काय चालू आहे हे क्लिअरली माहिती होईल. याविषयी मला पाच प्रश्नांची उत्तरे पाहिजे आहेत. संपूर्ण रिंगरोडमध्ये बाधित घरे किती आहेत? काही ठिकाणी रिंगरोड झालातरी एका भागात रिंगरोड आहे आणि एका भागात रिंगरोड प्लस रस्ता आहे. या भागात किती ताब्यात आणि किती ताब्यात आलेला नाही? हा रिंगरोड कुठल्या साली या शहरात प्राधिकरणाने आणला आहे? याची माहिती द्यावी. या विषयात माझे अज्ञान असू शकते. किती वर्षांत एखादे आरक्षण ताब्यात घेतले नाहीतर ते आरक्षण पुन्हा त्या शेतक-याच्या ताब्यात जाते, असा एक कायदा आहे, नियम आहे. त्याबाबतीत उत्तर दिलेतर मला वाटते, रिंगरोडच्या प्रश्नांबद्दल चर्चा चालू आहे. या प्रश्नांची उत्तरे दिलीतर मला वाटते हे नागरीकांच्या माध्यमातून होतील. मला परत बोलू द्यावे.

**मा.महापौर**-ज्यांना बोलायचे आहे त्या सर्वांनी बोलून घ्यावे. नंतर प्रश्नांची उत्तरे दिली जातील.

**मा.दत्तात्रय साने -**मा.महापौर साहेब,मी विनंती करतो की, माझा परिसर सुद्धा या प्रसंगातून गेला आहे. ही टांगती तलवार वाल्हेकरवाडी या परिसरात चालू आहे. या भागात निगडीच्या जवळपास कुदळवाडी, मोशीचा पट्टा आहे. या भागात हा प्रसंग यापूर्वी होऊन गेला आहे. यात सदसदविवेकबुद्धी म्हणून त्याकाळात २००५ च्या काळात शरदनगर परिसर असेल, अंकुश चौक असेल, तळवडे परिसर असेल, कृष्णानगर या भागात हा विषय आला होता. यात सर्वांना ज्ञात आहे, माहित आहे. आदरणीय पक्षनेते, स्थायी समिती सभापती, महापौर, आयुक्त, संपूर्ण सभागृह यांना मी त्याकाळातला काही इतिहास सांगू इच्छितो. ज्यावेळी शरदनगर परिसरात असा प्रसंग आला त्या काळात जे कोणी बाधित होते. जसे आत्ता मा.भाऊसाहेब भोईर यांनी सांगितले किंवा दोघातिघांनी सांगितले की, त्या मूळ शेतक-यांना आजही, स्वतः माझी प्राधिकरणात दहा एकर चौसष्ट आर जमिन गेलेली असताना आजही साडेबारा टक्याने मोबदला मिळालेला नाही. १९७२ पासून आजपर्यंत मला मोबदला मिळालेला नसतानाही अशा काळात त्या परिसरातील त्या शेतक-यांनी अधिकृतरित्या सातबारा सर्व करत असताना त्यांची जागा दिली होती. त्या काळात २००५ पासून २०१० मध्ये आम्ही नको ती आंदोलने केलेली आहेत. आत्ता जसे हे लोक आंदोलन करत आहेत, त्यावेळी आम्ही सत्तेत असताना आंदोलने केली आहेत. त्याठिकाणी ज्या बाधितांची घरे जात होती, त्याच जागेच्या बाजूला त्यांना जागा देण्याबाबत जो निर्णय झाला होता, तसा निर्णय याबाबतीत व्हावा, अशी आमची अजिबात अपेक्षा नाही. त्यांची घरे गेली, त्याच्याच बाजूला १५० मीटरवर सेक्टर क्र.१९ मध्ये जवळपास ६५ लोकांना प्राधिकरणाने घर व जागा बांधून देण्याचा ऐतिहासिक निर्णय केला होता. त्याला मी जिवंत उदाहरण आहे. आम्ही काही ठिकाणी रस्ता वळवला, काही घरे वाचवली. काही घरे शिफ्ट केली, काही टर्न होता. हे सगळे केले. ज्यांची ज्यांची घरे वाचवता आली त्यांची घरे वाचवायचा प्रयत्न केला आहे. माझी आपल्याला अशीच विनंती राहील की, त्याठिकाणी वाल्हेकरवाडीपासून पुढे जॉईंट रस्ता आहे. त्या रस्त्याची गरज नसेल आणि त्याठिकाणी एखादा गोरगरीब किंवा एखादे घर किंवा तिथे जाणारी जी काही घरे आहेत ती शिफ्टींगमधून वाचत असतील, कारण आम्ही शरदनगरमध्ये काही ठिकाणी शिफ्टींग केले होते. काही ठिकाणी प्राधिकरणाच्या बाजूला तो रस्ता दाबला गेलेला आहे. मी सभागृहाला हे सांगू इच्छितो की, हा पूर्ण रस्ता होत असताना वाल्हेकरवाडी किंवा अन्य विषय घेण्यापेक्षा महानगरपालिका व प्राधिकरणाने जो शहाणपणा केलेला आहे. सदबुद्धी वापरलेली आहे. प्राधिकरणाच्या डी.पी. प्लॅनमधील रस्ता व महापालिकेचा रस्ता यांत ९.५ मी. चे अंतर आहे. तिथे रस्ता जॉईंट होत नाही. गेले सात वर्षांपासून आम्ही हेच बोंबलत होतो. तिथे येण्याजाण्यासाठी अडचण होते. तो एन.ए. झालेला प्लॉट आहे. त्या लोकांनी पूर्वी कलेक्टर एन.ए. करुन तिथे घरे बांधली आहेत. त्याठिकाणी अलाईनमेंट जॉईंट होत नाही. एका बाजूने गेलेतर प्राधिकरणाच्या बिल्डींग जातात. दुस-या बाजूने गेलो की नको ती घरे जातात. हे करत असताना जर आपली काही चूक

नसताना प्रशासनाची चूक, आपल्या अधिका-यांची केलेली चूक जर गोरगरीब नागरीकांच्या माथ्यावर मारत असालतर तो शंभर टक्के अन्याय आहे. माझी आपल्याला आग्रहाची विनंती आहे. त्या प्रसंगात आम्हीही बघितले आहे. त्या प्रसंगात कोण काय करत होते. लोकांना झोपा येत होत्या का नाही. आजही शंभर टक्के हिच परिस्थिती असणार आहे. माणसाचा मुलभूत अधिकार आहे, अन्न, वस्त्र व निवारा. ज्यासाठी माणूस त्याच्या प्रपंचाचा गाडा म्हणजे कुठपासून कुठपर्यंत जाणार आहे. त्यासाठीच तो लढत असतो. आपली मूलंबाळं असतील, आपलं घर असेल, अन्न, वस्त्र, निवारा असेल यासाठीच तुम्ही आम्ही सर्वजण प्रपंच करतोय. जर या प्रसंगाला तुम्ही असे चूकीच्या माध्यमातून काही करत असालतर या विषयाला माझा स्वतःचा शंभर टक्के विरोध राहणार आहे. मा.आयुक्त साहेब, मी विनंती करु इच्छितो की, आमच्या भागात प्राधिकरणाची घरे गेली आहेत. काही ठिकाणी ७५ मी. रस्ता आहे, काही ठिकाणी ४५ मी. चा रस्ता आहे. हा जॉईंट करत असताना ज्या लाईनमेंटच्या चूका आहेत. या माध्यमातून या नागरीकांना त्रास होत असेल, आमच्या भागात चूकीच्या अलाईनमेंट झाल्या असतील तर त्यात माझी आपल्याला विनंती राहील. आपण अजून एक नियम काढलाय की, ३१ मार्च २०१२ च्या अगोदरची घरे नियमानुसार लिगल केलेली आहेत. आपणच असा विषय सभागृहात आणला होता किंवा मंजूर झाला होता. जर ३१ मार्च २००८ किंवा २०१२ च्या अगोदरची घरे लिगल असतील तर ही घरे यापूर्वीची आहेत का नाहीत हे देखील आपण तपासले पाहीजे. मा.आयुक्त साहेब, मला आजही एक इतिहास कळालेला नाही. त्या काळातला १९७२/७६ दरम्यानचा रस्ता अजूनही ताब्यात घेतला नसेल, तिथे डिमार्केशन नसेल, तिथे कुठलाही बोर्ड प्राधिकरण, महापालिका किंवा अन्य बोर्ड नसेल, त्याठिकाणी खरेदी झाल्या असतील तर ही घरे अनधिकृत कशी. सगळ्यांना हा प्रश्न पडल्याशिवाय राहणार नाही. माझी आपल्याला विनंती आहे की, जर ही घरे रस्त्यांत असतील तर पूर्वी जो प्रश्न होता. प्राधिकरणात घरे बांधताना त्या वेळचे अधिकारी काय करत होते हे मला चांगले माहित आहे. आजसुद्धा जेव्हा प्राधिकरणांत घरे बांधली जातात. तेव्हा हेच अधिकारी म्हणतात, तुम्ही घरे बांधा, आम्ही पाठिमागे आहोत. त्यांचे त्या काळातले पैसे,ठरलेले रेट. मला वाटते,आजही तोच धंदा चालू आहे. जर एखाद्या आरक्षणाच्या प्लॉटवर किंवा अन्य कुठे घर बांधत असताना, आपले प्रशासन,अधिकारी काय करत असतात. त्या काळात किंवा आजच्याही काळात असे अनेक प्रसंग आपल्यापुढे येणार आहेत. नवीन भागात आज नाहीतर उद्यातरी असे प्रसंग येणार आहेत. आरक्षणाचे प्लॉट विकले जाणार आहेत. कारण आपले प्रशासन सुस्त आहे. अनेक वेळी मी सांगितले आहे. महापालिकेची जी जी आरक्षणे आहेत, तिथे साधा कंपाऊंडचा रॉड लावा आणि बोर्ड लावा. म्हणजे कोणी येणारा गोरगरीब फसणार नाही. हे मा.महापौर यांना पण माहित आहे. मी हे अनेक ठिकाणी बोललो आहे. हे लोक ज्या पद्धतीने आपल्याकडे आले आहेत. ज्या पद्धतीने घरे बांधली आहेत. आज घरे बांधत असताना ज्याचे जळतं, त्यालाच

कळत असेल. ही कोणी मौल्यवान घरांत राहणारी लोक असणार नाहीत. ही सर्वसामान्य लोक आहेत. यांना वाचवायचे काम आपण करावे असे मी या निमित्ताने सांगतो. त्या काळात जी-जी जास्तीची घरे होती त्यांचा अभ्यास केला, किंवा आम्ही जसा शरदनगरचा अभ्यास केला किंवा त्या काळात आम्ही ज्या-ज्या डॉक्युमेंट सादर केल्या होत्या. प्राधिकरणाचा जी.आर. आणला होता त्याचा अभ्यास केला. तर शंभर टक्के त्यात तुम्हाला नागरीकांचा व तुमचा संवाद व्यवस्थित साधून त्यातून योग्य मार्ग निघत असेल, नागरीकांची घरे वाचत असतील किंवा कोणाची घरे पडणार नसतील, किंवा त्या रोडची आवश्यकता नसेल. कारण मला अजूनही कळाले नाही रिंगरूट व रिंगरोड हे दोन्ही वेगळे आहेत. ७५ मी.मध्ये २२ मी. चे दोन रोड, व मध्ये २० मी. चा रिंग रुट म्हणजे रिंग रेल्वे असे आहे. या पद्धतीने रोड व रुट आहे. म्हणून मला वाटते, ज्या विषयाची गरज नाही, त्या विषयात आपण लोकांच्या भावनेशी न खेळता जो काही निर्णय होईल, जो काही चांगला मार्ग निघेल, संवाद साधून किंवा लोकांवर अन्याय होणार नाही अशा माध्यमातून काहीतरी मार्ग काढावा. मी जसे शरदनगरचे उदाहरण दिले. ज्याठिकाणी मी माझे आयुष्य काढले असेल आणि त्याठिकाणी मला उचलून एखाद्या बॉर्डरवर न्यायचा प्रयत्न केला असेल तर शंभर टक्के मला वाटते कोणीही जाणार नाही. हे माझे स्वतःचे उदाहरण आहे. त्याठिकाणी महापालिका किंवा हा खरोखर लोकांच्या जिवनाचा प्रश्न आहे. या लोकांना हात न लावता, त्यांची घरे उद्ध्वस्त न करता त्या लोकांना पर्यायी व्यवस्था देण्याचा विचार न करता जर हा रस्ता शिफ्ट होत असेल. अन्यथा तिथे राजकीय काही होऊ नये. लोकांच्या भावनांशी खेळू नये. प्राधिकरणाचे अन्य प्लॉट आहेत तिथे महापालिकेने किंवा ज्याचे घर जेवढे आहे, तेवढी घरे त्यांना बांधून द्यावीत. मी स्वतःचे मत मांडतोय. लोकांना न विचारता बोलतोय. प्राधिकरणाचे तिथे पाच/सहा चांगले प्लॉट आहेत. त्यांनी आता तिथे कंपाऊंड मारले आहे. मला त्या भागातला असा प्रसंग आठवतोय, त्यावेळी सिसपेन्सील होती. त्याकाळात जेव्हापासून प्राधिकरणाने जागा ताब्यात घेतली.या शेतक-यांच्या वाल्हेकरवाडीतल्या जागा प्राधिकरणाने ताब्यात घेतल्या, तेव्हा तिथे प्राधिकरणाचा शिक्का असला असता. पण मला आठवतेय, तिथे सातबा-यावर पेन्सीलचा शिक्का होता. आजही काही पूरावे मी तुम्हाला दाखवतो. जर तुमच्या जागा ताब्यातच नाहीत, जर तुम्ही जागा ताब्यात घेतलीच नसेल, शेतक-यांना मोबदला दिला नसेलतर मला वाटत नाही ही जागा आपण ताब्यात घ्यावी. यापूर्वीचा सर्व इतिहास पाहता, या लोकांच्या बाबतीत आपण योग्य निर्णय घ्यावा. या लोकांना हात न लावता रस्ता वळवता येत असेलतर वळवावा. जे-जे नागरीक बाधित होणार आहेत, त्यांच्याबरोबर आम्ही आहोत हे सांगतो व थांबतो.

**मा.अपर्णा डोके-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सहकारी नगरसेवक,गेले कित्येक महिने सर्व लोकप्रतिनिधी असतील, जनता असेल यांना रिंगरोडचा विषय भेडसावतोय. प्राधिकरण, एमआयडीसी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आज वीस लाख लोकसंख्येच्या आपल्या शहरात

काम करत असताना निश्चितच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमातून विविध आरक्षणे, आज जी सर्वसाधारण सभा झाली, त्यात आपण सर्व नगरसदस्यांच्या मागणीप्रमाणे त्या-त्या भागातली आरक्षणे बदलली. भूसंपादन,डि.पी.रस्ते यासाठी प्रत्येक लोकप्रतिनिधी इतका झटत असतो. ही आरक्षणे ताब्यात घेण्यासाठी प्रशासन देखील कुठेतरी कमी पडत असते. रिंगरोड रस्ता खूप वर्षांपूर्वी मंजूर झाला. प्रशासनाने आपला रोल काटेकोरपणे, प्रामाणिकपणे केला असतातर, आज ज्या नागरीकांनी त्या भागांत घरे बांधली आहेत. शेवटी प्रत्येक नागरीक जो शहरात राहतो, त्याचे घर हे मोठे स्वप्न असते. आज ब-याच लोकांचे आयुष्य घर करण्यात जाते. आज रिंगरोडच्या माध्यमातून या बाधित लोकांच्या घरांची खरोखरच रांगोळी होते आहे. असे आपल्या शहरात होणे अयोग्य आहे. यातून निश्चितच मार्ग काढण्यासाठी सगळ्यांनी प्रयत्न केला पाहीजे. निश्चितच यात पक्षीय राजकारण न आणता शहराला खरोखरच रिंगरोडची आवश्यकता आहे का. आम्ही जी आरक्षणे,रस्ता मागतो, ते मिळत नाहीत. आणि जे मागत नाहीत ते मिळते आहे. हा विरोधाभास कुठेतरी होतो आहे. निश्चितच झोपडपट्टी पुनर्वसन, घरकुल, पंतप्रधान आवास योजनेच्या माध्यमातून केंद्र सरकार, राज्य सरकार, महापालिका बेघरांना घरे देतोय. आणि दुसरीकडे विरोधाभास असा आहे की, शहरात जे लोक रहात आहेत, त्यांना आज बेघर करायची वेळ येते आहे. कुठेतरी हा त्यांच्यावर अन्याय होतो आहे असे मला प्रामाणिकपणे वाटते आहे. मी मा.महापौर साहेब व मा.आयुक्त साहेब यांना विनंती करेन की, निश्चितच या शहराच्या दृष्टीने नागरीकांची घरे कशी वाचवता येतील, या दृष्टीने काही बदल करता येतील का, रद्द करता येतील, शहरातील लोकांचे नुकसान टाळता येईल असा रुल करावा. पूररेषा बाधितांची घरे, अनधिकृत घरे अधिकृत करण्यासाठी, नागरीक बाधित आहेत. रिंगरोडचा महत्वाचा प्रश्न शहराला भेडसावतो आहे. त्यांच्या डोक्यावर टांगती तलवार आहे. म्हणून लवकरात लवकर चांगला निर्णय घेऊन या नागरीकांची घरे कशी वाचतील, सभागृहाच्या माध्यमातून आपले म्हणणे मा.मुख्यमंत्र्यांना कसे मांडता येईल, यासाठी निश्चित प्रयत्न करावा. आपण मला बोलायला संधी दिलीत त्याबद्दल आपले मनापासून धन्यवाद.

**मा.मंगलाताई कदम**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,माझे सर्व सहकारी, आज रिंगरोड संदर्भात जी सभा चालू आहे, या सभेत आज बघितले तर प्राधिकरणाने कारवाई करताना कोणत्याही गोष्टीचा विचार केला नाही. काही ठिकाणी सकाळी सहा वाजता कारवाई केलेली आहे. कोणी नागरीक फर्स्ट शिफ्टमध्ये कामाला गेल्यावर हे लोक घरांत नसताना त्यांच्या घरावर कारवाई केली आहे. जे दूकानदार लोक होते, त्यांनी प्राधिकरणाच्या अधिका-यांशी थोडेसे गोड बोलून सहकार्य केले. त्यांना भेटवस्तू दिली. त्यामुळे त्यांचे दूकान किंवा त्यांचा माल काढायचे थांबले. परंतू काही दुकानदार असे काही करु शकले नाहीत. काही ग्रेनाईटच्या दुकानांमध्ये त्यांची बरोबर ॲडजस्टमेंट झाली आहे. आणि दूकानांवर मात्र अजिबात ॲडजस्टमेंट

झालेली नाही. अशा माध्यमातून भरपूर प्रमाणात तिथे कारवाई झाली. एक महिला भगिनी आहेत, मी त्यांचे नाव देखील सांगेन गायकवाड ताई आहेत. त्यांच्या मिस्टरांचे नुकतेच निधन झाले होते. त्या दुसरीकडे बाहेर गेल्या होत्या. मुलगा आजारी होता. दवाखान्यात होता. आणि अक्षरशः त्या सांगत होत्या की, मला सामान बाहेर काढू द्यात. हे सांगेस्तोवर त्यांच्या घरावर पूर्ण कारवाई केली गेली. सगळं सामान खराब झालं. ज्या घरातला कर्ता माणूस नाही, मुलगा दवाखान्यात आहे. अशा परिस्थितीत सुद्धा तिथे कारवाई केली गेली. मा.आयुक्त साहेब, परिस्थिती अशीच आहे. रेडझोन संदर्भात सुद्धा अशीच परिस्थिती आहे. २००२ साली आपल्याकडे गावे आली. त्यावेळी रेडझोन संदर्भात निवडणूक घेतल्या असत्या. रेडझोन मध्ये डिक्लेरेशन केले असते तर आपण हा भाग घेतला नसता. सगळा खर्च केला, संपूर्ण डेव्हलमेंट होत आली आणि आता त्यांनी सांगितले की हा भाग रेड झोन आहे. भेळचौकापर्यंत रेडझोन आहे. दिघीची गाव भरपूर प्रमाणात त्यात जाताहेत. म्हणजे सगळं होऊन गेल्यावर सांगतात. आणि आत्ता खरेदी खते करायची बंद झाली आहेत. अश्या माध्यमातून काय होते. जेव्हा सर्वसामान्य नागरीक असतो. त्याला वाटते चार खोल्यांचे घर बांधावे. कमी प्रमाणात, कमी खर्चात जागा मिळाली तर नागरीक शंभर टक्के ती जागा घेतात. त्यांच्या लक्षात येत नाही की, चला बाबा, मला कमी पैशांत जागा का मिळाली. कशासाठी हे झाले. तिथे बोर्ड लिहीला असतातर खरेदीखत झालं नसत. तर शंभर टक्के या रिंगरोडमध्ये लोकांनी जागा घेतली नसती. तुम्ही पाच दहा वर्षांपूर्वी काळेवाडीतली परिस्थिती बघितली असतीतर तिथे नागरीक खूप कमी प्रमाणात वास्तव्यास होते. म्हणून आजचा हा जो रिंगरोड आहे. आत्ता इथे मा.दत्ता काका साने यांनी सांगितले की, स्पाईन रोड झाला. अगदी मुख्यमंत्र्यांपर्यंत सगळी प्रकरणे गेली. सगळे केले. मी हे परत सांगणार नाही. आज त्याच्यासाठी भांडणे झाली. आम्ही नागरीकांना तिथेच शेजारी पलिकडच्या बाजूला जागा घेऊन दिल्या. आणि ज्या लोकांना जागा देता येणार नव्हती त्यावेळी आम्ही असा सुद्धा प्रस्ताव केला होता की, त्यांची घरे या रोडमध्ये जात आहेत. ते महापालिकेतील नागरीक आहेत. प्राधिकरणाने त्यांच्या जागा घेऊन महापालिकेने त्या नागरीकांना पैसे द्यावेत. म्हणजे या नागरीकांना घरे मिळतील. परंतू मा.आयुक्त साहेब, आज या रिंगरोडमधील बाधित लोकांची इतकी भयाण अवस्था आहे. लोकांनी इतकी वर्षे तिथे राहिल्यानंतर आजची परिस्थिती बघितली तर आपल्याकडे मेट्रो आहे, आपल्याकडे बससाठी जागा केली आहे. रस्ते भव्य आहेत. पलिकडच्या बाजूला उड्डाणपूल आहे. सगळ्या गोष्टी आहेत. आम्ही असे म्हणत नाही की रिंगरोड झालाच पाहिजे. असे आम्ही म्हणणार नाही. मघाशी पवना बंद पाईपबद्दल काय विषय झाला. जर नागरीकांच्या रक्ताचे पाणी पिंपरी चिंचवडला येणार असेलतर आम्हाला हे पाणी नको. या नागरीकांची घरे पाडणार असतील, या नागरीकांना जर आपण मारत असूतर, आम्हाला हा रिंगरोडच नको आहे. मा.आयुक्त साहेब, सभागृहात ठराव करा. मंगला कदम बोलली म्हणून मुळीच ठराव नका करु.

तुम्ही सत्ताधारी म्हणून ठराव करा. रिंगरोड होऊ नये असा तुम्ही सगळ्यांनी ठराव करा. आम्हाला जास्त बोलायचे पण नाही. एकतर तुम्हाला हे करावे लागेल. अन्यथा प्राधिकरणाने जितकी जागा दिली होती, तशा पद्धतीने ही जागा द्यावी. महापालिकेच्या हातात जी जागा आहे. प्राधिकरण जी जागा देऊ शकत नाही. एकच सांगितलं, तुम्ही रिंगरोड करु नका असचं सांगितलं. मा.सचिन भोसले बोलल्यानंतर जर तुम्हाला राग आला असेलतर ते सत्य आहे. सगळ्यांनी पेपरमध्ये वाचले आहे. लाठी खाल्लेले नागरीक मागे बसले आहेत. सगळी सभागृहे बघा. लोकसभेचे सभागृह बघा, विधानसभेचे सभागृह बघा. एक माणूस बोलत असताना दुसरा माणूस बोलतो का ते पण बघा. जे झालं झालं. त्यात बोलण्यासारखं दुसर काय आहे. पेपरमध्ये वाचले. मा.सचिन भोसले बोलले असतील. ज्या नागरीकांना लाठीचार्ज झाला ते नागरीक बोलणार. मी एकच सांगते, एकच बोलते, आमचा रिंगरोड होण्याला विरोध आहे. आम्हाला दूसरं काही बोलायचं नाही. आणि आम्हाला पर्याय पण नको, जागा नको. धन्यवाद महापौर. आम्ही शब्द बदलणार नाही. यांनी सांगितले एकच बोला. पुढचा पर्याय सुद्धा सांगत नाही. रिंगरोड होऊ देऊ नका ही सभागृहाला नम्रतेची आणि कळकळीची विनंती आहे.

**मा.राहूल कलाटे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, अधिकारी व पत्रकारबंधू, संपूर्ण शहरात गेले दोन महिन्यांपासून एकच चर्चा आहे. रिंगरोड, रिंगरोड, रिंगरोड. १९७६ साली ज्याप्रमाणे मा.भाऊसाहेब भोईर यांनी सांगितले की, प्राधिकरणाचा डिपी नसतो, लेआऊट असतो. मला वाटते आपण प्राधिकरणाने जागा ताब्यात घ्यायची, ती महापालिकेकडे हँडओव्हर करायची. बरीचशी जागा महापालिकेच्या ताब्यात आली आहे. पिंपळे सौदागरमध्ये गार्डनचे बरेच मोठे काम देखील चालू आहे. हे सगळे करत असताना आपण पाहिले असेल की हे शहर कामगारांची नगरी आहे. शहरातील गोरगरीबांनी गुंठा गुंठा करुन प्राधिकरण हद्दीतील जागा घेतल्या. याला जबाबदार कोण, ज्याप्रमाणे नागरीक याला जबाबदार आहेत, त्याप्रमाणे सर्व यंत्रणा सुद्धा याला जबाबदार आहे. मी परत परत हे सांगणार नाही. हे सांगत असताना मा.महापौर साहेब, मला एका गोष्टीची आठवण करुन द्यायची आहे की, आपण अनधिकृत बांधकामांसाठी प्राधिकरणासहीत मोर्चे काढले. नागपूरला मोर्चे काढले. मुंबईला मोर्चे काढले. मुंबईच्या मोर्चाच्या वेळी मा.सुधीर मुणगुंटीवार किंवा मा.विनोद तावडे, मा.निलमताई गो-हे, मा.गिरीश महाजन,मा.सुभाष देसाई होते. मुंबई व नागपूर दोन्ही ठिकाणी आमच्याबरोबर शिष्ट मंडळ होते. ते मा.मुख्यमंत्री यांना भेटले. त्याकाळी ही कारवाई थांबवली. निश्चितच सवयीप्रमाणे सत्ताधारी देखील आले. त्यानंतर या भागातल्या नागरीकांनी खासदार निवडून दिले, या भागातल्या नागरीकांनी या भागातले. आमदार निवडून दिले. तरीसुद्धा प्रश्न तसाच आहे. मघाशी मा.अभिषेक बारणे यांनी सांगितले की, प्राधिकरणासहीत जी.आर. बनवा. या जी.आर.मध्ये काय म्हटले आहे, २० फूटांचा रस्ता, साईडला ९० मी. असे सोडू शकतो का. हा जी.आर बनवत असताना या लहान लहान गोष्टींचा देखील उल्लेख करायला पाहीजे होता. माझी

मा.आयुक्त साहेबांना विनंती आहे की, उद्या शेवटचा दिवस आहे २० ऑगस्ट. या दिवशी तुम्ही सर्व नगरसेवकांच्या वतीने हरकती घ्या. प्राधिकरणाच्या हद्दीतील लोकांची अनधिकृत घरे खरेच रेग्युलराईज होणार का. ज्यावेळी गुंठेवारी कायदा झाला त्यावेळी किती बांधकामे रेग्युलराईज झाली. ९० टक्के बांधकामांना दिलासा मिळाला नाही. १० ते १५ टक्के बांधकामांना दिलासा मिळाला. आणि आपण आत्ता जी.आर. वाचलातर या जी.आर.मध्ये त्रुटी आहेत. म्हणून मोठ्या संख्येने लोकांनी हरकती घेतल्या. या हरकती घेत असताना मला आपल्या महापालिकेच्या हे निदर्शनास आणून द्यायचे आहे की, प्राधिकरण जागा ताब्यात घेऊन आपल्याकडे हँडओव्हर करणार आहेत. जसे मा.मंगलाताई कदम यांनी सांगितले. मा.सिमाताई सावळे यांनी पण सांगितले की, आम्हाला रक्ताने रंगलेले पवनाचे पाणी नको आहे. तसाच या गरिबांच्या घरांना धक्का लावून, त्यांना बेघर करुन आपण या रिंगरोडने प्रवास करणार आहोत का? यातून प्रवास करायची कोणाची मानसिकता आहे. मला एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणून द्यायची आहे. निगडी ते दापोडी बीआरटी त्या मार्गावरून, मेट्रो त्याच मार्गावरुन, ६ मी.चा रोड त्याच मार्गावरून. तुमच्या प्लॅनिंगमध्ये किती कोऑर्डीनेशन आहे. त्याच मार्गावरून बीआरटी, त्याच मार्गावरून मेट्रो, त्याच मार्गावरून ६ मी. चा डीपी रोड. तिथे पर्याय उपलब्ध असताना सुद्धा प्रशासनाने असा हट्ट धरणे योग्य नाही. मुख्यमंत्री साहेबांनी देखील या शहरात सभा घेतल्या. या शहरातल्या गोरगरीबांच्या बांधकामांना धक्का लागू देणार नाही असे विधानसभा, लोकसभेच्या निवडणूकांच्या वेळी मुख्यमंत्र्यांनी देखील सांगितले होते. मला वाटते, आपण सर्वांनी मिळून,सर्व पदाधिका-यांनी देखील मिळून त्यांची भेट घ्यावी. संघर्ष समितीने देखील आम्हाला खूप वेळा बोलवले. पण आम्हाला त्यांच्यात पक्षीय राजकारण करायचे नव्हते. आम्ही तुमच्या बरोबर आहोत, एवढेच आम्ही त्यावेळी त्यांना सांगितले. आपल्याला निवडणूकांच्या वेळी त्यांची मते चालतात ना मग त्यांची घरे पण चालवून घ्या. ज्याप्रमाणे एक मत दिलेतरी आपण त्या माणसाच्या कधी कामाला येऊ अशी आपली भावना होते. या लोकांची आज हजारो घरे जात आहेत. त्यांची कुठलीही मानसिकता नाही. त्यांना पर्याय नको आहे. त्यांना त्याचठिकाणी घरे पाहीजेत. जी त्यांनी त्यांच्या हक्काच्या पैशांतून बांधली आहेत. जमिनजुमला विकून बांधली आहेत. त्यांच्या भावना त्यात आहेत. त्यांच्या पूर्वजांची पूण्याई त्यात असेल. त्यांची मानसिकता नाही की आम्हाला तिथून शिफ्ट करा. उलट त्या लोकांची अशी मानसिकता असतीतर त्यावरही आपल्याला काही करता आले असते. परंतू २००० साला अगोदर त्या भागात खरेदी खते होत होती. नंतर एक चांगला प्रशासक आला आणि त्याने ही खरेदीखते बंद केली. ज्याप्रमाणे ते नागरीक यास जबाबदार आहेत, त्याचप्रमाणे महापालिकेसहीत सर्व सरकारी यंत्रणा यास जबाबदार आहे. शिवसेना म्हणून आम्ही या लोकांबरोबर आहोत. आमच्या रिंगरोड करण्याला विरोध आहे. तुम्ही रिंगरोड शिफ्ट करु शकता. त्याठिकाणी पर्याय देखील आहेत. आपल्याकडे मोठमोठे रोड आहेत. त्यामुळे माझी सभागृहाला, महापौर साहेबांना

व आयुक्त साहेबांना विनंती आहे की, एकमताने ठराव करा. तुमच्या अधिकारांत हा रोड शिफ्ट करुन घ्या. सर्वपक्षीय ठराव करुन शासनाकडे पाठवावा. परंतू कुठेतरी या गोरगरीबांवर अन्याय होणार नाही, ते बेघर होणार नाहीत या भावनेच्या माध्यमातून या गोष्टीकडे पाहिलेतर निश्चितच या लोकांचे आशिर्वाद आपल्याला भविष्यात मिळतील. रोगापेक्षा इलाज मोठा होणार नाही याची आपण काळजी घ्या. म्हणजे आपण लोकांना हजार हजार स्क्वे.फूटांची घरे देताना कुठेतरी दहा वीस कि.मी. लांब घरे दिलीत असा कुठलातरी पर्याय न देता लोकांच्या हिताचा पर्याय, त्यातून लोकांना कसा दिलासा मिळेल याचा सभागृहाने विचार करावा. मला वाटते, सर्व सभासदांची हिच इच्छा आहे. मा.भाऊसाहेब भोईर आमचे ज्येष्ठ आहेत. त्यांनी खूप वर्षांपासून अभ्यासू पद्धतीने या विषयाची मागणी केली आहे. मागणी करत असताना मला पुन्हा एकदा सभागृहाला, सर्व पक्षांच्या सर्व नेत्यांना विनंती करायची आहे की, सभागृहात एकमुखाने, एकमताने हा ठराव घ्या. त्या जागेवरून रिंगरोड शिफ्ट करा. जेणेकरुन त्या गोरगरीबांची घरे हलणार नाहीत, त्यांना न्याय मिळेल. धन्यवाद.

**मा.अभिषेक बारणे**-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, सर्वांचे मनःपूर्वक आभार. ज्यांच्या प्रभागातून रिंगरोड जात नाही, त्यांनीदेखील या प्रश्नाला वाचा फोडली त्यांचेदेखील आभार. सर्वच पक्षांचे नेते आज पक्ष सोडून वैयक्तिक नागरीहिताच्या निर्णयासाठी एकमुखाने बोलत आहेत. त्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार. संपूर्ण शहरात रिंगरोड बाधितांच्या घरांचा प्रश्न आहे. त्या आत्तापर्यंत बोललेल्या सर्व नगरसदस्यांचे एकच मत आहे की, जर पर्यायी रस्त्यामध्ये कोणाचे घरे जात नसेलतर, पर्यायी रस्ता द्या. आणि जर एखाद्याचे घर तोडून रस्ता होणार असेलतर तो रद्द करावा. हेच सर्व नगरसेवकांचे,सन्माननीयांचे म्हणणे आहे. त्याचबरोबर इथून मागील काळातला आमचा कुठल्याही नेत्याबद्दल,कोणाबद्दल आरोप नाही. मी पुन्हा एकदा तेच सांगतो की, सन्मा.मुख्यमंत्री शहराचा व्यवस्थितरित्या विकास होण्यासाठी बांधकामे नियमित करणार आहेत. जी आरक्षणे वगळता येतात. हा जो जी.आर काढलाय. तो सर्व नगरसदस्यांनी पुन्हा एकदा वाचावा. आपल्याकडे उद्यापर्यंत मुदत आहे. यासंदर्भात काय सूचना करता येतात ते पहावे. मा.आमदार लक्ष्मणभाऊ जगताप, मा.आमदार महेशदारा लांडगे, पक्षनेते मा.एकनाथ पवार व सर्व सदस्यांनी मा.मुख्यमंत्र्याकडे पाठपुरावा केल्यामुळे त्यांनी निर्णय दिला आहे. हा जी.आर. काढला आहे. त्यात २०१५ पर्यंतची बांधकामे नियमित होणार आहेत. पण मा.आयुक्त साहेब, मी तुमच्याशी चर्चा केल्यावर लक्षात आले की, ज्या बांधकामांच्या नोंदी नाहीत, त्यांची आत्ता नोंद करायला गेलोतर आपल्याला सहा वर्षे मागे जावे लागते. शास्तीकर भरावा लागतोय तरच बांधकामाची नोंद होईल. असे जर असेलतर नागरीक त्यांची बांधकामे या अटीतून रेग्युलराईज करुन घेऊ शकत नाहीत. त्यासाठी हा जी.आर. परत परत निघत नाही. त्याला वेळ लागतोय. आपल्याला शासनाच्या पाठिमागे पळायचे तर आत्ताच आपल्याला संधी आहे. सगळ्यांचे हेच म्हणणे असेल की त्या नागरीकांनी पाच सहा लाख

शास्तीकर भरलाच पाहीजे. तरच आम्ही बांधकामे नियमित करु. असे असेलतर गप्प बसा. पण जर सर्वांना वाटत असेल की त्या माणसाचे घर नियमित झाले पाहिजे तर सगळ्यांनी आत्ता प्रयत्न करायची गरज आहे. त्याच्या २०१५ च्या आधीच्या बांधकामाची नोंद झाली पाहीजे. माझ्या माहितीप्रमाणे मला वाटतेय म्हणून मी सांगतोय की, ७० टक्के बांधकामांची नोंद नसेल. आमच्या भागात तर नाहीच आहे. हे सगळे आपल्याला करुन घ्यावे लागणार आहे. मी परत एकदा सांगतो की, मी मा.मुख्यमंत्री यांचे आभार मानतो की ते सकारात्मक आहेत. आपण सर्वांनी या गोष्टीकडे पाऊले वळवली पाहीजेत. आपल्या वॉर्डातल्या लोकांना बरोबर घेऊन जसे जमेल तशा सूचना कराव्यात. कागदोपत्री बोलले पाहीजे. नुसते इथे बोलून उपयोग होणार नाही. हा प्रश्न महापालिकेचा नसून आपल्याला राज्य शासनाकडे जावे लागणार आहे. इथे एकमताने ठराव केल्यानंतर तो प्रस्ताव शासनाकडे पाठवतोय. पण सर्वस्वी निर्णय शासन घेणार आहे. यासाठी प्रस्ताव झाला पाहीजे. उद्या रविवार आहे. एक महिन्याची मुदत दिली आहे. ही मुदत वाढवता येते का यासाठी मा.महापौर साहेब व मा.आयुक्त साहेबांकडून प्रयत्न झाले पाहीजेत. आपण सर्वांनी यासाठी सूचना द्यावी एवढीच विनंती करतो व थांबतो. जयहिंद, जयमहाराष्ट्र.

**मा.अजित गव्हाणे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार मित्र आणि ज्यांच्यासाठी हा विषय इथे घेतला आहे. ते रिंगरोडमधील बाधित नागरीक इथे आवर्जून उपस्थित आहेत. प्रथमतः मी महापौरांचे आभार मानतो की, आपण हा विषय सभागृहात घेतला. गेले अनेक दिवस हा विषय सभागृहात होता. सभागृहाबाहेर यासंदर्भात नागरीकांमध्ये गेले महिना दोन महिन्यांत अनेक आंदोलने झाली. वर्तमानपत्रांतून बातम्या वाचल्या. इथे बसलेल्या प्रत्येक नगरसेवक मग तो कुठल्याही पक्षाचा असो त्याची हिच भूमिका आहे की, आपल्या इथल्या नागरीकांची घरे पडू नयेत. शेवटी नगरसेवक होत असताना त्याठिकाणी जरी मा.अभिषेक बारणे यांचा प्रभाग असलातरी ही व्यथा सगळ्यांच प्रभागांत वेगवेगळ्या पद्धतीने आहे. त्यामुळे प्रत्येकजण नगरसेवक होत असताना लोकांना हे सांगून आलेला आहे की, मी तुमच्यासाठी भांडणार आहे. उद्या मी नगरसेवक झालोतर आपल्या प्रभागातील घरे वाचवेल अशी भूमिका प्रत्येक नगरसेवकाने मांडली. म्हणूनच नगरसेवक म्हणून काम करायची संधी लोकांनी सर्वांना दिलेली आहे. म्हणून लोकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याच्या दृष्टिकोणातून प्रत्येक नगरसेवकाची हिच भावना आहे. मा.भाऊसाहेब भोईर यांनी सांगितले की, आपण या विषयाचे राजकारण केले नाही पाहीजे. माझेही हेच मत आहे. या विषयाचे राजकारण न करता हा विषय आपल्या सगळ्यांसाठी अतिशय महत्वाचा आहे. कारण या लोकांनी आयुष्यभर कष्ट करुन,पै-पै करुन त्याठिकाणी घरे उभी केली आहेत. आणि कुठेतरी प्रशासनाकडून, लोकप्रतिनिधींकडून चूक झाली आहे. आज तिथे घरे झाली आहेत. अचानकपणे त्यांची घरे पाडायची झालीतर ती कुटूंबे उद्ध्वस्त होतील. त्यामुळे आपली प्रत्येकाचीच ती मानसिकता आहे. अनेक जणांनी हा मुद्दा

मांडला की, रिंगरोडची अलाईनमेंट चेंज करता येते का. खरेच तशी करता येत असेलतर निश्चितपणे प्राधिकरण व आपण प्रशासनाने एकत्र बसून अलाईनमेंट चेंज करुन ही घरे वाचवता आलीतर निश्चितपणे तसा प्रयत्न झाला पाहिजे. मा.दत्ता काका साने यांनी उदाहरण दिले की, त्यांच्याकडील शरदनगर हा भाग आहे, इथे देखील अशीच परिस्थिती निर्माण झाली होती. आणि मी बघितले की, मा.दत्ता काका साने असतील, आमदार विलासराव लांडे पाटील असतील, यांनी त्या काळात मा.अजितदादा पवार साहेबांच्या माध्यमातून त्यांच्या पाठिमागे लागून त्या भागातल्या लोकांना पर्यायी घरे दिली आणि ज्यांची घरे वाचवता येतील त्यांची घरे वाचवायचे काम त्या काळात केले आहे. यापद्धतीने आपल्याला तसा प्रयत्न करता येईल. कुठल्याही प्रकारचे राजकारण न करता, सर्व पक्षांचे लोक आज जरी तुम्ही सत्तेत असलात, आम्ही विरोधी पक्ष म्हणून तुमच्या बरोबर आहोत. नागरीकांच्या हिताच्या दृष्टिकोणातून हा निर्णय घ्यायचा आहे. आणि मला वाटते ते शंभर टक्के शक्य आहे. त्या दृष्टिकोणातून आपण सकारात्मक भूमिका घेतली तर मला वाटते, आपले काम निश्चितपणे होईल. हे करत असताना कदाचित हे काम पुढे ढकलता येईल का हेही पाहता येईल. प्राधिकरण किंवा महापालिका लगेचच कारवाई करत असेलतर त्यातही थांबता येईल. कारण लगेचच कारवाई करणे गरजेचे नाही. यात एक महत्वाचा मुद्दा असा आहे की, वाहतूकीला अडथळा होत होता म्हणून इथून मागील काळात रस्ते मोठे केले. तिथे आज काय परिस्थिती आहे. प्रत्येक फूटपाथवर अतिक्रमण झाले आहे. लोकांना चालायला जागा नाही. भोसरी परीसरात कोणीपण येते आणि उड्डाणपूलाखाली टप-या, हातगाड्या लावतात अशी परिस्थिती आहे. काही लोकांची बांधकामे पाडली,काही लोकांची दूकाने पाडली, काही लोकांची घरे पाडली. ते कशासाठी तर रस्ता करण्यासाठी. ट्रॅफिक जाम होऊ नये, फूटपाथवरून माणसांना चालता यावे अशी त्यामागील भूमिका आहे. परंतू आज परिस्थिती काय आहे. आज परिस्थिती अशी आहे की, नुसतेच भोसरीत नाहीतर पिंपरी शहरात तुम्ही कुठेही गेलात तर सगळ्याच ठिकाणी अशा पद्धतीने आपल्या शहरात अनाधिकृतपणे परिस्थिती निर्माण झाली आहे. नगरसेवक म्हणून प्रत्येकजण आपल्याकडे प्रशासनाकडे मागणी करतो. उदाहरणार्थ आमच्या इ प्रभागाला जे अधिकारी आहेत. त्यांना ॲक्शन घ्यायला सांगितले तरी त्यांच्याकडून कारवाई होत नाही. कारण त्यांच्याकडे असणारा स्टाफ अत्यंत कमी आहे. तिथे कारवाई करताना त्यांना अडथळा निर्माण होतो. अशा परिस्थितीत त्यावेळी आम्ही वारंवार अशीच मागणी केली होती की, हा अतिक्रमणाचा भाग महापालिका स्तरावर घेतला पाहीजे. जेणेकरुन आज रिंगरोड करायची गरज का निर्माण होते. रस्ते मोठे करायची गरज का निर्माण होते. असलेले रस्ते कमी पडतात. असलेले रस्ते कमी का पडतात. त्यामुळे वाहतुकीला अडथळा होतो. वाहतुकीला अडथळा का होतो. अनधिकृतपणे अशा प्रकारची ट्रॅफिकची कोंडी होते. हा सगळा बेशिस्तपणा शहरात चालला आहे तो थांबवण्याच्या दृष्टिकोणातून प्रयत्न केलेतर कदाचित रिंगरोड करायची आवश्यकता आपल्या शहराला भासणार नाही. मघाशी मा.अभिषेक

बारणे यांनी मुद्दा मांडला. आत्ताही त्यांनी तो मुद्दा मांडला की, मा.मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक भूमिका घेऊन, मागील सरकारच्या काळातही तशीच सकारात्मक भूमिका इथल्या आमदार, खासदारांची होती. त्यावेळी त्यांनी मागणी केली. त्यानंतर सिताराम कुंटे यांची समिती स्थापन झाली. त्यांनी इथली अनधिकृत बांधकामे नियमित प्रयत्न केले. परंतू त्याला यश आले नाही. या मुख्यमंत्र्यांनी त्या दृष्टिकोणातून प्रयत्न केले. आणि आज जी.आर. आपल्यापुढे आला आहे. मा.अभिषेक बारणे यांनी त्याचा चांगला अभ्यास केला आहे. यात प्रशासनाला निश्चित माहिती आहे. मी प्रशासनाच्या अधिका-यांशी बोललो. आज नागरीकांना जो दंड भरावा लागणार आहे, जे डेव्हलपमेंट चार्जेस भरावे लागणार आहेत, ते त्यांना भरणे शक्य होणार नाही. याला हरकत घेतली गेली आहे. अनेक लोकांनी हरकती घेतल्या आहेत. मा.महापौर साहेब, जर शक्य असेलतर शासनाकडून जो जी.आर. आला आहे, तो सभागृहापुढे मांडला किंवा नगरसेवकांना सांगितला गेलातर निश्चितपणे प्रत्येकजण आपापले मत मांडू शकतो. आपण सभागृहाच्या वतीने एखादी सूचना शासनाला दिलीतर नागरीकांच्या दृष्टिकोणातून हा चांगला निर्णय होऊ शकतो. भविष्यकाळात अनधिकृत बांधकामे नियमित करण्याच्या दृष्टिकोणातून फायदा होऊ शकतो. आपण या दृष्टिकोणातून विचार करावा. याठिकाणी मा.एकनाथ पवार यांना विनंती आहे की, सर्वच पक्षांची लोकं इथे आहेत. सर्वांचा मिळून एक चांगला ठराव करावा. जेणेकरुन इथल्या नागरीकांची घरे पडणार नाहीत. या लोकांवर अन्याय होणार नाही असा ठराव सभागृहात एकमुखाने करावा. आत्तापर्यंत सहा महिने सभागृहात पाहतोय, मा.आयुक्त साहेब तुम्हीही पाहत असाल की हे सभागृह कशा पद्धतीने चालले आहे. प्रत्येक वेळी आमच्या बाजूने भांडणे होत आहेत, इकडूनही भांडणे होत आहेत. खरेतर आमच्या बाजूच्या लोकांना आपण विरोधी पक्षात आहोत हे समजत नाही आणि सत्ताधा-यांना ते सत्ताधारी आहेत हे समजत नाही. दोन्ही बाजूंनी अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे प्रत्येकाने आपली भूमिका बदलली पाहिजे याची भावना मनात असावी. सत्ताधा-यांनाही माझे म्हणणे आहे की, आपण आता सत्तेत आला आहात. आता मागचे काढू नका. तुम्ही सत्ताधारी झालाततर आता सत्ताधा-यांसारखे वागा. पारदर्शन कारभार याच मुद्यावर मा.एकनाथ पवार तुम्ही निवडणूक जिंकलात. त्यामुळे भाजपला प्रचंड बहुमत मिळाले. पारदर्शक कारभार करावा अशी तुमच्याकडून लोकांची अपेक्षा आहे. आमची विनंती आहे, मघाशी मा.योगेश बहल आपल्याला म्हणत होते की, त्यांच या विषयाला विरोध नव्हता. तुम्ही जी.आर. वाचून दाखवा. नवीन नगरसेवक आहेत. मा.एकनाथ पवार, जवळपास ८० टक्के नगरसेवक नवीन आहेत. त्यांना हे सभागृह कसे चालते ते माहित नाही. त्यांना सुद्धा माहिती झाले पाहीजे. कुठला विषय आला, त्यात काय लिहिले गेलेय, त्यांचा अभ्यास कधी होणार. नुसताच चार दोन लोकांना विरोध करायचा अशी भूमिका तुम्ही ठेवू नका. नवीन नगरसेवकांना हे सभागृह कसे चालते हे कळले पाहीजे. विषय होत असताना तो त्यांच्या भागातला विषय आहे का हे कळले पाहीजे. बजेट मंजूर करत असताना तुम्ही ते

सभागृहात चर्चा करुन मंजूर करायला पाहीजे होते. तसे तुम्ही केले नाही. हरकत नाही. इथून पुढे हा पायंडा बदला. सभागृहात येताना पक्षभेद बाजूला ठेवून काम केले पाहीजे. सर्वांनी एकमताने काम केले पाहीजे. राजकारण बाजूला ठेवले पाहीजे. नगरसेवक म्हणून लोकांनी आपल्याला निवडून दिले आहे. आपण सगळ्यांनी लोकांच्या हितासाठी काम केले पाहिजे अशा प्रकारची अपेक्षा इथे व्यक्त करुन मी इथे थांबतो.

**मा.नामदेव ढाके**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार बंधू, खरेतर मी गेल्या दोन तीन तासांपासून ज्या विषयावर सन्माननीय सदस्य चर्चा करत आहेत. परंतू तत्पूर्वी ज्या अनधिकृत घरांसंदर्भात गेल्या बारा/तेरा वर्षांपासून या शहरात विशेष करुन प्राधिकरणात बाधित असणा-या नागरीकांसाठी सातत्याने ज्या पक्षाच्या माध्यमातून भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून आम्ही आंदोलने केली. तत्कालिन प्रदेशाचे अध्यक्ष व आत्ताचे मुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस सुद्धा या मोर्चात सहभागी झाले होते. आणि मला असे वाटते की, हे गरीबांचे सरकार आहे. सर्वसामान्यांसाठी काम करणारे सरकार आहे. पंधरा वर्षांपासून जो भिजत पडलेला प्रश्न सर्वसामान्यांच्या घरावर टांगती तलवार होती. तो कायदा राज्याच्या अधिवेशनामध्ये मार्च महिन्यात मा.मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी दोन्ही सभागृहांमध्ये घेतला. काही कायदेशीर त्रुटी यात राहू नयेत म्हणून दि.२१ जूलै रोजी या संदर्भात अधिसूचना /जी.आर. काढला गेला. मला असे वाटते की, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न ज्यावेळी ज्या घरांसाठी सर्वसामान्य नागरीकांसाठी आंदोलन करत होतो. त्या माध्यमातून किंवा बाजाराच्या माध्यमातून त्या घराला झिरो व्हॅल्यू होती. परंतू आज शासनाने जी.आर काढला. कुठेतरी अनधिकृत घरे अधिकृत करण्यासाठी, कायदेशीररित्या ते घर अधिकृत करण्यासाठी पहिले पाऊल शासनाच्या माध्यमातून, सरकारच्या माध्यमातून किंवा याठिकाणचे आमदार मा.लक्ष्मणभाऊ जगताप असतील, मा.महेशदादा लांडगे असतील यांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा केला. त्याला ख-या अर्थाने मुहूर्तमेढ म्हणजे जी.आर.च्या माध्यमातून मिळाली. आज शहरातील लाखो घरे अधिकृत करण्यासंदर्भात पहिले पाऊल ठेवले गेले. म्हणून मी या सभागृहाच्या निमित्ताने अभिनंदन करेन की, राज्याचे मुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस असतील किंवा आमदार मा.लक्ष्मणभाऊ जगताप असतील, मा.महेशदादा लांडगे असतील की, ख-या अर्थाने सर्वसामान्यांच्यासाठी ज्यांनी या आंदोलनात भाग घेतला. याठिकाणी ज्येष्ठ सदस्य आहेत. आंदोलन करत असताना हा सर्वसामान्य नागरीकांचा विषय आहे. म्हणूनच त्यावेळी आंदोलनांत जे होते, त्यांनी ओळखले की हा खरोखरच कष्टकरी कामगारांचा विषय आहे. अनधिकृत घरांबाबतचा विषय आहे. म्हणून कुठेतरी शास्ती लावण्याचा विषय असेल किंवा अनधिकृत घरांचा विषय असेल, हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी अधिसूचना जाहिर करुन हरकती व सूचना मागवल्या. या विषयासंदर्भात गेल्या दोन तीन तासांपासून चर्चा होते आहे. आमच्या प्रभाग क्र.१७ मधून एसएमटीआर रस्ता म्हणजे रिंगरोड जाणार आहे. खरे म्हणजे याठिकाणी

चर्चा झाली, सर्व सदस्यांनी सांगितले, राजकारण करायचे नाही. समितीच्या माध्यमातून गेले दोन महिन्यांपासून सातत्याने सांगितले जाते आहे. मा.दत्ता साने यांनी सांगितले की, त्यांच्या प्रभागात २००५ मध्ये याच एसएमटीआार रस्त्याच्या संदर्भात लोकांची घरे बाधित झाली होती. त्यावेळी त्यांनी त्याठिकाणच्या नागरीकांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला. मला शासनाच्या अधिका-यांना व तत्कालिन त्यावेळी जी काही मंडळी असतील त्यांना मा.दत्ता काका साने यांच्या माध्यमातून २००५ मध्ये जर का त्यावेळी एसएमटीआर रस्ता जातो. तसा प्राधिकरणातून जातो. आमच्या चिंचवडेनगर मधून जातो. थेरगावमधून जातो. त्यावेळी त्या भागातले नागरीक बाधित होणार आहेत. मा.दत्ता काका साने यांच्या माध्यमातून त्यावेळी त्या रस्त्याची पाहणी केली गेली. आणि त्यावेळच्या नागरीकांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला. मी याच्या खोलात जाणार नाही. १९८८ ला कधी झाला, १९९२ ला कधी आला, २०१४ ला कधी पत्र दिले यात आपल्याला जायचे नाही. राजकारण करायचे नाही. बहुतेक आम्हीसुद्धा राजकारण करायच्या मानसिकतेत नाही. कारण ज्याचे जळते त्यालाच कळते. कारण माझ्या प्रभागातल्या जनतेला आज मी बघतोय. पहिल्यापासून त्या प्रभागातले नागरीक रडून रडून सांगत होते. खरेतर ती लोकं आंदोलनात होते. हा रस्ता इथे आहे हे त्यांना माहित नव्हते. गेले ३० वर्षांमध्ये प्राधिकरणाकडून एखादे ठिकाणचे आरक्षण किंवा एखाद्या ठिकाणचा रस्ता ताब्यात घेतला गेला नाही. म्हणून दूर्दैवाने इथे दलालांच्या माध्यमातून त्या जागा विकल्या गेल्या. सर्वसामान्य नागरीकांनी त्यांचे घरकुलाचे स्वप्न तिथे साकार केले. एका बाजूला असे होत असताना दुस-या बाजूला प्राधिकरणाची स्थापना झाली. या शहराचे वाढते नागरीकरण लक्षात घेऊन प्राधिकरणाची स्थापना झाली. खरेतर या माध्यमातून भूखंड किंवा अशा पद्धतीची घरे फ्लॅट त्यावेळी शासनाच्या माध्यमातून उपलब्ध करुन दिले असतेतर कदाचित त्यावेळी सर्वसामान्य नागरीकांनी ही घरे घेतली नसती. त्यांच्यावर ही टांगती तलवार आली आहे. एका बाजूला अनधिकृत घरे अधिकृत करायचा विषय आहे. दूसरीकडे आमच्या भागातल्या ८०० ते १००० मिळकती एससीएमआर रस्ता किंवा रिंगरोडच्या माध्यमातून जाणार आहेत. माझी आपल्याला विनंती आहे की, जसे सांगितले गेले. खरे म्हणजे मा.दत्ता काका साने यांचे मी अभिनंदन करेन. त्यावेळी त्यांनी लोकांना तशा पद्धतीच्या सूचना दिल्या. त्या लोकांनी कुठेतरी रोड बाजूला ठेवायला सांगितले. त्यावेळी आमच्या भागातही अशा पद्धतीने सांगितले गेले असतेतर आज त्या बिचा-या गरीब लोकांनी तिथे दोन तीन मजली इमारती बांधल्या नसत्या. यात प्रशासनाची कोणाची चूक याची चर्चा करायची नाही. आज यात अडकलेले नागरीक हे सर्वसामान्य नागरीक आहेत. म्हणून त्यांच्यासाठी आमचे काम आहे. कारण आमचा पक्ष हा सर्वसामान्यांसाठी काम करणारा पक्ष आहे. परवा दि. १२ तारखेला आदरणीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस हे शहरात आल्यानंतर आम्ही त्या प्रभागाचे नगरसेवक व प्रतिनिधी या नात्याने मा.मुख्यमंत्री यांना साकडे घातले. आणि त्यांना विनंती केली की, आमच्या भागातले अनेक

नागरीक त्रस्त आहेत. कोण आंदोलन करतोय, कोणी अनधिकृत घरांसंदर्भात याचिक दाखल केली,याबद्दल सुद्धा आम्ही बोलणार नाही. कारण भाऊसाहेबांनी सांगितलंय, यात राजकारण करायचे नाही. आणि म्हणून त्याच भूमिकेतून मी आज बोलतोय. मागील सहा महिन्यांच्या काळात कोणी काय केलं. आज आपण बघितले तर ताथवडे गावाचा डिपी सात सात वर्षे झाला नाही. हा रस्ता गेल्या पंधरा वीस वर्षांपासून कागदावर लांबत राहीला. यावर कुठल्याही अधिका-यांनी कुठल्याही आयुक्तांनी कुठल्याही मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आमच्यासारख्या लोकांनी याकडे कदाचित दूर्लक्ष केले. प्राधिकरणाच्या हद्दीत मात्र तो येऊन ठेपला. परंतू आज यात हे लोक अडकले आहेत. म्हणून आम्हाला विनंती करायची आहे की, यात बाधित होणा-या नागरीकांनी आमच्या डोळ्यासमोर घरे बांधली आहेत. वीस वीस वर्षे आमच्यासमोर आमच्याबरोबर राहीले आहेत. अशा पद्धतीने त्यांच्या घरांवर संकट येत असेलतर ते निवारण करायची जबाबदारी सुद्धा स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून आमची आहे. म्हणून मुख्यमंत्री साहेबांना विनंती करणार आहे. कारण हे गरीबांचे सरकार आहे. आम्ही त्यांच्याकडे सातत्याने आग्रह धरू, सातत्याने सांगू की, हे लोक त्याठिकाणी दलालांच्या माध्यमातून दूर्दैवाने अडकले गेले आहेत. त्यांना फसवले गेले आहे. म्हणून यात कुठेतरी पर्यायी रस्त्याचा विचार करुन त्यांना धोका न देता कोणत्याही प्रकारचा विकास करता येईल का. ताईंनी सांगितले की हा रिंगरोड कॅन्सल झाला पाहीजे. परंतू ताई मागील काळात शहरात असे अनेक प्रकारचे रोड झाले. त्या रोडचे रुंदीकरण होत असताना त्याठिकाणी काय काय झाले ते आमच्यासारख्या कार्यकर्त्याला, नागरीकांना माहित आहे. परंतू आज जो रिंगरोडचा प्रश्न आहे, तो रोड माझ्या प्रभागातून जात असल्यामुळे ती आमची जबाबदारी बनते. म्हणून मी या निमित्ताने विनंती करणार आहे की, आम्ही सुद्धा या भूमिकेबरोबर आहोत की, सर्वसामान्य नागरीकांना कोणतीही अडचण न येता रोड होत असेलतर पर्यायी रस्त्याचा वापर करावा. आज आम्हाला माहिती मिळाली आहे की, तिथे ८० टक्के रस्ता ताब्यात आहे आणि २० टक्के भागात प्राधिकरण आहे. म्हणून २० टक्के रस्त्यासाठी आख्खा रस्ता कॅन्सल करण्याऐवजी आमच्या भागातल्या बाधित लोकांच्या घरांवरून जाणारा रस्ता त्याठिकाणी पर्याय म्हणून वापर केलातर एसएमटीआर रस्ता जो काही आहे तो शहराच्या विकासाच्या दृष्टीने नवी दिशा असणारा होईल. परंतू तो कुठल्या दिशेने असणार आहे हे आमच्यासारख्या सर्वसामान्य नागरीकांच्या घरांना कुठलीही इजा न होता होत असेलतर त्याचे आम्ही स्वागत करु. आमच्या या रिंगरोडमध्ये किंवा एसएमटीआरमध्ये बाधित नागरीक, सर्वसामान्य नागरीक आमचे आहेत. त्यांनी आम्हाला मतदान केले आहे. त्यांच्यासाठी काम करणे ही आमची जबाबदारी आहे. याठिकाणी मी विनंती करणार आहे की, पर्यायी रस्त्याचा वापर  करावा असा या सभागृहाने इथे ठराव मंजूर करावा. आम्ही सुद्धा या भूमिकेत आहोत की, आमच्या लोकांचे कुठलेही नुकसान होऊ नये. धन्यवाद. जयहिंद, जयमहाराष्ट्र.

**मा.वैशाली घोडेकर**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,उपस्थित सर्व सन्माननीय नागरीक, आज याठिकाणी मी तीन चारच मुद्दे मांडणार आहे. मी जास्त वेळ घेणार नाही. पिंपरी चिंचवड शहराची ओळख ही मोठमोठे उड्डाणपूल, रस्ते, ग्रेडसेपरेटर म्हणून आहे. रिंगरोडची खरच गरज आहे का याचा विचार प्रशासनाने नक्कीच केला पाहीजे. पण त्याचबरोबर मी असेही सांगेन की रिंगरोड रद्द करा असा प्रस्ताव वर शासनाकडे पाठवला तर तो नक्कीच मंजूर होणार आहे का. याचा सुद्धा साधकबाधक विचार आपण सगळ्यांनी नियमाप्रमाणे सगळ्यांनी केला पाहीजे. नाहीतर त्या लोकांना नुसते आशेवर बसवायचे. आणि आपण चर्चा करुन मोकळे व्हायचे. हे सभागृहाने याठिकाणी करु नये. एक पर्याय सगळ्यांनी सांगितले आहे की पर्यायी जागेचा विचार म्हणजे पर्यायी जागेतून तो रिंगरोड केला पाहीजे. हा प्रस्ताव तिथे नक्कीच मंजूर होऊ शकतो. हे सभागृहाला माहित आहे. तर या पर्यायाचा विचार नक्कीच इथे करावा. आणि या रिंगरोडवर जी दाट लोकवस्ती झाली आहे ती सर्वतो प्रशासनाची चूक आहे. आज त्याठिकाणी डिमार्केशन असतेतर तिथे असे झाले नसते. इथून पुढे या रिंगरोडसारखी परिस्थिती इतर ठिकाणी उद्भवू नये म्हणून मी मा.आयुक्त साहेबांना विनंती करेन की, आपण जसे एमआयडीसीचे शेरे असतात, जसे प्राधिकरणाचे शेरे असतात, तसा महापालिकेचाही एक पेन्सिल शेरा केला पाहीजे की जेणेकरून लोकांना कळाले पाहीजे की या सर्वे नंबरमधून असे असे आरक्षण येते आहे किंवा असा असा रस्ता जातो आहे. मा.आयुक्त साहेबांनी याचा गांभिर्याने विचार करावा एवढे सांगते. धन्यवाद.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, पिंपरी चिंचवड वासियांच्या घरांवरून जाणारा रिंगरोड याबद्दल मागील मा.महापालिका सभेत चर्चा करायची खूप इच्छा होती. आज आमचे नगरसेवक असतील, मा.अभिषेक बारणे हे सांगताहेत की उद्या लास्ट डेट आहे. त्यावेळीच आम्हाला चर्चा करायला संधि मिळाली असतीतर आज ही वेळ आली नसती. माझ्या,आमच्या शहरातील नागरीकांना आम्हा नगरसेवकांना एक महिन्याचा कालावधी मिळाला असता. आम्ही हरकती गोळा करुन प्रशासनाकडे आणल्या असत्या. पण सन्मा.महापौर साहेब, मी एका विशिष्ट गोष्टीकडे लक्ष वेधते की, खरेतर रिंगरोड असेल, अनधिकृत बांधकामाचा विषय असेल हे सगळे आपल्या शहरावरती आलेच कसे? याचा विचार केलातर आजही आठवतेय की, शहरात मोहननगर परिसरात मुथा नावाच्या गृहस्थाचे रस्त्यात घर होते. आणि ते घर पाडलेच पाहिजे असे चालले होते. आत्ता सर्वसामान्य नागरीक जे रिंगरोडबाधित नागरीक आहेत त्यांचा कळवळा असल्याचा प्रयत्न करतोय. त्या व्यक्तीची बायको तिथे प्रिटीशनर आहे. सन्मा.महापौर साहेब, याठिकाणी राजकारण हा विषय कधीच नाही. कालही नव्हता, आजही नाही. परंतू आम्ही सभागृहात बोलत असताना खूप काळजी घेत असतो. नागरीकांना माहित नसते की माझे घर अनधिकृत आहे, रिंगरोडबाधित आहे. माझे घर रोडमध्ये जाणार आहे. जाणार नाही हे सर्वसामान्य नागरीकांना कधीच कळत नाही.

सर्वसामान्य नागरीकांना दोन वेळचे जेवण मिळण्यासाठी वणवण भटकावे लागते. त्यातून चार पैसे कमवून कुटूंब भागवले जाते. त्यातून कोण म्हणाले की, इथे जागा मिळते आहे. इतर ठिकाणी तीन रूपयांत मिळतेय मी दोन रुपयांत देतो. असे कोणी म्हटले की माझा नागरीक तिथे जातो. परंतू सिटीसर्वे बघायचा असतो, प्लॅन बघायचा असतो, या किचकट बाबी आम्हाला नगरसेवक असूनसुद्धा कदाचित कळत नाहीत. आमचे अज्ञान असेल कदाचित. परंतू आम्हाला कळत नसेलतर या सर्वसामान्य नागरीकांना कधी कळणार. आणि जेव्हा यांची घरे घालवायचा प्रयत्न करतोय, यांच्या डोक्यावर टांगती तलवार ठेवतोय, यांची झोप उडवतोय. या गोरगरीब नागरीकांचे मुलांसहीत रस्त्यावर उतरल्याचे फोटो पेपरमध्ये पाहीले तर मन भरून आले होते. आज मोठी माणसेच नाहीततर त्यांची मुले सुद्धा रस्त्यावर थांबले होती की, काका, बघा आमचं घरं. प्रशासनाने आमची घरे वाचावीत अशी त्या छोट्या चिमुरड्यांची मागणी होती. नक्कीच या सगळ्या गोष्टींना कोण जबाबदार आहे, याचा सुद्धा विचार करायची गरज या सभागृहाला आहे. कुठेतरी म्हणायचे, मुख्यमंत्र्यांनी लाठिमार केला. अहो लाठिमार केला नाही. आम्हीसुद्धा अनधिकृत बांधकामांबाबतीत मा.शरद पवार असतील, सन्मा.अजितदादा पवार असतील यांच्याकडे पत्र घेऊन जायचो. त्यावेळी अदबीचीच भाषा काय असायची. बोलता आले नाहीतरी पत्र घेण्याची रिक्वेस्ट असायची. त्यांची भेट घेण्यासाठी आम्ही जायचो. आज मला हेच सांगायचे आहे की, नक्कीच आम्ही या नागरीकांबरोबर आहोत, कालही होतो, आजही आहोत. म्हणून आमदार मा.लक्ष्मणभाऊ जगताप यांनी राजिनामा सुद्धा दिला. भाऊंनी अनधिकृत बांधकामांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न याठिकाणी केला. परंतू आज पुन्हा एक नवीन विषय. आम्ही नागरीकांसमोर मत मागायला जातो. तेव्हा त्यांना वाट्टेल तेवढी आश्वासने पण देतो. मला सगळ्यांना हेच सांगायचे आहे की, आपण आश्वासन दिलेतर ते पूर्ण करणे लागतो. मग ते शासनाच्या माध्यमातून असेल, प्रशासनाच्या माध्यमातून असेल. आमचे संपूर्ण सभागृह भारतीय जनता पार्टी याकरिता कटीबद्ध आहे की, तुमच्यावर होणारा अन्याय म्हणतोय, आम्ही तसा कसलाही अन्याय होऊ देणार नाही. कासारवाडी असो कोणत्याही परिसरासाठी बोलत नाहीतर आम्ही संपूर्ण शहरासाठी बोलतोय. नागरीक आम्हाला सकाळी सहा वाजता दारं ठोकठोकून सांगतात, रडतात. ताई, आमचं घर बघा. त्या बिचा-यांचे इमोशन्स इतके सोप्पे नाहीत की, आम्ही तुम्हाला या सभागृहात सांगू शकू. परंतू मा.आयुक्त साहेब, आपण जेव्हा नागरीक याला जबाबदार असे म्हणतो. तेव्हा यांना कळायला पाहिजे होते. त्यावेळी तुमचे प्रशासन झोप काढत होते का हा सुद्धा तितकाच महत्वाचा मुद्दा आहे. ते अशिक्षित आहेत, अनपढ आहेत असे म्हणू. त्यावेळी आमचे जे आजी आजोबा होते, त्यांना कळत नव्हत, त्यांना ज्ञान नव्हत हे आम्ही यावेळी सभागृहात सुद्धा मान्य करतो. परंतू प्रशासन जे स्वतःला हुशार समजते. ते शिकलेले आहेत म्हणून त्यांना इथे नोकरी मिळाली आहे. ते कुठे गेले होते. जशी यांची आज झोप उडाली, तसाच यांचा आता फतवा निघाला

पाहीजे. त्या त्या वेळी तत्कालिन जे जे अधिकारी असतील,आयुक्त असतील, परीसराची पाहणी करणारे निरीक्षक असतील, त्यांच्याही खिशाला चाट बसली पाहीजे. त्यांना सुद्धा धक्का बसला पाहीजे. त्यांचेही दोन प्रमोशन्स थांबवले गेले पाहीजेत. हे मी सन्मा. आयुक्त साहेबांना सांगतेय. सर्वांत महत्वाचा भाग म्हणजे, आज अनधिकृत बांधकामे झाली. त्याचबरोबर आज रिंगरोडचा विषय आहे. स्पाईनरोडचा विषय झाला. तुम्हालाही माहिती आहे की, शहराचा १९९५ चा जो जुना डि.पी. आहे, तो आजपर्यंत ५ टक्के सुद्धा विकसित झालेला नाही. हा अत्यंत दूर्देवी भाग आहे. जागा रिकामी दिसली की सांगतात जागा रिकामी आहे. मोकळा प्लॉट आहे विकत घ्या. सामान्य नागरीकाला जागेची गरज असते. त्याला घर बांधायचे असते. आयुष्यात एकच स्वप्न असते की, आपले घर असावे. दोन मुले असावीत. त्यांचे लग्न करावे. या स्वप्नातून तो नागरीक चाललेला असतो. या मोहापायी तो घर घेतो. आज जेवढी आरक्षणे आहेत, त्या आरक्षणांत आपण कंपाऊंड घातले आहे का. आजही यांच्याबरोबर आपण किती नागरीकांचा बळी देणार आहोत. याचा विचार करायची वेळ आली आहे. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आज मी विनंती करते की, या विषयाबाबतीत आजही नागरीकांबरोबर भारतीय जनता पार्टी असणार आहे. यात शंका असण्याचे कारण नाही. त्याच पद्धतीने सोल्यूशन आम्ही रिंगरोड बाधित लोकांच्या बाबतीत शोधणार. हा शब्द मी या सभागृहात भारतीय जनता पार्टीच्या वतीने देते आहे. त्याचबरोबर सन्मा.महापौर साहेब व मा.आयुक्त साहेब, आपल्याला विनंती आहे की, आपले जे काही बजेट असेल त्या तरतूदी आपण सांगा. ज्या डिपीतल्या जागा आहेत, ताब्यात आलेल्या आहेत, आल्या नाहीत. परंतू ती आरक्षणातली जागा आहे. म्हणून संबंधित जागेला आपण तत्कालिन, त्वरित, अत्यंत अर्जंट विषय, महत्वाचा विषय म्हणून सगळ्या जागांना कंपाऊंड घालावे. त्यासाठी जी रक्कम लागेल ती सांगावी. नंतर अ प्रपत्र, ब प्रपत्र होईल तेव्हा होईल. परंतू माझा सामान्य नागरीक, किमान एवढी खात्री आहे की, आमचे आजी आजोबा फार शिकलेले नसलेतर एखाद्या ठिकाणी काळा बोर्ड लागला किंवा पत्रक लागले आहे. तेव्हा ते निश्चितपणे विचारतात, त्यांना समजते की, इथे काहीतरी लिहीले आहे मला वाचून दाखव. मग त्या सामान्य व्यक्तीला याची जाणिव होते की इथे काहीतरी आरक्षण आहे. म्हणून मी या सभागृहाला नक्की सांगते की, या सभागृहाला पुन्हा एकदा रिंगरोड नको, पुन्हा एकदा नवीन अनधिकृत बांधकामे नकोत. पुन्हा एकदा स्पाईन रोड बाधित लोक नकोत. अशा नागरीकांना त्रास झाल्यानंतर त्यांच्या वेदना आम्ही निश्चितपणे जाणतोच. यांच्याच मतांवर आम्ही इथपर्यंत सभागृहात आलो आहोत. याची जाण ठेवून सांगते की, आपण त्वरित जेवढी आरक्षणे असतील, त्यांना कंपाऊंड टाकायची व्यवस्था करावी. रिंगरोड बाधित लोकांसाठी जे काही करता येईल यातील चांगल्या बाबींचा विचार करुन, सभागृहात ठराव करुन प्रश्न सुटणार नाही. हे फक्त बोलून सोडवायचे प्रश्न नाहीत. तुम्ही जनतेला वचन दिले. अशा शब्दांवर, वचनांवर घरे राहत नाहीत. हे आमच्यासारख्यांना नक्की कळते. नुसते भाषण करुन शब्द थांबणार नाहीत.

प्रशासकीय भाषेत नागरीकांची घरे वाचण्यासाठी जो काही ठराव करता येईल, जो काही निर्णय घेता येईल तो करावा. या ठरावाला आम्ही सगळेजण तुमच्या बरोबर असू असे सभागृहाच्या वतीने सांगते व थांबते. जयहिंद, जयमहाराष्ट्र.

**मा.उषा ढोरे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह,अधिकारी वर्ग, पत्रकार बंधू, आज अतिशय महत्वाचा प्रश्न याठिकाणी होणार आहे. ज्यांची घरे जातात, असे सर्वच त्या भागातील नागरीक यांचे मी मनःपूर्वक स्वागत करते. ही मिटींग अतिशय व्यवस्थित झाली. परंतू हा बेघर होणा-या नागरीकांचा महत्वाचा विषय आहे. त्यासाठी चर्चा करण्यासाठी बराचसा वेळ दिला आहे. पाऊणेआठ वाजलेले आहेत. खूप वेळ गेला आहे. सत्ताधारी असो किंवी विरोधक असो. साहजिकच आहे. नागरीक मतदान करुन नगरसेवक निवडून आणत असतात, त्यावेळी त्या नागरीकांच्या ज्या काही अडचणी असतात, त्यांना आश्वासन दिलेले असते. त्या रिंगरोडमध्ये जो जो भाग येत असतो. मा.अभिषेक बारणे यांनी अतिशय सुंदरपणे हा प्रश्न जाहिर करुन सांगितला आहे. त्यांनी त्याचा अभ्यास देखील केला आहे. खरेतर मी त्यांचे कौतुक करते. रिंगरोडचा विषय एवढा अवघड आहे तरीसुद्धा त्यांनी त्याबद्दल खूप छान संभाषण केले. आणि सभागृहाला पटेल अशी त्यांनी त्याची बाजू मांडली आहे. त्याला अनुसरून सगळ्याच पक्षांतील नगरसेवक बोलले. मा.मंगलाताई कदम बोलल्या. मा.वैशालीताई घोडेकर बोलल्या. मा.अजित गव्हाणे बोलले. मा.दत्ता काका साने यांनी त्यावर छानपैकी भाषण केले. यातून हेच दिसतेय की, सर्वांचा या विषयाला विरोध आहे. आपलादेखील विरोध आहे. मा.पंतप्रधान यांनी आवास योजना कशासाठी राबवली आहे, तर बेघरांना घरे देण्यासाठी, जे या शहरात रोजगारासाठी आले आहेत. अश्या लोकांना पंतप्रधान आवास योजनेतून घरे देण्यासाठी फॉर्म भरून घेतले गेले आहेत. आपण बेघर लोकांना, झोपडपट्टी वासियांना घरे दिली आहेत. ही घरे देत असताना रिंगरोडमध्ये येणा-या नागरीकांची घरे वाचवायचे काम देखील आपण करायचे आहे. चूकतेय कुठे, प्रशासनाचे. मा.आयुक्त साहेब, ज्यावेळी आपण एखादा वॉर्ड किंवा गाव समाविष्ट करत असतो, त्यावेळी आपण त्या वॉर्डाचा किंवा त्या गावाचा पूर्णपणे आराखडा तयार करत असतो. गाव घेतल्यानंतर तिथे रोड पाहीजे, गार्डन पाहीजे, असा टाऊन प्लॅनिंगकडून आराखडा तयार करत असतो. गावे समाविष्ट करुन घेतल्यानंतर महापालिकेच्या अनेक प्रकारच्या सुविधा त्याठिकाणी दिल्या गेल्या पाहीजेत. याकरिता पूर्वतयारी म्हणून त्या भागाचा विकास करण्यासाठी हे अतिशय गरजेचे असते. मा.आयुक्त साहेब, तिथे प्रशासनाचे चूकते. गाव घेत असताना कोणी लक्ष देत नाही. शेतकरी वर्ग असतो, त्यांच्या हे लक्षात येत नाही. तिथे शेतकरी वर्ग असल्यामुळे, त्यांच्या लक्षात न आल्यामुळे गोरगरीबांनी त्याठिकाणी कमी पैशांत जागा घेतल्या आहेत. आणि घरे बांधली आहेत. खरेतर मला प्रशासनाची सुद्धा बाजू घ्यावीशी वाटते की, जेव्हा भूसंपादनाच्या जागा असतात. ब-याच नगरसेवकांनी सांगितले, मा.आशा धायगुडे-शेंडगे यांनी सुद्धा सांगितले की, तुम्ही महापालिकेच्या आरक्षित जागांना

कंपाऊंड करा. मा.आयुक्त साहेब, मा.महापौर साहेब, मी जास्त बोलणार नाही. ज्या जागा आरक्षित करतो त्याला कंपाऊंड घातले गेले पाहीजे. कारण डी.पी. जाहीर करताना तुम्ही गायरानात भूसंपादन केले आहे. परंतू जोपर्यंत भूसंपादन होत नाही, तुमच्या ताब्यात ती जागा येत नाही. तोपर्यंत तुम्हाला सुद्धा अडचणी येतात. ज्यावेळी गावे समाविष्ट करायची आहेत, त्याचवेळी प्लॅन करा. त्याची योजना केली गेली पाहीजे. वेगवेगळ्या भागांत लाईटचे भरपूर बोर्ड लागले आहेत. महापालिका या शहराची नस आहे. प्रशासनाने त्या भागातल्या लोकांना ४/५ दिवसांकरिता जाहीरातींचे बोर्ड स्वतः फ्रि मध्ये देऊन ही योजना राबवली गेली पाहीजे. वॉर्डची परिस्थिती कशी आहे हे दाखवले गेले पाहीजे. अशाप्रकारे अत्यावश्यक प्रश्न समोर येत असेल. आज पेपरमध्ये पाहिले, मोर्चात पाहीले, मा.नामदेव ढाके तिथे होते. असे नाही की विरोधासाठी विरोध करायचा. तिथे दंडेलशाही दाखवायची. विकास नक्की करायचा पण विकास करत असताना कोणालाही बेघर करायचे नाही. हा पिंपरी चिंचवडच्या माणूसकीचा प्रश्न आपल्याला जागरुक ठेवायचा आहे. म्हणून रिंगरोड करतात. म्हणून भाजपला कुठेतरी विरोध करायचा. कुठेतरी गोंधळ करायचा. आपण त्याठिकाणी पिक्चरमध्ये यायचे. आणि आम्ही तुमच्याकरीता काहीतरी करतोय हे दाखवायचे. त्याला अर्थ नाही. या प्रश्नावर अतिशय महत्वाचे निर्णय झाले पाहीजेत, चर्चा झाली पाहीजे. मा.मुख्यमंत्री असो, मा.आमदार असोत, आपले मा.लक्ष्मणभाऊ जगताप असोत, मा.महेशदादा लांडगे असोत. त्या भागातले सगळे प्रतिष्ठित लोक एकत्रित आले पाहीजेत. महापौरांनी सगळ्यांनी त्यावर अभ्यास केला पाहीजे आणि निर्णय घेतला पाहीजे. पर्यायी व्यवस्था करत असताना, त्याठिकाणी रिंगरोड करत असताना मा.महापौर आपण स्वतः त्याठिकाणी व्हिजिट द्या. लोकांना बेघर करण्यापेक्षा पर्यायी व्यवस्था करुन वाकड्या वळणाने तुम्हाला जाता येत असेलतर फक्त रस्ता होणे महत्वाचे आहे. तुम्हाला वाकड्या वळणाने रिंगरोड करता येत असेलतर आवश्य त्याठिकाणी हा रिंगरोड करावा. लोकांना बेघर करायचे काम आपले नाही. प्रशासन लोकांना घरे देते. आत्ताच आपण एक विषय पास केला. त्या लोकांना सुविधा देत असताना आपण त्यांचे संरक्षण सुद्धा करणार आहोत. रिंगरोडचा विषय महत्वाचा आहे. सगळे तुमचे आमचेच आहे. आपले पाहुणे आहेत, आपले नागरीक आहेत, आपले मतदार आहेत. ज्या लोकांची घरे रिंगरोडमध्ये जाणार आहेत, त्यांना आपण न्याय द्यावा. सगळे एकत्र आहोत असे शहराला दाखवून द्या. आपण अभ्यास केलातर शहराचा विकास झाल्याशिवाय राहणार नाही. बोलण्यासारखे खूप आहे. आपण मला बोलायची संधी दिलीत. आपली खूप आभारी आहे. धन्यवाद.

**मा.योगेश बहल-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,विशेषतः एवढे उशीरा बसलेले अधिकारी व पत्रकार, मी महापौर साहेबांचे व पक्षनेत्यांचे विशेषतः आभार मानतो की, हा ज्वलंत विषय आहे, जीवाभावाचा विषय आहे. त्यासाठी चर्चेला हा विषय दिला आहे. त्यासाठी वेळ दिला आहे. प्रथमतः जी कारवाई चालू आहे ती थांबवावी. कालबाह्य झालेला

डेव्हलपमेंट प्लॅन हा अंमलात आणू नये. रिंगरोड रद्द करावा. अशाप्रकारची मागणी करतोय. आज आपण सर्वांनी चर्चा केली आहे. या चर्चेच्या माध्यमातून सर्वांनी पॉझिटीव्ह चर्चा केलेली आहे. सर्वजण पॉझिटीव्ह आहेत आणि सर्वांना असे वाटते की, यांची घरे पडू नयेत. ही कारवाई थांबवावी. असेही सर्वांना जरी वाटत असले तरी आजच्या सर्वांच्या भाषणातून कदाचित चांगले परिणाम निघतील. मी मा.महापौरांचे, मा.पक्षनेत्यांचे, सर्व सन्माननीयांचे याठिकाणी आभार मानलेले आहे. परंतू माझी आपल्याला विनंती आहे की, आपल्याबरोबर आपल्या पक्षाचे अभिनंदन करावे अशी वेळ आपण आणा. की जेणेकरून यांना संरक्षण मिळावे. आज जो डेव्हलपमेंट प्लॅन कालबाह्य झालेला आहे. वास्तविक पाहता, कोणताही डेव्हलपमेंट प्लॅन त्याचे २० वर्षांनंतर रिव्हिजन व्हायला पाहीजे आणि एमआरटीपी ॲक्ट १२७ प्रमाणे आपण पाहिलेतर कोणत्याही जमिनीचे १० वर्षांच्या आज ॲक्विझिशन झाले नाहीतर आणि त्यानंतर जर त्या मालकाने किंवा त्या इंटरेस्टेड पार्टीने जर पर्चेस नोटीस दिली, १२ महिन्यांच्या आत प्रशासनाने त्यावर कारवाई केली नाहीतर reservation is being to be lapsed. एमआरटीपी ॲक्ट १२७ सेक्शनप्रमाणे नियमाप्रमाणे ते रिझर्वेशन लॅप्स होते. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा आणि प्राधिकरणाचा डेव्हलपमेंट प्लॅन अंमलात आला आहे. १९८५ ला डीपी मंजूर झाला आहे. आपण २०१७ मध्ये त्याची अंमलबजावणी करतो. वास्तविक पाहता, २० वर्षांत हा डीपी रिन्यू व्हायला पाहीजे होता. सेक्शन १२७ प्रमाणे दहा वर्षांत ॲक्विझिशन केलेले नाहीतर त्याची नोटीस द्यायला पाहीजे होती. परंतू मालकाने पर्चेस नोटीस न देता ती जागा दुस-याला विकून बसला. आरक्षणाची जागा विकून बसला म्हणून त्याने पर्चेस नोटीस दिली नाही. प्रशासनाने त्याच्यावर कारवाई केली नाही, ॲक्विझिशन केले नाही ही प्रशासनाची चूक आहे. तो शेतकरी अज्ञानी असेल त्यामुळे त्यांनी ती जागा विकून टाकली असेल म्हणून त्याने पर्चेस नोटीस दिली नाही. पहिल्यांदा प्रशासनाची चूक, दुस-यांदा त्या ओनरची चूक, भरडला गेला मात्र तो ज्याने ती जागा पर्चेस केली. त्याने बांधकामही त्यावर केले आणि अनेक वर्षांपासून तो तिथे वास्तव्य करतोय. आज त्याची मुले दहा बारा वर्षांची झाली आणि आज त्याच्या घरावर बुलडोजर फिरतोय. मघाशी मा.एकनाथ पवार माझ्याशेजारी बसून आम्ही हीच चर्चा करत होतो. कुणी अर्धा गुंठा घेतला कुणी एक गुंठा घेतला त्या अर्ध्या एक गुंठ्यात कोणी एक मजली बांधले कोणी दोन मजली बांधले. ज्याने त्याने त्याच्या ऐपतीप्रमाणे बांधकाम केलेले आहे. आपण सगळे चर्चा करतो आहोत. हा विषय फक्त पिंपरी चिंचवड शहरापुरता मर्यादीत नाही. यात पिंपरी चिंचवड प्राधिकरण पण आहे. यात सगळ्या गोष्टींना संरक्षण द्यायचे असेलतर यात मुख्य भूमिका यू.डी. डिपार्टमेंटची आहे. आणि यू.डी डिपार्टमेंट हे मा.मुख्यमंत्री यांच्या अखत्यारीतले डिपार्टमेंट आहे. त्यामुळे आपल्या सभागृहात जी चर्चा झाली आहे. या चर्चेन्वये आपले जे मत आहे, ते आजच्या मिटींगच्या अनुषंगाने मा.महापौर आपण व्यवस्थितरित्या मा.मुख्यमंत्री यांना द्यावे. यात सर्व राजकीय पक्षांची अशी भावना आहे की, सर्वांनी एकमताने हे ठरवले आहे.

आमच्या सर्वांचे मत असे आहे की, नियमाप्रमाणे प्रशासन चूकले आहे, नियमाप्रमाणे तो मालक सुद्धा चूकला आहे. परंतू प्रत्येकवेळी भरडला जातोय तो गरीब. रिझर्वेशन करतो, हजारो गोष्टी करतोय. लोकांना घरे देण्यासाठी प्रयत्न करतोय. बेघरांना घरे देण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करतेय. आणि दूस-या बाजूला अशा प्रकारचा नियम. डेव्हलपमेंट प्लॅन कालबाह्य झाला आहे. आपण एजन्सी नेमणार आहोत. नंतर आपल्याला ड्राफ्ट डेव्हलपमेंट प्लॅन बनवावा लागणार आहे. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, आपण मा.मुख्यमंत्र्यांना असे कळवावे की, २० वर्षांपूर्वी डेव्हलपमेंट प्लॅन केला आहे. २० वर्षांत प्रशासन असमर्थ ठरलेले आहे. म्हणून या लोकांच्या घरांवर बुलडोजर फिरवायची आमच्या कोणत्याही राजकीय पक्षाची इच्छा नाही. इथून मागे काय झाले,कोणी काय केले,कोण सत्तेवर होतं,हीच कॅसेट परत वाजवण्याऐवजी आपण सर्वांनी मिळून मा.मुख्यमंत्र्यांना निवेदन द्यावे. हा रिंगरोड रद्द करुन या लोकांना आहे तसं राहण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावा अशी मी विनंती मा.महापौर साहेबांना व मा.पक्षनेत्यांनाही करतो. आणि आजच्या चर्चेच्या अनुषंगाने हा ठराव आपण मा.मुख्यमंत्र्यांना पाठवावा. जेणेकरुन यातून मार्ग निघतोय का. कारण शेवटी महापालिकेत झालेली ही चर्चा अर्थात यात मा.महापौरांना अधिकार नाही. आयुक्तांना अधिकार नाही. किंवा सभासदांना अधिकारी नाही. परंतू लोकप्रतिनिधी म्हणून त्या नागरीकांचा आपल्यावर हक्क आहे. मग कोणीही कुठल्याही पक्षाचा असो. त्या हक्काच्या अनुषंगाने, माणूसकीच्या धर्माच्या अनुषंगाने आपण हा ठराव करावा. आपण मा.मुख्यमंत्र्यांना विनंती करु की, तुम्ही यात लक्ष घालून लोकांना त्याठिकाणी आश्रय द्यावा. त्यांना या कारवाईतून मुक्त करावे अशी मी विनंतीवजा सूचना करतो. मी मा.महापौर यांचे पुन्हा एकदा अभिनंदन करतो, सभागृहात आपण चांगली चर्चा करायला वेळ दिला आहे. मा.मुख्यमंत्र्यांचे कौतुक व्हावे, भारतीय जनता पक्षाचे कौतुक व्हावे अशी वेळ परमेश्वर कृपेने यावी, आणि या लोकांचा निवारा त्याच जागेवर रहावा, मी अशी अपेक्षा व्यक्त करतो. आणि थांबतो. धन्यवाद.

**मा.सिमा सावळे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,आज तीन तास एसएमटीआरवर चर्चा घडवून आणलीत, त्याबद्दल मी मा.महापौरांचे मनापासून अभिनंदन करते. सर्व ज्येष्ठ नगरसेवक असतील ज्यांनी सभागृहात वीस वीस पंचवीस वर्षे काढली. त्यांना नियमांची चांगली माहिती आहे. अशा सर्व ज्येष्ठांनी इथे आपले मत मांडले आहे. त्याचबरोबर नवोदीतांनी सुद्धा त्यांची मते मांडली आहेत. मतं मांडत असताना एकही नगरसेवक असे बोलला नाही की यांची घरे पाडा. खरेतर अनधिकृत घरे असतील किंवा याला प्राधिकरणातील अनियमित घरे म्हणता येतील. यातली जी घरे होती याच्या मोर्च्याची सुरुवातच मुळात मा.नामदेव ढाके यांनी केली आहे. मा.नामदेव ढाके असतील, पक्षनेते मा.एकनाथ पवार असतील, आजचे खासदार असतील, आम्ही सगळ्यांनी इथून ते नागपूरपर्यंत मोर्चे काढलेले

आहेत. नाही यश आले त्या मोर्च्यांना, नाही तत्कालिन सरकारने त्याची दखल घेतली. म्हणून काम थांबलंय का. सगळ्यांचे इथे म्हणणे लक्षात घेता टाळ्या वाजवण्यासाठी जी काही भाषणे होतात, ती कृतीमध्ये किती उतरतात. टाळ्या वाजवून घरे वाचणार असतीलतर शंभर टक्के टाळ्या वाजवा. आणि आमच्या नावाने शिव्या द्या. आमचे काही म्हणणे नाही. आम्हाला शिव्या देऊन तुमची घरे जर वाचणार असतील तर आम्हाला शिव्या द्या. परंतू सत्ताधारी पक्षाचे नगरसेवक आहेत. मुख्यमंत्र्यांचे कुठेतरी अभिनंदन करत आहेत. म्हणून कोणाच्या पोटात पोटशूळ उठत असेलतर त्यांनी त्यांचे नेतृत्व तपासायलाच पाहीजे. किती दिवस लोकांना मुर्खात काढणार आहात हे तुम्ही ठरवा. आता हे ठरवायची वेळ आलेली आहे. रोज उठून जाऊन तिथे पेटवायचे, विझवायचे कुणी. एखाद्याची बायको उघड्यावर पडली, मुलं उघड्यावर पडली, सांभाळणार कोण. तुमचे राजकारण होतेय, समोरच्याचा जीव जातोय हे लक्षात ठेवा. म्हणून टाळ्या वाजण्यासाठी इथे कोणी भाषणे केली असतीलतर त्या सगळ्यांना माझे सांगणे आहे की, हो ही घरे आम्ही नियमित करणार. आणि ते आम्हीच करणार आमचचं गव्हर्नमेंट करणार. सन्मा.मुख्यमंत्रीच करणार कारण तेच यू.डी.चे अध्यक्ष आहेत. त्यांच्याकडेच यू.डी. विभाग आहे. आत्ताच मा.योगेश बहल म्हणाले की तुमचा अभिनंदनाचा ठराव येऊ द्यात. मा.योगेश बहल तुम्ही आत्ताच अभिनंदनाचा ठराव करुन टाका. कारण या शहरातला गेले अनेक वर्षांपासूनचा अनधिकृत बांधकामांचा विषय मार्गी लावण्यासाठी सन्मा.मुख्यमंत्री यांनी प्रयत्न केले. त्याचबरोबर शास्ती ६०० स्क्वे. फूटाच्या वरील बांधकामावर लावण्यासाठी त्याठिकाणी अध्यादेश काढला. मागील कुठल्याही सरकारने असा अध्यादेश काढला नाही. का काढला नाही सत्ता नव्हती, हुकूमशाही नव्हती का. परंतू त्यासंदर्भातले कुठलेही काम न करता तत्कालिन सरकारमध्ये सर्वसामान्यांच्या विरोधातले काम झाले होते. म्हणून मी म्हणते, याठिकाणी मा.मुख्यमंत्र्यांनी हा जी.आर. काढला तो संपूर्ण महाराष्ट्राला लागू आहे. मा.अभिषेक बारणे यांना माझे सांगणे आहे की, आपण नवीन आहात. काही गोष्टींसाठी त्याठिकाणी नियमांत दंड भरावा लागलातरी हरकत नसावी. आपण दंड सोडून एखादा विषय करायला गेलोतर ते घरही राहणार नाही आणि तो दंडही राहणार नाही. काही गोष्टींसाठी दोन पाऊले मागे जायची सुद्धा तयारी ठेवा. तुम्ही खूप प्रामाणिक आहात. सेन्सिटीव्ह आहात. तुम्हाला हे सहन होत नाही. पक्षनेत्यांच्या मिटींगमध्ये तुम्ही भांडून भांडून सगळ्यांना जेरीस आणले की, या विषयावर चर्चा घ्या. परंतू तुम्ही ज्यावेळेस पोटतिडकीने बोलत होता, तेव्हा पाठीमागून ए ए ए चालले होते. बाकीचे भाषण करत होते तेव्हा टाळ्या पडत होत्या. दुःख त्याचे होते. मा.नामदेव ढाके यांनी, मा.एकनाथ पवार यांनी तर लाठ्याकाठ्या खाल्या आहेत. जसं चार माणसे मड घेऊन जातात, तसे मा.एकनाथ पवार यांना पोलिसांनी फरफटत नेले होते. मा.एकनाथ पवार यांना मानायला पाहीजे. काहीच वाटत नाही. ते तुमचे कोणीच लागत नाहीत. या शहराचे आम्ही कुणीच नाही आहोत. मुख्यमंत्री तुमचे कोणी लागत नाहीत. त्यांनी कोणासाठी हा

जी.आर काढला आहे. या शहराचा होल विकास आम्हीच केला म्हणून मोठमोठे बोर्ड लागले होते. तत्कालीन सत्ताधा-यांनी शहराचा विकास असाच केला का. कुणाचेच घर पाडले नाही. एकाचीही जागा घेतली नाही का. काय सांगताय तुम्ही. कोणाला सांगताय. आम्हाला. आम्हाला नका सांगू. मी शहरात १९९२ पासून राहतेय. अनेक लोकांना मी बेघर होताना पाहीलेले आहे. अनेक लोकांना मी बेघर होताना पाहीलेले आहे. आणि त्यावेळी इथे चर्चा सुद्धा होत नव्हती. कारण आम्ही त्यावेळी नगण्य होतो. म्हणून चर्चा होत नव्हती. आज इथे चर्चा करायला मिळतेय. सन्मा.महापौर, आत्ताच मा.योगेश बहल यांनी सांगितले. हा आपला अधिकार नसताना मा.अभिषेक बारणेंच्या, मा.नामदेव ढाकेंच्या, मा.पक्षनेत्यांच्या सांगण्यावरून आपण इतका वेळ दिलात. खरेतर दोन्ही आमदार आपल्याकडे बैठक करुन गेले आणि दोन्ही आमदारांनी सांगितले. शहराध्यक्ष मा.लक्ष्मणराव जगताप असतील, मा.महेशदादा लांडगे असतील त्यांनी सांगितलेच होते की, उद्या काही झालेतरी चर्चा ही व्हायलाच पाहीजे. हा नागरीकांच्या हिताचा विषय आहे. म्हणून इथे आपण चर्चा घेतली आहे. कारण आम्ही नगरसेवक आहोत म्हणून चर्चा होते आहे. मी मा.एकनाथ पवार यांना बोलले की, आयुक्त साहेबांनाच प्राधिकरणाचे अध्यक्ष केले पाहीजे. लवकरात लवकर हालचाली केल्या पाहीजेत. आम्ही सगळे हे बोललो यावर अंमलबजावणी करण्यासाठी, म्हणजे तुम्ही आमचे म्हणणे काय ते घेऊन जाल. आणि आज जरी प्राधिकरणावर आपली नियुक्ती नसलीतरी नजिकच्या काळात आपली तिथे नियुक्ती होणार आहे. त्यामुळे आपण या विषयाकडे अत्यंत गांभिर्याने पाहिले पाहिजे. गोरगरीब बांधव २०० फूटांचे ४०० फूटांचे बांधकाम करुन तिथे राहत आहेत. अशा किती नगरसेवकांना पूररेषेतल्या जागा विकल्या आहेत आणि ते नागरीक देशोधडीला लागले आहेत. कोणीच त्यांच्या पाठीशी येत नाही. आम्ही नगरसेवक आहोत. आम्हाला माहित आहे. तिथे पूररेषा आली आहे. एका नगरसेवकाने तर १० एकर जागा घेऊन त्याचे पंधरा वीस लाखांना प्लॉट विकले. इकडे आपला डिपी पास झाला आणि आपण तिथे पूररेषा आखली. आज तिथे बांधकाम करायला कोणीही परवानगी देत नाही. त्यांचे म्हणणे सुद्धा पुढे आपल्यापुढेच येणार आहे. याठिकाणी माझा सर्व सभागृहाला प्रश्न आहे की, ज्या जागा मालकांनी प्राधिकरणात जागा गेल्यानंतर डबल फायदा घेतला असेल तर त्यालासुद्धा नागरीकांनी चाबकाने फोडले पाहीजे. त्याच्याकडून सुद्धा पैसे वसूल केले पाहीजेत. त्याला का सोडायचे. त्या संबंधित जागा मालकाला माहित होते की माझी जागा ॲक्वायर्ड केलेली जागा आहे. मला त्याचा मोबदला मिळालेला आहे. आणि जसे मा.आशा धायगुडे-शेंडगे यांनी सांगितले की, सर्वसामान्य नागरीक माझी जी ऐपत असले त्या ऐपतीप्रमाणे जागा खरेदी करतोय. त्या जागेच्या मोहापायी,माझ्या घराच्या मोहापायी, माझ्या स्वप्नांच्या मोहापायी, माझ्या मुलांच्या स्वप्नांच्या मोहापायी, ही जी जागा घेतली आहे. त्याठिकाणी मी घर बांधले आहे. मला आत्ता कळतेय की, माझ्या घरावरून बुलडोजर जाणार आहे. तो जागामालक तर सहीसलामत सुटलाय.

मोहननगरला मुथा नावाच्या व्यक्तीचे बांधकाम रस्त्यात होते म्हणून ज्यांनी पिटीशन दाखल केले, त्याचे बांधकाम पाडावे म्हणून. ते या मोर्चाचे नेतृत्व करताहेत. अरे, लाजा आहेत का नाही. पार विकून खाल्लीय. कोण आहे तो ज्याने मुथाचे बांधकाम पाडा म्हणून पिटीशन दाखल केले. आणि आज ते इथे ही बांधकामं वाचवा म्हणून नेतृत्व करत आहेत. यांना लाज वाटली पाहीजे. बेगडी आव आणताय तुम्ही. तुम्हाला काय वाटते लोकांना कळत नाही. लोकांना बरोबर कळतेय. मा.महापौर साहेब, वेळप्रसंगी त्याला मी उघडा पाडणार आहे. जाहीर सभेत उघडा पाडणार आहे. रोज मला शिव्या द्या, मला काही फरक पडणार नाही. पण जे लोकांबद्दल बेगडी प्रेम दाखवत आहेत, त्यांचा माझा हिशोब चूकता करणार आहे. अनधिकृत बांधकामे अधिकृत करण्यासाठी, बाधित बांधकामे वाचवण्यासाठी मी सर्वप्रकारे प्रयत्न करणार आहे. सभागृहात सर्व पक्षीय नगरसेवक सह्या करतील, आम्ही मा.मुख्यमंत्र्यांना साकडे घालणार आहोत. मा.मुख्यमंत्र्यांनी जी.आर काढला आहे, यात ज्या ज्या ठिकाणी गरज असेल त्याठिकाणची बांधकामे अधिकृत होऊ शकतात. अशी नियमांत तरतूद आहे. मग का करायची नाहीत. का फायदा घ्यायचा नाही. माझे शहर कष्टक-यांचे, गोरगरीबांचे शहर आहे. माझे हे शहर फार मोठ्या धेंडांचे शहर नाही. चारशे फूटांचे, पाचशे फूटांचे, सहाशे स्क्वे. फूटांचे बांधकाम केलेले आहे. काल एक शिक्षक आले होते. त्यांना मोजणीसाठी साडे तीन लाख लागतील असे सांगितले. साहेब, वाईट वाटले. या नियमांत आपण कुठेतरी बदल करणे गरजेचे आहे. आपण छोट्या घरांसाठी जी स्किम आणली आहे, त्याचअनुषंगाने सांगते. त्याठिकाणी तुम्ही आर्किटेक्ट लावला, त्याला तीन साडेतीन लाख मोजावे लागले तर परवानगी घेऊन कोणीच घर बांधणार नाही. छोटा प्लॉट असेल, कमी क्षेत्रफळ असेलतर त्याठिकाणी आपल्या बांधकाम परवानगीच्या लोकांना तो ठराव मंजूर केला पाहीजे. अशाप्रकारच्या जाचक अटी असतील तर हे शहर दिवसेंदिवस अनधिकृत बांधकामांकडे वाटचाल करणार आहे. सगळ्यांची ओरड चालू आहे. बांधकामे वाढलीत, बांधकामे वाढलीत, बांधकामे वाढलीत. एकिकडे सांगायचे. पाणी देऊन दुसरीकडे सांगायचे, नागरीकांची अनधिकृत बांधकामे नियमित होणार आहेत. काही कळत नाही. एकदा काहीतरी ठोस निर्णय घ्या. माझी मा.महापौर साहेबांना नम्र विनंती आहे की, आपण स्वतः, त्यात विरोधी पक्षनेते घ्या, त्याठिकाणचे स्थानिक नगरसेवकांना घ्या. वेगवेगळ्या भागांतले त्यात असू द्या. त्यांची एक कमिटी तयार करा. त्या कमिटीच्या माध्यमातून मा.मुख्यमंत्र्यांना भेटा. यात फक्त आणि फक्त मा.मुख्यमंत्रीच न्याय देऊ शकतील. कोणीच देऊ शकणार नाही. टाळ्या घेणारे तर अजिबातच न्याय देणार नाहीत. त्यामुळे मा.महापौर साहेब, एक कमिटी जाहीर करुन उद्या या सगळ्या जी.आर. संदर्भातील हरकती /सूचना घेताना प्रामाणिकपणे ज्यांनी ज्यांनी त्यांच्या भाषणांवर टाळ्या वाजवल्या, त्यांनी सांगावे की, त्यांनी पाच लोकांना कायदेशीर भाषेत त्याठिकाणी हरकती नोंदवायला सांगितल्यात. नाही ना केलं. आम्ही करतो ते काम. आमच्याकडून चालू आहे हे काम.

आमच्याकडून चालू आहे हे काम. आमच्याकडून चालू आहे हे काम. आम्ही करतोय ते काम. योगेशभाई आमच्याकडून ते काम चालू आहे. आम्ही करतोय ते काम. आम्ही करतोय ते काम. भारतीय जनता पार्टीने संपूर्ण त्याठिकाणी वकील नेमला आहे. कायदेशीर भाषेत तिथे हरकती नोंदवायचे काम चालू आहे. मा.अभिषेक बारणे काम करतोय. मा.नामदेव ढाके काम करतोय. त्या भागातले नगरसेवक काम करत आहेत. कारण आम्हाला तुमची काळजी आहे. आम्हाला वाटते, तुमची घरे वाचली पाहीजेत. तुम्ही या शहरातच राहीले पाहीजेत. तुमची बायकापोरं रडताना बघताना आमचं सुद्धा काळीज तुटतं. आम्ही उलट्या काळजाचे नाही आहोत. आम्ही उलट्या काळजाचे अजिबात नाही आहोत. मा.महापौर साहेब, मी याठिकाणी विनंती करेन की, पक्षनेत्यांना विनंती करेन की,याठिकाणी सर्व पक्षांची एक कमिटी करुन मा.मुख्यमंत्री यांची वेळ घेऊन या बाधितांना लवकरात लवकर न्याय कसा देता येईल. यासंदर्भात इथे थिटे साहेब आहेत, त्यांचा सहभाग करुन घेणे फार गरजेचे आहे. कारण या रस्त्याचे संपूर्ण रेखांकन त्यांच्यावतीनेच होते आहे. त्यांचे म्हणणे, सूचना घेणे फार गरजेचे आहे. पर्यायी रस्ता देत असालतर ते बघा. नाही करता आलातर काय आमचं सात पिढ्यांचं वाया जाणार नाही. त्यामुळे रस्ता केला नाही केला काही फरक पडणार नाही. आम्ही विकास कसा केला हे सांगायची वेळ येणार नाही. चार लोकांत नजर देऊ शकू. आजपर्यंत चूकीचे काम केलं नाही, करु देणार नाही. चूकीचे होऊ देणार नाही. त्याचबरोबर कायद्याच्या चौकटीत राहून भावनेवर कायदा चालत नाही. त्यासाठी कायद्याला कायद्याचीच भाषा लागते. म्हणून मा.महापौर साहेब, आपल्याला विनंती करते की, आपण कमिटी करुन, विविध तज्ञ असतील त्यांना बरोबर घेऊन, दोन आमदारांना सुद्धा निमंत्रित करावे. सगळ्या पक्षांच्या नेत्यांना बरोबर घ्यावे. यासंदर्भात या विषयाचा लवकरात लवकर पाठपुरावा करावा. एवढेच सांगते व थांबते. धन्यवाद.

**मा.एकनाथ पवार**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,गेल्या दोन तीन तासांपासून जमलेले माझे बाधीत सर्व बंधू, विशेषतः या प्रश्नाला खरेच तळमळीने वाटले असे उपस्थित माझे सर्व नगरसेवक बंधू व भगिनींनो,माझ्या अगोदरच्या सगळ्या वक्त्यांनी रिंगरोड संदर्भातील भूमिका स्पष्ट केली. माझे मित्र मा.भाऊसाहेब भोईर यांनी मनापासून सांगितले की, या विषयात राजकारण झाले नाही पाहीजे. आत्ताची परिस्थिती अशी आहे की, काही लोकांना असे वाटतेय की, रिंगरोड संदर्भात भारतीय जनता पार्टी व्हिलन आहे. आमच्या घरांना बुलडोजर लावण्याचे काम भारतीय जनता पार्टी करतेय. दूर्दैवाने, अशा प्रकारचे चित्र काही राजकीय पक्षांचे नेते शहरात रंगवत आहेत. मला वाटतेय,प्रत्येकाने आपला इतिहास बघितला पाहीजे. या शहरातील रिंगरोडचा प्रश्न दोन महिन्यांपूर्वी आला. जेव्हा मा.श्रीकर परदेशी या शहरात महापालिकेचे आयुक्त होते. मला वाटते, मा.हर्डीकर साहेबांसारखे तज्ञ नव्हते. अनेकांच्या घरांवर बुलडोजर लावायचे काम त्यावेळी केले गेले. तुमचा इतिहास आठवा. त्यावेळी तुम्ही

कुठे होता. आम्ही त्यावेळी लोकांबरोबर होतो. ताई सांगत होत्या. अनधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी मी जेलमध्ये जाणारा कार्यकर्ता आहे. मा.नामदेव ढाके याचा साक्षीदार आहे. मा.मारुती भापकर ज्या लोकांचे नेतृत्व करत आहेत, ते याचा साक्षीदार आहेत. या सभागृहात पूतना मावशीचे प्रेम आणू नका. पंचवीस पंचवीस तीस वर्षांपासून नगरसेवक म्हणून तुम्ही काम करताय. महापालिकेच्या सभेत या विषयातला ठराव करुन घेण्याचा अधिकार मा.योगेशभाई बहल तुम्ही सांगितलात, मा.भाऊसाहेब भोईर तुम्ही सांगितलात. मा.दत्ता काका तुम्ही सांगितले. मला वाटतेय, आपल्या हातात असतेतर या सभेत आपल्याला चर्चा करायची गरज राहीली नसती. आपण या सभेत ठराव केला नसता. निवडणूकांना खूप वेळ आहे. त्याची चिंता करु नका. जे लोक बेघर होणार आहेत त्यांची चिंता करा. त्यात राजकारण करु नका. खरेतर आमच्या नेत्या बोलल्या, आम्ही कधीच राजकारण केले नाही. एखादा उमेदवार पडल्यानंतर लोकांच्या घरांवर बुलडोजर लावणा-यांची आमची संस्कृती नाही. लोकांना घरे मिळवून देण्याची आमची संस्कृती आहे. अशा पद्धतीने आम्ही आमचे काम प्रामाणिकपणे करतो. सभागृहाला माहित आहे, जे जे नेते पोटतिडकीने बोलतात. कुणीतरी सांगितले की, मुख्यमंत्री साहेबांचा निषेध करायला पाहीजे. खरेतर मला खूप वाईट वाटले. मा.मुख्यमंत्र्यांनी गेले अनेक दिवसांपासूनचा जो प्रश्न आहे,इथे अनधिकृत बांधकामे नियमित करण्यासंदर्भातला एकदा नाही लक्षात ठेवा. विधीमंडळात कायदा केला. तो कायदा करुन कोर्टापुढे सादर केला. कोर्टाने पुन्हा सांगितले की, कोर्टात केस दाखल असताना विधी मंडळात कायदा करु शकत नाही. त्याठिकाणी आमच्या बरोबर सरकारमध्ये असलेले शिवसेनेचे आमदार तिथे आहेत. शिवसेनेचे खासदारही राज्यांत आहेत. ते आमच्याबरोबर होते का नव्हते. त्यावेळी त्यांनी म्हणायला पाहीजे होते की, याठिकाणी आम्ही सरकार बरोबर नाही. दूर्दैवाने त्यावेळी सगळ्या पक्षांच्या नेत्यांनी शिवसेना असेल, राष्ट्रवादी काँग्रेस असेल,काँग्रेस असेल, सगळ्यांनी बांधकामे नियमित करण्यासाठी मुख्यमंत्र्यांना पाठिंबा दिला. आणि दोन्ही सभागृहांमध्ये विधायक मंजूर झाले. आणि त्याठिकाणचे नोटीफीकेशन आले. ज्या मुख्यमंत्र्यांनी राज्यातल्या सर्वसामान्य माणसाला आधार दिला पाहिजे, त्याला न्याय दिला पाहीजे. यासाठी प्रामाणिक प्रयत्न करत असताना मुख्यमंत्र्यांबद्दल शंका उत्पन्न करणारे, त्यांच्याबद्दल बोलायला आपण कोण आहोत. आपण काय आहोत, त्या मुख्यमंत्र्यांचा निषेध करतोय. आणि निवेदन काय दिले मला माहित नाही. आम्ही काही जणांचे शिष्टमंडळ सभागृहात आणायचा प्रयत्न करत होतो. दूर्दैवाने मुख्यमंत्र्यांच्या शेड्यूलमध्ये ते आले नाही. त्याचठिकाणी राहणा-या अनेक माणसांनी मुख्यमंत्र्यांना निवेदन देऊन आपली व्यथा मांडली. खरेच हा प्रश्न सोडवायचा आहे का राजकारण करायचे आहे. माझा सभागृहाला प्रश्न आहे. खरेच प्रश्न सोडवायचा असेलतर राजकीय जोडे कृपा करुन बाजूला ठेवा. कुणाला नगण्य नका बघू. कोणाला नायक बनवायच्या, हिरो बनवायच्या भानगडीत नका पडू. आम्ही तुमच्याबरोबर आहोत हे लक्षात ठेवा. आम्ही जर

तुमच्याबरोबर नसतोतर, मागचा काळ आठवा. सात/आठ महिन्यांपूर्वीचा वर्षभरापूर्वीचा काळ आठवा. या लोकांनी आपल्या घरांना काय केले ते आपण आठवा. याही काळात आम्ही सत्वशील आहोत हे लक्षात ठेवा. काही मंडळी विनाकारण अशा पद्धतीने लोकांच्या मनात भासवण्याचा प्रयत्न करत आहेत की, भाजपचे नगरसेवक तुमच्याविरोधात आहेत, भाजपचे आमदार तुमच्याविरोधात आहेत. भाजपचे पदाधिकारी तुमच्या विरोधात आहेत. का खोटा प्रचार करताय. भाजपचे सगळेच्या सगळे नगरसेवक लोकांच्याबरोबर आहेत. हे लक्षात ठेवा, त्यांना राजकारण करायचे नाहीतर त्यांना लोकांचा प्रश्न सोडवायचा आहे. मी यानिमित्ताने सगळ्यांना सांगणार आहे, कृपा करुन जनाची नाहीतर लोकांची तरी लाज राखा. या सभागृहात मा.वैशालीताई घोडेकर तुम्ही बोललात ते खरे आहे. तुम्ही पहिला प्रश्न विचारला, या सभागृहात ठराव करुन हा प्रश्न सुटणार आहे का. मला वाटतेय, नोटीफीकेशन आले. माझ्या काही बांधवांनी सांगितले की, उद्या शेवटचा दिवस आहे. मा.मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, जी आरक्षणे आपल्याला पर्यायी जागा देऊन बदलता येत असतील, काही चांगला पर्याय दिला. दिला आहे का नाही माहिती नाही. पण दिला असेलतर आनंदच आहे. आम्ही शोधतोय हे लक्षात ठेवा. मला वाटतेय की ही वेळ आली आहे. या विषयावर मला सभागृहाला विनंती करायची आहे की, मा.मुख्यमंत्री जे प्रश्न सोडवणार आहेत. मा.मुख्यमंत्री या प्रश्नाला न्याय देणार आहेत. ज्या प्रश्नाचे नेतृत्व करायचे आहे, सगळ्यांना सोबत घेऊन जायचे आहे. अनेक नगरसेवकांनी इथे सांगितले. सर्वपक्षीय नगरसेवकांचे शिष्टमंडळ मा.मुख्यमंत्र्यांना भेटवू शकतो. हे ताई, खरे आहे. ज्या लोकांच्या चूकीमुळे सर्वसामान्य माणसावर ही वेळ आली ते कोण होते. १९९५ ला, २००१ ला मा.भाऊसाहेब भोईर हे प्राधिकरणाचे सदस्य होते. त्याकाळी आम्ही सत्तेतही नव्हतो. काहीच नव्हतो. आंदोलनकर्ते म्हणून रस्त्यावर आंदोलन करणे एवढाच आमचा ३० वर्षांचा धर्म होता. ज्यांना माहित होते त्यांनी जर लोकांना जागे केले असतेतर या लोकांवर ही वेळ आली नसती. त्यावेळीही सत्तेत तुम्हीच, सगळं करणारे तुम्हीच. अलाईनमेंट करताना तुम्हीच. आणि आज आलेलं भूत आपण बघतोय, खरेतर किती लोक बाधित होत आहेत याची कल्पना नाही. अजून कुठल्या गोष्टीचा सर्वे झालेला नाही. कुठल्या भागातून रस्ता जातोय, किती लोकांची घरे जाताहेत, किती बांधकाम जाते आहे, किती स्क्वे. फूटांची घरे जाताहेत, ही परिस्थिती नाही. काही मंडळींना चान्स मिळाला आहे. विशेषतः भारतीय जनता पार्टीच्या विरोधकांना चान्स मिळाला आहे. संधी मिळाली आहे चला, लोक आपल्याबरोबर आहेत. फूकटचे नेतृत्व करायला मिळते आहे. बंधूंनो, लक्षात ठेवा, मराठा समाजाचे नेतृत्व तुम्ही बघितले आहे. मराठा समाजाचे नेतृत्व करायला जे जे राजकीय पक्षांचे नेते गेले त्यांना हकलून लावायचे काम केले गेले. कारण त्या राजकीय पक्षांच्या लोकांनी जेव्हा जेव्हा मी मराठा समाजाला आरक्षण मिळूवन देण्याची भूमिका केली. अशीच परिस्थिती इथून पुढील काळात या भागातील राजकीय नेत्यांची होणार आहे. ढोंग आणतात की आम्ही तुमच्याबरोबर आहोत. अरे, ढोंग नाही कृति

करा. खरेच सर्वसामान्य माणसाचा कळवळा असेलतर तुम्ही त्याच पद्धतीने लोकांच्या बरोबर असण्याची गरज आहे. या सभागृहाच्या माध्यमातून एवढेच सांगेन. आजही या रिंगरोड बाधितांबरोबर भारतीय जनता पार्टी शंभर टक्के आहे हे लक्षात ठेवा. भारतीय जनता पार्टी विषयापासून पळून जाणारी पार्टी नाही. ही सर्वसामान्य माणसांची पार्टी आहे हे लक्षात ठेवा. सर्वसामान्यांना न्याय मिळवून देणारी पार्टी आहे. या शहरातल्या बाधित होणा-या लोकांच्या बरोबर शंभर टक्के आहोत. पर्याय निघत असेलतर शंभर टक्के पर्याय निघाला पाहीजे. आम्ही मा.मुख्यमंत्र्यांकडे जाऊ, मा.पालकमंत्र्यांकडे जाऊ आणि लोकांच्या मागे ठाम उभे राहू. परंतू खोटा आव आणून भारतीय जनता पार्टीला मॅनेज करायचे काम काही मंडळी करत असतीलतर त्यांना उघडे पाडायचे काम आम्ही करु. हे लक्षात ठेवा. मा.दत्ताकाका साने सांगत होते. एकेकाळी तुम्हीही त्या भागाचे नेतृत्व करत होता. तुम्हाला आठवतेय, तिथल्या लोकांना आपण न्याय मिळवून दिलात. आम्ही कोणालाही बेघर होऊ देणार नाही. त्या लोकांच्या मागे ठामपणे उभे राहू. पर्याय निघत नसेल तरीही त्यांच्यामागे ठामपणे उभे राहू. माझी या निमित्ताने सभागृहाच्या माध्यमातून कळकळीची विनंती आहे, कृपा करुन या विषयात राजकारण नका करु. राजकारण करणार असेलतर सगळ्यांची कुंडली आमच्याकडे हे लक्षात ठेवा, कोणी काय केले, किती लोकांची घरे पाडलीत, किती लोकांना फसवलेय कृपा करुन याच्या खोलात जाऊ नका. मा.महापौर साहेब,या सभागृहाच्या माध्यमातून मी तुमचे अभिनंदन करतो. याठिकाणी तीन चार तास लागलेतरी चर्चा घडवून आणायची आपली पहिल्या दिवसापासूनची मानसिकता होती. आम्ही शंभर टक्के लोकांबरोबर आहोत. लोकांच्या प्रश्नांसाठी सभागृहापासून कुठेही पळून जाणार नाही अशी आमची भावना होती. मागील मा.महापालिका सभेत हेच सांगितले होते, आजही तेच मनापासून सांगतोय की, भारतीय जनता पार्टी लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही सर्वजण तुमच्याबरोबर असू. पुढील काळात अशीच परिस्थिती निर्माण झालीतर मा.भाऊसाहेब भोईर आपण नेतृत्व केलेतरी आम्हाला वाईट वाटणार नाही. मा.योगेशभाई बहल तुम्ही नेतृत्व केलेतरी आम्हाला वाईट वाटणार नाही. परंतू मा.महापौरांच्या नेतृत्वामध्ये जे जे या विषयात दर्दी आहेत त्यांना प्रामाणिकपणे वाटतेय की शहरातल्या लोकांचा हा प्रश्न सुटला पाहीजे. मा.मुख्यमंत्र्यांबरोबर या लोकांना घेऊन बैठक घेऊ. ते यातून तोडगा काढतील. लोकांना बेघर होऊ देणार नाही असे आश्वासन मा.मुख्यमंत्री शंभर टक्के देतील. आणि या पुढील काळात हे राजकीय जोडे बाजूला ठेवून हा लोकांचा प्रश्न आहे, माझा प्रश्न आहे. या लोकांच्या प्रश्नांसाठी मला काम करायचे आहे आणि या लोकांना न्याय मिळवून द्यायचा आहे. यासाठी आपण मा.मुख्यमंत्र्यांची भेट करवून घेऊन आपल्याला या सर्वसामान्य बाधितांच्याबरोबर पुढील काळात रहायचे आहे. कोणतीही चमकेगिरी न करता आपण जर लोकांच्याबरोबर प्रामाणिकपणे राहीलोतर माहित आहे की आज ना उद्या लोकांच्या शंभर टक्के लक्षात येते की आम्ही खरेच लोकांसाठी भांडतोय. काही मंडळींना असे वाटतेय की, भारतीय जनता पार्टीची सत्ता आहे.

एखाद्या प्रश्नाच्या संदर्भात बोलले की आमचे नाव छापून आले. लोक तुम्हाला आयुष्यभर लक्षात ठेवतील. तुम्ही पेपरमध्ये नाव येण्यासाठी बोलू नका. लोकांच्या प्रश्नांसाठी लढा. लोक तुम्हाला आयुष्यभर लक्षात ठेवतील. या मा.महापालिका सभेच्या निमित्ताने मी एवढेच आश्वासन देतो की, बाधित लोकांसाठी जे जे करता येईल, ते ते करण्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत. भारतीय जनता पार्टीचे आमचे अध्यक्ष, आमदार मा.लक्ष्मण जगतात असतील,आमचे आमदार मा.महेशदादा लांडगे असतील,आमचे खासदार मा.अमर साबळे असतील, आमची प्रामाणिक भूमिका आहे, या लोकांच्याबरोबर राहणार आहोत. आमचे असे नाही की लोकांना सांगायचे एक आणि करायचे एक. आम्ही जे बोलतो ते करतो हे लक्षात ठेवा. जे बोलतो ते करण्यासाठी या बाधितांबरोबर शेवटच्या क्षणापर्यंत राहण्याचे काम फक्त भारतीय जनता पार्टीच आणि फक्त भारतीय जनता पार्टीच असणार आहे. एवढेच या निमित्ताने मी सांगतो. मा.अजित गव्हाणे यांनी सांगितले की, पुढील काळात सर्वपक्षीय समिती घेऊन या सगळ्या लोकांना बरोबर घेऊन एक शिष्ट मंडळ मा.मुख्यमंत्र्यांकडे नेऊ. त्यांना आपले म्हणणे समजून सांगू. आणि आपल्या प्रश्नासाठी त्यांना फॉलोअप करायला सांगू. एवढेच याप्रसंगी सांगतो. मी मा.महापौरांना विनंती करतो की, याठिकाणी मा.मुख्यमंत्र्यांना शिष्टमंडळ भेटावयाचे असेलतर मा.महापौर, मा.विरोधी पक्षनेते, सर्व पक्षांचे गटनेते, मा.स्थायी समिती अध्यक्षा असतील यांचे सात/आठ जणांची टिम घोषित करा. आणि नजिकच्या काळात मा.मुख्यमंत्र्यांना भेटून यासंदर्भात आपले निवेदन देऊन आपली भूमिका सांगू. यातून सकारात्मक मार्ग काढण्यासाठी आपण सगळ्यांनी राजकीय जोडे बाजूला ठेवून काम करावे अशी अपेक्षा व्यक्त करतो. मा.महापौर साहेब, आपण ही कमिटी जाहीर करा. धन्यवाद.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, पिंपरी चिंचवडमधील विशेषतः बाधित होणा-या सर्व नागरीकांच्या वतीने मी भारतीय जनता पक्षाचे मा.सिमाताई सावळे, मा.एकनाथ पवार यांनी सांगितल्याप्रमाणे ऍडव्हान्समध्ये अभिनंदन करतोय. त्यांनी ही जबाबदारी स्विकारली आहे. तुम्ही ही जबाबदारी स्विकारली आहे. तुम्ही ही जबाबदारी पार पाडा. तुमचे अभिनंदन व कौतुक करतो.

**मा.महापौर** – रिंगरोडसंदर्भात कमिटी जाहीर करणेत येते आहे. या कमिटीमध्ये मा.महापौर, मा.सभागृहनेता, मा.विरोधी पक्षनेता, मा.स्थायी समिती अध्यक्ष, मा.गटनेते शिवसेना, मा.गटनेते मनसे, मा.गटनेते अपक्ष आघाडी यांची समिती करुन मा.आयुक्त यांना आदेश देणेत येतो आहे की, याची सर्व पाहणी करुन, यावर चर्चा करुन, मा.मुख्यमंत्री यांना भेटून यावर मार्ग काढावा.

सर्व नगरसेवक, नगरसेविका, पदाधिकारी, पत्रकार, नागरीक या सर्वांचे आभार व्यक्त करुन ही सभा संपल्याचे जाहीर करतो.

--------

**(नितीन (आप्पा) प्रताप काळजे)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.

नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/१०/कावि/३६६/२०१७
दिनांक - ७/९/२०१७

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(मा. महासभा ठराव क्र. ६९ वि.क्र.-१२ दि. १८/०८/२०१७ चे ठरावात) २३

67

पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी - ४११०१८

मागासवर्गीय कल्याणकारी योजना

घटक योजना क्र. ०१

प्रपत्र "अ"

| अ.क्र. | सध्याची योजना | सुधारीत योजना |
|---|---|---|
| १ | **योजनेचे नाव - ५ वी ते १०वी मधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना** | **योजनेचे नाव - ५ वी ते १० वी मधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना** |
| | योजनेचे स्वरुप –अनुसुचीत जाती, अनुसुचीत जमाती,विमुक्त जाती भटक्या जमातींच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाची आवड निर्माण व्हावी व गुणवत्तेत वाढ व्हावी आणि त्यांना आर्थिक पाठबळ मिळावे म्हणुन या योजनेद्वारे इ. ५ वी ते १०वी मध्ये शिकत असणा-या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे. | योजनेचे स्वरुप- अनुसुचीत जाती, अनुसुचीत जमाती, विमुक्त जाती भटक्या जमातींच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाची आवड निर्माण व्हावी व गुणवत्तेत वाढ व्हावी आणि त्यांना आर्थिक पाठबळ मिळावे म्हणुन या योजनेद्वारे इ. ५ वी ते १०वी मध्ये शिकत असणा-या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे. |
| | लाभाचे स्वरुप – शिष्यवृत्ती ५ वी ते ७ वी मध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी र.रु. २०००/- आणि ८ वी ते १० वी मध्ये शिकत असणा-या विद्यार्थ्यांना र.रु.३०००/-शिष्यवृत्ती (वार्षिक) | लाभाचे स्वरुप – शिष्यवृत्ती इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांना र.रु. ४,०००/- आणि इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिकत असणा-या विद्यार्थ्यांना र.रु.६,०००/-शिष्यवृत्ती (वार्षिक) |
| | अटी व शर्ती-<br>१) अर्जदार विद्यार्थाने उपजिल्हाधिकारी/सक्षम अधिकारी यांचेकडील जातीचा दाखला सादर केला केला पाहिजे.<br>२) अर्जदार विद्यार्थ्याने वास्तव्याच्या पुराव्यार्थ रेशनिंग कार्ड, झोपडपट्टी ओळखपत्र, पालकांचे मतदार ओळखपत्र घरपट्टी पावती इ. सादर करणे आवश्यक राहिल.<br>३) ५वी ते १०वी मध्ये शिकत असणा-या विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती देण्यात येईल.विद्यार्थ्याने मागील वर्षाची गुणपत्रिका सादर करणे आवश्यक.<br>४)अर्जासोबत विद्यार्थ्याने आधारकार्डची सत्य प्रत सादर करणे आवश्यक राहिल.<br>५) अर्जदारास बँक पासबुकची सत्यप्रत जोडणे आवश्यक. | अटी व शर्ती –<br>१) सक्षम प्राधिकरणाकडील जातीचा दाखला अर्जदार विद्यार्थी / वडील किंवा अर्जदार विद्यार्थ्यांचा शाळा सोडल्याचा दाखला.<br>२) शहरातील वास्तव्याच्या पुराव्यार्थ रेशनिंग कार्ड, झोपडपट्टी ओळखपत्र, पालकांचे मतदार ओळखपत्र, टेलिफोन बिल, लाईट बिल, घरपट्टी पावती इ. पैकी एक पुराव्याची छायांकित प्रत.<br>३) इयत्ता ५वी ते १०वी मध्ये शिकत असणा-या मागासवर्गीय विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती देण्यात येईल. विद्यार्थ्याने मागील वर्षाची गुणपत्रिकेची छायांकित प्रत सादर करणे आवश्यक राहिल.<br>४)अर्जासोबत विद्यार्थ्याने आधारकार्डची छायांकित प्रत सादर करणे आवश्यक राहिल.<br>५) अर्जदाराने बँक पासबुकची छायांकित प्रत जोडणे आवश्यक. |

मा.आयुक्त

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी – १८

→

पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी - ४११०१८
मागासवर्गीय कल्याणकारी योजना
घटक योजना क्र. ०५
प्रपत्र "ब"

| अ.क्र. | सध्याची योजना | सुधारीत योजना |
|---|---|---|
| २. | योजनेचे नाव- इ.१२वी नंतरचे वैद्यकिय (MBBS) अभियांत्रिकी यासारखे पदवी परीक्षा यासारखे उच्च शिक्षण घेण्यासाठी अर्थसहाय्य (फक्त प्रथम वर्षासाठी) | योजनेचे नाव- विद्यार्थ्यांना इ.१२वी नंतरचे वैद्यकिय (MBBS,BAMS,BHMS,BDS,BUMS) आणि अभियांत्रिकी पदवी परीक्षा यासारखे उच्च शिक्षण घेण्यासाठी अर्थसहाय्य (फक्त प्रथम वर्षासाठी) |
| | योजनेचे स्वरुप – अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती भटक्या जमातींच्या विद्यार्थ्यांना १२वी नंतरचे वैद्यकिय (MBBS,BAMS,BHMS,BDS,BUMS) आणि अभियांत्रिकी पदवी परीक्षा यासारखे उच्च शिक्षण घेण्यासाठी केंद्रीय पद्धतीने सदर अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षास प्रवेश मिळाल्यास अर्थसहाय्य देण्यात येईल. | योजनेचे स्वरुप – अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती भटक्या जमातींच्या विद्यार्थ्यांना १२वी नंतरचे वैद्यकिय (MBBS,BAMS,BHMS,BDS,BUMS) आणि अभियांत्रिकी पदवी परीक्षा यासारखे उच्च शिक्षण घेण्यासाठी केंद्रीय पद्धतीने सदर अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षास प्रवेश मिळाल्यास अर्थसहाय्य देण्यात येईल. |
| | लाभाचे स्वरुप — रक्कम रु. १५,०००/- (प्रथम वर्षी) एकदाच | लाभाचे स्वरुप- रक्कम रु. २५,०००/- (प्रथम वर्षी) एकदाच |
| | अटी व शर्ती –<br>१) अर्जदार विद्यार्थी/विद्यार्थीनीने विहीत नमुन्यात अर्ज केला पाहिजे.<br>२)अर्जदाराने उपजिल्हाधिकारी/ सक्षम प्राधिका-यांनी दिलेला जातीचा दाखला सादर केला पाहिजे.<br>३)अर्जदाराने महाविद्यालयाचा दाखला (बोनाफाईड) सादर केला पाहिजे.(प्रथम वर्षी शिकत असलेबाबत)<br>४)लाभार्थ्यांचे शहरात वास्तव्य असले पाहिजे. पुराव्यार्थ रेशनिंग कार्ड, मतदार ओळखपत्र, घरपट्टी पावती इ. चा पुरावा द्यावा लागेल.<br>५)अर्जदारास शैक्षणिक अहर्ता व प्रवेशासंबंधीत कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहिल.<br>६) अर्जासोबत १२वी उत्तीर्ण असले बाबतची गुणपत्रिका सादरकरणे आवश्यक<br>७) अर्जदाराने अर्जासोबत आधारकार्डची साक्षांकित प्रत सादर करावी.<br>८)अर्जदारास बँक पासबुकची सत्यप्रत जोडणे आवश्यक. | अटी व शर्ती –<br>१) विहीत नमुन्यात लाभार्थ्याने अर्ज केला पाहिजे.<br>२) सक्षम प्राधिकरणाचा लाभार्थ्याचा किंवा वडिलांचा जातीचा दाखला किंवा अर्जदार विद्यार्थ्यांचा शाळा सोडल्याचा दाखला सादर केला पाहिजे.<br>३) अर्जदाराने महाविद्यालयाचा दाखला(बोनाफाईड) (प्रथम वर्षी शिकत असलेबाबत) सादर केले पाहिजे.<br>४) लाभार्थ्याचे शहरातील वास्तव्याच्या पुराव्यार्थ रेशनिंग कार्ड, झोपडपट्टी ओळखपत्र, पालकांचे मतदार ओळखपत्र, टेलिफोन बिल,लाईट बिल, घरपट्टी पावती इ. पैकी एक पुरावा द्यावा लागेल.<br>५)अर्जदारास शैक्षणिक अहर्ता व प्रवेशासंबंधीत कागदपत्रे सादर करावे लागतील.<br>६) अर्जासोबत १२ वी उत्तीर्ण असले बाबतची गुणपत्रिका सादर करणे आवश्यक.<br>७) अर्जदाराने अर्जासोबत आधारकार्डची प्रत सादर करावी.<br>८)अर्जदाराने बँक पासबुकची प्रत जोडणे आवश्यक. |

मा.आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी - ४११०१८
मागासवर्गीय कल्याणकारी योजना
घटक योजना क्र. ०८
प्रपत्र "क"

| अ.क्र. | सध्याची योजना | सुधारीत योजना |
|---|---|---|
| | योजनेचे नाव - परदेशातील उच्च शिक्षणासाठी निवड झालेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य. | योजनेचे नाव - परदेशातील उच्च शिक्षणासाठी निवड झालेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य |
| | योजनेचे स्वरुप – पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना अधिकाअधिक उच्च शिक्षणाच्या संधी उपल्बध व्हाव्यात. आर्थिक अडचणीमुळे परदेशातील उच्च शिक्षणासाठी निवड होऊन त्यापासुन वंचित राहु नये.अशा विद्यार्थ्यांपासुन इतरांना प्रोस्तान मिळावे याकरीता अभ्यासक्रमास येणा-या खर्चापोटी र.रु.१,००,०००/-अर्थसहाय्य देण्यात येईल. | योजनेचे स्वरुप – पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना अधिका अधिक उच्च शिक्षणाच्या संधी उपल्बध व्हाव्यात. आर्थिक अडचणीमुळे परदेशातील उच्च शिक्षणासाठी निवड होऊन त्यापासुन वंचित राहु नये. अशा विद्यार्थ्यांपासुन इतरांना प्रोत्साहन मिळावे याकरीता अभ्यासक्रमास येणा-या खर्चापोटी र.रु.१,५०,०००/-अर्थसहाय्य एकदाच देण्यात येईल. |
| | लाभाचे स्वरुप – किमान एक वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीच्या परदेशातील उच्च शिक्षणासाठी र.रु.१,००,०००/- एकदाच विद्यापिठाच्या नावे अदा करण्यात येईल. | लाभाचे स्वरुप – किमान एक वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीच्या परदेशातील उच्च शिक्षणासाठी र.रु.१,५०,०००/- एकदाच विद्यापिठाच्या नावे अदा करण्यात येईल. |
| | अटी व शर्ती-<br>१)अर्जदार पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रहिवासी असणे आवश्यक राहिल.<br>२) परदेशातील उच्च शिक्षणासाठी निवड झालेसंबंधी कागदपत्रांच्या सत्यप्रत्री सादर करणे आवश्यक राहिल.<br>३) अर्जदाराच्या वास्तव्याच्या .पुराव्यार्थ रेशनिंग कार्ड, मतदार ओळखपत्र,लाईट बिल, घरपट्टी पावती इ. पैकी एक पुरावा द्यावा लागेल.<br>४)अर्जदार विद्यार्थ्याने उपजिल्हाधिकारी/सक्षम अधिकारी यांचे कडील जातीचा दाखला सादर केला पाहिजे.<br>५)शैक्षणिक अर्हतेसंबंधी कागदपत्रे तसेच पासपोर्टची सत्यप्रत सादर करणे आवश्यक राहिल.<br>६)अर्जदार विद्यार्थ्याने अर्जासोबत आधार कार्डची सत्यप्रत सादर करणे आवश्यक राहिल.<br>७)अभ्यासक्रम सुरु झाल्यानंतर बोनाफाईड प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल.<br>८)अर्जदाराने बँक पास बुकची सत्य प्रत सादर करणे आवश्यक. | अटी व शर्ती-<br>१) अर्जदार विद्यार्थ्याने वास्तव्याच्या पुराव्यार्थ रेशनिंग कार्ड, झोपडपट्टी ओळखपत्र, पालकांचे मतदार ओळखपत्र,टेलिफोन बिल,लाईट बिल, घरपट्टी पावती इ. पैकी एक पुरावा द्यावा लागेल.<br>२) परदेशातील उच्च शिक्षणासाठी निवड झालेसंबंधी कागदपत्रांच्या प्रती सादर करणे.<br>३) प्राधिकरणाकडील अर्जदार विद्यार्थ्याचा किंवा वडिलांचा जातीचा दाखला किंवा विद्यार्थ्यांचा शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे.<br>४)शैक्षणिक अर्हतेसंबंधी कागदपत्रे तसेच लाभार्थ्यांच्या पासपोर्टची प्रत सादर करणे.<br>५) अर्जदार विद्यार्थ्याने अर्जासोबत आधार कार्डची सत्यप्रत सादर करणे आवश्यक राहिल.<br>६) अभ्यासक्रम सुरु झाल्यानंतर बोनाफाईड प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल.<br>७)अर्जदाराने बँक पास बुकची प्रत सादर करणे आवश्यक. |

मा.आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी - ४११०१८
मागासवर्गीय कल्याणकारी योजना
घटक योजना क्र. ०२
प्रपत्र "ड"

| अ.क्र. | योजनेचे नाव –सध्याची योजना | योजनेचे नाव –सुधारीत योजना |
|---|---|---|
| | इ.८वी ते १२वी मध्ये महाविद्यालयामधील मगासवर्गीय विद्यार्थ्यांना मोफत सायकल वाटप. | इ.८वी ते १२वी मध्ये शिकत असलेल्या मगासवर्गीय विद्यार्थ्यांना सायकल घेणेकामी अर्थसहाय्य. |
| | योजनेचे स्वरुप — पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात वास्तव्य करणा-या इ.८वी ते १२वी मध्ये शिकत असलेल्या मागासवर्गीय मुला/मुलींना मोफत सायकल देण्यात येईल. | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात वास्तव्य करणा-या इ.८वी ते १२वी मध्ये शिक्षण घेणा-या मागासवर्गीय मुला/मुलींना शिक्षणाची आवड निर्माण व्हावी व त्यांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने सायकल घेणेकामी र.रु. ४००० /- पर्यंत अर्थसहाय्य देण्यात येईल. |
| | कार्यक्षेत्र -पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र | कार्यक्षेत्र - पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र |
| | अटी व शर्ती- | अटी व शर्ती- |
| | १)अर्जदार विद्यार्थी हा/ही अनुसुचित जाती,अनुसुचित जमाती,विमुक्त जाती,भटक्या जाती यापैकी असावा.व त्याने सक्षम प्राधिकारी यांचेकडील जातीचा दाखला सादर केला पाहिजे.<br><br>२) विद्यार्थ्यास मागील वर्षाच्या वार्षिक परिक्षेमध्ये किमान ५० % किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळालेले असावेत.<br>३) अर्जदार विद्यार्थ्यांनें वास्तव्याच्या पुराव्यार्थ रेशनिंग क्रार्ड, झोपडपट्टी ओळखपत्र, पालकांचे मतदार ओळखपत्र घरपट्टी पावती इ. सादर करणे आवश्यक राहिल.<br>४)संबंधित शाळेच्या मुख्यध्यापकाचे/ प्राचार्यांचे विद्यार्थी शिकत असलेबाबत शिफारस पत्र आवश्यक.<br>५) सदर योजनेचा लाभ हा एकदाच देता येईल.<br>६) अर्जादाराने अर्जासोबत आधारकार्डची साक्षांकित प्रत सादर करावी. | १) अर्जदार विद्यार्थी हा/ही अनुसुचित जाती,अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, ,अनुसुचित जमाती,विमुक्त जाती, भटक्या जाती यापैकी असावा व यासाठी सक्षम प्राधिकरणाकडील विद्यार्थ्याचा किंवा वडिलांचा जातीचा दाखला किंवा अर्जदार विद्यार्थ्यांचा शाळा सोडल्याचा दाखला सादर केला पाहिजे.<br>२) विद्यार्थ्यास मागील वर्षाच्या वार्षिक परिक्षेमध्ये किमान ५० % किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळालेले असावेत.<br>३) अर्जदार विद्यार्थ्याने वास्तव्याच्या पुराव्यार्थ रेशनिंग क्रार्ड, झोपडपट्टी ओळखपत्र, पालकांचे मतदार ओळखपत्र,टेलिफोन बिल,लाईट बिल, घरपट्टी पावती इ. पैकी एक पुरावा द्यावा लागेल.<br>४) संबंधित शाळेच्या मुख्यध्यापकाचे/प्राचार्यांचे विद्यार्थी शिकत असलेबाबत शिफारस पत्र आवश्यक.<br>५) सदर योजनेचा लाभ हा एकदाच देय राहील.<br>६) अर्जादाराने अर्जासोबत आधारकार्डची प्रत सादर करावी.<br>७)लाभार्थ्यांने खरेदी करावयाची सायकल ही सर्व साधारणपणे खालील परिमाणाचे /स्पेसिफिकेशनचे व नामांकित कंपनीची असावी.<br>UNSEX MODEL<br>Wheel Size -26"<br>Frame Hight – 18"<br>सोबत – सीट, हाफ चैन कव्हर, साईड स्टॅन्ड,कॅरीयर.<br>८) सायकल खरेदीच्या पावतीतील रक्कम किंवा र.रु. ४०००/- पर्यंत यापैकी जी रक्कम कमी असेल ती अर्जदाराच्या /पालकाच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल.<br>९)लाभार्थ्यांने उपरोक्त परीमाणाप्रमाणे सायकल खरेदी केल्याची पावती (GST क्रमांकासहीत) अर्जासोबत जोडणे आवश्यक.<br>१०) अर्जदारास बँक पासबुकची प्रत जोडणे आवश्यक.<br>११)अर्जदाराने खोटी/चुकीची कागदपत्रे/ खरेदी पावती सादर केल्याचे आढळुन आल्यास. खोटी कागदपत्रे सादर केले बाबत आढळल्यास कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. |

(स्वाक्षरी)
मा.आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८

(मा. मनपा सभा ठराव क्र. ८० स.क्र. 13 दि. २०।०।२०१८ चे प्रमाणे)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका-४११०१८
नागरवस्ती विकास योजना विभाग
इतर कल्याणकारी योजना

प्रपत्र 'अ'

| सध्याची योजना | प्रस्तावित दुरुस्त योजना |
|---|---|
| योजनेचे नाव- इयत्ता १ ली ते पदव्युत्तर पर्यंत शिक्षण घेणा-या महापालिका हद्दीतील अनाथ /निराधार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे.<br>योजनेचे स्वरूप- अनाथ/ निराधार विदयार्थ्यांना शिक्षणाची आवड निर्माण होउन त्यांची गुणवत्ता वाढीस लागावी. तसेच त्यांची शैक्षणीक उन्नती व्हावी यासाठी शिष्यवृत्ती देणे. | योजनेचे नाव- इयत्ता १ ली ते पदव्युत्तर पर्यंत शिक्षण घेणा-या महापालिका हद्दीतील अनाथ / निराधार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे.<br>योजनेचे स्वरूप- - अनाथ/ निराधार विदयार्थ्यांना शिक्षणाची आवड निर्माण होउन त्यांची गुणवत्ता वाढीस लागावी. तसेच त्यांची शैक्षणीक उन्नती व्हावी यासाठी शिष्यवृत्ती देणे. |
| लाभाचे स्वरुप-(शिष्यवृत्ती-इयत्ता) रक्कम रुपये<br>१) इयत्ता १ ली ते ९ वी र.रू. ४०००/-<br>२) इयत्ता १० वी ते १२ वी र.रू. ५०००/-<br>३) महाविद्यालयीन शिक्षण (प्रथम वर्ष ते तृतीय वर्षाकरीता) पदवीपर्यंत र.रू. ६०००/-<br>४) पदवीनंतरचे शिक्षण र.रू. ८,०००/- | लाभाचे स्वरुप- (शिष्यवृत्ती इयत्ता) रक्कम रुपये<br>१) इयत्ता १ ली ते ९वी र.रू १०,०००/-<br>२) इयत्ता १० वी ते १२ वी र.रू. १२,०००/-<br>३) महाविद्यालयीन शिक्षण (प्रथम वर्ष ते तृतीय वर्ष) पदवीपर्यंत र.रू.१५,०००/-<br>४) पदवीनंतरचे शिक्षण र.रू. २०,०००/- |
| प्रमुख अटी व शर्ती –<br>१) अर्जदाराने शिष्यवृत्तीसाठी विहीत नमुन्यात अर्ज करणे आवश्यक.<br>२) विद्यार्थी मागील वर्षाच्या वार्षीक परिक्षेत उत्तीर्ण झाला असला पाहिजे. त्यासाठी गुणपत्रक आवश्यक.<br>३) सदर अनाथ, निराधार विद्यार्थी संस्थेत रहात असल्याबाबतचा सदर संस्था प्रमुखांचा दाखला अर्जासोबत सादर करणे आवश्यक.<br>४) अनाथ / निराधार विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचा धनादेश संबंधीत संस्थेच्या नावे अदा करण्यात येईल. अर्जदाराने बँक पासबुकची सत्यप्रत जोडावी.<br>५) अर्जासोबत संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.<br>६) अर्जासोबत विद्यार्थ्याचे आधार कार्ड जोडणे आवश्यक आहे.<br>७) विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती देण्याचा अथवा न देणे या बाबतचा अंतिम अधिकार मा.आयुक्त यांना राहील. | प्रमुख अटी व शर्ती –<br>१) अर्जदाराने शिष्यवृत्तीसाठी विहीत नमुन्यात अर्ज करणे आवश्यक.<br>२) विद्यार्थी मागील वर्षाच्या वार्षीक परिक्षेत उत्तीर्ण झाला असला पाहिजे. त्यासाठी गुणपत्रक आवश्यक.<br>३) सदर अनाथ, निराधार विद्यार्थी निवासी संस्थेत रहात असल्यास संस्था प्रमुखांचा दाखला अर्जासोबत सादर करणे आवश्यक तसेच अर्जदार विद्यार्थी नातेवाईक पालकांकडे रहात असल्यास त्या पालकांचा मनपा हद्दीतील वास्तव्याचा पुरावा (रेशनकार्ड,लाईट बील, फोटो पास, मतदान ओळखपत्र, टेलीफोन बील, घर पटटी पावती) इ.पैकी एक पुरावा सादर करावा लागेल व त्या विद्यार्थ्यांचा आई वडिलांचे मुत्यु दाखले सोबत जोडणे आवश्यक.<br>४) सदर अनाथ, निराधार विद्यार्थी निवासी संस्थेत रहात असल्यास शिष्यवृत्तीचा धनादेश संस्थेच्या नावे किंवा अर्जदार विद्यार्थी नातेवाईक पालकांकडे रहात असल्यास त्यांच्या नावे अदा करणेत येईल. अर्जदाराने बँक पासबुकची सत्यप्रत जोडावी.<br>५) अर्जासोबत संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.<br>६) अर्जासोबत विद्यार्थ्याचे आधार कार्ड जोडणे आवश्यक आहे.<br>७) विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती देण्याचा अथवा न देणे या बाबतचा अंतिम अधिकार मा.आयुक्त यांना राहील. |

14

पिंपरी चिंचवड महानगरपालिका-४११०१८
नागरवस्ती विकास योजना विभाग
इतर कल्याणकारी योजना
प्रपत्र 'ब'

| सध्याची योजना | प्रस्तावित दुरुस्त योजना |
|---|---|
| योजनेचे नाव- एच.आय.व्ही. HIV / एड्स बाधित मुलांचा सांभाळकरणा-या पालकांना / संस्थाना अर्थसहाय्य देणे.<br><br>योजनेचे स्वरूप- पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील ० ते १८ या वयोगटातील एच.आय.व्ही./ एड्स (HIV /AIDS) बाधित मुलांचे शारिरीक आरोग्य सुधारण्यासाठी आहार घेणेकामी आर्थिक मदत. | योजनेचे नाव- एच.आय.व्ही. HIV / एड्स बाधित मुलांचा सांभाळ करणा-या पालकांना / संस्थाना अर्थसहाय्य देणे.<br><br>योजनेचे स्वरूप- पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील ० ते १८ या वयोगटातील एच.आय.व्ही./ एड्स (HIV /AIDS) बाधित मुलांचे शारिरीक आरोग्य सुधारण्यासाठी आहार घेणेकामी आर्थिक मदत. |
| लाभाचे स्वरुप- प्रति लाभार्थी दरमहा रक्कम रुपये २,०००/- | लाभाचे स्वरुप- प्रति लाभार्थी दरमहा र.रू. २,५००/- |
| प्रमुख अटी व शर्ती –<br><br>१) एच.आय.व्ही. /एड्स बाधित मुलांचा संभाळ करणा-या पालकांनी मनपा हद्दीतील वास्तव्याचा पुरावा (रेशनकार्ड,लाईट बील, फोटो पास, मतदान ओळखपत्र, टेलीफोन बील, घर पटटी पावती) इ.पैकी एक पुरावा सादर करणे आश्यक.<br><br>२) संस्थेच्या बाबतीत अर्जदार संस्था ही सार्वजनिक विश्वस्त कायदा अथवा संस्था नोंदणी अधिनियम १९६० अन्वये नोंदणीकृत असणे आवश्यक. तसेच संस्थेमध्ये ही मुले निवासी असावी. सदर संस्थेचे कार्यक्षेत्र पिंपरी चिंचवड शहर हे असावे.<br><br>३) मुलांच्या वयाचा पुरावा सादर करणे आवश्यक. (जन्मदाखला)<br>४) अर्जदार हा एच.आय.व्ही./ एड्स बाधित असल्याचे मनपा किंवा शासकीय रूग्णालयाकडील वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक.<br><br>५) एच.आय.व्ही. बाधित मुलांनी व सांभाळ करणा-या पालकांनी आधारकार्ड सादर करणे आवश्यक.<br><br>६) लाभार्थींना लाभ देण्याचा अथवा न देणे या बाबतचा अंतिम अधिकार मा.आयुक्त यांना राहील. | प्रमुख अटी व शर्ती –<br><br>१) एच.आय.व्ही. /एड्स बाधित मुलांचा संभाळ करणा-या पालकांनी मनपा हद्दीतील वास्तव्याचा पुरावा (रेशनकार्ड,लाईट बील, फोटो पास, मतदान ओळखपत्र, टेलीफोन बील, घर पटटी पावती) इ.पैकी एक पुरावा सादर करणे आश्यक.<br><br>२) संस्थेच्या बाबतीत अर्जदार संस्था ही सार्वजनिक विश्वस्त कायदा अथवा संस्था नोंदणी अधिनियम १९६० अन्वये नोंदणीकृत असणे आवश्यक. तसेच संस्थेमध्ये ही मुले निवासी असावी. सदर संस्थेचे कार्यक्षेत्र पिंपरी चिंचवड शहर हे असावे.<br><br>३) मुलांच्या वयाचा पुरावा सादर करणे आवश्यक. (जन्मदाखला)<br>४) अर्जदार हा एच.आय.व्ही./ एड्स बाधित असल्याचे मनपा किंवा शासकीय रूग्णालयाकडील वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक.<br><br>५) एच.आय.व्ही. बाधित मुलांनी व सांभाळ करणा-या पालकांनी आधारकार्ड सादर करणे आवश्यक.<br><br>६) लाभार्थींना लाभ देण्याचा अथवा न देणे या बाबतचा अंतिम अधिकार मा.आयुक्त यांना राहील. |

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८.

(मा. मनपा सभा ठराव क्रं.[17] ८०१ वि.क्र. १४ दि. २१/०८/२०१७चे अवगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी-१८

नागरवस्ती विकास योजना विभाग

इतर कल्याणकारी योजना

प्रपत्र 'क'

---

नविन प्रस्तावित योजना

| |
|---|
| योजनेचे नाव – पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील एच.आय.व्ही./ एड्स (HIV /AIDS) बाधित व्यक्तींना पी.एम.पी.एम.एल. बस चे पासेस मोफत देणे. |
| योजनेचे स्वरूप – महानगरपालिका हद्दीतील एच.आय.व्ही. / एड्स बाधित व्यक्तींना स्थानिक प्रवासासाठी पी.एम.पी.एम.एल. च्या सर्व मार्गावरील पासेस मी कार्डसह मोफत उपलब्ध करून देणे व त्या अनुषंगाने योग्य रक्कम प्रतिवर्ष पी.एम.पी.एम.एल. ला अदा करणे. |
| योजनेच्या – अटी व शर्ती |
| १) अर्जदाराचे पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात वास्तव्य असणे आवश्यक आहे. त्याकरिता वास्तव्याच्या पुराव्यार्थ रेशनिंग कार्ड, मतदार ओळखपत्र, मिळकत कर पावती, टेलीफोन बील, लाईट बील, झोपडपट्टी फोटो पास इ. पैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक. |
| २) अर्जदाराचे आधारकार्ड आवश्यक. |
| ३) सदरचे पासेस हे पी.एम.पी.एम.एल. च्या सर्व मार्गासाठी असतील. |
| ४) अर्जदार हे एच.आय.व्ही./ एड्स बाधित असल्याचे मनपा किंवा शासकीय रूग्णालयाकडील वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक. |
| ५) सदरचे पास एकावर्षाकरिता राहील. दरवर्षी हयात असले बाबत दाखला सादर करून पासेस नुतनीकरन करून घेणे आवश्यक. |
| ६) लाभार्थींना लाभ देण्याचा अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार मा.आयुक्त, यांना राहील. |

आयुक्त

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी-१८